राजभाषा परिचय

सत्यमेव जयते

भाषा संचालनालय
महाराष्ट्र शासन

पहिली आवृत्ती १९६८

दुसरी आवृत्ती १९८२

पुनर्मुद्रण १९८८

प्रकाशक :

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य, भाषा संचालनालय,
नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई–४०० ०३२.

मुद्रक :

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय,
वाई–४१२ ८०३.

मराठी भाषा प्रशिक्षण सल्लागार मंडळ

अध्यक्ष

डॉ. वा. ना. पंडित

सदस्य

डॉ. श्री. म. पिंगे

प्रा. चंद्रकुमार डांगे

श्री. ल. नी. छापेकर

श्री. म. वि. अकोलकर

श्री. अ. कु. मुजुमदार

श्री. वृ. प्रभाकर

श्री. शिवरामकृष्णन्

डॉ. ना. के. उपासनी

सदस्य-सचिव

श्री. वे. से. गजेंद्रगडकर

प्रा स्ता वि क

महाराष्ट्र शासनाचे भाषाविषयक धोरण कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने दि. १ मे १९६६ पासून महाराष्ट्र राज्यातील सर्व शासकीय कामकाजास मराठी राजभाषा अधिनियम लागू करण्यात आला आहे. अधिनियम म्हटला की, त्याच्या काटेकोर पालनाची जबाबदारी सर्व संबंधितांवर येऊन पडते. महाराष्ट्र शासनाचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी यापुढे आपल्या कार्यालयीन व्यवहारात मराठी राजभाषेचाच वापर करावा अशी शासनाचीच नव्हे तर जनतेचीसुद्धा अपेक्षा आहे, आणि ती रास्त आहे. ही अपेक्षा फलद्रूप व्हावी म्हणून शासनाने प्रथम या भाषिक परिवर्तनामागील विविध अडचणी जाणून घेतल्या आणि त्या दूर करण्यासाठी भाषा संचालनालयाद्वारा अनेक विधायक योजना कार्यान्वित केल्या. अमराठी भाषिकांचे मराठी प्रशिक्षण ही त्यांपैकीच एक योजना होय.

महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील मराठी न जाणणाऱ्या अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे प्रमाण दुर्लक्षिता येण्यासारखे नाही. मराठीकरणाचा प्रयोग सुरळीतपणे व यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी अमराठीभाषी कर्मचाऱ्यांना मराठी राजभाषेची ठेवण, तिची वैशिष्ट्ये यांचे प्राथमिक ज्ञान करून देणे महत्त्वाचे आहे. प्रारंभीच्या अवस्थेत तरी ही जबाबदारी आपलीच आहे असे शासनाने मानले; आणि त्या दृष्टीने या राज्याच्या चारही विभागात मराठी प्रशिक्षणाचे वर्ग सुरू केले. गेल्या तीन वर्षात हे प्रशिक्षण देत असताना ज्या अडचणी प्रत्ययास आल्या त्यांचा बारकाईने अभ्यास करून अमराठी भाषिकांना उपयुक्त होईल अशा रीतीने प्रस्तुत "राजभाषा परिचय" या पुस्तकाची रचना करण्यात आली आहे.

अमराठी भाषिकांना मराठीचा परिचय करून घेणे हा विषय तसा नवीन नाही. इंग्रजी अमदानीत इंग्रज अधिकाऱ्यांनी, जनतेशी संपर्क साधता येईल इतपत स्थानिक बोलीचे ज्ञान एतद्देशीय पंडितांकडून करून घेतल्याचे पुरावे

उपलब्ध आहेत. परंतु आता मराठीच्या एवढ्या जुजबी ज्ञानाने कार्यभाग साधणार नाही. सामान्य व्यवहारास आवश्यक इतकी मराठीची वरबसल्या तोंडओळख करून देणारी पुस्तके बाजारात उपलब्ध नाहीत असे नाही. परंतु त्या पुस्तकांचे उद्दिष्ट अगदीच मर्यादित आहे. सर्वस्पर्शी शासन-व्यवहारासाठी लागणाऱ्या भाषेची गरज भागविण्यास ती पुस्तके तोकडी पडतात असा अनुभव आहे. याचे कारण हे की, आजची मराठीची रुंदावलेली कक्षा त्या पुस्तककर्त्यांच्या कल्पनेत नव्हती. मराठीचे प्राथमिक ज्ञान सामान्य व्यवहार निभावून नेऊ शकेल, परंतु शासनव्यवहाराला ते पुरेसे होणार नाही. शासनव्यवहाराची विशिष्ट लेखनप्रणाली, तांत्रिक परिभाषा, पत्रव्यवहाराचे ठराविक नमुने, इत्यादी बाबी विचारात घेऊनच मराठीच्या प्रशिक्षणाची दिशा ठरवावी लागते.

अमराठी भाषिकांस मराठी शिकवणे, हे सकृद्दर्शनी सुलभ भासले तरी प्रत्यक्षात ती एक मोठीच समस्या असल्याचे अनुभवास आले आहे. शाळकरी मराठीभाषी मुलांना शिकवणे आणि मराठीव्यतिरिक्त अन्य भाषांचा अभ्यास झालेल्या प्रौढ अमराठी भाषिकांना शिकवणे यात महदंतर आहे. अनुभव असा आहे की, अमराठीभाषी प्रौढांना आपापल्या भाषांच्या व्याकरणादी अंगांचे सम्यक ज्ञान असते; आणि मराठी भाषा शिकत असताना तिची स्वभाषेशी व अन्य भाषांशी तुलना करण्याकडे त्यांचा कल असतो. नेहमी कानावर पडणाऱ्या बोलभाषेचाही त्यांच्या मनावर नकळत परिणाम होत असतो. अशा प्रकारच्या या तौलनिक अभ्यासातून निरनिराळ्या शंका उपस्थित होत जातात. निदेशकाला त्या शंकांचे समाधानकारक निरसन करणे भाग असते. अशा वेळी, मराठीची प्रकृती, तिचे व्याकरण, वाक्प्रचार यांबाबत एरवी न जाणवणारी गुंतागुंत अधिकच जाणवू लागते. ही गुंतागुंत सोडवण्यास तसेच अमराठी भाषिकांच्या अध्ययन-अध्यापनाच्या इतर समस्या सोडवण्यासही प्रस्तुत पुस्तक अत्यंत उपयुक्त ठरेल असे वाटते.

"राजभाषा परिचय" हे पुस्तक वरवर जरी चाळले तरी त्याच्या रचनेचा भरभक्कम पाया गेली तीन वर्षे प्रशिक्षण वर्गात मिळालेल्या अनुभवातूनच

घातला गेला आहे हे स्पष्ट होईल. या पुस्तकाची प्राथमिक आखणी भूतपूर्व भाषा उपसंचालक डॉ. ना. के. उपासनी व श्री. शं. कृ. सोहोनी यांनी केलेली होती पण नंतर त्या दोघांची शिक्षण विभागात उच्च पदावर नियुक्ती झाल्यामुळे हे पुस्तक पूर्ण होऊ शकले नाही. या पुस्तकाच्या सध्याच्या रचनेचे बहुतांश श्रेय श्री. वे. से. गजेंद्रगडकर, भाषा उपसंचालक, यांनाच आहे. श्री. गजेंद्रगडकर हे एक उत्तम शिक्षक आहेत. शिक्षणक्षेत्रातील त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाची बैठक या पुस्तकास लाभलेली आहे. शिक्षणशास्त्राच्या ठरीव सिद्धांतांपेक्षा त्यांना या विषयाबाबत असलेले व्यावहारिक ज्ञान या पुस्तकाच्या रचनेस अधिक उपकारक ठरले आहे. मराठी प्रशिक्षण मंडळाच्या मान्यवर सदस्यांनी देखील वेळोवेळी आपले बहुमोल मार्गदर्शन देऊन या पुस्तकाच्या मौलिकतेत भर घालण्यास मदत केली आहे. प्रस्तुत पुस्तक प्रसिद्ध करून शासनाच्या मराठीकरणाच्या उपक्रमात सहकार्य दिल्याबद्दल मंडळाचे सर्व सदस्य व विशेषत: श्री. गजेंद्रगडकर यांचे शासन हार्दिक आभार मानते.

द्वा. रा. प्रधान,
मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन.

मुंबई
दिनांक १५ नोव्हेंबर १९६६.

अनुक्रमणिका

भाग १

वर्णमाला-परिचय व अंकलेखन

१. मुळाक्षर परिचय

२. उच्चारवैशिष्टचे

३. जोडाक्षरे

४. अंकलेखन व संख्यामांडणी

१

मूळाक्षर परिचय

देवनागरी मुळाक्षरे (DEVANAGARI ALPHABETS)

स्वर (Vowels)

ŭ	â	î	ē	o͝o	o͞o	r	ĕ	ă	ī	ō	ŏ	ou	ŭm	ŭh
अ	आ	इ	ई	उ	ऊ	ऋ	ए	अॅ	ऐ	ओ	ऑ	औ	अं	अः

व्यंजने (Consonants)

कण्ठ्य वर्ण	k	kh	g	gh	ng	
(Gutturals)	क्	ख्	ग्	घ्	ङ्	(1)
तालव्य वर्ण	ch	chh	j	jh		
(Palatals)	च्	छ्	ज्	झ्	ञ्	(2)
मूर्धन्य वर्ण	ṭ	ṭh	ḍ	ḍh	ṇ	
(Cerebrals)	ट्	ठ्	ड्	ढ्	ण्	(3)
दन्त्य वर्ण	t	th	d	dh	n	
(Dentals)	त् (4)	थ्	द्	ध् (5)	न्	
ओष्ठ्य वर्ण	p	ph	b	bh	m	
(Labials)	प्	फ्	ब्	भ्	म्	
अंतःस्थ वर्ण	y	r	l	w		
(Semi-vowels)	य्	र्	ल्	व्		
उष्म वर्ण	sh	ṣh	s	h		
(Sibilants)	श्	ष्	स्	ह		
	ḷ	kṣh	dny			
	ळ्	क्ष्	ज्ञ्			

The correct pronunciation of lettres marked at (1), (2), (3), (4) and (5) will be as follows : (1) ङ् in वाङ्मय, (2) ञ् as in वाञ्छा, (3) ण्, as in पाणी, (4) त् as in तलवार, (5) ध as in धन.

By adding the twelve vowels except ऋ to each of the consonants, twelve different sounds are produced as under :

(1) k + ŭ = ka (Cult)
क् + अ = क (कर, कमल)

(2) k + â = ka (Car)
क् + आ = का (कागद, काका)

(3) k + ĭ = ki (Kit)
क् + इ = कि (किरण, किनारा)

(4) k + ē = kee (key)
क् + ई = की (कीटक, कीड)

(5) k + ŏo = ku (Cushion)
क् + उ = कु (कुमार, कुशल)

(6) k + ōo = koo (Cool)
क् + ऊ = कू (कूट, कूप)

(7) k + ĕ = ke (Case)
क् + ए = के (केर, केस)

(8) k + ă = ka (Catholic)
क् + अॅ = कॅ (कॅरेट)

(9) k + i = kai (Kaisar)
क् + ऐ = कै (कैरी, कैची)

(10) k + ō = koa (Coat)
क् + ओ = को (कोट, कोर)

(11) k + ô = ko (Comrade)
क् + ऑ = कॉ (कॉन्व्हेंट, कॉकटेल)

(12) k + ou = kau (Council)
क् + औ = कौ (कौतुक, कौल)

(13) k + ŭm = kam (Company)
क् + अं = कं (कंप, कंबर)

(14) k + ŭh = kah
क् + अः = कः (कःपदार्थ, कःचित–कश्चित)

Thus, we get क, का, कि, की, कु, कू, के, कॅ, कै, को, कॉ, कौ, कं, कः Similarly each consonant can produce its twelve sounds as above. These twelve sounds of every consonant are known as a series of twelve letters or a बाराखडी (Barakhadi) of the same consonant.

The vowel ऋ (r) is present in the following words : ऋषि, ऋतु, ऋण, कृपा, कृति, पृथ्वी, पृष्ठ.

२

उच्चारवैशिष्ट्ये (Peculiarities of Pronunciation)

A few of the consonants offer some difficulties in the course of their pronunciations. The mode of their pronunciation is indicated below :

(1) Consonant ङ्.—This consonant does not occur in Marathi as an independent consonant. It occurs in the word वाङ्मय (literature). In some of the words it optionally takes the place of a nasal, *e.g.*, अंक (Number) written as अंक or अङ्क. Other examples of this kind are (1) पतंग (Kite) written as पतङ्ग or पतंङ्ग, (2) अंग (Body) written as अङ्ग or अङ्ग and (3) रंग (Colour) written as रङ्ग or रङ्ग.

(2) Consonant ञ्.—This consonant also does not occur as an independent consonant in Marathi. It occurs in the words वाञ्छा (Desire), काञ्चन (Gold) and पञ्जर (Cage) written optionally also as, वांछा, कांचन and पंजर, respectively.

(3) Consonant च्.—This has two different sounds : (1) The first च् is peculiar to the Marathi language and has no corresponding sound in English. The words चल, चाल, चमचा, तुमचा, चळवळ clearly indicate the the first type. (2) The second च् (*Ch* as in chin, chalk, church, much) is indicated in the words चार, चतुर, चाळीस.

(4) Consonant छ्.—This has only one sound (as in *chh*). It is indicated in the words छटा, छाती, छाया, छकडा.

(5) Consonant ज्.—This has two different sounds : (1) ज्. (as in boys, cows, dogs) is indicated in the words जमा, जहाज, वजन. जनावर. (2) ज्. (as in jug, jar, judge, jasmine, joke) is indicated in the words जग, जय, जन्म, जलद, जीव.

(6) Consonant झ्.—This has also two sounds : (1) झ् (as in czar, zone, zoo) is indicated in the words झगा, झरा, झाड, झोप. (2) झ् (as in zest, zebra, zinc) occurs in झकास and झीज.

(7) Consonants श्, ष्, स्.—These are all sibilants. They belong to different classes of consonants. (1) श् is a palatal sound and belongs to the palatal group च्, छ्, ज्, झ्. It occurs in the words शहाणा, शहामृग, शेवट, शिक्षा, शोक, शक्ति, शपथ, शरीर, शहर, शिखर. (2) ष् is a cerebral sound and belongs to the group of the cerebrals ट्, ठ्, ड्, ढ्. It occurs in the words भाषा, षट्कोण, विषाद, विषम, गोष्ट. (3) स् is a dental sound and belongs to the group of the dentals त्, थ्, द्, ध्. It occurs in the words सरकार, सचिव, सादर, सकस, सदर, संमती, सहकार, सेवा, सही.

(8) Consonant ळ्.—This has no corresponding sound in English. It never occurs at the beginning of a word in Marathi. Its correct use can only be pointed out in the words मंडळ, सरळ, जवळ, दळणवळण, काळ, वेळ, सोळा, दुष्काळ, शाळा.

जोडाक्षरे (Conjunct Consonants)

A consonant may combine with one or more consonants and produce a conjunct consonant. The conjunct is called a जोडाक्षर in Marathi. In the course of the combination the initial consonant (except क्, छ्, ट्, ठ्, ड्, ढ्, द्, फ्, र्, ल्, ह्, ळ्) loses its perpendicular (दंड) and the second or the last consonant retains its full form, *e. g.*, स् + त = स्त (as in अस्त). Here the initial consonant स् drops its perpendicular and the second consonant त retains its full form. Take, *e. g.*, the combination स् + त् + या = स्त्या (as in कुस्त्या). Here the first and the second consonants lose their perpenpiculars and the last consonant या retains its complete form.

The following illustrations will indicate the nature and the variety of combinations (optional forms of the words have also been given): (1) A combination of the same consonants, *e. g.*, (*a*) न् + न = न्न as in अन्न; (*b*) ट् + ट = ट्ट or ट्ट as in हट्ट or हट्ट; (*c*) च् + च = च्च as in उच्च. Other examples of this type are सज्जन, नक्कल, पत्ता, टप्पा, वित्त, हिम्मत, सत्ता, खिन्न.

(2) A combination of different consonants, *e. g.*, (*a*) क् + त = क्त or क्त as in उक्त or उक्त; (*b*) ग् + नि = ग्नि or ग्नि as in अग्नि or अग्नि; (*c*) त् + न = त्न as in यत्न; (*d*) क् + व = क्व or क्व as in क्वचित or क्वचित. Other clear examples of this type are कष्ट अभ्यास, सामान्य, गद्य, स्वस्थ, म्हणून, त्यांना, विस्तव, ज्वर, पाठ्य, शक्य, सप्ताह, पद्म or पद्म, पथ्य, स्वभाव, व्याकरण, धनाढ्य, माध्यम, उष्ण, स्नान, वाणिज्य, प्रसिद्ध, मुख्य, न्याय, पस्तीस, दुग्ध, लिफ्ट, सत्य, रुग्णालय, वैकल्पिक, नैमित्तिक, स्वच्छ, तथ्य; स्थापना.

(3) Combinations of consonants with र्.—These are of four types: (*a*) When र् forms the first member of the combination it is written as ˘ on the top of the following consonant, *e. g.*, र् + य = र्य as in सूर्य; र् + म = र्म as in कर्मचारी; र् + ता = र्ता as in कर्ता. Other examples of this type are कार्य, वार्ता, अर्थ, पूर्व, चर्चा, वर्ष, सौंदर्य, तर्क, सर्व.

(*b*) When र् forms the last member of a combination, it is changed to a slanting stroke to be given at the the foot of letter preceding or the preceding consonant is written without the perpendicular and र added to it, *e.g.*, म् + र = म्र or म्‍र as in नम्र or नम्‍र; क् + र = क्र or क्‍र as in शुक्रवार or शुक्‍रवार; प् + र = प्र or प्‍र as in प्रकार or प्‍रकार. Other examples of this type are शुभ्र or शुभ्‍र, फेब्रुवारी or फेब्‍रुवारी, एप्रिल or एप्‍रिल, ताम्रपट or ताम्‍रपट, रात्र or रात्‍र, अग्र or अग्‍र, शीघ्र or शीघ्‍र, व्रण or व्‍रण, ध्रुव or ध्‍रुव.

Note.—श् + र = श्र or श्‍र as in श्रम or श्‍रम (श् optionally assumes श्‍ in combination with a consonant).

(*c*) The final र in combination with cerebrals ट्, ठ्, ड्, ढ् assumes two strokes, *e. g.*, ट् + र = ट्र as in राष्ट्र, महाराष्ट्र, ड्रील, ड्रम, ड्रामा.

(*d*) र् assumes a peculiar form in the case of words दुसऱ्या, तिसऱ्या, पांढऱ्या, गोऱ्या, अधिकाऱ्याला. Here the original words are दुसरा, तिसरा, पांढरा, गोरा and अधिकारी, respectively; while converting these into सामान्यरूप s or oblique forms, the final आ or ई in these words changes to या. Such combinations of र् and या only are written as ऱ्या, when र् assumes a short horizontal line. There are some original words which contain such combinations, *e. g.*, कऱ्हाड, वऱ्हाड, बिऱ्हाड, गुऱ्हाळ, चऱ्हाट.

(4) Combinations of more than two consonants : There are very few words, in Marathi, in which more than two consonants combine at a time, *e. g.*, ष् + ठ् + य = ष्ठ्य as in ओष्ठ्य. Other examples of this type are कुस्त्या, उच्छ्वास, सामर्थ्य, ऊर्ध्व, मत्स्यालय, मर्त्य, विन्ध्य, निन्द्य, कण्ठ्य, दन्त्य, पार्श्वभूमी.

(5) Two or more combinations of consonants (जोडाक्षरे) in the same word : There are words in Marathi which contain two or more combinations of consonants at a time, in the same word. The following are the illustrations :

स्वर्ग, स्वस्थ, श्रेष्ठ, ग्रस्त, त्रस्त, प्रश्न, विद्यार्थी, सह्याद्री, उत्कर्ष, निष्कर्ष, प्रपत्र, व्यत्यय, स्थापत्य, वास्तव्य, वात्सल्य, दुर्भाग्य.

४

अंकलेखन व संख्यामांडणी

अंकलेखन

1	12	23	34
एक	बारा	तेवीस	चौतीस
१	१२	२३	३४
2	13	24	35
दोन	तेरा	चोवीस	पस्तीस
२	१३	२४	३५
3	14	25	36
तीन	चौदा	पंचवीस	छत्तीस
३	१४	२५	३६
4	15	26	37
चार	पंधरा	सव्वीस	सदतीस
४	१५	२६	३७
5	16	27	38
पाच	सोळा	सत्तावीस	अडतीस
५	१६	२७	३८
6	17	28	39
सहा	सतरा	अठ्ठावीस	एकोणचाळीस
६	१७	२८	३९
7	18	29	40
सात	अठरा	एकोणतीस	चाळीस
७	१८	२९	४०
8	19	30	41
आठ	एकोणीस	तीस	एकेचाळीस
८	१९	३०	४१
9	20	31	42
नऊ	वीस	एकतीस	बेचाळीस
९	२०	३१	४२
10	21	32	43
दहा	एकवीस	बत्तीस	त्रेचाळीस
१०	२१	३२	४३
11	22	33	44
अकरा	बावीस	तेहतीस	चव्वेचाळीस
११	२२	३३	४४

45
पंचेचाळीस
४५

46
शेहेचाळीस
४६

47
सत्तेचाळीस
४७

48
अठ्ठेचाळीस
४८

49
एकोणपन्नास
४९

50
पन्नास
५०

51
एकावन्न
५१

52
बावन्न
५२

53
त्रेपन्न
५३

54
चौपन्न
५४

55
पंचावन्न
५५

56
छप्पन्न
५६

57
सत्तावन्न
५७

58
अठ्ठावन्न
५८

59
एकोणसाठ
५९

60
साठ
६०

61
एकसष्ट
६१

62
बासष्ट
६२

63
त्रेसष्ट
६३

64
चौसष्ट
६४

65
पासष्ट
६५

66
सहासष्ट
६६

67
सदुसष्ट
६७

68
अडुसष्ट
६८

69
एकोणसत्तर
६९

70
सत्तर
७०

71
एकाहत्तर
७१

72
बाहत्तर
७२

73
त्र्याहत्तर
७३

74
चौऱ्याहत्तर
७४

75
पंचाहत्तर
७५

76
शहात्तर
७६

77
सत्त्याहत्तर
७७

78
अठ्ठ्याहत्तर
७८

79
एकोणऐंशी
७९

80
ऐंशी
८०

81
एक्याऐंशी
८१

82
ब्याऐंशी
८२

83
त्र्याऐंशी
८३

84
चौऱ्याऐंशी
८४

85
पंचाऐंशी
८५

86
शहाऐंशी
८६

87
सत्त्याऐंशी
८७

88
अठ्ठ्याऐंशी
८८

89	95	101	107
एकोणनव्वद	पंच्याण्णव	एकशे एक	एकशे सात
८९	९५	१०१	१०७
90	96	102	108
नव्वद	शहाण्णव	एकशे दोन	एकशे आठ
९०	९६	१०२	१०८
91	97	103	109
एक्याण्णव	सत्याण्णव	एकशे तीन	एकशे नऊ
९१	९७	१०३	१०९
92	98	104	110
ब्याण्णव	अठ्ठ्याण्णव	एकशे चार	एकशे दहा
९२	९८	१०४	११०
93	99	105	
त्र्याण्णव	नव्याण्णव	एकशे पाच	
९३	९९	१०५	
94	100	106	
चौऱ्याण्णव	शंभर	एकशे सहा	
९४	१००	१०६	

संख्यामांडणी (अंकी व अक्षरी)

अंकी (in figures)		अक्षरी (in words)
१४७	...	एकशे सत्तेचाळीस
147	...	One hundred and forty-seven
२९३	...	दोनशे त्र्याण्णव
293	...	Two hundred and ninety-three
७१२	...	सातशे बारा
712	...	Seven hundred and twelve
१००१	...	एक हजार एक
1001	...	One thousand and one
१५४५	...	एक हजार पाचशे पंचेचाळीस अथवा पंधराशे पंचेचाळीस
1545	...	One thousand five hundred and forty-five Or Fifteen hundred and forty-five
५४३२१	.	चौपन्न हजार तीनशे एकवीस
54321	...	Fifty-four thousand three hundred and twenty-one

अंकी (in figures)		अक्षरी (in words)
इ. स. १९६६ सालात	...	इसवी सन एकोणीसशे सहासष्ट सालात
in the year 1966 A.D.	...	In the year ninteen hundred and sixty-six A.D.
७५ पक्षी	...	पंचाहत्तर पक्षी
75 birds	...	Seventy-five birds
२४० सभासद/सदस्य	...	दोनशे चाळीस सभासद/सदस्य
240 members	...	Two hundred and forty members
३ रा पक्षी	...	तिसरा पक्षी
3rd bird	...	The third bird
५ वा मुलगा	...	पाचवा मुलगा
5th boy	...	Fifth boy
७ वा रस्ता	...	सातवा रस्ता
7th Road	...	The seventh road
२३ वी मुलगी	...	तेविसावी मुलगी
23rd girl	...	Twenty-third girl
११ व्या उमेदवाराने	...	अकराव्या उमेदवाराने
by the 11th candidate	...	By the eleventh candidate
११ व्या उमेदवाराला to the 11th candidate	...	अकराव्या उमेदवाराला
११ व्या उमेदवारापासून from the 11th candidate	...	अकराव्या उमेदवारापासून
११ व्या उमेदवाराचा of the 11th candidate	...	अकराव्या उमेदवाचा
७ व्या रस्त्याने by the 7th road	...	सातव्या रस्त्याने
७ व्या रस्त्याला to the 7th road	...	सातव्या रस्त्याला
७ व्या रस्त्यापासून from the 7th road	...	सातव्या रस्त्यापासून
७ व्या रस्त्याचा of the 7th road	...	सातव्या रस्त्याचा
७ व्या रस्त्यावर on the 7th road	...	सातव्या रस्त्यावर

अपूर्णांक (Fractions)

अंकी (in figures)	अक्षरी (in words)
१/३	.. एक तृतीयांश
१/२	.. एक द्वितीयांश (अर्धा)
१/४	.. एक चतुर्थांश (पाव)
३/४	.. तीन चतुर्थांश (पाऊण)
२/३	.. दोन तृतीयांश
४/५	.. चार पंचमांश
५/६	.. पाच षष्ठांश
६/७	.. सहा सप्तमांश
७/८	.. सात अष्टमांश
८/९	.. आठ नवमांश
९/१०	.. नऊ दशांश

पूर्णांकयुक्त अपूर्णांक (Fractions with integers)

अंकी (in figures)	अक्षरी (in words)	
३ ३/४	. तीन पूर्णांक तीन चतुर्थांश किंवा पावणेचार	
५ ७/८	.. पाच पूर्णांक सात अष्टमांश	
१७ १/२	.. सतरा पूर्णांक एक द्वितीयांश किंवा साडेसतरा	
२ ३/४	.. दोन पूर्णांक तीन चतुर्थांश किंवा पावणेतीन	
५ १/४	.. पाच पूर्णांक एक चतुर्थांश किंवा सव्वापाच	
२ १/२	.. दोन पूर्णांक एक द्वितीयांश किंवा अडीच	
७ १/४	. सात पूर्णांक एक चतुर्थांश किंवा सव्वासात	
४ + ३ = ७	.. चार अधिक तीन बरोबर सात किंवा चारात तीन मिळविले तर सात होतात.	बेरीज (Addition)
९ − ६ = ३	.. नऊ उणे सहा बरोबर तीन किंवा नवातून सहा उणे केल्यास तीन उरतात.	वजाबाकी (Subtraction)

५×४=२०	..	पाच चोक वीस किंवा पाच गुणिले चार बरोबर वीस.	गुणाकार (Multiplication)
३०÷६=५	.	तीस भागिले सहा बरोबर पाच किंवा तिसास सहाने भागिल्यास पाच येतात.	भागाकार (Division)

विरामचिन्हे (Punctuation marks)

.	पूर्णविराम (Full stop)	" "	अवतरणचिन्हे (Inverted commas)
,	स्वल्पविराम (Comma)	?	प्रश्नचिन्ह (Sign of interrogation)
;	अर्धविराम (Semi-colon)	!	उद्‌गारवाचकचिन्ह (Sign of exclamation)
:	द्विबिंदुचिन्ह (colon)	:—	द्विबिंदू व जोडरेघ (colon and dash)
		=	बरोबर (equal to)
		/	तिरपी रेघ (oblique)
		–	जोडरेघ (Dash)

भाग २

वाचन पाठ

वाचन पाठ शब्द व वाक्ये

पाठ १ (अ, क, च, ट, त, प)

शब्द.—(१) घर, चढ, जग, ढग, दर, नख, नळ, फळ, यश, वर.
(२) कडक, कमल, गवत, जवळ, दगड, परत, पकड, पसर, शपथ, शहर.
(३) अननस, अपयश, कसरत, गडबड, गणपत, चटकन, दणकट, बडबड, लवकर, हरकत.

वाक्ये.—(१) अहमद, कप भर. (२) कमल, घर सजव. (३) गणपत, मदत कर. (४) छगन, चटकन वर चढ. (५) नरहर, गवत पसर. (६) बबन, शहर बघ. (७) भरत, वजन कर. (८) भरत, कसरत कर. (९) रतन, वजन कर. (१०) हसन, अननस धर.

पाठ २ (आ, का, गा, दा, पा, बा, रा)

शब्द.—(१) आशा, काका, काय, झाड, नफा, पाय, फार, बघा, साफ, हात.
(२) आमचा, आरसा, आळस, कापड, गायक, नारळ, पातळ, सागर.
(३) अपघात, अपमान, अपराध, आडनाव, महाराज, वसाहत, समाधान.
(४) काटकसर, नाटककार, करारनामा.

वाक्ये.—(१) आमचा बाग बघा. (२) आशा, काम कर. (३) काका आरसा आणतात. (४) झाडावरचा नारळ काढा. (५) पावसाळा आला, झाड लावा. (६) दादा, साखर आणा. (७) नकाशात भारत दाखवा. (८) मामा चार वाजता या. (९) भावाचा मान राखा. (१०) राम, हात साफ कर.

पाठ ३ (इ, कि, चि, नि, दि, हि)

शब्द.—(१) इजा, किडा, खिसा, दिन, दिवा, दिशा, निळा, लिहा, शिरा, हिरा.
(२) इतर, इलाज, इशारा, कविता, किरण, गणित, दिवस, विमान, विशेष, सचिव, लिपिक.

(३) अतिशय, अधिकार, अभिमान, अभिनव, नियमित, परिचय, परिचित, परिणाम, सविनय, शनिवार.

वाक्ये.—(१) अजित, आळस टाक. (२) अधिक बचत करा. (३) आठ दिशा दाखवा. (४) काका, कविता रचा. (५) दादा, कथा लिहा. (६) बाळाला गणित शिकवा. (७) लिपिक कागद काढतात. (८) विमल, दिवा लाव. (९) विमलचा वाढदिवस साजरा करा. (१०) सरल, गणित कर.

पाठ ४ (ई, की, जी, री, सी)

शब्द.—(१) आई, खादी, गाडी, टीका, ठीक, पाटी, पीक, मीठ, सही, साडी.
(२) आळशी, उशीर, कमाई, कानडी, खिडकी, जमीन, माहिती, वाईट, विहीर, हिरवी.
(३) आगगाडी, कवाईत, तपशील, टीकाकार, अमरावती, आरामशीर, जबाबदारी.

वाक्ये.—(१) आई घरी आली. (२) खादी वापरा. (३) ताई आज लिहिणार नाही. (४) दादा, साडी आणा. (५) दारावर पाटी लावा. (६) दिवाळी आली (७) वही उघडा. (८) नदीला पाणी नाही. (९) मागील फाईल पाठवा (१०) सहीसाठी नीट जागा ठेवा.

पाठ ५ (उ, कु, तु, नु, पु)

शब्द.—(१) गुण, चुका, जुना, तुझा, पुडी, पुरा, सुख.
(२) उजवा, उधार, उपाय, गुलाब, नमुना, मसुदा, मुलगा, रुमाल, सुचवा, सुतार.
(३) अनुभव, अनुवाद, आपुलकी, उजळणी, उपकार, उपचार, कुरकुर, गुरुवार, नुकसान, सुविचार.

वाक्ये.—(१) अनुवादक अनुवाद करतात. (२) आज उजळणी करा. (३) गुरुजी मराठी शिकवतात. (४) दुकानदार, दुकान उघडा. (५) दुकानावरची पाटी साफ करा. (६) फार उशीर झाला. (७) मी रुमाल धुतला आहे. (८) या घरी खुशाल राहा. (९) वडील गुरुवारी उपास करतात. (१०) वैद्य भावावर उपचार करतात.

पाठ ६ (ऊ, कू, घू, पू, रू)

शब्द.—(१) चूक, तूट, दूध, दूर, पूल, फूल, मूल, रूप, लिहू, शूर.
(२) अजून, उठून, कुरूप, जरूर, जोडून, पाऊस, पासून, येऊन, सांगून, सूचना.
(३) अनुकूल, वागणूक, करमणूक, निवडणूक, फसवणूक, मिरवणूक.

वाक्ये.—(१) आज निवडणूक आहे. (२) काल फार पाऊस पडला. (३) जून महिना सुरू झाला. (४) दुधात पाणी मिसळू नका. (५) मी नाटक बघावयास जाऊ काय? (६) मी माडीवर बसून पाहू काय? (७) वहीत एक चूक मिळाली. (८) वाकून पाहू नका. (९) वारा वाहू लागला. (१०) ही पहा मिरवणूक.

पाठ ७ (ए, के, डे, बे, हे)

शब्द.—(१) केस, खेळ, गाणे, तेल, घडे, देव, शेत, सेवा, पेटी, बरे.
(२) आदेश, उजेड, खेळते, चेहरा, जेवते, फिरते, बसते, बेरीज, वेतन, शेजारी.
(३) आगपेटी, उपदेश, जानेवारी, जेवायला, भेटायला, शिकवते, उपदेशक.

वाक्ये.--(१) आई कपडे शिवते. (२) आईने तेल मागितले. (३) आज एक जानेवारी आहे. (४) इकडे ये, पेढे घे. (५) करावे तसे भरावे. (६) तुमची बेरीज चुकली. (७) ते जेवायला आले. (८) बागेत फुले आहेत. (९) मला गाणे येते. (१०) मुले धडे वाचतात.

पाठ ८ (ऐ, कै, गै, दै, मै)

शब्द.--(१) ऐक, ऐट, कैदी, कैरी, गैर, चैन, दैव, पैसा, बैस, बैल.
(२) ऐपत, ऐहिक, दैनिक, बैठक, वैशाख, सैनिक, मैफल.
(३) ऐटबाज, ऐसपैस, ऐतिहासिक, गैरवापर, गैरसमज.

वाक्ये.—(१) आकाशवाणीवर गाणे ऐका. (२) ऐपत नसेल तर ऐट करू नका. (३) कागदाचा गैरवापर करू नका. (४) कैरी तुरट लागते. (५) चैन करू नका. (६) बैठकीवर बसा व दैनिक वाचा. (७) भैरवी हा एक राग आहे. (८) गायनाची मैफल छान झाली. (९) सैनिकांची कामगिरी फार मोठी असते. (१०) ही इमारत ऐसपैस आहे.

पाठ ९ (ओ, को, तो, पो, रो, लो)

शब्द.--(१) ओढा, कोठे, चोर, जोडा, टोपी, दोर, धोबी, पोट, मोर, शोभा.
(२) अशोक, ओळख, कसोटी, कोणता, झोपडी, पोपट, पोषाख, बसतो, लिहितो, वाचतो.
(३) आगबोट, ओढाताण, कमावतो, कळवतो, पाठवतो, पोटभर, बोटभर, वापरतो, ओळखतात, बोलावतात.

वाक्ये.--(१) अशोक टोपी वापरतो. (२) आगबोट येत आहे. (३) काही लोक झोपडीत राहातात. (४) चोर पैसे चोरतो. (५) देव माणसाची कसोटी पाहतो. (६) धोबी कपडे धुतो. (७) पोपट पेरू खातो. (८) पोलीस चोराला पकडतात. (९) वडील मुलाला बोलावतात. (१०) वाणी सामान पाठवतो.

पाठ १० (औ, चौ, कौ, मौ, गौ)

शब्द. –(१) औट, कौल, चौक, चौदा, डौल, दौरा, पौष, फौज, मौज, हौस.
(२) औषध, गौरव, चौकार, चौरस, यौवन, डौलदार, फौजदार.
(३) औपचारिक, औषधालय.

वाक्ये.—(१) औषधालयात औषध मिळते. (२) काल गावाचा गौरव झाला. (३) खेळाडूने चौकार मारला. (४) घरावर कौले आहेत. (५) देवळात चौघडा वाजतो. (६) पौष महिना आला. (७) फौजदार कोठे आहेत? (८) महापौर आले. (९) हा चौकोन आहे. (१०) हे औषध कडू आहे.

पाठ ११ (अं, गं, मं, रं, सं)

शब्द.—(१) अंग, खांदा, गांधी, चेंडू, संथ, थंड, दंड, धंदा, मंद, शिंपी.

(२) अनंत, आनंद, चांदोबा, जयंत, जांभळा, तांबडा, नारिंगी, पतंग, पांढरा, सुंदर.

(३) आनंददायक, डिसेंबर, नागपंचमी, पांडुरंग, भांडखोर, लफंडाव, विसंगत, सफरचंद, सुसंगत.

वाक्ये.—(१) अंगण साफ ठेवा. (२) काही लोक कापडाचा धंदा करतात. (३) गांधीजी पंचा वापरीत होते. (४) घंटा झाली रांगेत उभे राहा. (५) तांबडा, नारिंगी व जांभळा हे रंग आहेत. (६) माथेरानची हवा थंड आहे. (७) मुलगा पतंग उडवतो. (८) मुले चेंडूकरता भांडण करतात. (९) वसंता, इकडे ये. (१०) शिंपी कपडे शिवतो.

पाठ १२ (क्र, प्र, स्त, भ्य, ष्ट्र)

शब्द.—(१) अन्न, अल्प, क्रम, कार्य, गप्पा, चित्र, नम्र, पुण्य, रस्ता, वित्त, सूर्य.

(२) अभ्यास, कर्तव्य, चरित्र, निर्णय, पुष्कळ, प्रतिज्ञा, प्रस्ताव, प्रस्तुत, वऱ्हाड, व्यवस्था.

(३) अधीक्षक, उपस्थिती, चिकित्सक, दुग्धालय, न्यायालय, पूर्वग्रह, व्यवसाय, सरस्वती, स्वयंपूर्ण, कालमर्यादा, ग्रामसेवक, पदग्रहण, राजपत्रित, वेळापत्रक, संग्रहालय.

वाक्ये.—(१) आगगाड्या वेळापत्रकाप्रमाणे धावतात. (२) आम्हाला पुष्कळ मित्र आहेत. (३) खूप अभ्यास करा. (४) थोडी विश्रांती घ्या. (५) चिकित्सक रोग्यावर उपचार करतात. (६) वर्गात उपस्थिती फार कमी आहे. (७) व्यायाम करा व दूध प्या. (८) स्वयंपूर्ण प्रस्ताव प्रस्तुत करा. (९) हा रस्ता पुण्यास जातो. (१०) हे मुख्य वाक्य आहे.

पाठ १३ (विसर्ग—कः, तः, मः, यः, शः)

शब्द.—(१) दुःख, प्रायः, स्वतः.

(२) क्रमशः, वस्तुतः.

(३) अक्षरशः, इतःपर, कःपदार्थ, निःसंशय, अंतःकरण.

वाक्ये.—(१) आरोपी निःसंशय खोटे बोलतो. (२) इतःपर मला भेटू नका. (३) जग सुखदुःखाने भरले आहे. (४) तो स्वतः बाजारात जातो. (५) थोर लोक धनाला कःपदार्थ समजतात. (६) प्रत्येक माणसाला अंतःकरण असतेच. (७) प्रायः साप वाटेस जात नाही. (८) रानात जनावरे इतस्ततः फिरतात. (९) ही कादंबरी क्रमशः प्रसिद्ध झाली आहे. (१०) ही हकीगत अक्षरशः खरी आहे.

पाठ १४ (वाचनार्थ शब्द)

अतिक्रमण	Encroachment	उदाहरणार्थ	For example
अधिक्रमण	Supersession	उपजीविका	Livelihood
अधिनियम	Act	उपरिनिर्दिष्ट	Referred to above
अधिवेशन	Session	उपसंचालक	Deputy Director
अनौपचारिक	Unofficial	उपस्थितिपट	Muster roll
अनुदानसंहिता	Grant-in-aid-Code	उपासमार	Starvation
अपरिचित	Unacquainted	उमेदवार	Candidate
अपरिहार्य	Inevitable	औद्योगीकरण	Industrialisation
अफरातफर	Misappropriation	औपचारिक	Formal
अब्रूनुकसानी	Defamation	कार्यकारिणी	Executive
अभिकथनपत्र	Statement of allegations	कार्यपद्धती	Procedure
		कार्यक्षमता	Efficiency
अभ्यासक्रम	Syllabus	कार्यालयीन	Official
अभूतपूर्व	Unprecedented	कुलसचिव	Registrar
अंमलबजावणी	Execution, Enforcement	गौरवास्पद	Commendable
		ग्रामविकास	Rural Development
अर्थसंकल्प	Budget		
अल्पबचत	Small saving	ग्रामसेवक	Gram Sevak
अल्पमुदत	Short-term	घटनाबाह्य	Unconstitutional
अवमूल्यन	Devaluation	चलनवाढ	Inflation
अवलोकन	Perusal	जनगणना	Census
अंशकालिक	Part-time	जबाबदारी	Responsibility
असमर्थता	Inability	जन्मशताब्दि.	Centenary
आकडेवारी	Statistics	जिल्हाधिकारी	Collector
आकाशवाणी	Radio	तपासनीस	Checker
आचारसंहिता	Cod of Conduct	तुलनात्मक	Comparative
आंतरराज्यीय	Inter-State	दंडाधिकारी	Magistrate
आदेशभंग	Breach of order	दळणवळण	Communication
आधारसामग्री	Data	दक्षतारोध	Efficiency bar
आश्चर्यकारक	Surprising	दिनदर्शिका	Caledar
उत्तरदायित्व	Responsibility	दुकानदार	Shop-keeper
उत्तरपत्रिका	Answer book	नकाराधिकार	Veto

नागरिकशास्त्र	Civics
नियमावली	Rules
निवासस्थान	Residence
नियतकालिक	Periodical
निवृत्तिवेतन	Pension
नुकसानभरपाई	Compensation
न्यायालय	Court
परिपत्रक	Circular
परिरक्षण	Maintenance
परिसंवाद	Symposium
परिवहन	Transport
पर्यवेक्षक	Supervisor
पारिभाषिक	Technical
पुनरावृत्ति	Repetition
पुनर्रचना	Reconstruction
पूर्णकालिक	Full-time
पूर्वग्रहदूषित	Prejudiced
प्रगतिशील	Progressive
प्रतिनियुक्ति	Deputation
प्रतिस्वाक्षरी	Counter signature
प्रतिज्ञा	Pledge
प्रथमोपचार	First-aid
प्रमाणपत्र	Certificate
प्रवेशपत्रिका	Admission card
प्रश्नपत्रिका	Question paper
प्रसिद्धि-पत्रक	Press-note
भविष्यकाळ	Future tense
भांडारपाल	Store-Keeper
मदतनीस	Helper
महानगरपालिका	Municipal Corporation
महालेखापाल	Accountant General
मागणीपत्र	Indent
मार्गदर्शिका	Guide book
मुख्याध्यापक	Head master
मुद्रणालय	Printing Press
योजनाबद्ध	Planned
राज्यकारभार प्रशासन	Administration
राजकारण	Politics
राजपत्रित	Gazetted
राजभवन	Government House
लेखापरीक्षक	Auditor
वनमहोत्सव	Vanmahotsava
वर्गीकरण	Classification
वर्तमानपत्र	News paper
वसतिगृह	Hostel
वारंवारता	Frequency
विकेंद्रीकरण	Decentralisation
विचाराधीन	Under consideration
विधानपरिषद	Legislative Council
विधानसभा	Legislative Assembly
विभागप्रमुख	Head of Department
विवरणपत्र	Statement
विश्वविद्यालय / विद्यापीठ	University
वेतनवाढ	Increment
वेळापत्रक	Timetable
व्यवस्थापक	Manager
शब्दसंग्रह	Vocabulary
शल्यचिकित्सक	Surgeon

शासननिर्णय	Government Resolution
शिधावाटप	Rationing
समाजकार्य	Social work
समादेशक	Commandant
सर्वसाधारण	General
साहित्यसंमेलन	Literary conference
सेवायोजन	Employment
स्थायीकरण	Confirmation
स्मरणपत्र	Reminder
स्नेहसंमेलन	Social Gathering
हस्तलिखित	Manuscript
हस्तांतरण लेख	Transfer deed

• • •

भाग ३

संभाषण पाठ

संभाषण पाठ

(Conversation Lessons)

माझे संपूर्ण नाव (MY FULL NAME)

1. What is your full name ?
   My full name is George Phillips Rebello.
2. What is your name ?
   My name is George.
3. What is your father's name ?
   My fathe's name is Phillips.
4. What is your surname ?
   My surname is Rebello.

१. आपले संपूर्ण नाव काय आहे ?
   माझे संपूर्ण नाव जॉर्ज फिलिप्स रिबेलो आहे.

२. आपले नाव काय आहे ?
   माझे नाव जॉर्ज आहे.

३. आपल्या वडिलांचे नाव काय आहे ?
   माझ्या वडिलांचे नाव फिलिप्स आहे.

४. आपले आडनाव काय आहे ?
   माझे आडनाव रिबेलो आहे.

आपले (तुमचे) संपूर्ण नाव (YOUR FULL NAME)

1. What is my full name ?
   Your full name is Vasant Seetaram Desai.
2. What is my name ?
   Your name is Vasant.
3. What is my father's name ?
   Your father's name is Seetaram.
4. What is my surname ?
   Your surname is Desai.

१. माझे संपूर्ण नाव काय आहे ?
   आपले संपूर्ण नाव वसंत सीताराम देसाई आहे.

२. माझे नाव काय आहे ?
   आपले नाव वसंत आहे.

३. माझ्या वडिलांचे नाव काय आहे ?
   आपल्या वडिलांचे नाव सीताराम आहे.

४. माझे आडनाव काय आहे ?
   आपले आडनाव देसाई आहे.

[*Note*.— तुमचे, तुमच्या are also used in places of आपले, आपल्या. The former are the forms of तुम्ही (you) and the latter are the forms of आपण (you). आपण is used to show respect. The word 'your' can also be translated by तुझे, तुझ्या if the person referred to is to be addres sed in the singular.]

२

त्याचे / त्यांचे संपूर्ण नाव (HIS FULL NAME)

1. What is his full name ?

१. त्याचे (त्यांचे) संपूर्ण नाव काय आहे ?

His full name is Anant Vaman Kulkarni.

त्याचे (त्यांचे) संपूर्ण नाव अनंत वामन कुलकर्णी आहे.

2. What is his name ?

२. त्याचे (त्यांचे) नाव काय आहे ?

His name is Anant.

त्याचे (त्यांचे) नाव अनंत आहे.

3. What is his father's name ?

३. त्याच्या (त्यांच्या) वडिलांचे नाव काय आहे ?

His father's name is Vaman.

त्याच्या (त्यांच्या) वडिलांचे नाव वामन आहे.

4. What is his surname ?

४. त्याचे (त्यांचे) आडनाव काय आहे ?

His surname is Kulkarni.

त्याचे (त्यांचे) आडनाव कुलकर्णी आहे.

(*Note*.— The words त्यांचे, त्यांच्या are the plural forms of त्याचे, त्याच्या. They also convey respect.)

तिचे / त्यांचे संपूर्ण नाव (HER FULL NAME)

1. What is her full name ?

१. तिचे (त्यांचे) संपूर्ण नाव काय आहे ?

Her full name is Savitri Parashram Gaglani.

तिचे (त्यांचे) संपूर्ण नाव सावित्री परशराम गगलानी आहे.

2. What is her name ?

२. तिचे (त्यांचे) नाव काय आहे ?

Her name is Savitri.

तिचे (त्यांचे) नाव सावित्री आहे.

3. What is her father's name ?

३. तिच्या (त्यांच्या) वडिलांचे नाव काय आहे ?

Her father's name is Parashram.

तिच्या (त्यांच्या) वडिलांचे नाव परशराम आहे.

4. What is her surname?
Her surname is Gaglani.

४. तिचे (त्यांचे) आडनाव काय आहे?
तिचे (त्यांचे) आडनाव गगलानी आहे.

[*Note.*— The words त्यांचे, त्यांच्या are also the plural forms of तिचे and तिच्या; they are used to show respect and are also used when the words convey a plural sense. It may be noted that the nouns मित्राचे (friend's), नोकराचे (servant's) etc., can be substituted for त्याचे, त्याच्या. The sentences will then read as follows : मित्राचे नाव काय आहे ? मित्राच्या वडिलांचे नाव काय आहे ? Similarly, the nouns मैत्रिणीचे (female friend's), मुलीचे etc., can be substituted for तिचे, तिच्या. The sentences, after substitution, will read as under :—

१. मैत्रिणीचे नाव काय आहे ?

२. मैत्रिणीच्या वडिलांचे नाव काय आहे ?]

३

राहाण्याचे ठिकाण व पत्ता (PLACE OF RESIDENCE AND ADDRESS)

1. Where do you stay?	१. आपण (तुम्ही) कोठे राहता?
I stay at Andheri.	मी अंधेरीला राहतो.
2. Where does your friend stay?	२. आपला (तुमचा) मित्र कोठे राहतो? किंवा आपले (तुमचे) मित्र कोठे राहतात? किंवा आपली (तुमची) मैत्रीण कोठे राहते?
My friend stays at Poona.	माझा मित्र पुण्याला राहतो. किंवा माझे मित्र पुण्याला राहतात. किंवा माझी मैत्रीण पुण्याला राहते.
3. Where do your relatives stay?	३. आपले (तुमचे) नातलग कोठे राहतात?
My relatives stay at Sholapur.	माझे नातलग सोलापूरला राहतात.
4. Where do your parents stay?	४. आपले (तुमचे) आईवडील कोठे राहतात?
My parents stay at Nagpur.	माझे आईवडील नागपूरला राहतात.
5. Write your friend's address.	५. आपल्या (तुमच्या) मित्राचा पत्ता लिहा.
George Pillips Rebello, Janaki Nivas, Second Floor, 227, Tilak Road, Poona 2.	जॉर्ज फिलिप्स रिबेलो, जानकी निवास, दुसरा मजला, २२७ टिळक पथ, पुणे २.
6. Wirte your address.	६. आपला (तुमचा) पत्ता लिहा.
Vasant Seetaram Desai, Azad Nagar, 4/27, Andheri (West), Bombay 54.	वसंत सीताराम देसाई, आझाद नगर, ४/२७, अंधेरी (पश्चिम), मुंबई ५४.
7. Write your father's address,	७. आपल्या (तुमच्या) वडिलांचा पत्ता लिहा.
Seetaram Vinayak Desai, Shivneri, 123, Abhyankar Nagar, Nagpur.	सीताराम विनायक देसाई, शिवनेरी, १२३ अभ्यंकरनगर, नागपूर.

४

माझे कुटुंब (MY FAMILY)

1. Are you married or unmarried? — १. आपण (तुम्ही) विवाहित आहात की अविवाहित आहात?
   I am married. — मी विवाहित आहे.
2. How many persons (members) are there in your family? — २. आपल्या (तुमच्या) कुटुंबात किती माणसे आहेत?
   There are five persons (members) in my family. — माझ्या कुटुंबात पाच माणसे आहेत.
3. Who are they? — ३. कोण कोण आहेत? ते कोण आहेत?
   Myself, my wife, my daughter and my two sons. — मी स्वतः, माझी पत्नी, माझी मुलगी व माझे दोन मुलगे.
4. Who is the head of the family? — ४. कुटुंबप्रमुख कोण आहे?
   I am the head of the family. — मी कुटुंबप्रमुख आहे.
5. How old are you? — ५. आपले (तुमचे) वय किती आहे?
   I am forty-eight years old. — माझे वय अठ्ठेचाळीस आहे.
6. How old are the other members of the family? — ६. कुटुंबातील इतर व्यक्तींची वये काय आहेत?
   My wife is forty-two years old. — माझ्या पत्नीचे वय बेचाळीस आहे.
   My daughter is twenty years old. — माझ्या मुलीचे वय वीस आहे.
   The elder son is twelve years old — मोठ्या मुलाचे वय बारा आहे.
   The younger son is eight years old. — धाकट्या मुलाचे वय आठ आहे.
7. Is there any servant in your house? — ७. आपल्या घरी नोकर (घरगडी) आहे काय?
   No, there is no servant in my house. — नाही, माझ्या घरी नोकर (घरगडी) नाही.
8. Then, who attends to the domestic work? — ८. तर मग घरकाम कोण करते?
   My wife attends to the domestic work. — माझी पत्नी घरकाम करते.
   Sometimes I help her. — कधीकधी मी तिला मदत करतो.

9. What do your children do ?	९. आपली (तुमची) मुले काय करतात ?
My daughter goes to a college.	माझी मुलगी महाविद्यालयात जाते.
The elder son goes to a secondary school and the younger one goes to a primary school.	मोठा मुलगा माध्यमिक विद्यालयात जातो आणि धाकटा मुलगा प्राथमिक विद्यालयात जातो.
10. Where do you work ?	१०. आपण (तुम्ही) कोठे काम करता ?
I work in Mantralaya.	मी मंत्रालयात नोकरी करतो.
11. What is your designation ?	११. आपले (तुमचे) पदनाम काय आहे ?
I am a superintendent.	मी अधीक्षक आहे.
12. What is your basic pay ?	१२. आपले (तुमचे) मूळ वेतन [आपला (तुमचा) मूळ पगार] किती आहे ?
My basic pay is Rs. 380.	माझे मूळ वेतन (माझा मूळ पगार) ३८० रुपये आहे.
13. Do you get any allowances ?	१३. आपल्याला (तुम्हांला) काही भत्ते मिळतात काय ?
Yes, I get the dearness allowance, the local compensatory allowance and the house rent allowance.	होय, मला महागाई भत्ता, स्थानिक पूरक भत्ता व घरभाडे भत्ता मिळतो.
14. What is your approximate monthly expenditure.	१४. आपला (तुमचा) मासिक खर्च अजमासे किती आहे ?
My approximate monthly expenditure is Rs. 500.	माझा मासिक खर्च अजमासे ५०० (पाचशे) रुपये आहे.
15. How much amount do you contribute to the General Provident Fund per month?	१५. आपण (तुम्ही) सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधीत किती रक्कम दर महिना भरता ?
I contribute Rs. 50 per month to the General Provident Fund.	सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधीत मी दरमहा ५० रुपये (पन्नास रुपये) भरतो.

५

माझे घर (MY HOUSE)

1.	Is this your house ? Yes, this is my house ?	१.	हे आपले (तुमचे) घर आहे काय ? होय, हे माझे घर आहे.
2.	Is this a rented house or your won ? This is a rented house.	२.	हे भाड्याचे घर आहे की आपले (तुमचे) स्वतःचे घर आहे ? हे भाड्याचे घर आहे.
3.	How many rooms are there? There are two rooms.	३.	(घराला) किती खोल्या आहेत ? (घराला) दोन खोल्या आहेत.
4.	Is There an independent bathroom ? No, there is no independent bathroom.	४.	(घराला) स्वतंत्र स्नानगृह आहे काय ? नाही, घराला स्वतंत्र स्नानगृह नाही.
5.	What is the area of each room ? The area of each room is 120 square feet.	५.	प्रत्येक खोलीचे क्षेत्रफळ किती आहे ? प्रत्येक खोलीचे क्षेत्रफळ १२० चौरस फूट आहे.
6.	Is the house airy and spacious ? Yes, the house is airy, but not spacious.	६.	घर हवेशीर आणि ऐसपैस आहे काय ? होय, घर हवेशीर आहे, पण ऐसपैस नाही.
7.	How far is the market from your house ? The market is very near from my house.	७.	आपल्या (तुमच्या) घरापासून बाजार किती लांब आहे ? माझ्या घरापासून बाजार अगदी जवळ आहे.
8.	How far is the post office from your house ? The post office is at a distance of ten minutes' walk from my house.	८.	आपल्या (तुमच्या) घरापासून डाकघर/टपाल कचेरी किती दूर आहे ? माझ्या घरापासून डाकघर/टपाल कचेरी दहा मिनिटांच्या अंतरावर आहे.

9. How much time do you require to go to the office from your house?

९. आपल्या (तुमच्या) घरापासून कार्यालयात जाण्यास (पोचण्यास) आपणास (तुम्हाला) किती वेळ लागतो ?

I require an hour to go to (to reach) the office from my house.

माझ्या घरापासून कार्यालयात जाण्यास (पोचण्यास) मला एक तास लागतो.

10. How long is the ration shop from your house?

१०. आपल्या (तुमच्या) घरापासून शिधावाटप दुकान किती दूर आहे ?

The ration shop is quite near to my house.

शिधावाटप दुकान माझ्या घरापासून अगदी जवळ आहे.

11. How long have you been staying in this house?

११. या घरात आपण (तुम्ही) किती वर्षांपासून राहात आहात?

I have been staying in this house since the last twenty years.

या घरात मी गेल्या वीस वर्षांपासून राहात आहे.

12. On which floor do you stay?

१२. आपण (तुम्ही) कितव्या मजल्यावर राहाता ?

I stay on the first floor.

मी पहिल्या मजल्यावर राहतो.

13. Is there a telephone in your house?

१३. आपल्या (तुमच्या) घरी दूरध्वनी आहे काय ?

No, there is no telephone in my house.

नाही, माझ्या घरी दूरध्वनी नाही.

६

माझे कार्यालय (MY OFFICE)

1. What is the Marathi word for 'office'?
'कार्यालय' is the word for 'office' in Marathi.

१. 'ऑफिस'ला मराठीत कोणता शब्द आहे?
'ऑफिस'ला "कार्यालय" हा मराठी शब्द आहे.

2. What is an office?
An office is a place for transacting business.

२. कार्यालय म्हणजे काय?
कार्यालय म्हणजे कामकाज करण्याचे ठिकाण.

3. When do you attend the office?
I attend the office at ten o'clock in the morning.

३. तुम्ही (आपण) कार्यालयात केव्हा उपस्थित राहता?
मी सकाळी दहा वाजता कार्यालयात उपस्थित राहतो.

4. Where is your office?
My office in Usmanpura/the Fort area.

४. आपले (तुमचे) कार्यालय कोठे आहे?
माझे कार्यालय उस्मानपुऱ्यात/फोर्ट विभागात आहे.

5.. What are the office hours?
The office hours are from 10 a.m. to 5 p.m.

५. कार्यालयाची वेळ कोणती आहे?
कार्यालयाची वेळ सकाळी १० ते सायंकाळी ५ आहे.

6. On which days the office is closed?
The office is closed on Sundays, second and fourth Saturdays of every month and on public holidays.

६. कार्यालय कोणकोणत्या दिवशी बंद असते?
रविवारी, प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी व सार्वजनिक सुट्यांच्या दिवशी कार्यालय बंद असते.

7. When do you have lunch break for?
We have lunch break from 1-30 p.m. to 2-00 p.m.

७. दुपारच्या जेवण्याकरिता तुम्हांला मध्यंतर केव्हा असते?
दुपारच्या जेवणाकरिता आम्हांला दुपारी १-३० ते २ मध्यंतर असते.

8. Are these timings followed everywhere?
No, at all the district places, the office timings are from 10-30 a.m. to 5-30 p.m., and the lunch time is from 2-00 p.m. to 2-30 p.m.

८. सगळीकडे याच वेळा असतात काय (पाळल्या जातात काय)?
नाही, सर्व जिल्ह्यांच्या ठिकाणी कार्यालयाची वेळ सकाळी १०-३० ते सायंकाळी ५-३० पर्यंत असते आणि दुपारच्या जेवणाची वेळ २ ते २-३० असते.

9. How much casual leave do you have in a year?
We have fifteen days' casual leave in a year.

९. तुम्हाला एका वर्षात किती नैमित्तिक रजा असतात?
आम्हाला एका वर्षात पंधरा दिवस नैमित्तिक रजा असतात?

10. How do you recon the year for casual leave?
We recon the year from 1st January to 31st December for casual leave.

१०. नैमित्तिक रजेसाठी वर्ष कसे मोजतात (धरतात)?
नैमित्तिक रजेसाठी एक जानेवारी ते एकतीस डिसेंबर असे वर्ष आम्ही मोजतो (धरतो).

11. How many public holidays arethere in a year?
The number of such holidays is not fixed.

११. वर्षात सार्वजनिक सुट्या किती असतात?
अशा सुट्यांची संख्या ठरलेली नसते.

12. Do you have any other holidays in the year?
We have four optional holidays in a year.

१२. तुम्हाला वर्षात आणखी कोणत्या सुट्या असतात?
वर्षात आम्हास चार दिवस वैकल्पिक सुट्या असतात.

13. Cite a few types of Official letters.
(1) Application, (2) Government letter, (3) D. O. letter, (4) Reminder and (5) Conffiidential letter.

१३. कार्यालयीन पत्रांचे काही प्रकार सांगा.
(१) आवेदनपत्र, (२) शासकीय पत्र, (३) अर्धशासकीय पत्र, (४) स्मरणपत्र आणि (५) गोपनीय पत्र.

७

दैनिक कार्यक्रम (DAILY ROUTINE)

1. What is your morning routine?	१. आपला/तुमचा सकाळचा कार्यक्रम काय असतो?
(*a*) I get up in the morning at six o'clock.	(अ) मी सकाळी सहा वाजता उठतो/उठते.
(*b*) Then I wash my face and change the clothes.	(ब) नंतर मी तोंड धुतो/धुते व कपडे बदलतो/बदलते.
(*c*) Then I take tea and go out for a walk.	(क) नंतर मी चहा घेतो/घेते व बाहेर फिरावयास जातो/जाते.
(*d*) I return home at eight o' clock and read newspapers.	(ड) मी आठ वाजता घरी परत येतो/येते व वर्तमानपत्रे वाचतो/वाचते.
(*e*) Then I take my bath and meals.	(इ) नंतर मी स्नान करतो/करते व भोजन करतो/करते.
(*f*) Then I again change my clothes and leave for office.	(फ) नंतर मी पुन्हा कपडे बदलतो/बदलते व कार्यालयात जाण्यास निघतो/निघते.
(*g*) I reach office at 10 o'clock.	(ग) मी कार्यालयात दहा वाजता पोचतो/पोचते.
2. What is your office routine?	२. आपला/तुमचा कार्यालयातील कार्यक्रम काय असतो?
(*a*) I sign the muster roll.	(अ) मी उपस्थितिपत्रावर सही करतो/करते.
(*b*) Then I take my seat.	(ब) मग मी जागेवर बसतो/बसते.
(*c*) I read cases, put up notes and prepare drafts.	(क) मी प्रकरणे वाचतो/वाचते, टिप्पण्या प्रस्तुत करतो/करते व (पत्रांचे) मसुदे तयार करतो/करते.
(*d*) I send the cases to the superintendent.	(ड) मी ती प्रकरणे अधीक्षकांकडे पाठवितो/पाठविते.
(*e*) In the afternoon I have my lunch.	(इ) दुपारी मी जेवण घेतो/घेते.

(*f*) Till five o'clock, I attend to my work.
(फ) पाच वाजेपर्यंत मी माझे काम करतो/करते.

(*g*) Then I go home.
(ग) नंतर मी घरी जातो/जाते.

3. What is your evening routine ?
३. आपला/तुमचा सायंकाळचा कार्यक्रम काय असतो ?

(*a*) I return home at six o'clock in the evening.
(अ) मी सायंकाळी सहा वाजता घरी परत येतो/येते.

(*b*) Then I change my clothes and take a wash.
(ब) नंतर मी कपडे बदलतो/बदलते व हातपाय धुतो/धुते.

(*c*) Then I take tea or coffee.
(क) नंतर मी चहा किंवा कॉफी घेतो/घेते.

(*d*) I take my meal at eight o'clock.
(ड) आठ वाजता मी जेवतो/जेवते.

(*e*) At nine o'clock I listen to the news on radio.
(इ) नऊ वाजता मी आकाशवाणीवरील बातम्या ऐकतो/ऐकते.

(*f*) Sometimes I read a novel or a magazine.
(फ) कधीकधी मी एखादी कादंबरी किंवा मासिक वाचतो/वाचते.

(*g*) I go to bed at ten o'clock.
(ग) दहा वाजता मी झोपतो/झोपते.

रविवारचा कार्यक्रम (ROUTINE ON SUNDAYS)

1. When do you get up on Sunday?
   On Sundays also, I get up at six o'clock.

१. आपण/तुम्ही रविवारी किती वाजता उठता?
   रविवारीही मी सकाळी सहा वाजता उठतो/उठते.

2. What do you do thereafter?
   I take tea, read newspaper and go to the market.

२. नंतर आपण/तुम्ही काय करता?
   नंतर मी चहा पितो/पिते, वर्तमानपत्र वाचतो/वाचते, व बाजारात जातो/जाते.

3. What do you purchase in the market?
   I purchase vegetables.

३. आपण/तुम्ही बाजारात काय विकत घेता?
   मी भाजी विकत घेतो/घेते.

4. Which are the vegetables you get in the market?
   We get brinjals, ladies' fingers, potatoes, onions, pumpkins, beans, cucumbers and carrots.

४. बाजारात आपणांस/तुम्हांस कोण-कोणत्या भाज्या मिळतात?
   आम्हास वांगी, भेंड्या, बटाटे, कांदे, भोपळे, घेवडा (फरसबी), काकड्या व गाजरे मिळतात.

5. What else do you get in the market?
   We get chillies, coriander, ginger, lemons and coconuts also.

५. बाजारात आपणांस/तुम्हांस आणखी काय मिळते?
   आम्हांस मिरच्या, कोथिंबिर, आले, लिंबे व नारळ देखील मिळतात.

6. Which are the fruits available in the market at present?
   At present, mangoes, popayas, oranges, guavas, chikkus, grapes and apples are available.

६. बाजारात हल्ली कोणती फळे मिळतात?
   हल्ली आंबे, पापया, संत्री, पेरू, चिकू, द्राक्षे व सफरचंदे मिळतात.

7. What is your programme in the afternoon?
   I take rest. Sometimes, I go to a movie with my wife and children. At times, we all go for marketing.

७. दुपारी तुमचा काय कार्यक्रम असतो?
   (दुपारी) मी विश्रांती घेतो. कधीकधी पत्नीला व मुलांना घेऊन सिनेमाला जातो. एखाद्या वेळी आम्ही सर्वजण खरेदीसाठी जातो.

8. Is there any change in the meals on Sundays?
   Yes, there is.

9. Do you have any visitors on Sundays?
   Friends, relatives and sometimes colleagues from my office visit us on Sundays.

८. आपल्या/तुमच्या रविवारच्या जेवणात काही बदल असतो काय?
   होय, असतो.

९. रविवारी तुमच्याकडे कोणी भेटायला येतात का?
   मित्र, नातलग आणि कधीकधी माझ्या कार्यालयातील सहकारी आमच्याकडे रविवारी (भेटायला) येतात.

९

किती ? (HOW MANY ? HOW MUCH ?)

1. How many brothers have you?
I have two brothers.

१. आपल्याला / तुम्हाला किती भाऊ आहेत ?
मला दोन भाऊ आहेत.

2. How many sisters have you?
I have three sisters.

२. आपल्याला/तुम्हाला किती बहिणी आहेत ?
मला तीन बहिणी आहेत.

3. How many posts are advertised?
Five posts are advertised.

३. किती पदांसाठी जाहिराती दिली आहे ?
पाच पदांसाठी जाहिरात दिली आहे.

4. How many books have you?
I have ten books.

४. आपल्याजवळ / तुमच्याजवळ किती पुस्तके आहेत ?
माझ्याजवळ दहा पुस्तके आहेत.

5. How many cupboards are there in your house?
There are two cupboards in my house.

५. आपल्या / तुमच्या घरी किती कपाटे आहेत ?
माझ्या घरी दोन कपाटे आहेत.

6. How many windows are there in the picture?
There are four windows in the picture.

६. चित्रात किती खिडक्या आहेत ?
चित्रात चार खिडक्या आहेत.

7. How many doors do you see on the stage?
I see only two doors.

७. रंगमंचावर आपल्याला / तुम्हाला किती दरवाजे दिसतात ?
मला फक्त दोन दरवाजे दिसतात.

8. How many visitors have you on Sunday?
I have a number of visitors on Sundays.

८. रविवारी आपल्याला / तुम्हाला भेटायला किती लोक येतात ?
रविवारी मला भेटायला पुष्कळ लोक येतात.

9. How much rent do you pay per month?
I pay Rs. forty per month as rent.

९. आपण / तुम्ही दरमहा किती भाडे देता ?
मी दरमहा चाळीस रुपये भाडे देतो.

10. How much house rent allowance do you get per month?
I get Rs. twenty as the house rent allowance per month.

११. आपल्याला / तुम्हाला दरमहा घरभाडे भत्ता किती मिळतो?
मला दरमहा वीस रुपये घरभाडे भत्ता मिळतो.

11. How much amount do you pay to the grocer?
I pay Rs. eighty-five to the grocer.

११. आपण / तुम्ही वाण्याला किती रक्कम देता? (तुमचे वाण्याचे बील किती असते?)
मी वाण्याला पंचाऐंशी रुपये देतो. (माझे वाण्याचे बिल पंचाऐंशी रुपये असते.)

12. How much is your doctor's bill?
It all depends on the illness in the family.

१२. आपण / तुम्ही डॉक्टरना किती रक्कम देता? (तुमचे डॉक्टरचे बिल किती असते?) ते कुटुंबातील आजारपणावर अवलंबून असते.

13. How much amount do you send to your parents every month?
I send Rs. forty per month to my parents.

१३. आपण / तुम्ही आई-वडिलांना दर-महा किती पैसे पाठविता?
मी माझ्या आई-वडिलांना दरमहा चाळीस रुपये पाठवितो.

14. How much amount is to your credit in the General Provident Fund?
The amount to my credit is Rs. 3,500.

१४. सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधीत आपली / तुमची किती रक्कम जमा आहे?
माझ्या नावे साडेतीन हजार रुपये जमा आहेत.

15. How much are you insured for?
I am insured for Rs. 3,000.

१२. आपण / तुम्ही किती रकमेचा विमा उतरवला आहे?
मी तीन हजार रुपयांचा विमा उतरवला आहे.

16. How much time do you devote to reading?
I read for half an hour every day.

१६. आपण / तुम्ही वाचनासाठी किती वेळ देता?
मी रोज अर्धा तास वाचन करतो.

१०

सात वार (THE SEVEN DAYS OF A WEEK)

1. What day is to-day ?
To-day is Tuesday.

१. आज कोणता वार आहे ?
आज मंगळवार आहे.

2. What was the day yesterday?
Yesterday was Monday.

२. काल कोणता वार होता ?
काल सोमवार होता.

3. What will be the day to-morrow ?
To-morrow, will be Wednesday.

३. उद्या कोणता वार असेल ?
उद्या बुधवार असेल.

4. How many days make a week ?
Seven days make a week.

४. किती दिवसांचा आठवडा होतो ?
सात दिवसांचा आठवडा होतो.

5. Which is the first day of the week ?
Monday is the first day of the week. Some treat Sunday as the first day of the week.

५. आठवड्याचा पहिला दिवस कोणता आहे ?
सोमवार हा आठवड्याचा पहिला दिवस आहे. काही रविवार हा आठवड्याचा पहिला दिवस मानतात.

6. What is the day after Wednesday ?
What is the day after Saturday ?
Day after Wednesday is Thursday. Day after Saturday is Sunday.

६. बुधवारनंतर कोणता वार असतो ?
शनिवारनंतर कोणता वार असतो ?
बुधवारनंतरचा दिवस गुरुवार असतो. शनिवारनंतरचा दिवस रविवार असतो.

7. What is the day before Saturday ?
Day before Saturday is Friday.

७. शनिवारच्या पूर्वी / अगोदर कोणता वार असतो ?
शनिवारच्या पूर्वीचा / अगोदरचा दिवस शुक्रवार असतो.

8. On which day is the office closed ?
The office is closed on Sunday.

८. कोणत्या दिवशी कार्यालय बंद असते ?
कार्यालय रविवारी बंद असते.

9. Which important days do we celebrate every year ?
We celebrate (1) The Children's Day, (2) The Independence Day, and (3) The Republic Day.

९. आपण दरवर्षी कोणते महत्त्वाचे दिवस / दिन साजरे करतो ?
आपण (१) बालदिन, (२) स्वातंत्र्य-दिन व (३) प्रजासत्ताक दिन साजरे करतो.

10. Do you know any other word for 'आठवडा' ?
Yes, 'सप्ताह' is another word for 'आठवडा'.

१०. 'आठवडा' या अर्थी दुसरा शब्द तुम्हास माहीत आहे काय ?
होय, 'सप्ताह' हा आठवडा या अर्थी दुसरा शब्द आहे.

11. Which weeks (सप्ताह) do we celebrate ?
We celebrate (1) The Courtsey Week, (2) The National Week, and (3) The Prohibition Week.

११. आपण कोणते सप्ताह साजरे करतो ?
आपण (१) सौजन्य सप्ताह, (२) राष्ट्रीय सप्ताह व (३) नशाबंदी सप्ताह साजरे करतो.

(A day दिवस; on a day दिवशी; on which day ? कोणत्या दिवशी ?)

११

वेळ (TIME)

1. What time it is?
It is half past four.

१. किती वाजले आहेत?
साडेचार वाजले आहेत.

2. At what time do you get up every day?
I get up at six o'clock every day.

२. आपण/तुम्ही रोज किती वाजता (कोणत्या वेळेस) उठता?
मी रोज़ सहा वाजता उठतो.

3. When do you leave for the office?
I leave for the office at five minutes to ten in the morning.

३. कार्यालयात जाण्यास आपण/तुम्ही किती वाजता निघता?
मी कार्यालयात जाण्यास सकाळी दहाला पाच मिनिटे कमी असताना/पाच मिनिटे असताना निघतो.

4. When do you return home in the evening?
I return home at a quarter past six in the evening.

४. आपण/तुम्ही सायंकाळी केव्हा/किती वाजता घरी परत येता?
मी सायंकाळी सव्वासहा वाजता घरी परत येतो.

5. At what time do the children return home from the school?
Children return home quarter to six in the evening.

५. मुले शाळेतून किती वाजता घरी परत येतात?
मुले सायंकाळी पावणे सहा वाजता घरी परत येतात.

6. At what time does the rationing shop open?
The rationing shop opens exactly at half past eight.

६. शिधावाटप दुकान किती वाजता उघडते?
शिधावाटप दुकान ठीक साडेआठ वाजता उघडते.

7. When does the Deccan Queen leave Bombay?
The Deccan Queen leaves Bombay at ten minutes past five.

७. डेक्कन क्वीन मुंबईहून केव्हा सुटते?
डेक्कन क्वीन मुंबईहून पाच वाजून दहा मिनिटांनी सुटते.

8. When does it reach Poona?
It reaches Poona at twenty minutes past eight.

८. ती पुण्यास केव्हा पोचते?
ती पुण्यास आठ वाजून वीस मिनिटांनी पोचते.

9. When does the last local (train) reach Borivli?
The last local reaches Borivli at quarter to one.

९. शेवटची लोकल (गाडी) बोरिवलीस केव्हा पोचते ?
शेवटची लोकल बोरिवलीस पाऊण वाजता पोचते.

10. When do you get the Bombay papers at Nagpur?
We get Bombay papers between quarter past one and half past two.

१०. मुंबईची वर्तमानपत्रे तुम्हाला नागपूरला केव्हा मिळतात ?
मुंबईची वर्तमानपत्रे आम्हाला सव्वा ते अडीच्या दरम्यान मिळतात.

11. When does the Flying Ranee leave Bombay Central?
The Flying Ranee leaves Bombay Central exactly at 5–30 p.m.

११. फ्लाइंग राणी मुंबई सेंट्रलहून केव्हा सुटते ?
फ्लाइंग राणी मुंबई सेंट्रलहून सायंकाळी ठीक साडेपाच वाजता सुटते.

12. When does it reach Surat?
It reaches Surat at 10 p.m.

१२. ती सुरतेस केव्हा पोचते ?
ती सुरतेस रात्री १० वाजता पोचते.

13. When does it start from Surat towards Bombay?
It starts from Surat at 5-25 a.m.

१३. ती सुरतहून मुंबईकडे येण्यास केव्हा निघते ?
ती सुरतहून पहाटे पाच पंचवीसला निघते.

14. When does it reach Bombay Central?
It reaches Bombay Central at 10-10 a.m.

१४. ती बॉम्बे सेंट्रलला केव्हा पोचते ?
ती बॉम्बे सेंट्रलला सकाळी १०-१० ला पोचते.

१२

प्रशिक्षण वर्ग (TRAINING CLASS)

1. Which class is this?
This is the Marathi Language Training Class.

१. हा कोणता वर्ग आहे?
हा मराठी भाषा प्रशिक्षण वर्ग आहे.

2. Who attend this class?
Officers attend this class.

२. या वर्गात कोण कोण येतात?
या वर्गात अधिकारी येतात.

3. Which officers attend this class?
Officers who do not know Marathi attend this class.
OR
Officers whose mother-tongue is not Marathi attend this class.

३. कोणकोणते अधिकारी या वर्गात येतात?
ज्यांना मराठी येत नाही असे अधिकारी या वर्गात येतात.
किंवा
ज्यांची मातृभाषा मराठी नाही असे अधिकारी या वर्गात येतात.

4. Are there separate classes for Gazetted and Non-Gazetted Officers?
Yes, there are separate classes for Gazetted and Non-gazetted Officers.

४. राजपत्रित व अराजपत्रित अधिकाऱ्यांकरिता वेगवेगळे वर्ग आहेत काय?
होय, राजपत्रित व अराजपत्रित अधिकाऱ्यांकरिता वेगवेगळे वर्ग आहेत.

5. How many trainees are there in the class for non-gazetted officers?
There are twenty-seven trainees in the class.

५. अराजपत्रित अधिकाऱ्यांच्या वर्गात किती प्रशिक्षार्थी आहेत?
वर्गात सत्तावीस प्रशिक्षार्थी आहेत.

6. Give designations of some of them.
Superintendents, senior clerks, junior clerks and typists.

६. त्यांच्यापैकी काहींची पदनामे सांगा.
अधीक्षक, वरिष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक आणि टंकलेखक.

7. Who is the Teacher / Instructor?
Shri Desai is the Teacher/Instructor.

७. शिक्षक/निदेशक कोण आहेत?
श्री. देसाई शिक्षक/निदेशक आहेत.

8. What are the trainees required to do in the class? The trainees have to answer the questions; take down notes in Marathi; narrate stories; and describe an object or an incident; sometimes they also ask questions and difficulties.

9. Do the trarinees attend the class regulary and punctually? Usually they attend the class regularly and punctually.

10. What is the duration of the class? The duration of the class is one year.

11. Are there examinations? Yes, there are monthly examinations.

12. Are these classes conducted by Government? These classes are conducted by the Directorate of Languges on behalf of Government.

८. वर्गात प्रशिक्षार्थ्यांना काय करावे लागते? प्रशिक्षार्थ्यांना प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतात; मराठीतून लिहून घ्यावे लागते, गोष्टी सांगाव्या लागतात आणि एखाद्या वस्तूचे अगर प्रसंगाचे वर्णन करावे लागते; कधीकधी ते प्रश्न व शंकादेखील विचारतात.

९. प्रशिक्षार्थी वर्गात नियमितपणे व वक्तशीरपणे उपस्थित राहतात. काय? बहुधा ते नियमितपणे व वक्तशीरपणे वर्गात उपस्थित राहतात.

१०. वर्गाची मुदत किती असते?

वर्गाची मुदत एक वर्ष असते.

११. या वर्गांना परीक्षा असतात काय? होय, मासिक परीक्षा असतात.

१२. हे वर्ग शासनाकडून चालविले जातात काय? हे वर्ग शासनाच्या वतीने भाषा संचालनालयाकडून चालविले जातात.

माझे शेजारी (MY NEIGHBOUR)

1. Who is your neighbour? Shri Deshpande is my neighbour.	१. आपले/तुमचे शेजारी कोण आहेत? श्री. देशपांडे हे माझे शेजारी आहेत.
2. How old is he? He is forty-eight years old.	२. त्यांचे वय काय आहे? त्यांचे वय अठ्ठेचाळीस आहे.
3. Where does he work? He works in a foctory.	३. ते कोठे काम करतात? ते एका कारखान्यात काम करतात.
4. How many members are there in his family? There are four members in his family; himself, his wife, his son and his daughter.	४. त्यांच्या कुटुंबात किती माणसे आहेत? त्यांच्या कुटुंबात चार माणसे आहेत; ते स्वतः, त्यांची पत्नी, त्यांचा मुलगा व त्यांची मुलगी.
5. Does his wife work anywhere? No, she is a social worker.	५. त्यांच्या पत्नी कोठे काम करतात काय? नाही, त्या समाजकार्य करतात/ त्या समाजकार्यकर्त्या आहेत.
6. Do you have cordial relations with your neighbour? Yes. Our relations are cordial.	६. आपले/तुमचे शेजाऱ्याशी संबंध सलोख्याचे आहेत का? होय. आमचे संबंध सलोख्याचे आहेत.
7. Does he have a telephone with him? Yes, he has a telephone.	७. त्यांच्याकडे दूरध्वनी/फोन आहे काय? होय, त्यांच्याकडे दूरध्वनी/फोन आहे.
8. Have you anything special to say about them? Yes, Shri Deshpande is painstaking and efficient. Smt. Deshpande is unassuming, modest and hospitable.	८. आपण/तुम्ही त्यांच्याविषयी विशेष काही सांगू शकाल काय? होय, श्री. देशपांडे हे दीर्घोद्योगी व कार्यक्षम आहेत. श्रीमती देशपांडे या निगर्वी, सालस आणि आतिथ्यशील आहेत.
9. Do they have any hobbies? Shri Deshpande has a hobby of collecting rare coins while Smt. Deshpande is interested in classical music.	९. त्यांना काही छंद आहेत का? श्री. देशपांडे यांना दुर्मिळ नाणी जमविण्याचा छंद आहे, तर श्रीमती देशपांडे यांना शास्त्रीय संगीताची आवड आहे.

१४

विद्यालय (A SCHOOL)

1. How many schools are there in your town ?
There are three schools in our town.

१. आपल्या / तुमच्या शहरात किती शाळा आहेत ?
आमच्या शहरात तीन शाळा आहेत.

2. Mention and describe the Main types of schools.
(1) Pre-primary School.
Pupils in the age group of 3 to 5 get admission into the pre-primary schools.
(2) Primary School.
Pupils in the age group of 5 to 11 get admission into the primary schools.
(3) Secondary School.
Pupils who pass the examination of the fourth standard or the seventh standard of a primary school are admitted to the secondary school.

२. विद्यालयाचे मुख्य प्रकार सांगा.
(१) पूर्व-प्राथमिक विद्यालय.
३ ते ५ या वयोगटातील मुलांना पूर्व-प्राथमिक विद्यालयात प्रवेश मिळतो.
(२) प्राथमिक विद्यालय.
५ ते ११ या वयोगटातील मुलांना प्राथमिक विद्यालयात प्रवेश मिळतो.
(३) माध्यमिक विद्यालय.
प्राथमिक विद्यालयाच्या चौथ्या इयत्तेच्या किंवा सातव्या इयत्तेच्या परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना माध्यमिक विद्यालयात प्रवेश मिळतो.

3. What are the courses open to students passing the secondary school certificate examination ?
For higher education, there are Colleges and Polytechnics Students choosing the degree course go to the colleges. For the post-degree courses, they go to the University. Students choosing the technical course secure admission either in a Polytechnic or in an Engineering College.

३. माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना कोणते अभ्यासक्रम उपलब्ध आहेत ?

उच्च शिक्षणासाठी महाविद्यालये व तंत्रनिकेतने आहेत. पदवी अभ्यासक्रम निवडणारे विद्यार्थी महाविद्यालयात जातात; पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ते विद्यापीठात जातात. तंत्रशिक्षणाचा अभ्यासक्रम निवडणारे विद्यार्थी तंत्रनिकेतनात किंवा अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश मिळवितात.

4. Mention the universities in Maharashtra along with the cities in which they are situated.—

(1) The Bombay University, Bombay.

(2) Shrimati Nathibai Damodar Thackersey Women's University, Bombay.

(3) The Poona University, Poona.

(4) The Shivaji University, Kolhapur.

(5) The Marathwada University, Aurangabad.

(6) The Nagpur University, Nagpur.

5. Upto what level is education compulsory and free ?

Education is compulsory and free upto the secondary level.

6. Do the secondary schools get financial assistance from Government ?

Yes, Govt. Sanctions grant-in-aid to these schools.

7. Who Prescribes the syllabus for the secondary education?

The Board of secondary Education prescribes this syllabus for the secondary education.

४. महाराष्ट्रातील विद्यापीठे व ती कोण-कोणत्या शहरांत आहेत ते सांगा.——

(१) मुंबई विद्यापीठ, मुंबई.

(२) श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.

(३) पुणे विद्यापीठ, पुणे.

(४) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

(५) मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

(६) नागपूर विद्यापीठ, नागपूर.

५. कोणत्या स्तरापर्यंत शिक्षण सक्तीचे व मोफत आहे ?

माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षण सक्तीचे व मोफत आहे.

६. माध्यमिक विद्यालयांना शासना-कडून आर्थिक सहाय्य मिळते का ?

होय, शासन या विद्यालयांना सहाय्यक अनुदान मंजूर करते.

७. माध्यमिक शिक्षणाचा पाठ्यक्रम कोण ठरवते/विहित करते ?

हा पाठ्यक्रम माध्यमिक शिक्षण मंडळ ठरवते/विहित करते.

8. Mention the designation of some of the educational officers—
   (1) The Director of Education.
   (2) The Chairman, Board of Secondary Education.
   (3) The Deputy Director of Education.
   (4) The Vocational Guidance Officer.
   (5) The Parishad Education Officer.
   (6) The Educational Inspector.

८. काही शिक्षणाधिकाऱ्यांची पदनामे सांगा—
   (१) शिक्षण संचालक.
   (२) अध्यक्ष, माध्यमिक शिक्षण मंडळ.
   (३) शिक्षण उपसंचालक.
   (४) व्यवसाय मार्गदर्शन अधिकारी.
   (५) परिषद शिक्षणाधिकारी.
   (६) शिक्षण निरीक्षक.

१५

महिने (मराठी) [MONTHS (Marathi)]

1. Which is the current month?
It is Jyeshtha.

2. Give names of the two months immediately preceding and following this month.
Preceding : Chaitra, Vaishakh.
Following : Aashadh, Shravan.

3. In how many parts a Marathi month is divided ?
Every month has two parts. (1) (First fortnight) Shuklapaksha (2) (Second fortnight) Krishnapaksha or Vadyapaksha.

4. Which is the concluding day of Shuklapaksha ?
Pournima (full-moon day) is the concluding day of shuklapaksha.

5. Which is the Last day of the Marathi month ?
It is Amavasya.

6. How a day is referred to in a Marathi month ?
A day is referred to as 'Tithi' in a Marathi month.

१. चालू महिना कोणता आहे ?
हा ज्येष्ठ महिना आहे.

२. या महिन्याला लागून असलेले अगोदरचे व नंतरचे दोन महिने सांगा.

अगोदरचे : चैत्र, वैशाख.

नंतरचे : आषाढ, श्रावण.

३. मराठी महिन्याचे भाग सांगा.

प्रत्येक महिन्याचे दोन भाग असतात. (१) शुक्लपक्ष, (२) कृष्णपक्ष (वद्यपक्ष).

४. शुक्लपक्षाचा शेवटचा दिवस कोणता ?
पौर्णिमा शुक्लपक्षाचा शेवटचा दिवस असतो.

५. मराठी महिन्याचा शेवटचा दिवस कोणता ?
अमावस्या.

६. मराठी महिन्यात दिवसाला काय म्हणतात ?
मराठी महिन्यात दिवसाला 'तिथी' म्हणतात.

7. Mention the names of the Marathi months.

   Chaitra, Vaishakh, Jyeshtha, Aashadha, Shravan, Bhadrapad, Ashvin, Kartik, Margsheersh, Pausha, Magh, Phalguna

8. What is the Marathi New year day ?

   Gudhi Padwa is the Marathi New Year day.

७. मराठी महिन्याची नावे सांगा.

चैत्र, वैशाख, ज्येष्ठ, आषाढ, श्रावण, भाद्रपद, आश्विन, कार्तिक, मार्गशीर्ष, पौष, माघ, फाल्गुन.

८. मराठी नववर्ष दिन कोणता ?

गुढीपाडवा हा मराठी नववर्ष दिन होय.

१६

माझे नातलग (MY RELATIVES)

1. How many brothers and sisters have you?

I have two brothers and three sisters.

१. तुम्हाला किती भावंडे आहेत? (भावंडे--भाऊ आणि बहिणी)
मला दोन भाऊ आणि तीन बहिणी आहेत.

2. What is father's brother called?

Father's brother is called uncle.

२. वडिलांच्या बंधूंना (भावाला) काय म्हणतात?
वडिलांच्या बंधूंना (भावाला) काका (चुलता) म्हणतात.

3. How many brothers has your mother?

My mother has two brothers.

३. तुमच्या आईला किती बंधू (भाऊ) आहेत?-तुम्हाला किती मामा आहेत?
माझ्या आईला दोन बंधू (भाऊ) आहेत.–मला दोन मामा आहेत.

4. Who is an aunt?

Father's sister is called aunt.

Mother's sister is also called aunt.

४. आत्या / मावशी कोणाला म्हणतात?
वडिलांच्या बहिणीला आत्या म्हणतात.
आईच्या बहिणीला मावशी म्हणतात.

5. Who is called grandfather?

Father's father is called grandfather.

Mother's father is also called grandfather.

५. आजोबा कोणास म्हणतात?
वडिलांच्या वडिलांना आजोबा म्हणतात.
आईच्या वडिलांनादेखील आजोबा म्हणतात.

6 Who is (1) a brother-in-law and (2) a sister-in-law.

Wife's brother or sister's husband is called brother-in-law.

Wife's sister is called sister-in--law.

६. (१) मेहुणा व (२) मेहुणी म्हणजे कोण?
बायकोच्या भावाला किंवा बहिणीच्या यजमानाला (पतीला) मेहुणा म्हणतात.
बायकोच्या बहिणीला मेहुणी म्हणतात.

7 What minimum relations do you find in a joint family?

(1) Sister-brother, (2) Husband-wife, (3) Father-son, (4) Mother- daughter, (5) Father-mother, (6) Mother-in-law, daughter-in - law, (7) Uncal-nephew, uncle-niece, (8) Grandfather - Grandson, Grandmother - Granddaughter (9) Brother-brother's Wife (10) Father-in-law-Son-in--law.

७. एकत्र कुटुंबात तुम्हास कमीत कमी कोणती नाती आढळतात?

(१) बहीण-भाऊ, (२) पती-पत्नी, नवरा-बायको, (३) बाप-लेक, पिता-पुत्र, वडील आणि मुलगा, (४) माय-लेक, (५) आई-वडील, माय-बाप, (६) सासू-सून, (७) चुलता-पुतण्या, मामा-भाचा, (८) आजोबा-नातू, आजी-नात (९) भाऊ-भावजय, भाऊ-वहिनी, (१०) सासरा-जावई.

१७

रुग्णालय (A HOSPITAL)

1. What is a hospital ?
A hospital is a place where patients are treated.

१. रुग्णालय म्हणजे काय ?
रुग्णालय म्हणजे रोग्यांवर उपचार करण्याचे ठिकाण.

2. Are there hospitals in your city ?
Yes, there are three hospitals in our city.

२. आपल्या/तुमच्या शहरात रुग्णालये आहेत काय ?
होय, आमच्या शहरात तीन रुग्णालये आहेत.

3. Are they private or public ?
Two of them are public hospitals and only one is a private hospital.

३. ती खाजगी आहेत की सार्वजनिक आहेत ?
त्यापैकी दोन सार्वजनिक रुग्णालये आहेत आणि फक्त एक खाजगी रुग्णालय आहे.

4. Is the private hospital open for all ?
Anyone can get admission into a private hospital. The charges for operation and indoor-treatment in a private hospital are very high; therefore, many people generally do not go to a private hospital.

४. खाजगी रुग्णालयात सर्वांना प्रवेश मिळतो काय ?
खाजगी रुग्णालयात कोणासही प्रवेश मिळू शकतो. खाजगी रुग्णालयात शस्त्रक्रियेचा व तेथील औषधोपचारांना खर्च फार येतो; म्हणून लोक बहुधा खाजगी रुग्णालयात जात नाहीत.

5. Who get admitted into a private hospital ?
People who can afford to pay high fees get themselves admitted into the private hospital.

५. खाजगी रुग्णालयात कोण दाखल होतात ?
ज्यांना भारी फी देण्याची ऐपत आहे असेच लोक खाजगी रुग्णालयात दाखल होतात.

6. Who get admitted into a Government hospital ?
Anybody can be admitted here.

६. शासकीय रुग्णालयात कोण दाखल होऊ शकतो ?
येथे कोणीही दाखल होऊ शकतो.

7. What are the formalities for getting admitted into a Government hospital ?

The patient has to register his name and then a case paper is given to him.

On showing the casepaper to the doctor on duty, the latter examines the patient. The doctor admits the patient into the hospital--

(1) If the illnessis of a serious nature, (2) If the patient needs to be operated upon or, (3) If the patient is to be admitted to the hospital for urgent treatment.

७. शासकीय रुग्णालयात दाखल होण्यासाठी काय काय करावे लागते ?

रोग्याला आपले नाव नोंदवावे लागते; व नंतर त्याला एक रुग्णपत्रिका देण्यात येते.

रुग्णपत्रिका कर्तव्यस्थ चिकित्सकांना दाखविल्यावर ते रोग्याला तपासतात.

(१) आजार गंभीर स्वरूपाचा असेल, (२) रोग्यावर शस्त्रक्रिया करणे जरूर असेल किंवा (३) जर रोग्याला तातडीच्या उपचाराकरिता रुग्णालयात दाखल करावयाचे असेल तर चिकित्सक त्यास रुग्णालयात दाखल करून घेतात.

8. Which are the main departments of a Government hospital ?

A Government hospital has two main departments.

(1) Out-patient Department,
(2) In-patient Department.

८. शासकीय रुग्णालयाचे प्रमुख विभाग कोणते ?

शासकीय रुग्णालयाचे दोन विभाग असतात.

(१) बाह्य रुग्ण विभाग,
(२) आंतर रुग्ण विभाग.

9. Are there, besides these, any sub-divisions in a hospital ?

Yes, there are.

९. याशिवाय रुग्णालयात काही उप-विभाग असतात काय ?
होय, असतात.

10. Which are they ?
(1) The male ward, (2) The female ward, (3) The children's ward.

१०. ते कोणते ?
(१) पुरुष वार्ड, (२) स्त्री वार्ड,
(३) बाल वार्ड.

11. Who treats the patients in a Government hospital ?

If it is a matter of an ordinary treatment, then the concerned doctor treats the patient. If it is a matter of a specific treatment or if the patient needs an operation, then experts or surgeons treat the patient.

११. शासकीय रुग्णालयात रोग्यांवर उपचार कोण करतात ?

जर सर्वसाधारण उपचाराची बाब असेल तर संबंधित डॉक्टर उपचार करतात. जर विशिष्ट उपचाराची बाब असेल किंवा रोग्यावर शस्त्रक्रिया करणे आवश्यक असेल तर तज्ञ डॉक्टर किंवा शल्य चिकित्सक रोग्यावर उपचार करतात.

12. Do all the Surgeons receive any Salary ?

Some of them are paid salaries, but the honorary surgeons receive honorarium.

१२. सर्व शल्यचिकित्सकांना वेतन मिळते काय ?

काहींना वेतन दिले जाते. मात्र मानसेवी शल्यचिकित्सकांना मानधन मिळते.

13. Who assists the Surgeon ?

Nurses assist the Surgeon.

१३. शल्यचिकित्सकांना कोण मदत करतात.

शल्यचिकित्सकांना परिचारिका मदत करतात.

14. Who is a nurse ?

A nurse is a lady trained in the Science of nursing (taking care of a patient).

१४. परिचारिका म्हणजे कोण ?

परिचारिका म्हणजे शुश्रूषा शास्त्राचे प्रशिक्षण घेतलेली स्त्री (शुश्रूषा—रोग्याची काळजी घेणे).

15. What are her main duties ?

Her main duties are—

(1) Nursing the patients,
(2) assisting the surgeon, and
(3) completing all preliminaries of an operation.

१५. तिची मुख्य कर्तव्ये कोणती ?

(१) रोग्यांची शुश्रूषा करणे,
(२) शल्यचिकित्सकाना मदत करणे, आणि
(३) शस्त्रक्रियेची पूर्वतयारी करणे

ही तिची मुख्य कर्तव्ये आहेत.

16. Please give some of the designations of some of the officers working in a Hospital—

(1) A Gynaecologist.
(2) A Paediatrician.
(3) A skin disease specialist.
(4) A cardiologist.
(5) An ophthalmist.
(6) An Ear-Nose-Throat specialist.
(7) A Dentist.

१६. रुग्णालयात काम करणाऱ्या काही अधिकाऱ्यांची पदनामे सांगा–

(१) स्त्रीरोग विशेषज्ञ.
(२) बालरोग विशेषज्ञ.
(३) त्वचारोग विशेषज्ञ.
(४) हृदयरोग चिकित्सक.
(५) नेत्रवैद्य.
(६) कान-नाक-घसा विशेषज्ञ.
(७) दंतवैद्य.

17. Are patients suffering from Cancer and T. B. admitted into general hospitals ?

No; there are separate hospitals for them.

१७. कर्करोग व क्षयरोग झालेल्या रोग्यांना सर्वसाधारण रुग्णालयात प्रवेश मिळतो काय ?

नाही; त्यांच्याकरिता वेगळी रुग्णालये असतात.

18. What are the fees charged in a Government hospital for an X-ray examination ?

Nominal fees are charged in Government hospitals for X-ray examination.

१८. शासकीय रुग्णालयात 'क्ष-किरण' तपासणीकरिता काय आकार द्यावा लागतो ?

शासकीय रुग्णालयात 'क्ष-किरण' तपासणीकरिता नाममात्र फी आकारली जाते.

१८

ग्रंथालय (LIBRARY)

1. Is there a library in your village ?

   Yes, there is a library in our village.

१. तुमच्या गावात ग्रंथालय आहे काय ?

   होय, आमच्या गावात ग्रंथालय आहे.

2. What is a library ?

   A library is a public place where books, newspapers and magazines are available for reading.

२. ग्रंथालय म्हणजे काय ?

   ग्रंथालय म्हणजे पुस्तके, वर्तमानपत्रे व मासिके वाचावयास मिळण्याचे सार्वजनिक ठिकाण.

3. What are the types of newspapers ?

   A Daily, a Weekly and a Fortnightly are the types of newspapers.

३. वर्तमानपत्रांचे प्रकार कोणते ?

   दैनिक, साप्ताहिक व पाक्षिक हे वर्तमानपत्रांचे प्रकार आहेत.

4. What is a daily newspaper ? State the names of some of the daily newspapers.

   A Daily newspaper is a newspaper published every day.

   Names of daily newspapers:-

   Ajantha, Kesari, Gavkari, Tarun Bharat, Navashakti, Marathawada, Maharashtra Times, Lokasatta, etc.

४. दैनिक वर्तमानपत्र म्हणजे काय ? काही दैनिक वर्तमानपत्रांची नावे सांगा.

   दैनिक वर्तमानपत्र म्हणजे रोज प्रसिद्ध होणारे वर्तमानपत्र/वृत्तपत्र.

   दैनिक वर्तमानपत्रांची नावे :—

   अजंठा, केसरी, गावकरी, तरुण भारत, नवशक्ती, मराठवाडा, महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, वगैरे.

5. What is a weekly ? State the names of some of the weekly newspapers :—

   A weekly is a publication published every week.

   Names of weeklies :— Sadhana, Manohar, Swarajya, etc.

५. साप्ताहिक म्हणजे काय ? काही साप्ताहिकांची नावे सांगा :–

   दर आठवड्याला प्रसिद्ध होणारे प्रकाशन म्हणजे साप्ताहिक.

   साप्ताहिक वर्तमानपत्रांची नावे :– साधना, मनोहर, स्वराज्य, इत्यादी.

6. What is a magazine? State the names of some of the magazines.

A magazine is a periodical which is published every month. Names of magazines :— Abhiruchi, Amrit, Kirloskar, Manohar, Mohini, Vasant, Stree, Hauns, etc.

६. मासिक म्हणजे काय? काही मासिकांची नावे सांगा.

मासिक म्हणजे दर महिन्याला प्रसिद्ध होणारे नियतकालिक. मासिकांची नावे :—अभिरुची, अमृत, किर्लोस्कर, मनोहर, मोहिनी, वसंत, स्त्री, हंस, इत्यादी.

7. What is the equivalent word for 'library?'

A 'reading room' is an equivalent word for 'library'.

७. 'ग्रंथालय' या शब्दाचा समानार्थी शब्द कोणता?

'वाचनालय' हा ग्रंथालयाचा समानार्थी शब्द आहे.

8. Are there any rules for being enrolled as a member of the library?

Yes, there are rules for being enrolled as a member. Every library has its own rules.

८. ग्रंथालयाचा सभासद होण्याकरिता काही नियम असतात काय?

होय, सभासद होण्याकरिता नियम असतात. प्रत्येक ग्रंथालयाचे स्वतंत्र नियम असतात.

9. What are the other activities of a library?

(1) lectures by renowned authors, (2) discussion on recent publications, (3) symposium on a literary subject, and (4) oth r cultural activities.

९. ग्रंथालयाचे इतर कोणते कार्यक्रम असतात?

(१) नामवंत ग्रंथकारांची व्याख्याने, (२) नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या पुस्तकावर चर्चा, (३) वाङ्मयीन विषयावर परिसंवाद, आणि (४) इतर सांस्कृतिक कार्यक्रम.

10. How does a library meet its expenditure?

A library meets its expenditure from the subscription from members, donations from public and grants-in-aid from Government.

१०. ग्रंथालय आपला खर्च कसा भागवते?

ग्रंथालय आपला खर्च सभासदांच्या वर्गणीतून, लोकांनी दिलेल्या देणग्यांतून व शासनाच्या सहायक अनुदानातून भागवते.

१९

महाराष्ट्र राज्य (THE MAHARASHTRA STATE)

1. When was the Maharashtra State formed ?
The Maharashtra State was formed on the first of May Nineteen Hundred and Sixty (1-5-1960).

१. महाराष्ट्र राज्य केव्हा स्थापन झाले ?
महाराष्ट्र राज्य एक मे एकोणीसशे साठ (१-५-१९६०) रोजी स्थापन झाले.

2. Who inaugurated the Maharashtra State ?
The Late Pandit Jawaharlal Nehru inaugurated the Maharashtra State.

२. महाराष्ट्र राज्याचे उद्घाटन कोणी केले ?
स्वर्गीय पंडित जवाहरलाल नेहरूंनी महाराष्ट्र राज्याचे उद्घाटन केले.

3. State the divisions of the Maharashtra State ?
The Maharashtra State has six divisions :—
(1) Konkan, (2) Nasik, (3) Pune, (4) Aurangabad, (5) Amaravati and (6) Nagpur.

३. महाराष्ट्र राज्याचे विभाग सांगा ?
महाराष्ट्र राज्याचे सहा विभाग आहेत.—
(१) कोकण, (२) नासिक, (३) पुणे, (४) औरंगाबाद, (५) अमरावती व (६) नागपूर.

4. What is the total number of districts in the Maharashtra State ?
The total number of districts in the Maharashtra State is 30

४. महाराष्ट्र राज्यातील जिल्ह्यांची एकूण संख्या किती आहे ?
महाराष्ट्र राज्यातील जिल्ह्यांची एकूण संख्या ३० आहे.

5. What is the population of the Maharashtra State ?
It is 6.27 crores according to the census.

५. महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या किती आहे ?
जनगणनेप्रमाणे ती ६·२७ कोटी इतकी आहे.

6. How many cities, tahasils and villages are there in the Maharashtra State ?
There are 289 cities, 303 tahasils and 35,778 villages in the Maharashtra State.

६. महाराष्ट्र राज्यात शहरे, तहसिली व खेडी किती आहेत ?
महाराष्ट्र राज्यात २८९ शहरे, ३०३ तहसिली आणि ३,५७७८ खेडी आहेत.

7. What is the percentage of literacy in Maharashtra ?

The percentage of literacy in Maharashtra is 39.

७. महाराष्ट्रातील साक्षरतेची टक्केवारी किती आहे ?

महाराष्ट्रातील साक्षरतेची टक्केवारी ३९ आहे. / महाराष्ट्रातील साक्षरतेचे प्रमाण ३९ टक्के आहे.

8. Which is the capital of Maharashtra?

Bombay is the capital of the Maharashtra State.

८. महाराष्ट्राची राजधानी कोणती आहे ?

मुंबई ही महाराष्ट्र राज्याची राजधानी आहे.

9. State some of the special features of the Bombay City?

Bombay is a cosmopolitan city. People of various races, religions and professions live here in harmony.

This is a principal commercial centre.

It is connected with all the prominent cities in the world from here.

There are many textile mills in this city.

There are many worth-seeing places here. Some of them are as follows :—

(1) The Aarey Milk Colony; (2) the Victoria Gardens; (3) the Aquarium; (4) the Museum; (5) the Gateway of India; and (6) the Kamala Nehru Park.

९. मुंबई शहराची काही वैशिष्ट्ये सांगा ?

मुंबई हे बहुरंगी शहर आहे. येथे विविध वंशांचे, धर्मांचे आणि व्यवसायाचे लोक सलोख्याने राहतात.

हे एक प्रमुख व्यापारी केंद्र आहे. / ही एक प्रमुख व्यापारी पेठ आहे.

जगातील सर्व प्रमुख शहरांशी येथून ते जोडलेले आहे.

या शहरात कापडाच्या पुष्कळ गिरण्या आहेत.

येथे पुष्कळ प्रेक्षणीय स्थळे आहेत. त्यांतील काही पुढीलप्रमाणे आहेत :—

(१) आरे दुग्ध वसाहत; (२) राणीचा बाग; (३) मत्स्यालय; (४) वस्तु संग्रहालय; (५) भारताचे प्रवेशद्वार; व (६) कमला नेहरू उद्यान.

10. Mention some of the hill-stations in Maharashtra ?

(1) Matheran (Raygad District).

(2) Pachgani and Mahabaleshwar (Satara District).

१०. महाराष्ट्रातील काही थंड हवेची ठिकाणे सांगा ?

(१) माथेरान (रायगड जिल्हा).

(२) पाचगणी आणि महाबळेश्वर (सातारा जिल्हा).

(3) Bhandardara (Ahmednagar District).

(4) Panhala (Kolhapur District).

(5) Chikhaldara (Amravati District).

(6) Khandala, Lonavala (Poona District).

(7) Toranmal (Dhulia District).

(३) भंडारदरा (अहमदनगर जिल्हा).

(४) पन्हाळा (कोल्हापूर जिल्हा).

(५) चिखलदरा (अमरावती जिल्हा).

(६) खंडाळा, लोणावळा (पुणे जिल्हा).

(७) तोरणमाळ (धुळे जिल्हा).

11. State some of the forts in Maharashtra ?

Pratapgarh, Raigarh, Sinhagarh, Panhalgarh, Daulatabad and Gawilgarh are some of the forts in Maharashtra.

११. महाराष्ट्रातील काही किल्ले (गड) सांगा ?

प्रतापगड, रायगड, सिंहगड, पन्हाळगड, दौलताबाद आणि गाविलगड हे महाराष्ट्रातील काही किल्ले आहेत.

२०

काही प्रश्न व उत्तरे

(उत्तरे कंसातील शब्द योजून पूर्ण वाक्यात सांगा.)

कोण ?

(१) पूर्वेकडे सकाळी कोण उगवतो ?	(सूर्य)
(२) रात्री प्रकाश कोण देतो ?	(चंद्र)
(३) भविष्य कोण सांगतो ?	(ज्योतिषी)
(४) सोन्याचे दागिने कोण घडवितो ?	(सोनार)
(५) कपडे कोण धुतो ?	(गडी, नोकर, मी स्वतः)
(६) घराला शोभा कोण देते ?	(मूल, फूल)
(७) ताजी बातमी कोण देते ?	(वर्तमानपत्र)
(८) फळे कोण विकतो ?	(फळवाला)
(९) कपडे कोण शिवतो ?	(शिंपी)
(१०) मडकी कोण करतो ?	(कुंभार)
(११) लाकडी सामान कोण बनवितो ?	(सुतार)
(१२) मासे कोण पकडतो ?	(कोळी)
(१३) औषध कोण देतात ?	(वैद्य, डॉक्टर, चिकित्सक)
(१४) वेतन-बिले कोण तयार करतात ?	(लेखापाल)
(१५) राज्याचे प्रमुख कोण असतात ?	(राज्यपाल)

काय ?

(१) तुम्ही सकाळी काय खाता ?	(पाव, रोटी, चपाती, बिस्किटे, फळे)
(२) वाणी आपल्याला काय विकतो ?	(साखर, धान्य, डाळ, नारळ, तेल, तूप, लोणी)
(३) डॉक्टर रोग्यास काय देतात ?	(औषध, गोळ्या, पुड्या, सल्ला)
(४) निदेशक तुम्हास काय विचारतात ?	(प्रश्न, माहिती, गृहपाठ)
(५) आई मुलास काय देते ?	(खाऊ, फळे)
(६) माळी तुम्हास काय देतो ?	(फुले, फळे, पाने, गजरा, वेणी, हार, पुष्पगुच्छ)

(७) दुग्धालयात काय मिळते? (दूध, दही, ताक, लस्सी, पीयुष, पेढे, बर्फी, हलवा, खवा)

(८) तुम्ही रात्री आकाशात काय पाहता? (चंद्र, तारे, चांदण्या, नक्षत्रे)

(९) कोळी समुद्रात काय पकडतो? (मासे, मासळी)

(१०) मुंबईत प्रवासी काय पाहतो? (मंत्रालय, मत्स्यालय, आरे दुग्ध वसाहत, कमला नेहरू उद्यान, भारताचे प्रवेशद्वार)

(११) भिकारी काय मागतात? (अन्न, भाकरी, कपडे, धान्य)

(१२) मुले शाळेत काय करतात? (अभ्यास, प्रयोग, लेखन, व्यायाम सुतारकाम)

कोणास? कोणाला?

(१) कार्यालयात तुम्ही कोणाला बोलाविता? (चपराश्याला, अधीक्षकांना, लिपिकाला, टंकलेखकाला, टंकलेखिकेला, लघुलेखकाला, लघुलेखिकेला)

(२) धनादेश कोणास दिला? (अधिकाऱ्यास)

(३) शिक्षक कोणास शिक्षा करतात? (विद्यार्थ्यांना, विद्यार्थ्यास, विद्यार्थ्याला)

(४) वडिलांची संपत्ती कोणास मिळते? (मुलास, मुलीस मुलांस, वारसास, मुलामुलींना)

(५) पोलीस कोणास पकडतात? (चोरास, गुंडास, मवाल्यास, दंगा करणाऱ्यास, नियम मोडणाऱ्यास)

(६) वडील कोणाला शिकवतात? (मुलाला, मुलीला)

(७) आपण कोणास नमस्कार करतो? (आईस, वडिलांस, गुरुजींस)

(८) रोखपालाच्या जागी कोणास नेमतात? (अनुभवी, कार्यक्षम व विश्वासू व्यक्तीस)

(९) जगात कीर्ति कोणास मिळते? (शास्त्रज्ञास, साहित्यिकास, विद्वानास, विदुषीस, कवीस, कवयित्रीस, इतिहासकारास, नाटककारास, कादंबरीकारास, गणितज्ञास, डॉक्टरास, चिकित्सकास, संशोधकास, देशभक्तास, समाजकार्यकर्त्यास)

(१०) निदेशक कोणाला प्रश्न विचारतात? (प्रशिक्षार्थ्याला, शिष्याला, विद्यार्थ्याला)

कोणी ?

(१) आदेश कोणी काढले ?	(संचालकांनी, उपसचिवांनी)
(२) चहा कोणी केला ?	(पत्नीने, आईने)
(३) कपडे कोणी शिवले ?	(शिंप्याने)
(४) चित्र कोणी काढले ?	(चित्रकाराने)
(५) मसुदा कोणी लिहिला ?	(अवीक्षकाने)
(६) अभ्यास कोणी केला ?	(विद्यार्थ्याने – विद्यार्थ्यांनी, मुलाने–मुलांनी, मुलीने–मुलींनी)
(७) दूध कोणी आणले ?	(गड्याने, नोकराने)
(८) औषध कोणी दिले ?	(वैद्याने, डॉक्टरने)
(९) चोरास कोणी पकडले ?	शिपायाने–शिपायांनी)
(१०) खुर्ची कोणी बनविली ?	(सुताराने)

कशामुळे ? कशाने ?

(१) तुम्ही कशाने लिहिता ?	(पेन्सिलीने, पेनने, टाकाने)
(२) मुले कशाने खेळतात ?	(चेंडूने)
(३) तुम्ही कपडे कशाने धुता ?	(साबणाने)
(४) तो कशाने बरा झाला ?	(औषधोपचाराने, विश्रांतीने)
(५) तुम्ही सायंकाळी कशाने/कसे घरी जाता ?	(गाडीने, बसने, दुचाकीने)
(६) तुम्ही अंग कशाने पुसता ?	(टॉवेलने)
(७) घरास शोभा कशामुळे येते ?	(बागेमुळे, फुलांमुळे, मुलांमुळे)
(८) तुम्हास कशामुळे घाम येतो ?	(व्यायामामुळे, परिश्रमामुळे)
(९) शक्ती कशामुळे येते ?	(व्यायामामुळे, पौष्टिक अन्नामुळे, दुधामुळे)
(१०) यश कशामुळे मिळते ?	(दीर्घोद्योगामुळे, अभ्यासामुळे)

कोणाकरिता ? कशाकरिता ? (साठी)

(१) फुलदाणी कशाकरिता असते ?	(शोभेकरिता)
(२) पंखा कशाकरिता असतो ?	(हवेकरिता)
(३) छत्री कशाकरिता असते ?	(पावसाकरिता, सावलीकरिता)

(४) दवाखाना कशासाठी असतो ?	(औषधासाठी, रोग्याकरिता)
(५) ग्रंथालय कोणासाठी असते ?	(वाचकांसाठी)
(६) विमान कोणाकरिता असते ?	(उतारूकरिता)
(७) कायदा कशाकरिता असतो ?	(सुव्यवस्थेसाठी)

कोणापासून ? कशापासून ? कोणापेक्षा ? कोठून ?

(१) पेढा कशापासून तयार करतात ?	(दुधापासून, खव्यापासून)
(२) सुट्टी कधीपासून लागते ?	(मे महिन्यापासून, सोमवारपासून)
(३) कापड कशापासून तयार होते ?	(कापसापासून)
(४) तेल कशापासून मिळते ?	(खोबऱ्यापासून, शेंगदाण्यापासून)
(५) फूल कोठून पडते ?	(झाडावरून, वेलीवरून)
(६) तुम्ही रोज कुठून येता ?	(दादरहून, कल्याणहून)
(७) ती केव्हापासून आजारी आहे ?	(दोन महिन्यापासून)
(८) रामा कोणापेक्षा उंच आहे ?	(गोविंदापेक्षा, बहिणीपेक्षा)
(९) अत्तर कशापासून मिळते ?	(फुलांपासून)
(१०) प्रकाश कोणापासून मिळतो ?	(सूर्यापासून, दिव्यापासून, कंदिलापासून)

कशाचा–ची–चे ? कोणाचा–ची चे ?

(१) कस्तुरबा कोणाच्या पत्नी ?	(महात्मा गांधींच्या)
(२) बिरबल कोणाचा प्रधान ?	(अकबर बादशहाचा)
(३) पंडित जवाहरलाल नेहरू कोणाचे पुत्र ?	(पंडित मोतीलाल नेहरूंचे)
(४) हे कोणाचे पुस्तक आहे ?	(त्याचे, माझे, तुमचे, हिचे, त्याचे, आपले, तुझे)
(५) ही कोणाची सही आहे ?	(आयुक्ताची, अधीक्षकाची, लेखापालाची)
(६) हा कोणाचा आदेश आहे ?	(वित्त मंत्र्यांचा, मुख्य सचिवांचा)
(७) हे कोणाचे घर आहे ?	(तुमचे, माझे, सावकाराचे, मालकाचे, श्रीमंत गृहस्थाचे)
(८) हे पत्र कोणाचे आहे ?	(सचिवांचे, संचालकांचे, कक्ष अधिकाऱ्याचे)
(९) हे कशाचे कापड आहे ?	(रेशमाचे, नायलॉनचे, मलमलीचे)
(१०) ही पेटी कशाची केली आहे ?	(लाकडाची, लोखंडाची, पत्र्याची)
(११) हा कशाचा हार आहे ?	(फुलांचा, मोत्यांचा, मण्यांचा)

कशात ? कोठे ?

(१) कोळी मासे कोठे पकडतो ?	(समुद्रात, नदीत)
(२) मजूर कोठे काम करतात ?	(गिरणीत, कारखान्यात)
(३) विद्यार्थी कोठे शिकतात ?	(शाळेत, विद्यालयात, महाविद्यालयात)
(४) राज्यपाल कोठे राहतात ?	(राजभवनात)
(५) कैद्यांना कोठे ठेवतात ?	(तुरुंगात, कोठडीत)
(६) मुले कोठे खेळतात ?	(मैदानात, मोकळ्या जागेत)
(७) औषध कोठे मिळते ?	(रुग्णालयात, औषधालयात, दवाखान्यात)
(८) तुम्ही कोठे जाता ?	(बाजारात, कार्यालयात, दुकानात)
(९) पैसे कशात ठेवतात ?	(खिशात, पाकिटात, पेटीत)
(१०) वाणी सामान कशात बांधतो ?	(कागदात, कागदाच्या पुड्यात)

● ● ●

भाग ४

व्याकरण पाठ

व्याकरण पाठ

१

वर्तमानकाळ (Present Tense)

A verb that refers to the present time is said to be in the present tense, *e. g.*, नोकर घरी जातो (A servant goes home); मुलगा व्यायाम करतो (A boy takes exercise).

Now read the following sentences (खालील वाक्ये वाचा) :—

मी सकाळी दूध **पितो.**	माझे वडील चहा **पितात.**	माझी आई कॉफी **पिते.**
माझी बहीण कोको **पिते.**	माझा भाऊ दूध **पितो.**	माझे अनेक मित्र चहा **पितात.**
तू सकाळी काय **पितोस ?**	मी सकाळी दूध **पितो.**	तुम्ही सकाळी काय **पिता ?**
आम्ही सकाळी चहा **पितो.**		

(1) There are three genders in Marathi : Masculine (पुल्लिंग), Feminine (स्त्रीलिंग) and Neuter (नपुसकलिंग). There are also three persons as in English; the first person (प्रथम पुरुष), the second person (द्वितीय पुरुष) and the third person (तृतीय पुरुष).

(2) The words in the bold type in the sentences above are the present tense forms of the verb (क्रियापद) पिणे (to drink).

(3) Every verb (क्रियापद) has a root (धातू); the root of the verb is usually arrived at by dropping the final 'णे' in the verb., *e. g.*, खाणे (to eat) is a verb, 'खा' is the root. Similarly धावणे is the verb, धाव is the root.

We now classify the verbs in the above sentences according to the persons, genders and numbers they govern.

वर्तमानकाळ (Verb खाणे, Root खा)

	एकवचन (Singular)	अनेकवचन (Plural)
प्रथम पुरुष (Eirst Person)	मी खातो (M.) मी खाते (F.) (I eat)	आम्ही खातो आपण खातो (M., F.) (We eat)
द्वितीय पुरुष (Second Person)	तू खातोस (M.) तू खातेस (F.) (You eat)	तुम्ही खाता आपण खाता (M., F.) (You eat)

	एकवचन (Singular)	अनेकवचन (Plural)	
तृतीय पुरुष (Third Person)	तो खातो (M.) (He eats) (भाऊ मित्र)	ते खातात (M.) (भाऊ, मित्र)	They eat.
	ती खाते (F.) (She eats) (बहीण)	त्या खातात (F.) (बहिणी)	
	ते खाते (N.) (मूल) (It eats)	ती खातात (N.) (मुले)	

Similarly, the root जा will yield the following forms:—

	एकवचन	अनेकवचन
प्रथम पुरुष	मी जातो (M.) मी जाते (F.) (I go)	आम्ही जातो आपण जातो (M., F.) (We go)
द्वितीय पुरुष	तू जातोस (M.) तू जातेस (F.) (You go)	तुम्ही जाता आपण जाता (M., F.) (You go)
तृतीय पुरुष	तो जातो (M.) (He goes)	ते जातात (M.)
	ती जाते (F.) (She goes)	त्या जातात (F.)
	ते जाते (N.) (It goes)	ती जातात (N.)

They go.

The verb असणे (to be) gives the following forms in the **Present** Tense :–

	एकवचन	अनेकवचन
प्रथम पुरुष	मी आहे (M., F.) (I am)	आम्ही आहोत आपण आहोत (M., F.) (We are)
द्वितीय पुरुष	तू आहेस (M., F.) (You are)	तुम्ही आहांत आपण आहात (M., F.) (You are)
तृतीय पुरुष	तो आहे (M.) (He is) ती आहे (F.) (She is) ते आहे (N.) (It is)	ते आहेत (M.) त्या आहेत (F.) ती आहेत (N.) } They are.

The root अस (to be) also yields optional forms, e.g , असतो, असतात, etc. The root हो (to become) yields होतो etc.

Unlike English, Marathi follws the S O V (Subject, Object, Verb) pattern; that is, in a Marathi sentence, the subject with its enlargements comes first and the verb comes at the end of a sentence. The other parts of speech generally come in between the subject and the verb, e. g., मुलगा आंबा खातो (The boy eats a mango); हुषार मुलगा फार अभ्यास करतो (A clever boy studies hard); अधीक्षक लिपिकावर फार रागावतात (The superintendent gets very angry with the clerk).

Verbs are of two typs : (1) Intransitive (अकर्मक) and (2) Transitive (सकर्मक). The former do not govern a direct object while the latter do. The verb धावतात in the sentence मुले मैदानात धावतात (Boys run on the ground) is an example of the first type; the verb टाकतो in the sentence नोकर पत्र टाकतो (A servant posts a letter) is an example of the

second type. In Marathi, the articles 'a', 'an', 'the' are generally not translated, as Marathi does not have articles.

Some verbs and their roots are given below :—

अकर्मक (Intransitive)	सकर्मक (Transitive)
१. जाणे (जा) to go	१. खाणे (खा) to eat
२. येणे (ये) to come	२. पिणे (पि) to drink
३. धावणे (धाव) to run	३. लिहिणे (लिहि) to write
४. पडणे (पड) to fall	४. वाचणे (वाच) to read
५. थांबणे (थांब) to stop	५. देणे (दे) to give
६. निजणे (निज) to sleep	६. घेणे (घे) to take
७. बसणे (बस) to sit	७. गाणे (गा) to sing
८. उठणे (उठ) to get up	८. आणणे (आण) to bring
९. रागावणे (रागाव) to be angry	९. फेकणे (फेक) to throw
१०. रडणे (रड) to weep, to cry	१०. धुणे (धु) to wash
११. हसणे (हस) to smile, to laugh	११. ऐकणे (ऐक) to listen
१२. राहाणे (राहा) to live, to stay	१२. करणे (कर) to do
१३. लढणे (लढ) to fight	१३. शिकणे (शिक) to learn
१४. उडणे (उड) to fly	१४. शिकवणे (शिकव) to teach
१५. चालणे (चाल) to walk	१५. विकणे (विक) to sell
१६. निघणे (निघ) to start	१६. दाखवणे (दाखव) to show
१७. भांडणे (भांड) to quarrel	१७. पकडणे (पकड) to catch
१८. असणे (अस) to be	१८. सांगणे (सांग) to tell

अभ्यास १

Translate the following sentences into English (खालील वाक्यांचा इंग्रजीत अनुवाद करा) :—

१. आम्ही येतो.
२. ती बसते.
३. ते रागावतात.
४. तुम्ही धावता.
५. मी पडतो.
६. तू भांडतोस.
७. तो हसतो.
८. मुलगा आंबा खातो.
९. मूल दूध पिते.
१०. मुलगी पुस्तक वाचते.
११. अधिकारी मराठी शिकतात.
१२. अधीक्षक फाईल आणतात.
१३. आम्ही पाणी आणतो.
१४. तुम्ही अधिकारी आहात.
१५. त्या गाणे गातात.

अभ्यास २

Translate into Marathi (मराठीत अनुवाद करा) :—

1. She sings.
2. The servant sleeps.
3. A bird flies.
4. The child cries.
5. You write a letter.
6. We see a drama.
7. Father brings vegetables.
8. She is a typist.
9. She reads an essay.
10. The player catches a ball.
11. The grocer sells sugar.
12. The teacher shows a picture.
13. He is a student.
14. You are a gentleman.
15. The clerk writes a letter.
16. The grandfather tells a story.

[*New words* (नवीन शब्द) : A servant—नोकर (M.); a bird पक्षी (M.); a child—मूल (N.); a drama—नाटक (N.); a teacher — शिक्षक, गुरुजी, अध्यापक (M.); a player — खेळाडू (M.); a student — विद्यार्थी (M.); a letter — पत्र (N.); a gentleman — सभ्य गृहस्थ (M.); a clerk — लिपिक (M.); a typist — टंकलेखिका (F.); a grandfather — आजोबा (M.); an essay — निबंध (M.); a story — गोष्ट (F.); an officer—अधिकारी (M).]

अभ्यास ३

Use the present tense of the roots given in the brackets to complete the following sentences (खालील वाक्ये पूर्ण करण्याकरिता कंसात दिलेल्या धातूंची वर्तमानकाळी रूपे योजा) :—

१.	आम्ही प्रश्न	(विचार)	६.	मुले बाकावर	(बस)
२.	तू चित्रपट	(पाहा)	७.	मी कार्यालयात	(जा)
३.	स्त्रिया कपडे	(धू)	८.	वडील कधी कधी	(रागाव)
४.	तो दादरला	(राहा)	९.	आई खाऊ	(आण)
५.	तुम्ही उत्तरे	(दे)	१०.	तू विद्यार्थी	(अस)

अभ्यास ४

Complete the following sentences (खालील वाक्ये पूर्ण करा) :—

१. ——— ——— वाचतो.
२. ——— ——— राहातो.
३. ——— ——— लिहितात.
४. ——— ——— धुता.

५. ——— ——— उडतात. ८. ——— ——— आहोत.
६. ——— ——— फेकता. ९. ——— ——— होतो.
७. ——— ——— जाते. १०. ——— ——— शिकवतात.

[*New words* (नवीन शब्द) : प्रश्न (M.)—A question; चित्रपट (M.)—A film, A picture; स्त्री (F.)—A lady; स्त्रिया—ladies (Plural of स्त्री); उत्तर (N.)—An answer; बाक (M.)—A bench; कार्यालय (N.)—An office; कधी कधी Sometimes.]

२

नामविचार (Nouns)

A Noun is a word used as the name of a person, place or a thing, *e. g.*, राम, मुंबई, पुस्तक.

Now read the following paragraph and note the words in the bold type (खालील परिच्छेद वाचा व ठळक शब्दांकडे लक्ष द्या) :–

मुंबईत महात्मा गांधी मार्ग आहे. तेथे **सुखनिवास** नावाची **इमारत** आहे. या इमारतीत एक **कुटुंब** राहाते. या कुटुंबात चार **माणसे** आहेत. **आई**, **वडील** व दोन **मुले**. वडिलांचे **नाव जीवनजी**, आईचे नाव **सावित्री**, **मुलाचे** नाव **शंकर** व **मुलीचे** नाव **हेमा**. आई लवकर उठते व **काम** करते. ती **घराची स्वच्छता** ठेवते. वडील लवकर उठतात, **तोंड** धुतात व **बागेतील फुले** गोळा करतात. सर्वजण **क्रमाने स्नान** करतात. वडील **देवाची पूजा** करतात, आई **स्वयंपाक** करते, मुले **अभ्यास** करतात. नंतर सर्वजण **जेवण** करतात. वडील **न्यायालयात** काम करतात. मुले **विद्यालयात** जातात. आई **महिलामंडळात** जाते. कुटुंबातील **वातावरण** फार चांगले आहे. या कुटुंबात **आनंद**, **सौजन्य** व **प्रेम** हे गुण दिसून येतात.

मार्ग (M.) A road; इमारत (F.) A building; कुटुंब (N.) A Family; लवकर Early; घर (N.) A house; स्वच्छता (F.) Cleanliness; स्वयंपाक (M.) Cooking; क्रम (M.) An order; अभ्यास (M.) Study; न्यायालय (N.) A court; विद्यालय (N.) A school; महिलामंडळ (N.) A ladies' club; वातावरण (N.) Atmosphere; आनंद (M.) Joy; सौजन्य (N.) Courtsey; प्रेम (N.) Affection/love.

The words in the bold type in the passage above are nouns (नामे). In Marathi, there are three kinds of nouns (and not five as in English): (1) Proper Noun (विशेष नाम), (2) Common Noun (सामान्य नाम), (3) Abstract Noun (भाववाचक नाम) (All Material Nouns and Collective Nouns are classed as Common nouns). The nouns in the bold type in the above passage are classified below:–

Proper Noun (विशेष नाम)	Common Noun (सामान्य नाम)	Abstract Noun (भाववाचक नाम)
मुंबई, महात्मा गांधी, सुखनिवास, जीवनजी, सावित्री, शंकर, हेमा.	मार्ग, इमारत, कुटुंब, माणूस, आई, वडील, मूल, नाव, मुलगा, मुलगी, काम, घर, तोंड, बाग, फूल, क्रम, स्नान, देव, पूजा, स्वयंपाक, अभ्यास, जेवण, न्यायालय, विद्यालय, महिला मंडळ.	स्वच्छता, वातावरण, आनंद, सौजन्य, प्रेम.

(1) *A Proper Noun* is the name of a particular person or place (mountain, river, sea, road, book, building, city, etc.), *e. g*., राम, हिमालय, गोदावरी, अटलांटिक, जनपथ, गीतांजली, ताजमहाल, नागपूर.

(2) *A Common Noun* is a name common to every one of a class of objects, *e. g*., नदी, पेटी, टोपी, देवालय, रस्ता, फळा, मित्र, घर, दिवस.

(3) *An Abstract Noun* is the name of a property or of a quality either in an individual or in an object, *e. g*., नम्रता (Modesty), शौर्य (Bravery), प्रामाणिकपणा (Honesty), सौंदर्य (Beauty), समाधान (Satisfaction). It is easy to distinguish between proper and common nouns. Abstract nouns (भाववाचक नामे) in Marathi are derived in two ways—(1) by the addition of the Sanskrit terminations य, त्व, ता to some of the nouns and adjectives, *e. g*., क्रूर (cruel) + य = क्रौर्य (Cruelty); मित्र + त्व = मित्रत्व (Friendship); कटु (bitter) + ता = कटुता (Bitterness); (2) by the addition of Marathi terminations to nouns and adjectives पण, पणा, ई, की, गिरी, *e. g*., देव + पण = देवपण (Godliness); चांगला + पणा = चांगुलपणा (Goodness); मालक + ई = मालकी (Ownership); आपला + की = आपुलकी (Affinity); गुलाम (a slave) + गिरी = गुलामगिरी (Slavery); सावध (Cautious) + गिरी = सावधगिरी (Cautiousness).

(1) Proper nouns are sometimes used as Common nouns, e. g., (१) तो आधुनिक **कर्ण** आहे (कर्ण—name of Pandava's brother; a noble person). (२) आमच्या वर्गात एक **कुंभकर्ण** आहे (कुंभकर्ण--name of Ravana's brother; a person who always sleeps).

(2) Common nouns are sometimes used as proper nouns, e. g., **जीवन** हे मुलाचे नाव आहे (जीवन—life; water; name of a person).

(3) Sometimes an adjective is used as a noun, *e. g*., (१) **आंधळ्याला** पैसा द्या (आंधळा—blind, a blind person). (२) शहाण्याला शब्दाचा मार (शहाणा—Wise, a wise man).

(4) Sometimes an indeclinable (अव्यय) is used as a noun, *e. g*. त्याची **वाहवा** (indeclinable) झाली (He was praised).

अभ्यास १

Classify the following nouns under the three types of nouns proper, common and abstract :—

भाषा, हात, पाय, वाणी, जून, द्वेष (hatred), परीक्षा, हर्ष (delight), आश्चर्य (surprise), जवाहरलाल, नारळ (A cocoanut), औरंगाबाद, नदी, भूक (hunger), सुतार, सोमवार, प्रेम, तापी, वाईटपणा, सोलापूर, अनुमती (consent), संगम (confluence), तारुण्य (youth).

अभ्यास २

Add to each of the following groups three more nouns of the same kind [illustration : आंबा, पेरू, संत्रे, चिकू, सफरचंद (an apple)] :—

१. सायकल, टांगा, ————, ————, ————.
२. नेमणूक, बढती, ————, ————, ————.
३. टेबल, खुर्ची, ————, ————, ————.
४. सूचना, आदेश ————, ————, ————.
५. लिपिक, अधीक्षक, ————, ————, ————.
६. सुख, दुःख, ————, ————, ————.
७. गाय, घोडा, ————, ————, ————.
८. गुलाब, मोगरा, ————, ————, ————.

अभ्यास ३

Choose the opposites of the following nouns from the list of nouns given at the end :—

१. जन्म, २. मित्र, ३. रात्र, ४. निंदा, ५. नफा, ६. सुख, ७. हिंसा, ८. सज्जन, ९. न्याय, १०. प्रकाश.
(दुःख, दुर्जन, अन्याय, मरण, शत्रू, अंधार, अहिंसा, तोटा, स्तुति, दिवस).

अभ्यास ४

Fill in the gaps with suitable nouns given at the end :—

१. ————कपडे शिवतो. २. कवी————रचतो. ३. नाटककार———लिहितो.
४. मुले————उडवतात. ५. पक्षी————बांधतात. ६. पत्नी————करते.

७. कोळी------पकडतो. ८. अधीक्षक------तपासतात. ९. ------टंकलेखन करतात. १० आम्ही------वाचतो. ११. सूर्य------देतो. १२. शेतकरी------नांगरतो. (ploughs)

[टंकलेखक (A typist), स्वयंपाक, घरटे, कादंबरी, टिप्पणी, शेत, प्रकाश, पतंग, शिंपी, नाटक, मासे, कविता.]

अभ्यास ५

Translate the following sentences into Marathi (Illustration : Bombay is a city—मुंबई हे शहर आहे) :—

(1) Poona is a city. (2) Metro is a theatre. (3) Matheran is a hill-station. (4) Tea is a drink. (5) 'Hamlet' is a play. (6) Kabaddi is a game. (7) A parrot is a bird. (8) Rose is a flower. (9) Gold is a metal. (10) Wisdom is a an abstract noun.

[*New words* : Poona —पुणे; a city—शहर (N); a theatre—चित्रपटगृह (N.); a hill-station—थंड हवेचे ठिकाण (N.); a parrot—पोपट (M.); gold—सोने (N.); a metal—धातू (M.); a drink—पेय (N.); a play—नाटक (N.); a game—खेळ (M.).]

अभ्यास ६

Translate the following sentences into Marathi :—

(1) We offer co-operation. (2) A soldier displays bravery. (3) An officer holds an enquiry. (4) The boy reads an advertisement. (5) An examiner examines an answer-book. (6) The Superintendent reads the draft. (7) The servant shuts the door. (8) The farmer sows seeds. (9) A student performs an experiment. (10) A boy commits a mistake.

[*New words* : co-operation—सहकार्य (N.); to display—दाखविणे; bravery—शौर्य (N.); an enquiry—चौकशी (F.); an advertisement—जाहिरात (F.); to examine—तपासणे; an answer-book—उत्तरपत्रिका (F.); a draft—मसुदा (M.); to shut—बंद करणे; to sow—पेरणे; a seed—बी (N.); an experiment—प्रयोग (M.); a mistake—चूक (F.).]

३

लिंगविचार (Genders)

In the last chapter, we studied different kinds of nouns. Every noun has a gender (लिंग), a number (वचन) and a case (विभक्ती). In this chapter, it is proposed to consider genders in Marathi. It may be stated that genders of nouns in Marathi are generally determined more by practice and usage than by specific rules. In the absence of precise rules, the best way to learn genders is by practice alone.

Notice, *e.g.* the three nouns फळा (a black-board), खुर्ची (a chair) and टेबल (a table). All the three articles are made of wood and yet the three nouns have three different genders Masculine, Feminine and Neuter, respectively. Hence, it is proposed to give mere indications, by way of guidance only. They may help the learner to recognize the genders of Marathi nouns.

Now read the following paragraph :—

पुणे येथे **टिळकपथ** आहे. तेथे एक माध्यमिक **विद्यालय** आहे. **मुले** विद्यालयात शिकतात. विद्यालयाची **इमारत** भव्य आहे. **सकाळ दुपार** दोन वेळा **वर्ग** भरतात. **शिपाई घंटा** देतो. **मुले प्रार्थना** म्हणतात. **शिक्षक** वर्गात जातात. येथे **शिक्षिका** नाहीत. **संस्कृत, शास्त्र, इतिहास, गणित, भाषा** वगैरे **विषय** येथे शिकवतात. **विद्यार्थी वह्या** व **पुस्तके** आणतात. **सोमवार** ते **शुक्रवार** पूर्ण **वेळ शाळा** चालते. **मे महिना** म्हणजे मुलांचा **आनंद**.

We shall now classify the nouns in bold type in this passage, under the three different genders :

Masculine Nouns (पुल्लिंगी नामे)	Feminine Nouns (स्त्रीलिंगी नामे)	Neuter Nouns (नपुसकलिंगी नामे)
टिळकपथ, वर्ग, शिपाई, शिक्षक, इतिहास, विषय, विद्यार्थी, सोमवार, शुक्रवार, मे, महिना, आनंद.	इमारत, सकाळ, दुपार, घंटा, प्रार्थना, शिक्षिका, भाषा, वही, वेळ, शाळा.	पुणे, विद्यालय, मूल, संस्कृत, शास्त्र, गणित, पुस्तक.

The above classification does not reveal any general rules for fixing the genders of nouns. We can at the most say that शिक्षक, विद्यार्थी and

शिपाई are nouns denoting the male kind; hence, they are in the masculine gender; the word शिक्षिका is a noun denoting the female kind and is, therefore, in the feminine gender. It is, therefore, proposed to give a few hints that may help the reader to decide the gender of Marathi nouns. The following may prove useful :—

Nouns (नामे)

Masculine gender (पुल्लिंगी)	Feminine gender (स्त्रीलिंगी)	Neuter gender (नपुसकलिंगी)
(1) Nouns denoting the male kind, *e.g.*— वडील, अध्यापक, विद्यार्थी, मुलगा, पक्षी, कवी, हत्ती, नट, धोबी, शेजारी.	Nouns denoting the female kind, *e.g.*— आई, अध्यापिका, विद्यार्थिनी, मुलगी, पक्षीण, कवयित्री, हत्तीण, नटी, धोबीण, शेजारीण.	Nouns denoting either, *e.g.*— मूल, भावंड, मांजर, गाढव.
(2) Marathi nouns ending in आ, *e.g.*— आंबा, खांदा, घसा, वारा, रस्ता, कांदा, पैसा, दिवा, भत्ता, महिना, देखावा, आरसा, किनारा, रुपया, फायदा, पुतळा, पुरावा, पडदा, नमुना, मसुदा, खुलासा पुरवठा, आराखडा, राजीनामा, गोषवारा, ठावठिकाणा (whereabouts), कायदा, वायदा, घोडा, तबेला, गोठा, हिवाळा, पावसाळा, उन्हाळा.	(a) Sanskrit nouns ending in आ, *e.g.*— कथा, सभा, विद्या, भाषा, भार्या, प्रजा, पूजा, यात्रा, निंदा, वार्ता, शोभा, शंका, आशा, सेवा, चिंता, गुहा, हिंसा, सत्ता, श्रद्धा (faith), संस्था, परीक्षा, सूचना, प्रतिभा (inspiration), प्रार्थना, प्रशंसा, वेदना, भावना, मर्यादा, योजना, रचना, यंत्रणा (machinery), व्यवस्था, मान्यता, सुधारणा, अनुकंपा (compassion), गुणवत्ता (merit), अनुक्रमणिका, दक्षता, कार्यक्षमता. (b) Nouns derived from Urdu, Hindi etc. and ending in आ, *e.g.*— इजा, सुभा, जमा, पागा, रजा, सजा, जागा, मजा, थट्टा, पर्वा.	

Nouns (नामे)—*cont.*

Masculine gender (पुल्लिंगी)	Feminine gender (स्त्रीलिंगी)	Neuter gender (नपुसकलिंगी)
(3) Nouns ending in ई, *e.g.*— मणी (bead), मोती, (pearl).	शाई, तिथी, दाढी, गाडी, नदी, खुर्ची, टोपी, पोळी, उडी, चोरी, माती, वाणी (speech), छत्री, भाजी, मती, बुद्धी, रीती, भीती, भक्ती, दृष्टी, सृष्टी, शक्ती, प्रीती, टेकडी, लेखणी, काकडी, भाकरी, माहिती, मजुरी, ओहोटी, भरती, फिरती, वाटणी, चौकशी, समिती, विनंती, खरेदी, प्रगती, तपासणी, विसंगती, सरासरी, सहमती (concurrence), वस्तुस्थिती, कार्यवाही, जबाबदारी, हातचलाखी.	पाणी, लोणी, मोती, दही.
(4) Nouns ending in ऊ, *e.g.*— लाडू, पेरू, काजू, खडू, बांबू, खाऊ, झाडू, उतारू, अश्रू, शत्रू.	बाजू, वाळू, वस्तू.	रडू, हसू, लिंबू, गळू.
(5) Large and powerful inanimate objects, *e.g.*— डोंगर, समुद्र, पर्वत, सूर्य, ढग, मेघ.	..	..
(6) ..		Words denoting off-springs, *e.g.*— पोर, वासरू, पिल्लू, कोकरू.

Nouns (नामे)—*cont.*

	Masculine gender (पुल्लिंगी)	Feminine gender (स्त्रीलिंगी)	Neuter gender (नपुंसकलिंगी)
(7)	(*a*) Names of the days of a week, *e. g.*— रविवार, सोमवार, शनिवार.	(*a*) Names of rivers, *e.g.*— गंगा, यमुना, गोदावरी.	Names of metal, *e.g.*— सोने, रूपे, पितळ, लोखंड.
	(*b*) Names of months, *e. g.*— चैत्र, वैशाख, मे, जून.	(*b*) Names of the Hindu calender days, *e. g.*— प्रतिपदा, द्वितीया, दशमी.	[Exception – चांदी (F.) (Silver.)]
	(*c*) Names of mountains, *e. g.*— हिमालय, सह्याद्री.	(*c*) Names of Languages *e.g.*— गुजराथी, हिन्दी.	...
		(*d*) Names of directions, *e. g.*— पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण.	...
		(*e*) Names of parts of the day, *e. g.*— सकाळ, दुपार, संध्याकाळ.	...
(8)	...	...	All nouns ending in ए, *e. g.*— केळे, संत्रे, तळे, मडके, गाणे, बसणे, देणे, घेणे.
(9)	...	...	Nouns ending in अन and अण, *e.g.*, वाचन (reading), लेखन, गायन, पचन, पालन, भोजन, स्थान, दान, साधन, भवन, वदन (a face), भांडण, स्मरण, अनुकरण (Imitation), अध्ययन (learning), अध्यापन

Masculine gender (पुल्लिंगी)	Feminine gender (स्त्रीलिंगी)	Neuter gendre (नपुसकलिंगी)
		(teaching), स्पष्टीकरण (clarification), विश्लेषण (analysis), वर्गीकरण (classification), संवितरण (disbursement), समाधान (satisfaction). [Exceptions – चढण, उतरण, शिवण (all F.)].
(10)	Names of cities ending in ई, *e. g.* — मुंबई, दिल्ली, झांशी, अमरावती, परभरणी.	Names of cities, *e. g.* — पुणे, नगर, सोलापूर नागपूर, उस्मानाबाद, नाशिक.
(11) Abstract nouns ending in पणा and वा, *e.g.*, चांगुलपणा, वाईटपणा, गारवा, ओलावा.	Abstract nouns ending in ता, ई, की, गिरी, *e. g.*, धन्यता, कटुता, गरिबी, लुच्चेगिरी, फुशारीकी, मालकी, फसवेगिरी.	Abstract nouns ending in पण, त्व and य, *e.g.*, देवपण, मृदुत्व, दातृत्व, स्वास्थ्य, शौर्य, सत्य.

These indications may help the learner to fix up the genders of nouns when they are not used in a sentence. The gunders of nouns can be determined by the inflections of adjectives, pronouns, verbs and adverbs which relate to the nouns when the latter are used in a sentence, *e.g.*, (१) हा रुमाल (M.) आहे. In this sentence the demonstrative pronoun हा indicates the gender of रुमाल *viz.*, Masculine. (२) मुलाने हे मोठे पुस्तक चांगले वाचले. In this sentence the gender of पुस्तक, *viz.*, Neuter can be determined by हे the demonstrative pronoun, by मोठे the adjective, by चांगले the adverb and by वाचले the verb.

(३) हा देखावा **चांगला** आहे—रमणीय (pleasing); रम्य, सुंदर (beautiful); आल्हादकारक, आल्हाददायक (delightful).

(४) हा घोडा **चांगला आहे**—देखणा (handsome), चपळ (active), मजबूत (strong), धष्टपुष्ट (well-built, well-nourished).

(५) हा रोखपाल (cashier) **चांगला आहे**—अनुभवी (experienced), प्रामाणिक (honest), कार्यक्षम (efficient).

Feminine (स्त्रीलिंगी)

(१) ही मुलगी **चांगली** आहे—कष्टाळू (hard-working), कामसू (assiduous), आज्ञाधारक (obedient).

(२) ही जागा **चांगली** आहे—हवेशीर (airy, well ventilated), ऐसपस (spacious).

(३) ही सुरी **चांगली** आहे—तीक्ष्ण, धारदार (sharp).

(४) ही भाजी **चांगली** आहे—ताजी (fresh), हिरवीगार (all-green), जीवनसत्त्वयुक्त (containing vitamins).

(५) ही आमटी (curry) **चांगली** आहे—रुचकर (tasty), पाचक (digestive), पौष्टिक (nourishing).

Neuter (नपुंसकलिंगी)

(१) हे उत्तर **चांगले** आहे—योग्य (fit, fitting), समर्पक (befitting), मुद्देसूद (to the point), अर्थपूर्ण (full of meaning), तर्कशुद्ध (logical), सयुक्तिक (appropriate).

(२) हे चांदणे चांगले आहे—मनोहर (pleasing, charming) (please see in 'देखावा चांगला आहे').

(३) हे औषध **चांगले आहे**—गुणकारक, गुणकारी, परिणामकारक (effective), रोगनिवारक (remover of the disease), रोग प्रतिबंधक (preventive).

(४) हे दूध **चांगले** आहे—पौष्टिक (nourishing), ताजे (fresh), निर्जंतुक (pasteurized), रुचकर (tasty), निर्भेळ (unadulterated).

(५) हे पाणी **चांगले** आहे—थंड, गार (cold); स्वच्छ (clean), निर्जंतुक (free from bacteria), पाचक (digestive), रुचकर (tasty).

Masculine (पुल्लिंगी)

(१) तो नोकर **वाईट** आहे—उर्मट, उद्धट (arrogant); मग्रूर (rude), उन्मत्त (rampant), दुर्गुणी, व्यसनी (vicious, addicted); अप्रामाणिक (dishonest), बडबड्या (talkative).

(२) तो कपडा **वाईट** आहे—मळकट (dirty), खरबरीत (rough), जीर्ण (old) फाटका (torn).

(३) तो मुलगा **वाईट** आहे—व्रात्य, चेष्टेखोर (mischievous), लबाड, धूर्त (cunning, shrewd), दुष्ट, दुराचारी (wicked, ill-behaved).

(४) तो घोडा **वाईट** आहे—लुकडा, अशक्त (weakling), निरुपयोगी (useless), रोगट (unhealthy).

(५) तो माणूस **वाईट** आहे—स्वार्थी (selfish), कपटी, विश्वासघातकी (treacherous); अविश्वास्य (faithless, untrustworthy).

Feminin (स्त्रीलिंगी)

(१) ती कादंबरी **वाईट** आहे—अश्लील (indecent), कंटाळवाणी (boring).

(२) ती म्हैस **वाईट** आहे—मारकी, हडकुळी (weakling); भाकड (dry).

(३) ती हवा **वाईट** आहे—रोगट (unhealthy); अपायकारक (harmful), दमट (damp), अत्युष्ण (too hot).

(४) ती इमारत **वाईट** आहे—कोंदट (congested), जुनाट (very old).

(५) ती प्रगती **वाईट** आहे—असमाधानकारक (unsatisfactory), अपूर्ण (incomplete).

Neuter (नपुंसकलिंगी)

(१) ते नाणे वाईट आहे--बनावट (counterfeit), खोटे (false), बद्द (not giving the usual ring).

(२) ते दूध वाईट आहे--नासके (spoilt), बेचव (tasteless).

(३) ते फूल वाईट आहे--सुकलेले, कोमेजलेले (faded); अपायकारक (harmful),

(४) ते पाणी वाईट आहे--गढूळ (muddy), अपायकारक (harmful), जड (heavy).

(५) ते घर वाईट आहे--कोंदट (congested), जुनाट (very old), पडके (dilapidated).

Sometimes an adjective is declined like a noun. In that case it has inflected forms like those of a noun. All adjectives ending in अ are declined like masculine nouns ending in अ., *e. g.* वाईट (bad).

	Singular	*Plural*
Nom.	वाईट	वाईट
Acc.	वाइटास, वाईटाला	वाइटांस, वाइटांला, वाइटांना
Instr.	वाइटान, वाइटाशी	वाइटांनी, वाइटांशी
Dative	वाइटास, वाइटाला	वाइटांस, वाइटांला, वाइटांना
Abl.	वाइटाहून	वाइटांहून
Gen.	वाइटाचा-ची-चे	वाइटांचा, वाइटांची, वाइटांचे
Loc.	वाइटात	वाइटांत

Adjectives ending in आ are declined like घोडा (M.) when they are used in the masculine gender, like नदी (F.) when they are used in the feminine gender and like गाणे (N.) when they are in the neuter gender. Examples of this type are :-

(१) चांगल्याची संगत धरा (Associate with the good *or* Befriend the good)

(२) वाईटांची संगत धरू नका (Do not associate with the bad *or* shun the bad).

(2) *Adjectives showing quantity* (संख्यावाचक विशेषणे). – Out of these the cardinals and ordinals can be inflected when they are used as substantives. They then yield the same forms as other adjectives, mentioned above, *e.g.*—

Examples of cardinals	(१) आठांत तीन मिळवा (Add three to eight). (२) पंधरातून पाच उणे करा (Subtract five from fifteen). (३) पाचला तीनाने गुणा (Multiply five by three). (४) सोळाला चाराने भागा (Divide sixteen by four).
Examples of ordinals	(१) दुसऱ्यांपासून खूप शिकण्यासारखे आहे (There is much to learn from others). (२) पाचव्याला सातवीत प्रवेश द्या (Admit the fifth to the seventh standard). (३) तिसऱ्याने काम केले. (The third did the work).

The सार्वनामिक विशेषणs have been dealt with in the previous chapter. As regards the धातुसाधित विशेषणs, they are inflected like other adjectives ending in आ.

Uses of adjectives :—

(1) When an adjective qualifies two or more nouns, it agrees with the nearest, *e.g.* मला चांगले विद्यार्थी व विद्यार्थिनी आवडतात (I like good students). (2) When the subject denotes inanimate objects, the predicative adjective, (*i.e.* the adjetive qualifying the predicate) agrees with the last., e.g. त्याचा कोट व टोपी मोठी होती (His coat and cap were big). (3) Sometimes two or more adjectives qualify a single noun., *e.g.*, हे एक जुने आणि उंच झाड आहे (This is an old and tall tree). (4) The adjective may be used as the object of a transitive verb, e.g. आपण दुसऱ्यांचे वाईट चिंतू नये (We should never think ill of others). (5) When there is a comparison between two objects, the adjective is placed after the ablative case (पंचमी) of the noun with which another is compared, *e.g.* पाणी तेलापेक्षा जड असते. (Water is heavier than oil). (6) There are no suffixes in Marathi for comparative and the superlative as there are in Sanskrit. The sentence in the superlative degree could be as follows, *e.g.* (i) तो वर्गातील सर्व मुलांत हुशार आहे (He is the cleverest boy in the class);

(ii) धातूंत सोने सर्वांत महाग आहे (Gold is the costliest of all the metals), The following sentence in the comparative degree may be stated thus. e.g. (i) चालण्यापेक्षा धावणे बरे (Running is better than walking); (ii) भारतापेक्षा अमेरिका जास्त श्रीमंत आहे (America is richer than India).

अभ्यास १

Translate the following into Marathi :—

(1) A white handkerchief. (2) A black cap. (3) Good replies. (4) A happy family. (5) An obedient girl. (6) An odd number. (7) Indecent novels. (8) The fifth house. (9) The eleventh house. (10) The seventeenth road. (11) Talkative boys. (12) Smiling faces. (13) The first child, the second daughter, the last child. (14) Indian atmosphere. (15) A violent riot. (16) A fatal blow. (17) A scientific reason. (18) A cultural programme.

[*New words*:- A riot – दंगल (F.); Violent – हिंसक; fatal – प्राणांतिक; a blow – प्रहार (M.); cultural – सांस्कृतिक].

अभ्यास २

Rearrange the words in each group so that they make correct sentnecs :—

(१) कोणत्याही, नाहीत, द्राक्षे, माणसाला, आंबट, आवडत. (२) फार, असतात, चांगले, महाग, आंबे, व, गोड. (३) आहे, हा, शुक्र, तारा, तेजस्वी. (४) जागतिक, शास्त्रीजींनी, कीर्ती, मिळविली. (५) गर्विष्ठ, होता, हा, अहंकारी, पुरुष, हिटलर. (६) हिंसक, रस्त्यावर, दंगल, सतराव्या, झाली, एक. (७) आहे, आई, प्रेमळ, माझी, फार (८) तिसऱ्या, आहे, मुख्य, मजल्यावर, कार्यालय. (९) शेवटचा, आहे, आठवड्याचा, रविवार, हा, दिवस. (१०) बक्षीस, पन्नास, मिळाले, मुलीला, पहिल्या, रुपयांचे.

अभ्यास ३

Prefix suitable adjectives to the nouns mentioned below: —

(१) ········ गांधी. (२) ······ टिळक. (३) ······ वल्लभभाई पटेल. (४) ········ विनोबाजी. (५) ······ कर्वे. (६) ······ भाऊराव पाटील. (७) ········ रामदास. (८) ········ रमाबाई. (९) ······ नेहरू. (१०) ········ आगरकर. (११) ······ बाबू गेनू.

(Solutions) :– महर्षि, हुतात्मा (Martyr), पंडित, संत, कर्मवीर, समाजसुधारक, पंडिता, महात्मा, सरदार, आचार्य, लोकमान्य.

अभ्यास ४

Fill in the gaps in the following sentences with suitable adjectives given at the end :—

(१) .... घरात माणसे राहतात; .... घरात माणसे राहात नाहीत.
(२) .... भाजी पौष्टिक असते; .... भाजी वाईट असते.
(३) तो नोकर .... आहे; .... नोकरास नोकरीवर ठेवत नाहीत.
(४) हे पुस्तक .... आहे; लोक .... पुस्तक वाचत नाहीत.
(५) माथेरानची हवा .... आहे; नागपूरची हवा .... आहे.
(६) एक, तीन, पाच हे .... आकडे आहेत; दोन, चार, सहा हे .... आकडे आहेत.
(७) दुपार हा दिवसाचा .... भाग आहे; संध्याकाळ हा दिवसाचा .... भाग आहे.
(८) सिंह हा .... प्राणी आहे; गाय हे .... जनावर आहे.
(९) आरे कॉलनीचे दूध .... असते; इतर दूध .... असते.
(१०) चहा हे .... पेय आहे; लस्सी हे .... पेय आहे.

(शेवटचा, अश्लील, सम, थंड, बेचव, मधला, वाचनीय, प्रामाणिक, रानटी, ताजी, कोंदट, शिळी, अप्रामाणिक, हवेशीर, विषम, चवदार, पाळीव, उष्ण).

अभ्यास ५

Write suitable nouns against each adjective. (Write at least three nouns against each) :—

(१) दैनिक .... (२) वार्षिक .... (३) शासकीय .... (४) मुख्य .... (५) यशस्वी .... (६) कैलासवासी .... (७) शैक्षणिक .... (८) ऐतिहासिक .... (९) वाचनीय .... (१०) सांस्कृतिक .... (११) तेजस्वी .... (१२) प्रामाणिक ....

अभ्यास ६

Fill in the gaps with suitable cardinals and ordinals :—

(१) गुरुवार हा आठवड्याचा .... दिवस आहे. (२) मे हा वर्षाचा .... महिना आहे. (३) कार्यालयाची वेळ .... ते .... आहे. (४) नोव्हेंबरच्या .... तारखेस आपण बालदिन साजरा करतो. (५) माझे वय .... वर्षे आहे. (६) दर .... तारखेस पगार मिळतो.

(७) आमचे कार्यालय ······ मजल्यावर आहे. (८) डिसेंबरच्या ······ तारखेस नाताळ सुरू होतो. (९) आईवडिलांचे सर्वांत ······ मुलावर जास्त प्रेम असते. (१०) माघ हा वर्षाचा ········ महिना आहे.

अभ्यास ७

Give the Marathi rendering of the following :—

(1) On the third road. (2) By the tenth boy. (3) To a blind beggar. (4) Of such girls. (5) To wise men. (6) With the short stick. (7) In the deep well. (8) From the white cow. (9) In the appropriateanswer. (10) In an old book. (11) By the straight road. (12) For correct answers. (13) Fifty years ago. (14) For every student. (15) Than clever women.

अभ्यास ८

Translate the following into Marathi :--

(1) He breaks the world record. (2) She is successful at the annual examination. (3) The servant is dishonest and arrogant. (4) The house is airy and spacious. (5) The boy is healthy, meek and self-reliant. (6) This is a pleasant news; hence all like it. (7) This is the first and the last chance. (8) October is the tenth month in a year. (9) Candidate at S. N. 22 stands first. (10) This is an auspicious moment. (11) Bad boys hide their faults. (12) This is an industrial area. (13) Thirty per cent of the people in India are literate. (14) Dry fruits are tasty. (15) He purchases a sharp penknife from the market. (16) There are many selfish men in the world; the selfless ones are few. (17) There are three colleges, eight secondary schools and fifteen primary schools in this city.

[*New words* : A world record —जागतिक उच्चांक; Meek—नम्र; a chance—संधी (F.); S. N. 22—बाविसाव्या क्रमांकाचा; Sharp—तीक्ष्ण; Selfish—स्वार्थी; Selfless—निस्वार्थी.]

भूतकाळ-भाग १—अकर्मक क्रियापदे

(*Past Tense—Part I—Intransitive Verbs*)

The past tense is used to express the notion that an act has taken place in time already spent or passed. *e.g.*, वडिलांनी मला गोष्ट सांगितली (Father told me a story); वसंत मुंबईस गेला (Vasant went to Bombay).

Now, read the following paragraph and note the verbs in the bold type :—

एकदम जोराचा पाऊस **आला**. मी जवळच्या इमारतीकडे **धावलो**. माझ्याबरोबर माझे मित्र **होते**, तेही **धावले**. इमारतीच्या खाली गर्दी होती, म्हणून आम्ही दुसऱ्या इमारतीकडे **धावलो**. इतक्यात माझा एक मित्र **आला**. तोही पावसात **भिजला**. थोड्या वेळाने पाऊस **थांबला**. मी घरी **गेलो**. माझे सर्व मित्र घरी **गेले**. माझा मुलगा शाळेतून **आला**, मुलगी शाळेतून परत **आली**.

The verbs in the bold type in the above paragraph are in the past tense, *e.g.*, आला is the past tense of येणे; होते is the past tense of असणे; गेले is the past tense of जाणे, and so on.

The forms of verbs in the past tense are almost the same in the case of transitive (सकर्मक) and intransitive (अकर्मक) verbs. In the case of intransitive (अकर्मक-without the object) verbs, the verbs agree in number and in gender with the subject, *e.g.*, मुलगा धावला (The boy ran); घड्याळ बंद पडले (The watch stopped); मुलगी घरी आली (The girl came home).

In all these cases the verbs धावला, पडले and आली agree with the subject मुलगा, घड्याळ and मुलगी, respectively, in respect of number, gender and case.

As against this, transitive verbs when used in the past tense agree with the object; and the subject takes up the instrumental case (तृतीया विभक्ती), *e.g.*, नोकराने रुमाल आणला, मुलीने भाजी आणली, लिपिकाने पत्र आणले. The object in this case is uninflected (*i.e.*, having no case ending).

In all these sentences, the verb आणणे is transitive and in the past tense. Therefore, it agrees with the respective objects रुमाल (M.), भाजी (F.) and पत्र (N.), which are uninflected forms of the original nouns.

We first take up intransitive verbs in the past tense. All the forms of the verbs बसणे in the past tense are given below: --

बसणे (to sit)

	Singular	*Plural*
First person (प्रथम पुरुष)	मी बसलो (I sat) (M.) मी बसले (I sat) (F.)	आम्ही बसलो आपण बसलो (We sat) (M. and F.) तुम्ही बसला/बसलात
Second person (द्वितीय पुरुष)	तू बसलास (You sat) (M.) तू बसलीस (You sat) (F.)	आपण बसला/बसलात (You sat) (M. and F.)
Third person तृतीय पुरुष	1. तो बसला (He sat) (M.) 2. ती बसली (She sat) (F.) 3. ते बसले (It sat) (N.)	ते बसले (M.) त्या बसल्या (F.) ती बसली (N.) (They sat)

The following substantives may be substituted in place of तो (Sing.) and ते (Plu.)--both Masculine :—

1. Singular–मुलगा, पुरुष, नोकर, कवी, धोबी, मित्र—बसला
2. Plural–मुलगे, पुरुष, नोकर, कवी, धोबी, मित्र--बसले

(All Masculine)

The following substantives may be substituted in place of ती (Sing.) and त्या (Plu.)-both Feminine :-

1. Singular–मुलगी, स्त्री, बहीण, कवयित्री, धोबीण, मैत्रीण–बसली
2. Plural–मुली, स्त्रिया, बहिणी, कवयित्री, धोबिणी, मैत्रिणी–बसल्या

(All Feminine)

The following substantives may be substituted in place of ते (Sing.) and ती (Plu.)-both Neuter :-

1. Singular–मूल, मांजर, गाढव,--बसले
2. Plural–मुले, मांजरे, गाढवे--बसली

(All Neuter)

In addition to the verbs listed in the Chapter on the present tense, we give below some additional verbs :—

1.	हालणे	(to move).	13.	ऋणी असणे	(to be obliged).
2.	माहीत असणे	(to know).	14.	चमकणे	(to shine, to flash).
3.	नापास होणे	(to fail).	15.	गरजणे	(to thunder).
4.	बरे होणे	(to recover from illness).	16.	मरणे	(to die).
5.	भिजणे	(to be wet).	17.	रुजू होणे	(to join duty).
6.	जळणे	(to burn).	18.	परत रुजू होणे	(to resume duty).
7.	दमणे	(to be tired).	19.	हाती असणे	(to rest with).
8.	चढणे	(to climb).	20.	भूक लागणे	(to be hungry).
9.	पोहोचणे	(to reach).	21.	तहान लागणे	(to be thirsty).
10.	उगवणे	(to rise).	22.	पाऊस पडणे	(to rain).
11.	मावळणे	(to set).	23.	आश्चर्य वाटणे	(to be surprised).
12.	खोकणे	(to cough).	24.	ओकणे	(to vomit).

(1) The following intransitive verbs assume irregular forms in the past tense :—

(१) पळ—पळालो. (२) निघ--निघालो. (३) जा—गेलो. (४) ये–आलो. (५) मर--मेलो. (६) हो—झालो. (७) उड -- उडाला. (८) राह— राहिलो.

(2) The following verbs, though transitive, yield forms on the lines of the intransitive verbs, *i.e.*, they agree with the subject and not with the object as per rule mentioned above *e.g.*:—

(१) पिणे — प्या—प्यालो. (२) भिणे — भ्या — भ्यालो. (३) म्हणणे — म्हणा -- म्हणालो. (४) विसरणे -- विसरलो. (५) शिकणे — शिकलो. (६) जेवणे -- जेवलो. (७) बोलणे — बोललो. (८) मिळणे -- मिळालो. (९) गळणे -- गळालो. (१०) चावणे — चावलो.

Examples of the first four verbs in (2) above are given below :—

	(M.)	(F.)	(N.)
(१)	मुलगा चहा प्याला,	मुलगा कॉफी प्याला,	मुलगा दूध प्याला.
	(M.)	(F.)	(N.)
(२)	मुलगी वाघाला भ्याली,	मुलगी वाघिणीला भ्याली,	मुलगी डुकराला भ्याली.

(M.) (F.) (N.)
(३) वडील श्लोक म्हणाले, वडील गीता म्हणाले, वडील सूत्र म्हणाले.
(M.) (F.) (N.)
(४) लिपिक आदेश विसरला, लिपिक टिप्पणी विसरला, लिपिक पत्र विसरला.

In all these sentences the verb though transitive, agrees with the subject and not with the object.

The forms of the verb होणे (to become) in the past tense are given below :-

	Singular	*Plural*
Frist Person	मी झालो (M.) / मी झाले (F.) (I became)	आम्ही झालो / आपण झालो (M. F.) (We became)
Second Person	तू झालास (M.) / तू झालीस (F.) (You became)	तुम्ही झाला / झालात / आपण झाला / झालात (M. F.) (You became)
Third Person	तो झाला (M.) (He became) / ती झाली (F.) (She became) / ते झाले (N.) (It became)	ते झाले (M.) / त्या झाल्या (F.) / ती झाली (N.) (They became.)

The forms of the verb असणे (to be) in the past tense are given below :-

	Singular	*Plural*
First Person	मी होतो (M.) / मी होते (F.) (I was)	आम्ही होतो / आपण होतो (M. F.) (We were)
Second Person	तू होतास (M.) / तू होतीस (F.) (You were)	तुम्ही होता / होतात / आपण होता / होतात (M. F.) (You were)
Third Person	तो होता (M.) (He was) / ती होती (F.) (She was) / ते होते (N.) (It was)	ते होते (M.) / त्या होत्या (F.) / ती होती (N.) (They were.)

in the gaps with the past tense forms of verbs shown at the end h of the following sentences :—

(१) मी सकाळी सहा वाजता (उठणे). (२) काल आम्ही घरी (बसणे). (३) ावसात (भिजणे). (४) तुम्ही मुंबईत खूप (फिरणे). (५) तो लिपिकावर फार गावणे). (६) ते फार (भांडणे). (७) ती मुलगी झाडावर (चढणे). (८) स्त्रिया ला मंडळात (जाणे). (९) माझ्या पायाला उंदीर (चावणे). (१०) आम्ही (खेळणे) व (दमणे). (११) रमेश माझ्या घरी (येणे). (१२) पत्नी मला हणणे). (१३) मी घरात (जाणे). (१४) जेवण तयार (होणे) काय? (१५) मच्यावर खूप संकटे (येणे).

त २

ive the corresponding past tense forms of the following present forms :—

हेत, भांडतोस, पळतो, पडतात, घाबरतात, भटकते, मरतेस, पिते, थुंकता, फिरतो.

स ३

ranslate the following sentences into Marathi :—

(1) We went home at 5 o'clock yesterday. (2) The son quarrelled ith his father. (3) The officer came to the office and was angry with ıe peon. (4) He drank tea in the morning. (5) She walked in the ain. (6) My daughter said, "A rat bit my foot". (7) My friends layed cards in my house. (8) People ran to the nearest building. 9) Children started from the school and reached their home in time. 10) We were afraid of darkness. (11) Five men, three women and wo children died in the fire. (12) My friend came to me in the aorning. (13) People were angry with the authorities. (14) The whole ıation was surprised. (15) It rained heavily yesterday morning.

New words : in the rain — पावसात; cards—पत्ते; was surprised — ार्यचकित झाले; with the authorities — अधिकाऱ्यांवर; it rained — पाऊस ा].

भूतकाळ-भाग २--सकर्मक क्रियापदे

(*Past Tense—Part II—Transitive Verbs*)

In this Part the forms of transitive verbs in the past tense will be dealt with. Now read the following sets of sentences :—

Present Tense	*Past Tense*
१. लिपिक मसुदा (M.) लिहितो.	१. लिपिकाने मसुदा (M.) लिहिला.
२. लिपिक मसुदे (M.) लिहितो.	२. लिपिकाने मसुदे (M.) लिहिले.
३. लिपिक मसुदा (M.) लिहितात.	३. लिपिकांनी मसुदा (M.) लिहिला.
४. लिपिक मसुदे (M.) लिहितात.	४. लिपिकांनी मसुदे (M.) लिहिले.

In these sentences the object मसुदा is in the masculine gender; in the past tense the verbs लिहिला, etc., agree with the number, gender and the case of the object, *viz.*, मसुदा, *e.g.*, मसुदे लिहिले, मसुदा लिहिला. The subject लिपिक is changed to the instrumental case लिपिकाने or लिपिकांनी according to number in the original sentence.

Now read the following sentences :—

१. मुलगी भाजी (F.) आणते.	१. मुलीने भाजी (F.) आणली.
२. मुलगी भाज्या (F.) आणते.	२. मुलीने भाज्या (F.) आणल्या.
३. मुली भाजी (F.) आणतात.	३. मुलींनी भाजी (F.) आणली.
४. मुली भाज्या (F.) आणतात.	४. मुलींनी भाज्या (F.) आणल्या.

In these sentences the object भाजी is in the feminine gender. The verbs आणली, आणल्या in the past tanse, etc., agree with the objects भाजी and भाज्या respectively. The subjects मुलगी, मुली are changed to their respective instrumentals, *viz.*, मुलीने, मुलींनी.

Now read the following sentences :—

१. नोकर पत्र (N.) टाकतो.	१. नोकराने पत्र (N.) टाकले.
२. नोकर पत्रे (N.) टाकतो.	२. नोकराने पत्रे (N.) टाकली.
३. नोकर पत्र (N.) टाकतात.	३. नोकरांनी पत्र (N.) टाकले.
४. नोकर पत्रे (N.) टाकतात.	४. नोकरांनी पत्रे (N.) टाकली.

In these sentences, the object पत्र is in the neuter gender. The verbs टाकले and टाकली in the past tense agree with the object पत्र and पत्रे respectively. The subjects नोकर (Sing.) and नोकर (Pl.) are changed to their instrumental forms नोकराने and to नोकरांनी respectively.

We give below some additional transitive verbs :—

(१) मुक्त करणे (to discharge, to relieve).
(२) कृपा करणे (to favour).
(३) तक्रार करणे (to complain).
(४) त्रास देणे (to trouble).
(५) तयार करणे (to prepare).
(६) दूर करणे (to redress).
(७) निलंबित ठेवणे (to suspend).
(८) आग्रह धरणे (to insist on).
(९) प्रतिज्ञा करणे (to pledge).
(१०) निश्चय करणे (to resolve).
(११) मेळ घालणे (to reconcile).
(१२) नजरेस आणणे (to bring to notice).

We can, with the help of these data, arrive at some generalizations. In the case of a transitive verb used in the past tense : (1) the verb agrees with the object in gender and in number; (2) the subject is changed to its instrumental case, (case endings ने and नी) singular number or plural number, as the case may be.

This generalization holds good when the object is un-inflected (अप्रत्ययी कर्म). But if the object is used in its inflected form, *i.e.*, when it is used with a case-ending (सप्रत्ययी कर्म) the verb in the past tense is used *in the third person singular* and *in the neuter gender*, irrespective of the number (singular or plural) of the subject and of the object, *e.g.*:—

Present	*Past*
१. दुर्जन सज्जनाला फसवतो.	१. दुर्जनाने सज्जनाला फसवले.
२. दुर्जन सज्जनांना फसवतो.	२. दुर्जनाने सज्जनांना फसवले.
३. दुर्जन सज्जनाला फसवतात.	३. दुर्जनांनी सज्जनाला फसवले.
४. दुर्जन सज्जनांना फसवतात.	४. दुर्जनांनी सज्जनांना फसवले.

Some additional sentences of this kind are given below :—

Present	*Past*
१. वडील मुलाला बोलावतात.	१. वडिलांनी मुलाला बोलावले.
२. शिपाई चोराला पकडतो.	२. शिपायाने चोराला पकडले.
३. शिपाई चोराला पकडतात.	३. शिपायांनी चोराला पकडले.
४. शिपाई चोरांना पकडतात.	४. शिपायांनी चोरांना पकडले.

The following transitive verbs assume irregular forms in the past tense, *e.g.* :—

(१) घेणे – घेतला. (२) धुणे – धुतला. (३) देणे – दिला. (४) म्हणणे – म्हटला. (५) खाणे – खाल्ला. (६) बघणे – बघितला. (७) मागणे – मागितला. (८) सांगणे– सांगितला. (९) करणे – केला. (१०) पाहणे – पाहिला. (११) वाहणे – वाहिला. (१२) गाणे – गायला. (१३) इच्छिणे (wish) – इच्छिला.

This rule of changing the subject to its instrumental case is not applicable to the personal pronouns मी, आम्ही, तू, तुम्ही. These retain the same form in the instrumental case (the old instrumental forms म्या for मी and त्वा for तू are very rarely used), *e. g.* :—

Present	*Past*
१. मी आंबा खातो / खाते.	१. मी आंबा खाल्ला;–मी आंबे खाल्ले.
२. आम्ही काम / कामे करतो.	२. आम्ही काम केले;–आम्ही कामे केली.
३. तू पत्र / पत्रे लिहितोस.	३. तू पत्र लिहिलेस;-तू पत्रे लिहिलीस.
४. तुम्ही बातमी / बातम्या सांगता.	४. तुम्ही बातमी सांगितली/सांगितलीत; तुम्ही बातम्या सांगितल्या/सांगितल्यात.

The rule of changing the subject to the instrumental case is also not applicable in the case of transitive verbs आवडणे, वाटणे :–

Present	*Past*
१. मला आंबा आवडतो; मला आंबे आवडतात.	१. मला आंबा आवडला; मला आंबे आवडले.
२. मला असे वाटते.	२. मला असे वाटले.
३. तुला भीती वाटते.	३. तुला भीती वाटली.

The following sentences will give an idea as to how sentences are converted from the present tense to the past *vice versa* :—

Present	*Past*
१. राजा युद्ध करतो.	१. राजाने युद्ध केले.
२. राजा युद्धे करतो.	२. राजाने युद्धे केली.
३. राजे युद्ध करतात.	३. राजांनी युद्ध केले.
४. राजे युद्धे करतात.	४. राजांनी युद्धे केली.

Additional Sentences

Present	*Past*
१. मुलगा दात घासतो––मूल दात घासते.	१. मुलाने दात घासले.
२. मुले दात घासतात.	२. मुलांनी दात घासले.
३. भिकारी पेटी वाजवतो.	३. भिकाऱ्याने पेटी वाजवली.
४. भिकारी पेटी वाजवतात.	४. भिकाऱ्यांनी पेटी वाजवली.
५. लिपिक टिप्पणी लिहितात.	५. लिपिकांनी टिप्पणी लिहिली.
६. लिपिक टिप्पणी लिहितो.	६. लिपिकाने टिप्पणी लिहिली.
७. आम्ही चित्रपट पाहतो.	७. आम्ही चित्रपट पाहिले.
८. तुम्ही कपडे धुता.	८. तुम्ही कपडे धुतले.
९. तो काम करतो.	९. त्याने काम केले.
१०. ती निरोप सांगते.	१०. तिने निरोप सांगितला.

अभ्यास १

Construct sentences (as many as you can) with the help of the words given in brackets, using the verb in the past tense :—

(१) (भिकारी) (भीक) (माग). (२) (सचिव) (काम) (सांग). (३) (तो) (स्थळ) (पाह). (४) (वडील) (कपडे) (बदल). (५) (ती) (रजा) (घे). (६) (अधिकारी) (चर्चा) (कर). (७) (ते) (बातमी) (ऐक). (८) (लोक) (टाळी) (वाजव). (९) (अधीक्षक) (हाक) (मार). (१०) (सचिव) (मसुदा) (तपास).

अभ्यास २

Fill in the gaps in the following sentences by means of suitable nouns given at the end :—

(१) गाढवाने––मारली. (२) गाढवांनी—मारल्या. (३) निदेशकांनी––दाखवली. (४) निदेशकांनी—दाखवल्या. (५) मी —विकत घेतला. (६) मी––विकत घेतले. (७) तिने — विकली. (८) तिने– – विकल्या. (९) सचिवांनी — विचारला. (१०) सचिवांनी—विचारले. (११) तू––केलास. (१२) तू—केलेस. (१३) तुम्ही—काढले. (१४) तुम्ही––काढलीत. (१५) नाटककारांनी––लिहिले. (१६) नाटककारांनी—लिहिली.

(Answers : नाटके, प्रश्न, गृहपाठ, भाज्या, लाथा, वही, घोडे, नाटक, भाजी, लाथ, घोडा, चित्र, वह्या, चित्रे.)

अभ्यास ३

Complete the following sentences by using suitable subjects and objects :—

(१) ... बांधले. (२) .... प्याला. (३) .... पकडले. (४) .... दिले. (५) .... आणलेस. (६) .... घेतलीत. (७) .... शिवले. (८) .... केली. (९) .... बोलावले. (१०) .... मारले.

अभ्यास ४

Translate the following sentences into Marathi :—

(1) The cat killed a mouse; cats killed mice. (2) He wrote a letter and posted it. (3) She brought books and vegetables. (4) The teacher asked a few questions. (5) First, I ate the apple and then drank the milk. (6) He shut the door and opened the window. (7) The Chief Minister made a statement in the Assembly. (8) The merchant sold sugar in the blackmarket. (9) We did our work and the superintendent examined it. (10) The students saw the Ajintha Caves. (11) I gave my wife fifty rupees and she bought a new saree. (12) The novelist wrote two novels and published them.

[*New words* : a mouse — उंदीर (M.); to post — पोस्टाच्या पेटीत टाकणे; an apple — सफरचंद (N.); a statement — निवेदन (N.); in the black-market — काळ्याबाजारात; Students — विद्यार्थी; to publish — प्रसिद्ध करणे.]

अभ्यास ५

Rewrite the following passages using the verbs in the past tense :—

खालील उताऱ्यातील क्रियापदांची भूतकाळी रूपे वापरून उतारे पुन्हा लिहा :—

(१) रमेश माझा मित्र आहे. तो माझ्या घरी येतो. मी दार उघडतो व त्याला काही प्रश्न विचारतो. तो कार्यालयातून घरी येतो, कपडे बदलतो, हातपाय धुतो, फराळ करतो, चहा पितो व वर्तमानपत्र वाचतो. त्याची पत्नी कापडाच्या दुकानात जाते व सुंदर पातळ पाहते.

(२) कुंभार मडकी करतो. सुतार खुर्ची बनवतो. धोबी कपडे धुतो. कोळी मासे पकडतो. चिकित्सक औषध देतो. गाय दूध देते. वाणी साखर विकतो.

(३) एक कोल्हा आहे, त्याला भूक लागते. तो अरण्यात जातो. खूप फिरतो. बऱ्याच वेळाने तो एक द्राक्षाचा वेल पाहतो. एक उडी मारतो. पुष्कळ उड्या मारतो. निराश होतो. परत जातो.

(४) एक गृहस्थ आहे. तो मुंबईला येतो. मित्राकडे उतरतो. दोघे प्रेक्षणीय स्थळे पाहावयास निघतात. मंत्रालयापाशी येतात. मंत्रालयाची भव्य इमारत पाहतात.

भविष्यकाळ (Future Tense)

The future tense is used to express the sense of futurity. It is used of an act that has still to take place, *e.g.*, **उद्या पाऊस पडेल** (It will rain tomorrow); मी उद्या आपल्याला भेटेन (I shall see you tomorrow); लोक प्रार्थना करतील (People will pray).

Now read the following paragraph :—

गुरुजी म्हणाले, "जरा वेळाने आकाशात ढग **जमतील**, काळोख **होईल**, जोराचा पाऊस **पडेल**. आपण सर्व वर्गातच **बसू**. तुम्ही बाहेर कसे **जाल**? मी तुम्हाला गोष्टी **सांगेन**; नंतर तुम्ही प्रत्येकजण एकेक गोष्ट **सांगाल** काय ?" राम म्हणाला, "गुरुजी, मी एक गोष्ट **सांगेन**. माझे मित्र पण एक एक गोष्ट **सांगतील**". "ठीक आहे", गुरुजी म्हणाले, "पाऊस थांबेपर्यंत आपण वर्गातच **बसू**; तोपर्यंत गोष्टी **सांगू**".

The verbs in the bold type in the above passage are in the future tense, *e.g.*, बसू (from बसणे); होईल (from होणे); पडेल (from पडणे); जाल (from जाणे) etc.

Before the regular forms of verbs are given, it should be noted that there are two types of conjugated forms in the future tense.

(1) For intransitive verbs not included in category (3) below, *e.g.*, बसणे, धावणे, निजणे, नाचणे, उठणे, पडणे, रडणे, हसणे, भांडणे, रागावणे etc.

(2) For Transitive verbs not included in category (3) below, *e.g.*, फेकणे, करणे, आणणे, पाठवणे, लिहिणे, विकणे, दाखवणे, पाहणे, टाळणे (to avoid), फसवणे, लपवणे (to hide), etc.

(3) As for the verbs ending in आ, ई, ऊ, ए and ओ (both transitive and intransitive) *i.e.*, ending in vowels, they yield forms similar to those in category (2) above. Verbs of this type are given below :—

जा (जाणे) (Int.) खा (खाणे (Tr.) गा (गाणे) (Tr.)	ending in आ	धु (धुणे) (Tr.)	ending in उ
पि (पिणे) (Tr.) भि (भिणे) (Tr.)	ending in इ	ये (येणे) (Int.) दे (देणे) (Tr.) घे (घेणे) (Tr.)	ending in ए
		हो (होणे) (Int.)	ending in ओ

First we take up the forms of verbs in category (1) *i.e.*, intransitive verbs.

Future Tense (भविष्यकाळ) बसणे

	Singular	*Plural*
First person	मी बसेन (M. F.) (I shall sit)	आम्ही/आपण बसू (M. F.) (We shall sit)
Second person	तू बसशील (M. F.) (You will sit)	तुम्ही/आपण बसाल (M. F.) (You will sit)
Third person	तो बसेल (M. F.) (He will sit)	ते बसतील (M.) (They will sit)
	ती बसेल (F.) (She will sit)	त्या बसतील (F.) (They will sit)
	ते बसेल (N.) (It will sit)	ती बसतील (N.) (They will sit)

Verbs mentioned in this category will yield similar forms *e.g.*, मी धावेन (I shall run); तो धावेल (He will run); मी भांडेन (I shall quarrel); तो भांडेल (He will quarrel).

Now we take up category (2) : Transitive verbs (सकर्मक क्रियापदे)

Future Tense (भविष्यकाळ) वाचणे

	Singular	*Plural*
First person (प्रथम पुरुष)	मी वाचीन (M. F.) (I shall read)	आम्ही/आपण वाचू (M. F.) (We shall read).
Second person (द्वितीय पुरुष)	तू वाचशील (M. F.) (You will read)	तुम्ही/आपण वाचाल (M. F.) (You will read)
Third person (तृतीय पुरुष)	तो वाचील (M.) (He will read)	ते वाचतील (M.) (They will read)
	ती वाचील (F.) (She will read)	त्या वाचतील (F.) (They will read)
	ते वाचील (N.) (It will read)	ती वाचतील (N.) (They will read)

Verbs mentioned in this category will yield forms on the lines mentioned above, *e.g.*, मी आणीन (I shall bring); तो आणील (He will bring); मी करीन (I shall do); तो करील (He will do).

Verbs mentioned in the third category *i.e.*, जाणे, खाणे etc., yield forms like those in the second category *e.g.*, मी जाईन, आम्ही जाऊ. There is, however, one change in the second person plural in respect of verbs ending in इ, उ, ए and ओ; such forms are given below :–

पी - प्याल	(You will drink)	दे - द्याल	(You will give)
भि - भ्याल	(You will be afraid)	घे - घ्याल	(You will take)
धु - धुवाल	(You will wash)	हो - व्हाल	(You will become)
ये - याल	(You will come)	गा - गाल	(You will sing)

We give below the forms of पी (पिणे) and धु (धुणे) in the future tense.

धुणे (to wash)

	Singular	*Plural*
First person	मी धुईन (I shall wash)	आम्ही / आपण धुऊ (We shall wash)
Second person	तू धुशील (You will wash)	तुम्ही / आपण धुवाल (You will wash).
Third person	तो / ती / ते धुवील (He / She / It will wash) (M. F. N.)	ते / त्या / ती धुतील (They will wash). (M. F. N.)

पिणे (to drink)

First person	मी पिईन (M. F.) (I shall drink)	आम्ही / आपण पिऊ (M. F.) (We shall drink)
Second person	तू पिशील (M. F.) (You will drink)	तुम्ही / आपण प्याल (M. F.) (You will drink)
Third person	तो / ती / ते / पिईल (He / She / It will drink) (M. F. N.)	ते / त्या / ती पितील (They will drink) (M. F. N.)

The verbs सांगणे (to tell) and the verb मागणे (to ask for) –– both transitive –– yield both the forms in the first person and in the third person sing., *e.g.*, सांगेन-सांगीन, सांगेल-सांगील, मागेन-मागीन, मागेल-मागील The verbs थुंकणे (to spit), जेवणे (to dine), नेसणे (to wear), चुकणे (to miss), समजणे (to understand), स्मरणे (to remember), शिकणे (to learn), विसरणे (to forget) yield forms like the intransitive verb बसणे.

(1) We use the future tense wherever we employ the words 'should' and 'would' in English *e.g.*, (१) त्याला कोण हसेल? (Who would laugh at him?). (२) तू जाशील अशी आमची खात्री होती (We were certain that you would go); तू जाणार अशी आमची खात्री होती (We were certain that you will go).

(2) It is used in the first clause of the conditional sentence *e.g.*, आंधळ्याला मदत कराल किंवा पैसे द्याल तर फार बरे होईल (It would be better if you would help the blind).

(3) We sometimes use the future tense where we use the present tense in English *e.g.*, तुला आवडेल/ वाटेल तसे कर (Do as you like or as you please).

(4) The future tense is used to express the possibility as is expressed by the auxiliary verb 'may' *e.g.*, मला कोणीतरी भेटेल/दिसेल (Someone may meet me).

अभ्यास १

Fill in the gaps in the following sentences by using the future tense of the verbs given in brackets :—

(१) तुम्ही इकडे लक्ष (दे) काय? (२) परवा परीक्षा (संप). (३) तो उद्या नागपूरला (जा) व भावाकडे (उतर). (४) उद्या या वेळेस आम्ही घरीच (अस). (५) भिकाऱ्याला पाहून मी सुखी कसा (हो)? (६) गरिबाला औषध (दे) तर बरे (हो). (७) तुम्ही परवानगी (दे) तर मी (ये). (८) जर तो (ये) तर सामान घेऊन (जा). (९) अन्न नसले तर लोक काय (कर)? (१०) व्यापारी नुकसान का (सोस)? (११) तुम्ही (सांग) तसे ते (वाग). (१२) मी गेलो तर (जा). (१३) तुम्ही (बस) तर मी (बस).

अभ्यास २

Change the verbs in the following sentences in the future tense and effect consequential changes :–

(१) म्हैस लाथ मारते. (२) शिंप्याने कपडे शिवले. (३) तुम्ही काय खाता? (४) ही गोष्ट तुम्हाला माहीत होईल. (५) मी आंबा खाल्ला. (६) रात्र झाली; आता

आपण झोपतो. (७) आम्ही पत्र लिहिले. (८) पक्षी आकाशात उडाले. (९) कोळ्यांनी मासे पकडले. (१०) तिने प्रश्न विचारले. (११) आम्ही रात्री अभ्यास करतो. (१२) आम्ही संध्याकाळी सहा वाजता घरी येतो, हातपाय धुतो, कपडे बदलतो, चहा पितो व वर्तमानपत्र वाचतो. (१३) ते सकाळी उठले व खोलीतच बसले. (१४) तू म्हणतोस तसे मी करतो. (१५) हुशार मुले परीक्षेत उत्तीर्ण होतात व शिष्यवृत्ती मिळवितात.

अभ्यास ३

Construct suitable sentences, using the following verbs :—

(१) लिहू, (२) जातील, (३) बिघडेल, (४) देईल, (५) येतील, (६) भांडाल, (७) सांगेन. (८) होशील, (९) असेल, (१०) आणाल, (११) करतील, (१२) व्हाल.

अभ्यास ४

Translate the following sentences into Marathi :—

(1) I shall start tomorrow. (2) We shall miss the train. (3) He will be fifteen next Monday. (4) The clouds will gather in the sky. (5) She will pity the beggar. (6) The merchant will bear the loss. (7) The tailors in Bombay will go on strike. (8) The fishermen will catch the fish and will bring them home. (9) Will you attend to my question? (10) They will be Ministers after the next election. (11) Will you please give me five rupees? (12) What will people do if every commodity is costly? (13) We shall write a letter and post it today. (14) The teacher will tell a story and you will listen to it. (15) The servants will carry the furniture from the first floor to the second floor.

[*New words* : to start – निघणे; We shall miss the train. – आमची गाडी चुकेल; nxet – येत्या; to pity – दया करणे; loss – नुकसान (N.), हानी (F.); on strike – संपावर; a commodity – वस्तू; costly – महाग; to bear – सोसणे].

काळबद्दल (Transformation of Tenses)

In this chapter, it is proposed to illustrate the transformation of verbs from one tense to another. All the rules in this respect have already been dealt with in previous chapters.

The following two rules deserve a special mention :--

(1) In the case of transitive verbs, the verb in the past tense agrees with the object and the subject is changed to its instrumental case. (2) In the case of the future tense, attention is invited to the conjugation of transitive and intransitive verbs and also to the second person plural of some roots ending in आ, इ, उ, ए, ओ (जा, पि, धु, घे, हो, etc).

We give below three lists A, B, and C. The list 'A' contains sentences having intransitive verbs (अकर्मक क्रियापदे). The list 'B' contains sentences having transitive verbs (सकर्मक क्रियापदे) and the list 'C' contains exceptional verbs (अपवादात्मक क्रियापदे).

List 'A'

भूतकाळ *Past Tense*	वर्तमानकाळ *Present Tense*	भविष्यकाळ *Future Tense*
१. मी माझ्या मित्रावर रागावलो. (I got angry with my friend).	१. मी माझ्या मित्रावर रागावतो. (I get angry with my friend).	१. मी माझ्या मित्रावर रागावेन. (I shall get angry with my friend).
२. आम्ही/आपण कार्यालयात गेलो. (We went to the office).	२. आम्ही/आपण कार्यालयात जातो. (we go to the office).	२. आम्ही/आपण कार्यालयात जाऊ. (We shall go to the office).
३. तू हसलास. (You smiled).	३. तू हसतोस. (You smile).	३. तू हसशील. (You will smile).
४. तू रडलीस. (You cried).	४. तू रडतेस. (You cry).	४. तू रडशील. (You will cry).

भूतकाळ *Past Tense*	वर्तमानकाळ *Present Tense*	भविष्यकाळ *Fuiure Tense*
५. तुम्ही/आपण पडला/पडलात. (You fell).	५. तुम्ही/आपण पडता. (You fall).	५. तुम्ही/आपण पडाल (You will fall).
६. तो झाडावर चढला. (He climbed a tree).	६. तो झाडावर चढतो. (He climbs a tree).	६. तो झाडावर चढेल. (He will climb a tree).
७. ती नाचली. (She danced).	७. ती नाचते. (She dances).	७. ती नाचेल. (She will dance).
८. पक्षी उडाले. (Birds flew).	८. पक्षी उडतात. (Birds fly)	८. पक्षी उडतील. (Bird will fly).
९. काल शुक्रवार होता. (Yesterday was Friday).	९. आज शनिवार आहे. (Today is Saturday).	९. उद्या रविवार असेल. (Tomorrow will be Sunday).

List 'B'

भूतकाळ *Past Tense*	वर्तमानकाळ *Present Tense*	भविष्यकाळ *Future Tense*
१. मी आंबा खाल्ला. (I ate a mango).	१. मी आंबा खातो. (I eat a mango).	१. मी आंबा खाईन. (I shall eat a mango).
२. आम्ही/आपण भाज्या आणल्या. (We brought Vegetables)	२. आम्ही/आपण भाज्या आणतो. (We bring vegetables).	२. आम्ही/आपण भाज्या आणू. (We shall bring vegetables).
३. तू काय केलेस? (What did you do?)	३. तू काय करतोस? (What do you do?).	३. तू काय करशील? (What will you do?)
४. तुम्ही/आपण चेंडू फेकला/फेकलात. (You threw a ball).	४. तुम्ही/आपण चेंडू फेकता. (You throw a ball).	४. तुम्ही/आपण चेंडू फेकाल. (You will throw a ball).
५. त्याने कादंबरी वाचली. (He read a novel).	५. तो कादंबरी वाचतो. (He reads a novel).	५. तो कादंबरी वाचील. (He will read a novel).

भूतकाळ *Past Tense*	वर्तमानकाळ *Present Tense*	भविष्यकाळ *Future Tense*
६. तिने पत्रे लिहिली. (She wrote letters).	६. ती पत्रे लिहिते. (She writes letters).	६. ती पत्रे लिहील. (She will write letters).
७. लोकांनी स्वागत केले. (People welcomed).	७. लोक स्वागत करतात. (People welcome).	७. लोक स्वागत करतील. (People will welcome)
८. गुरुजींनी गोष्टी सांगितल्या. (The teacher told stories).	८. गुरुजी गोष्टी सांगतात. (The teacher tells stories).	८. गुरुजी गोष्टी सांगतील. (The teacher will tell stories).
९. धोब्याने कपडे धुतले. (The washerman washed clothes).	९. धोबी कपडे धुतो. (The washerman washes clothes).	९. धोबी कपडे धुईल. (The washerman will wash clothes).

List ‘C’

भूतकाळ *Past Tense*	वर्तमानकाळ *Present Tense*	भविष्यकाळ *Future Tense*
१. मुले दूध प्याली. (Children drank milk).	१. मुले दूध पितात. (Children drink milk)	१. मुले दूध पितील. (Children will drink milk).
२. वडिलांनी मुलाला बोलावले. (Father called the son).	२. वडील मुलाला बोलावतात. (Father calls the son)	२. वडील मुलाला बोलावतील. (Father will call the son).
३. लोक भांडण विसरले (People forgot the quarrel).	३. लोक भांडण विसरतात. (People forget the quarrel)	३. लोक भांडण विसरतील. (People will forget the quarrel).

अभ्यास १

Re-write the following sentences in the remaining two tenses :-

(१) आम्ही पेढे खाल्ले. (२) ती पुस्तके वाचते. (३) आज पाऊस पडतो. (४) तुम्ही केव्हा हजर झालात? (५) गाडी आली. (६) तुम्ही कोणता उद्योग करता? (७) आम्ही श्रीमंत होऊ. (८) मुलींनी सामना जिंकला. (९) संपादक

लेख लिहितात. (१०) कर्मचारी संप करतील. (११) तुम्ही का रागावलात? (१२) तुमच्या कुटुंबात किती माणसे आहेत? (१३) ती कोठे राहते? (१४) तुम्ही पुस्तक दिले. (१५) लोक गावाला जातात.

अभ्यास २

Complete the following sentences by using suitable forms of verbs given in the brackets :-

(१) मी उद्या कपडे (धुणे). (२) मुले आता मैदानात (खेळणे). (३) मी काल कपडे (आणणे). (४) काल आकाश निरभ्र (असणे). (५) उद्या थंडी (पडणे). (६) दोन दिवसांपूर्वी मी येथे (येणे) व प्रेक्षणीय स्थळ (पाहणे). (७) परवा माझे पाकीट (हरवणे), म्हणून वडील मला (रागावणे). (८) काल भाजी महाग (होणे), पण दूध स्वस्त (होणे). (९) हल्ली माझा पगार २०० रुपये (असणे); गेल्या महिन्यात तेवढाच (होणे); पुढील महिन्यात तेवढाच (राहणे) (१०) आम्ही उद्या पुण्याला (जाणे) व दोन दिवस (राहणे).

१४

क्रियाविशेषण अव्यये (Adverbs)

An adverb is a word which modifies the meaning of a verb, an adjective or another adverb *e. g.*, (१) घोडा जलद धावतो. (२) हा आंबा फार गोड आहे. (३) तो अगदी स्पष्टपणे वाचतो. In sentence No. 1, the adverb जलद modifies the verb धावतो; in sentence No. 2, the adverb फार modifies the adjective गोड; in sentence No. 3, the adjective अगदी modifies the adverb स्पष्टपणे (clearly).

Now read the following paragraph :—

आज **येथे** काम नाही. **उद्या इकडे** या. **तोपर्यंत आसपास** लक्ष द्या. **नेहमी चोहोकडे** पाहा. **उगीच** वेळ दवडू नका. तुम्हांस **खचित** काम मिळेल. **प्रतिदिन** काहीतरी काम करा. **आजकाल** परिस्थिती **फार** चमत्कारिक आहे. **क्षणोक्षणी** काय होईल ते सांगता येत नाही. माणसाने **आमरण** विद्या संपादन करावी. **दैववशात** काहीही होऊ शकेल. **शास्त्रदृष्ट्या** हे तुम्हास खरे वाटणार नाही. पण **यथाशक्ती** प्रयत्न करणे तुमच्या हाती आहे.

[*New words* : तोपर्यंत (till then); आसपास (nearby, in the neighbourhood); खचित (certainly); प्रतिदिन (every day); क्षणोक्षणी (every moment); आमरण (till death); दैववशात (fortunately); शास्त्रदृष्ट्या (scientifically); यथाशक्ती (according to strength); आजकाल (now-a-days)].

The words in the bold type in the above paragraph are adverbs. Adverbs are not generally inflected or declined; hence they are also called indeclinables (अव्यये). They are also called adverbial prepositions (क्रियाविशेषण अव्यये).

The adverbial prepositions are of five kinds :—

(1) *Adverbs of place* (स्थलवाचक क्रियाविशेषणे).— These are of two kinds :

(*a*) स्थितिदर्शक (denoting a place or a spot), *e. g.*, येथे (here); तेथे (there); जेथेतेथे, सर्वत्र (everywhere); जवळ, समीप (near); पुढे, समोर

(before, in the presence of, in front of); खाली (below); मध्ये (within); मागे (behind); पलीकडे (beyond); सभोवती (around).

(*b*) गतिदर्शक (denoting motion to a place or from a place), *e.g.*, इकडून (hence); तिकडून (thence); इकडे (here), तिकडे (there).

(*2*) *Adverbs of time* (कालवाचक क्रियाविशेषणे).—These are of three kinds:—

(*a*) कालदर्शक (denoting a period or point of time), *e. g.*, आज, उद्या, काल; परवा (two days ago or two days hence); तेरवा (three days ago or three days hence); मग, नंतर (afterwards); सांप्रत (at present); झटकन (instantly); अकस्मात, एकाएकी (suddenly); तत्काळ, तत्क्षणी (immediately); एकदम (at once); शेवटी (at last).

(*b*) सातत्यदर्शक (denoting continuance of time), *e.g.*, नेहमी, नित्य, सर्वदा, सदा (often); सतत (continually); रोज, रोजरोज, रोजच्या रोज, प्रतिदिन (daily); दिवसेंदिवस (day after day).

(*c*) आवृत्तिदर्शक (denoting repetition), *e.g.*, वारंवार (often); रोजरोज (every day); पुनः पुनः (again and again); वेळोवेळी (off and on); क्षणोक्षणी (every moment).

(*3*) *Adverbs of quantity* (परिमाणवाचक क्रियाविशेषणे) (denoting quantity or measuer), *e. g.*, अत्यंत, अगदी (quite, entirely); किंचित (little); निदान (at least); पुष्कळ (very much); पुरे (enough); काही (some, somewhat); अधिक (more); कमी (less).

(*4*) *Adverbs of manners* (रीतिवाचक क्रियाविशेषणे) (denoting manners); *e.g.*, असे तसे (so); व्यर्थ (in vain); फुकट (free of charge, gratis), अकस्मात, अचानक (suddenly); निरर्थक (to no purpose); जसे (as); कसे (how); उगाच, उगीच, उगीचच (merely, for no reason); कदाचित (perhaps); एकत्र (together).

(*5*) *Adverbs of interrogation* (प्रश्नार्थक क्रियाविशेषणे), *e.g.*, केव्हा (when); कोठे (where); कशाला (why); कोणीकडे (where).

The following adverbs can be included in the above categories (1-4) according to the context they may be used in, *e.g.*, होय (Yes); खचित (certainly); निःसंशय (undoubtedly); खरोखर (really); मोठ्यानं (loudly); अनवाणी (bear-footed) :—

(1) Sometimes pronouns are used adverbailly, *e.g.*, तो दहा मैल चालला. (He walked ten miles); तू रात्रीचा कोठे होतास? (Where were you at night?)

(2) Sometimes pronouns are used adverbially, *e.g.*, मुलगा आपल्या आपण घरी आला. (The boy came home of his own accord.)

(3) Adjectives also are adverbially used, *e.g.*, त्याने चांगले वाचले नाही. (He did not read well).

(4) Participles are also sometimes adverbially used, *e.g.*, तो जाणूनबुजून गैरहजर राहिला. (He deliberately remained absent.)

अभ्यास १

Fill in the gaps by using suitable adverbs given at the end :—

(१) तो अहवाल ·········· गोपनीय आहे. (२) माझा त्याने ········ अपमान केला. (३) ·········· आंबे खूप आले. (४) सिंह ·············· मेला नव्हता. (५) मी ·········· सांगितले तरी तो ऐकत नाही. (६) वडीलांनी ·········· पूजा केली. (७) रामदास ·········· ब्रह्मचारी होते. (८) तो ······· निष्काळजी आहे. (९) ती मुंबईहून ·········· आली. (१०) तो पुस्तक ·········· वाचतो. (११) ·········· जागतिक परिस्थिती फार स्फोटक आहे. (१२) पाहुणे ·········· जेवले.

(*Answers* :– आमरण, आजकाल, यथास्थित, यथाशास्त्र, केव्हा, जाणूनबुजून, यंदा, खरोखर, अगदी, वारंवार, आजन्म, कसे.)

अभ्यास २

Give Marathi equivalents for the following :—

(1) Every day. (2) Now-a-days. (3) From the birth. (4) Till death. (5) In the meanwhile. (6) Very loudly. (7) Every moment

(8) By now. (9) Really speaking. (10) Fortunately. (11) In front of. (12) Repeatedly.

अभ्यास ३

Translate the following sentences into Marathi :—

(1) In the meanwhile my friend came to my help. (2) We all are students till death. (3) These boys rarely studied. (4) He deliberately avoided the examination. (5) The serpent was not really dead. (6) Now-a-days there is a scarcity of sugar. (7) The servant attends to all things roundabout (8) He is a very important person. (9) The swing moves to and fro. (10) My mother, all of a sudden, left the house. (11) How did you go to Nagpur ? By rail or by road ? (12) How did you solve the puzzle? (13) When did you pass the degree examination ? (14) He wrote as he pleased. (15) We never trust a liar.

[*New words* : In meanwhile इतक्यात; till death आमरण; rarely क्वचित; to avoid टाळणे; dead मेलेला; a scarcity टंचाई; a V. I. P. अति महत्त्वाची व्यक्ती; all of a sudden एकाएकी; a puzzle कोडे (N.); a degree examination पदवी परीक्षा (F.); to trust विश्वास ठेवणे; a liar खोटे बोलणारा (Adj.).].

शब्दयोगी अव्यये (Post-Positions)

A post-position is a word which shows the realation of a noun or a pronoun to some other word in the sentence, *e.g.*, तो खुर्चीवर बसला (He sat in the chair); काही लोक जेवणानंतर सुपारी खातात (Some people eat a betel-nut after meals); आपल्या भावाबरोबर खेळावयास जा (Go to play with your brother).

Now read the following passage :-

महात्माजींची प्रतिमा टेबला**वर** आहे. तिच्या**कडे** पाहा. महात्माजींच्या**मुळे** आपण स्वतंत्र झालो. त्यांच्या शिकवणो**प्रमाणे** आज **आपल्याला** वागले पाहिजे. त्यांच्या**कडून** आपण पुष्कळ गोष्टी शिकलो. त्यांच्या**सारखा** लोकप्रिय नेता जगात झाला नाही. गांधीजींच्या **बरोबर** काम करताना आनंद वाटत असे. त्यांच्या**खेरीज** दुसरा कोणीही भारत स्वतंत्र करू शकला नाही. भारता**वर** त्यांचे अफाट प्रेम होते. शेवट**पर्यंत** ते देशाच्या हिता**साठी** झटले.

The words in the bold type above are post-positions.

Post-positions are of various kinds, depending on the relations they signify ;

(1) Denoting time (कालदर्शक)–आत (in, before); पुढे, नंतर (after); आधी, अगोदर, पूर्वी (before); पर्यंत (until), *e.g.*, संध्याकाळपर्यंत घरी ये. (Come home till evening).

(2) Denoting place (स्थलदर्शक)– आत (in); मध्ये (in between); बाहेर (out); पाशी, समीप, जवळ (near); समक्ष, पुढे, समोर (before, in the presence); मागे (behind); खाली (under); वर (on); अलीकडे (on this side); पलीकडे (beyond), *e.g.*, माझ्याजवळ कोणी येऊ नका (Let no one come near me).

(3) Denoting motion to or from a place (गतिदर्शक)– आतून (from within); खालून (from below); मधून (from the middle); वरून (from above); पर्यंत (till); कडे (at towards); पासून (from), *e. g.*, पुलावरून जा (Go over the bridge).

(4) Denoting iustrumentality (करणवाचक) - करून, द्वारा, हातून, हाती (by or through), *e. g.*, त्याच्या हाती निरोप पाठवा (Send a message through him).

(5) Denoting ability (योग्यतादर्शक) – सम, समान, सारखा (like); जोगा, जोगता (suitable); *e. g.*, महात्मा गांधीसारखा पुढारी होणार नाही (There will be no leader like Mahatma Gandhi).

(6) Denoting contradicton (विरोधवाचक) – विरुद्ध, उलटे (against), *e. g.*, नियमाविरुद्ध कोणतीही गोष्ट करू नका (Do not do anything against the rules).

(7) Denoting co-existence (साहचार्यवाचक) – बरोबर, सह, सकट, संगे, सहित (with), *e. g.*, तो पत्नीसह गावाला गेला (He went to the vIllage with his wife).

(8) Pure post-positions (शुद्ध शब्दयोगी अव्यये) – च, मात्र, देखील, पण, फक्त, *e. g.*, फक्त दोन रुपये द्या (Give only two rupees).

(9) Miscellaneos (संकीर्ण) – साठी (for); विषयी (about); भोवती (around); पुरता (sufficient); खेरीज, शिवाय, वाचून (without, except); पैकी (out of).

Sufficient illustrations of the post-positions have been given in the Chapter on cases.

(1) The post-position serves the same purpose as the case ending. The noun to whicn it is joined assumes its सामान्यरूप (oblique form) before the post-position, *e. g.*, पर्वतावर, इमारतीजवळ, घरापासून.

(2) Sometimes the noun, in question, may not assume the सामान्यरूप. Words denoting time come under this category, *e.g.*, दुपारपर्यंत, सकाळपर्यंत.

(3) Nouns and pronouns to which post-positions are joined either take the सामान्यरूप or the सामान्यरूप s of its genetive form, *e. g.* रामाजवळ or रामाच्याजवळ, त्याकरिता, or त्याच्याकरिता, त्यापासून or त्याच्यापासून.

अभ्यास १

Fill in the gaps in the following sentences with suitable post-positions given at the end :--

(१) घरा .... बाग असणे चांगले. (२) सीते .... राम बनात गेला. (३) बंगाली बाबू कलकत्त्या .... रहात होता. (४) घोड्या .... तबेला असतो. (५) आणि .... कधी कधी 'ब' वापरतात. (६) नियमां .... चालावे. (७) बाबू गेनू .... दुसरा कोणी हुतात्मा झाला नाही. (८) इमारतीच्या .... ओढा आहे. (९) माझ्या .... ही गोष्ट सांग. (१०) त्याच्या .... हे कोणीही काम करणार नाही. (११) मुले वर्ष .... अभ्यास करतात. (१२) या चित्रपटास .... प्रौढांना प्रवेश मिळेल. (१३) तापा .... तोंड कडू झाले आहे.

(Answers : साठी, शिवाय, फक्त, मध्ये, भोवती, मुळे, जवळ, समक्ष, खेरीज, भर, ऐवजी, सह, प्रमाण.).

अभ्यास २

Give the Marathi renderings of the following :—

(1) With children. (2) Like Pandit Nehru. (3) Before Tuesday. (4) For the country. (5) In the interest of the public. (6) Opposite to this house. (7) Regarding a friend. (8) After the arrival. (9) In your presence. (10) Near the office. (11) Against rules. (12) All the year round. (13) Owing to illness. (14) On behalf of my friend. (15) Through his son. (16) In place of sugar. (17) Except rice. (18) Different from that. (19) But for him. (20) As for me.

अभ्यास ३

Translate the following sentences into Marathi :—

(1) He went to the theatre, along with his wife.
(2) We reached the station before the arrival of the train.
(3) The grocer gave salt instead of sugar.
(4) They sent a message through their servant.
(5) There is a river near my house.
(6) We are six, including myself.

(7) He told everything in my presence.
(8) People acted against their will.
(9) Virtue is the opposite of vice.
(10) The child fell from the third floor.
(11) The officer transferred the clerk in the public interest.
(12) Poona, too, is a big city.
लिपिकांनी टिप्पणी लिहिली	लिपिकांनी टिप्पणी लिहिली नाही.
लिपिकांनी टिप्पण्या लिहिल्या	लिपिकांनी टिप्पण्या लिहिल्या नाहीत.
तू प्रयोग केलास	तू प्रयोग केला नाहीस.

Note—

खाल्ला	ate;	खाल्ला नाही	did not eat.
खाल्ले	ate	खाल्ले नाहीत	did not eat.
केले	did	केले नाही	did not do
केली	did;	केली नाहीत	did not do.
लिहिली	wrote;	लिहिली नाही	did not write.
लिहिल्या	wrote;	लिहिल्या नाहीत	did not write.

2) *Past Imperfect or Continuous Past tense* (अपूर्ण भूतकाळ –The negative verbs can be arrived at by supstituting of forms होतो, होतास, होती, होते etc. (sentences like मी जात होतो, तू जात होतास, ती जात होती, ते जात होते) by नव्हतो नव्हतास, नव्हती and नव्हते, respectively. The sense of the sentences after using these forms will be as folllows:—

Affirmative	*Negative*
१. मी जात होतो (I was going)	१. मी जात नव्हतो (I was not going).
२. तू खात होतास (You were eating)	२. तू खात नव्हतास (You were not eating).
३. ती धावत होती (She was running)	३. ती धावत नव्हती (She was not running).
४. ते पीत होते (They were drinking)	४. ते पीत नव्हते (They were not drinking)

Affirmative	*Negative*
५. त्या बोलत होत्या (They were talking)	५. त्या बोलत नव्हत्या (They were not talking).
६. ते मूल आकाशाकडे पाहात होते (The child was looking at the sky)	६. ते मूल आकाशाकडे पहात नव्हते (The child was not looking at the sky).

(3) *The Past Perfect tense* (*पूर्ण भूतकाळ*).—For obtaining the negative forms of verbs, substitute the forms होतो, होता, होते, होती etc. in sentense containing the verbs in past perfect tense by their corresponding negative forms given in the table I above e. g.–

मी गेलो होतो (I had gone); मी गेलो नव्हतो (I had not gone). The rule regarding the agreement of intransitive verbs with subject and the agreement of transitive verbs with object holds good in this case e. g.

Affirmative	*Negative*
१. तो बसला होता (He had sat)	१. तो बसला नव्हता (He had not sat).
२. तुम्ही भांडला होता You had quarelled)	२. तुम्ही भांडला नव्हता (You had not quarrelled).
३. मूल दूध प्याले होते (The child had drunk milk)	३. मूल दूध प्याले नव्हते (The child had not drunk milk)

Affirmative	*Negative*
४. तिने गृहपाठ केला होता (She had done the home-work)	४. तिने गृहपाठ केला नव्हता (She had not done the home-work)
५. अधिकारी वेळेवर आले होते (The officer had come in time)	५. अधिकारी वेळेवर आले नव्हते (The officer had not come in time).
६. आम्ही चुका केल्या होत्या (We had made mistakes)	६. आम्ही चुका केल्या नव्हत्या (We had not made mistakes).
७. नोकराने पत्रे टाकली होती (The servant had posted the letters)	७. नोकराने पत्रे टाकली नव्हती (The servant had not posted the letters).
८. वडिलांनी याची चर्चा केली होती (Father had discussed this).	८. वडिलांनी याची चर्चा केली नव्हती (The Father had not discussed this).

(*4*) *The Habitual Past Tense* (*रीति भूतकाळ*)—For obtaining the negative forms of verbs in the Habitual Past Tense, substitute the negative forms of असणे in the past tense (given in table 2 above) in place of the positive forms of असणे in the habitual past tense *e.g.*—

मी जात असे (I used to go); मी जात नसे (I never used to go).

Some examples of this type are given below :—

Affirmative	*Negative*
१. आम्ही खेळत असू (We used to play)	१. आम्ही खेळत नसू (We never used to play), (We did not play).
२. तू उपदेश करीत असस (You used to advise)	२. तू उपदेश करीत नसस (You did not advise), (You never advised).
३. तुम्ही/आपण फिरावयास जात असा (You used to go for a walk)	३. तुम्ही आपण फिरावयास जात नसा (You did not go for a walk), (You never used to go for a walk).
४. तो लिहीत असे (He used to write)	४. तो लिहीत नसे (He din not write). (He never used to write)
५. ते खात असत (They used to eat)	५. ते खात नसत (They did not eat); (They never used to eat).

अभ्यास १

Give the negative forms of the following :—

(१) धूत असत. (२) बोलत होते. (३) (राग) येत होता. (४) (राग) येत असे. (५) (राग) आला. (६) मिळवीत होती. (७) बोलावले. (८) खाल्ली होती. (९) (उपदेश) केला. (१०) (उपदेश) करत होता. (११) (उपदेश) केला होता. (१२) (उपदेश) करत असे. (१३) बसतात. (१४) बसत होता. (१५) बसला होता. (१६) बसत असा. (१७) सांगितले. (१८) सांगत होते. (१९) सांगितले होते. (२०) सांगत असत.

Translate into Marathi :—

(1) The ground was not prepared. (2) There was no match. (3) The players did not turn up. (4) He was not poor; still he did not live in a bungalow. (5) The student did not do their home-work. (6) The editor had not published the news. (7) The Officer did not sanction the leave. (8) The clerk had not brought the fitness certificate. (9) The Secretary did not discuss the matter with the Deptuty Secretary. (10) She could not go to the market as she had no money.

● ● ●

नकारार्थी वाक्ये (भविष्यकाळ)

[Negative Sentences (Future Tense)]

The forms of असणे (to be) in the future tense along with its negative forms are given are below :—

असणे (To be)

(असेन—affirmative) (नसेन—negative)

	Singular		Plural	
	Affirmative	Negative	Affirmative	Negative
First person	मी असेन (I shall be)	मी नसेन (I shall not be)	आम्ही आपण असू (We shall be)	आम्ही आपण नसू (We shall not be)
Second person	तू असशील (You will be)	तू नसशील (You will not be)	तुम्ही आपण असाल (You will be)	तुम्ही आपण नसाल (You will not) be)
Third person	तो असेल (He will be)	तो नसेल (He will not be)	ते / त्या / ती } असतील (They will be)	ते / त्या / ती } नसतील (They will not be)
	ती असेल (She will be)	ती नसेल (She will not be)		
	ते असेल (It will be)	ते नसेल (It will not be)		

Simple Future (साधा भविष्यकाळ).—The two negative sentences in the Simple Future Tense can be formed by adding णार to the root (*e. g.*, बस+णार=बसणार; जा+णार=जाणार; वाच+णार=वाचणार) and then by adding the negative form of असणे in the Present Tense as required by the subject, *e. g.* बसणार नाही, जाणार नाही, वाचणार नाही.

We give below more examples of both the kinds :—

Affirmative	Negative
(१) शिक्षक शिकवतील (The teacher will teach)	(१) शिक्षक शिकवणार नाहीत (The teacher will not teach).

Affirmative

(२) तुम्ही/आपण याल
(You will come).

(३) आम्ही/आपण खेळू
(We will play).

(४) तू पाहशील
(You may/will see)

Negative

(२) तुम्ही/आपण येणार नाही
(You will not come).

(३) आम्ही/आपण खेळणार नाही
(We will not play).

(४) तू पाहणार नाहीस
(You may/will not see).

Future Continuous (*अपूर्ण भविष्यकाळ*).-- The negative sentences in the future continuous can be formed by replacing the forms of असणे (in the future tense), by the forms of नसणे (in the future tense), given at the beginning of this section, *e.* g., मी जात असेन (I shall be going); मी जात नसेन (I shall not be going).

The following additional sentences will clarify the point :—

Affirmative

(१) तो प्रवास करीत असेल
(He will be travelling)

(२) पाऊस पडत असेल
(It will be raining)

(३) तू खेळत असशील
(You will be playing)

(४) तुम्ही धावत असाल
(You will be running)

(५) ते काम करत असतील
(They will be doing the work)

(६) मुले भांडत असतील
(Children will be quarrelling).

Negative

(१) तो प्रवास करीत नसेल
(He will not be travelling).

(२) पाऊस पडत नसेल
(It will not be raining).

(३) तू खेळत नसशील
(You will not be playing).

(४) तुम्ही धावत नसाल
(You will not be running).

(५) ते काम करत नसतील
(They will not be doing the work).

(६) मुले भांडत नसतील
(Children will not be quarrelling).

Future Perfect (*पूर्ण भविष्यकाळ*).— The negative sentences in the future perfect can be formed by replacing the forms of असणे (in the future tense) by the forms of नसणे (in the future tense), given at the

beginning of this section, *e. g.*, मी गेलो असेन (I shall have gone), मी गेलो नसेन (I shall not have gone). The following sentences will illustrate the grammatical point :—

Affirmative	*Negative*
(१) तो गेला–गेलेला–असेल (He will have gone)	(१) तो गेला–गेलेला–नसेल (He will not have gone).
(२) ती पोचली असेल (She will have reached)	(२) ती पोचली नसेल (She will not have reached)
(३) त्याने पैसे दिले असतील (He will have given money)	(३) त्याने पैसे दिले नसतील (He will not have given money).
(४) तू पत्र लिहिले असशील (You will have written a letter)	(४) तू पत्र लिहिले नसशील (You will not have written a letter).
(५) नोकराने काम केले असेल (The servant will have done the work)	(५) नोकराने काम केले नसेल (The servant will not have done the work).

Some Verbs in the negative in all the varieties of the future tense are given :—

Simple Future	*Future Continuous*	*Future Perfect*
(१) सूर्य उगवणार नाही (The Sun will not rise)	(१) सूर्य उगवत नसेल (The Sun will not be rising)	(१) सूर्य उगवला नसेल (The Sun will not have risen).
(२) तू झोपणार नाहीस (You will not sleep)	(२) तू झोपत नसशील (You will not be sleeping)	(२) तू झोपला नसशील (You will not have slept).
(३) ती घेणार नाही (She will not take)	(३) ती घेत नसेल (She will not be taking)	(३) तिने घेतले नसेल (She will not have taken).
(४) मुलगा आंबे खाणार नाही (The boy will not eat mangoes)	(४) मुलगा आंबे खात नसेल (The boy will not be eating mangoes)	(४) मुलाने आंबे खाल्ले नसतील (The boy will not have eaten mangoes).

अभ्यास १

Give the negative forms of the following verbs :—

(१) खणले असतील, (२) बसला असाल, (३) जाऊ, (४) याल, (५) पडले असेल, (६) पाहात असाल, (७) करत असशील, (८) खाल्ले असतील, (९) पडाल, (१०) जमाल, (११) जमत असाल, (१२) जमला असाल, (१३) पाहाशील, (१४) पाहात असशील, (१५) पाहिला असशील.

अभ्यास २

Translate into Marathi :—

(1) My brother will not return from Bombay, (2) He will not be Staying in Bombay, (3) He will not have stayed in Bombay, (4) The procession will not start at 3 p. m., (5) The procession will not be starting at 3 p. m., (6) The procession will not have started by 3 p. m., (7) You will not finish the work, (8) You will not be finishing the work, (9) You will not have finished the work, (10) The Superintendent will not complete the work, (11) She will not be completing the work, (12) She will not have completed the work.

● ● ●

प्रश्नार्थक वाक्ये (१)

[Interrogative Sentences (I)]

Interrogative sentences are formed with the help of interrogative Pronouns and interrogative adverbs. The interrogative pronouns are who (कोण), what (काय) and which (कोणता-ती-ते), how many (किती). The interrogative adverbs are when (केव्हा), where (कोठे), why (का) and how (कसा, कशी, कसे). All of these play an important part in asking questions. We deal with these in their order.

(१) 'Who' (कोण) is used of persons only, *e. g.* who came (कोण आले ?) who says so? (असे कोण म्हणते ?) who is the officer here ? (येथे अधिकारी कोण आहेत ?), In all these questions we expect the answer to be the name of a person. (२) When the agent is unknown, कोण (who) is used with the verb, in the neuter gender and singular number, *e. g.* कोण बोलते ? (who speaks ?) कोण बोलावते ? (who calls ?) कोण टंकलेखन करते ? (who types ?) (३) As an indefinite pronoun कोण (who) means 'some one' *e. g.* खाली कोणी आले आहे (some one has come downstairs). In this sense, there may not be a question, but in the sentence खाली कोण आले आहे ? (who has come downstairs ?), there is a question and there is a stress on the word कोण. The pronoun कोण is changed to कोणी in the instrumental case both in the singular and in the plural, *e. g.* चहा कोणी केला ? (Who prepared tea ?) दूध कोणी आणले ? (Who brought milk ?) चित्र कोणी काढले ? (Who drew the picture ?). The answers in Marathi, to all these questions will have the subjects in the instrumental case, either in singular or in plural, as the case may be.

The interrogative form कोण (who) has different forms in different cases. Naturally, there will be so many questions in Marathi which could be formed with the help of each one of these forms. We take them in their order.

कोणास, कोणाला (to whom ?). The plural forms of these will be कोणास, कोणाला. These forms are the same for the accusative as well as for dative. In the accusative case these occur as objects *e.g.*, पोलीस शिपाई कोणास कोणाला पकडतात ? [Who (m) do the police constables arrest ?] वडील कोणाला शिकवतात ? [Who(m) does the father teach ?] लोक कोणास मानतात ? [Who(m) do people honour ?]. In the dative case these forms occur as indirect objects, *e. g.*, तुम्ही कोणाला/कोणास पैसे देता ? [Who(m) do you give money to ?].

कोणासाठी, कोणाकरिता (for whom) are also the forms of these pronouns in the dative case, *e. g.* ही जागा कोणाकरिता/कोणासाठी आहे ? (For whom is this place reserved ?) धर्मशाळा कोणाकरिता/कोणासाठी आहे ? (For whom is the rest-house meant ?) स्वागतकार कोणाकरिता आहेत ? (For whom is the receptionist meant ?) The interrogative pronoun कोणापासून (from whom) indicates a source, *e. g.* प्रकाश कोणापासून मिळतो ? (From whom we get light?) त्रास कोणापासून होतो ? (Whom do we get trouble form ? who causes trouble ?)

The pronouns कोणापेक्षा, कोणाहून (than whom ?) indicate a comparison, *e. g.*, राम कोणापेक्षा उंच आहे ? (than whom is Ram taller?)

The forms कोणाचा (M), कोणाची (F)., कोणाचे (N) (all meaning whose) indicate the idea of possession and denote that the nouns following these are in masculine, feminine and neuter gender, respectvely. हा कोणाचा मुलगा आहे ? ही कोणाची मुलगी आहे ? हे कोणाचे घर आहे ? (Whose son/daughter/house is this ?) हे कोणाचे मुलगे आहेत ? ह्या कोणाच्या मुली आहेत ? ही कोणाची घरे आहेत ? (Whose sons/daughters/houses are these ?)

The form कोणात (in whom) is found in questions like — दोष कोणात नसतो ? (Who is free from fault ?) कोणात दोष नसतात ? (Who is free from faults ?) In these questions the from कोणात can be taken to mean कोणत्या माणसात (In which man).

(२) काय in the sense of 'what' is used in the nominative and in the accusative, *e.g.*, हे काय आहे? (What is this?) तुम्हाला काय पाहिजे? (What do you want?) त्याचा हेतू काय? (What is his object?) The pronoun काय (what) has different forms in all the cases. (३) कशास, कशाला (Why, what for?) तुम्ही कशाकरिता आलात? (What have you come for?) हे सर्व कशासाठी/कशाबद्दल? (What is all this for?) (४) कशाहून? (Than what?) पृथ्वी कशाहून मोठी आहे? (What is the earth greater than?) (५) कशाचा, कशाची, कशाचे (of what)? फळा कशाचा केला आहे? (What is the black-bord made of?) खुर्ची कशाची बनवली आहे? (What is the chair made of?) कपाट कशाचे केले आहे? (What is the cupboard made of?) (६) (कशात?) (In what?) has to be taken to mean in what pa [illegible] or an odject, *e.g.*, दूध कशात ठेवले आहे? (Which vesse is the milk in?) कशाने, कशाशी mean 'with what' and denote an instrument, *e.g.* तुम्ही कशाने खेळता? (What do you play with?) तुम्ही पांव कशाशी खाऊ? Wha w you eat bread with?) (७) काय (what) has different meanings when used in different positions in a sentence, *e.g.*, (*a*) At the end of a sentence काय calls for an answer either in the affirmative or in the negative, *e.g.*, तू अभ्यास केलास काय? (Have you studied? Have you read your lesson?) ते चहा प्याले काय? (Did they drink tea?) (*b*) Before the verb the pronoun काय asks for information or details, *e.g.*, तुम्ही काय खाल्ले? (What did you eat?) तो काय खेळला? (What game he played?) (*c*) At the beginning of a sentence काय (what) also denotes a surprise, *e.g.*, काय, तुम्ही आलात? (What, you have come?) (८) It is used as a particle of interrogation, *e.g.*, काय आज पाऊस पडेल? (Will it rain to-day?) The word 'what' in English sentences 'what are you?, and 'what is your father?' is an exception to the general meaning of what, *viz*, काय. These sentences if literally translated as in English sentences refer to the profession

(३) (कोणता) (M), (कोणती) (F), (कोणते) (N) (which): These pronouns are used of persons as well as of things. They imply a selection, *i.e.*, तुमचा मित्र कोणता आहे [which (of these) is your friend?] तुमची पेटी

कोणती आहे ? (Which is your box?) तुमचे घर कोणते आहे ? (Which is your house ?) The plural forms of कोणता-तो-ते which कोणते-त्या-ती, *e.g.*, कोणते मित्र ? (Which friends ?) कोणत्या पेट्या ? (Which boxes ?) कोणती घरे ? (Which houses ?)

(४) किती, केवढा - केवढी केवढे (How much; How many ?) These pronouns denote the number and the quantity required, *e.g.*, तुम्ही किती पैसे देऊ शकाल ? (How much money can you spare ?) तुम्हाला किती भाऊ आहेत ? (How many brothers have you ?) The pronouns केवढा (M), केवढी (F), केवढे (N) (All meaning how much) are genera y answered by एवढा (M), एवढी (F) and एवढे (N) (All meaning 'this much') or by तेवढा (M), तेवढी (F) and तेवढे (N) (All meaing, 'that much') in the arswer implied by the question *e.g.*, तुम्हाला केवढा तुकडा पाहिजे ? (How long a piece do you want ?) Answer: मला एवढा/तेवढा तुकडा पाहिजे (I want this much/that much piece). The adjective कितवा (what) is formed from किती and denotes rank, *e.g.*, त्याचा कितवा क्रमांक आहे? त्याने कितवे बक्षीस मिळविले ? हा त्याचा कितवा उच्चांक आहे ? The answers to these questions denote the rank say 'fifth' or 'seventh' or 'second', etc.

अभ्यास १

Fill in the gaps with suitable interrogative pronouns given at the end:–

(१) तुमचे नाव ———— ? (२) तुमचे पदनाम ———— ? (३) चहा ———— केला ? (४) मला———— हाक मारली ? (५) तुम्ही———— नमस्कार करता ? (६) ही ———— वही आहे ? (७) ह्या ———— वह्या आहेत ? (८) ————मुलाने अभ्यास केला ? (९)————मुलांनी अभ्यास केला ? (१०) रुमाल———— विणला आहे. (११) आज आपण कार्यालयात येणार नाही ————? (१२) घरात ———— आनंद मिळतो ? (१३) तुमच्या मुली ————? (१४) हा सर्व त्रास ———— ? (१५) तुम्ही ———— चर्चा करता ? (१६) ते ———— रागावतात ? (१७) मंत्र्यांनी ———— अभिनंदन केले ? (१८) आई ———— काळजी करते ? (१९) अधिकाऱ्यांनी ———— क्षमा केली ? (२०)———— नैमित्तिक रजा मंजूर झाली ? (२१) तुम्ही ————

पाते (blade) वापरता? (२२) आज तुम्ही नाटकाला जाणार ———— (२३ झाडावर ———— चढले? (२४) वडिलांनी ———— बोलावले? (२५) ———— वर्तमानपत्र चांगले आहे?

(काय, कोणास, कोणाला, कोणते, कोणी, कोणावर, कोणाचे, कोणाची, कोणत्या, कोणापासून, कोणाकरिता, कोणाच्या, कोण.)

● ● ●

२५

प्रश्नार्थक वाक्ये २

[Interrogative Sentences (II)]

In this chapter it is proposed to deal with the interrogative adverbs (१) When ? (केव्हा ?), (२) Where ? (कोठे ?), (३) Why? (का ?), and (४) How ? (कसा, कशी, कसे ?). When adverbs are used in asking questions, they are called interrogative adverbs.

(१) केव्हा (*when*).–– This is an adverb of time, *e. g.*, (१) आपण केव्हा आलात ? (Whed did you come ?) (२) तुम्ही स्मरणपत्र केव्हा पाठवले ? (When did you send a reminder?) Also, शिवाजीचा जन्म केव्हा झाला ? (When was Shivaji born ?)

The post-positions करिता and साठी when joined to केव्हा refer to the period of time. हे औषध केव्हाकरिता आहे ? (At what time of the day/when is the medicine to be taken?) ही भाजी केव्हासाठी आणली आहे ? (For what part of the day are the vegetables brought?)

The word केव्हापासून also denotes the period of time, *e.g.*, तो केव्हापासून उभा आहे ? (How long has he been standing?) The words केव्हाचा, केव्हाची, केव्हाचे are also used to denote the period of time and are used in different genders according to the nouns they govern, *e. g.*, तो केव्हाचा आला आहे, ती केव्हाची अभ्यास करत आहे, ते मूल केव्हाचे रडते आहे. The words केव्हाचा, केव्हाची and केव्हाचे are to be translated as 'Since a long time'. The sentences cited above are mere statements and not questions. (These can be turned into questions, *e. g.*, तू केव्हाचा अभ्यास करत आहेस ? (How long have you been studying).

The interrogative adverb कधी is substituted for केव्हा. It also refers to time. The interrogative adverb कधी also yields forms like कधीकरिता, कधीपासून, कधीचा, कधीची, कधीचे.

(२) कोठे (*where*).— This is an adverb of place, *e. g.*, कार्यालय कोठे आहे? (Where is the office?) आज अधिकारी कोठे जाणार आहेत? (Where is the officer going today?)

The adjectives कोठला (M), कोठली (F), कोठले (N) and कोठचा (M), कोठची (F), कोठचे (N) are formed from the interrogative adverb (कोठे) and are used in different genders according to the nouns they govern—

हा कोठला/कोठचा मुलगा आहे?	(What place is the boy from?)
ही कोठली/कोठची मुलगी आहे?	(What place is the girl from?)
हे कोठले/कोठचे पत्र आहे?	(What place is the letter from?)

The adverb कोठपासून, कोठून refer to the time, *e.* g., तुमचा पगार कोठपासून/कोठून काढला? [From what time (date) is your pay drawn?] The adverb कोठपर्यंत refers to the limit, *e. g.*, तुम्ही कोठपर्यंत जाणार? (How far do you mean to go?)

(३) का (*why*).— This is an adverb of reason. It means 'why', 'wherefore', 'for that reason' and the answer implies the reason of the action expressed in the verb, *e. g.*,—

तुम्हास का उशीर झाला? (Why are you late?) The words प्रयोजन or कारण काय? are sometimes substituted for का, *e. g.*, तुम्हास उशीर होण्याचे प्रयोजन/कारण काय? The adverb कशाकरिता, कशासाठी, कशाला, कशास are also substituted for का, *e. g.*, येथे कशाकरिता आलात? (Why have you come here?)

The interrogative adverb का occurring in the body of the sentence means 'why', but when used at the end of a sentence it turns the sentences into a question.

आपण येणार का? (Will you come?) तुम्ही टिप्पणी लिहिलीत का? (Did you write the note?).

(४) कसा, कशी, कसे (*how*).—In what manner? These are interrogative adverbs but when used in sentences, they modify the verbs, *e. g.*, घोडेस्वार कसा दिसतो? (How does a rider look?)

In sentences like (१) तो कसा वाचतो? (२) ती कशी वाचते? (३) मूल कसे पिते? the adverbs do modify the verbs and at the same time denote the gender of the subject.

The adverb कसा in the above sentences agrees with the subject and in the following sentences agrees with the object *e. g.*,

तो मसुदा कसा लिहितो ? तो चिठ्ठी कशी लिहितो ? तो पत्र कसे लिहितो ?

When both the subject and the object are inflected, the adverb is put in the neuter singular, *e. g.*,

पोलीसाने/शिपायाने चोराला कसे पकडावे ? (How should the police constable catch the thief?) It is also used in the neuter gender when the subject of the interrogative verb is inflected *e. g.*,

मुलाने कसे चालावे ? स्त्रियांनी कसे बोलावे ? त्यांनी कसे हसावे ?

The adverbs कसला, कसली, कसले are also the forms of कसा, कशी, कसे. These can be translated as what kind/sort of ? of what nature ? What sort of ? What kind of ? These should be treated as adjectives ending in आ, *e.g.*, हा कसला मुलगा आहे ? ही कसली मुलगी आहे ? हे कसले घर आहे ? कसल्या मुलाला तुम्ही आश्रय दिलात ? तुम्ही कसल्या घरात राहाता ?

The adverb कसा being a declinable adverb yields forms in all the cases, *e.g.*, (१) कशाने, कशाशी, कशाबरोबर (All instrumental); (२) कशासाठी, कशाकरिता, कशास, कशाला (All datives); (३) कशापासून, कशाहून (All abletive); (४) कशाचा, कशाची, कशाचे (All genetives); (५) कशात, कशावरून (All locative).

अभ्यास १

Fill in the gaps with the suitable interrogative adverbs given at the end :—

(१) आज तुम्ही कार्यालयात——— काम केले ? (२) अधीक्षक लवकर——— गेले ? (३) टिप्पणी ———— लिहावी ? (४) ———, आज तुम्ही रजा घेतलीत ? (५) विद्यार्थ्यांनी वर्गात——— वागावे ? (६) तुम्ही सचिवांना भेटलात ———— ? (७) तुमचे काम ——— आले ? (८) हे औषध ——— घ्यावयाचे आहे ? (९) महात्मा गांधींचा जन्म ———— झाला ? (१०) तू——— स्वस्थ बसला आहेस ?

(Answers.— कसे, कोठवर, का, कोठे, कशी, का, कशाला.)

२६

आज्ञार्थ

(The Imperative Mood)

So far we have used verbs in all the tenses, either to make a statement or to ask a question. A verb may be used to express a command also *e.g.*, कोपऱ्यात उभा राहा (Stand in the corner); घरी जा (Go home). It may be used to express a condition, *e.g.*, पाऊस पडत असेल तर येऊ नका (Do not come if it rains) It may be used to express a duty, *e.g.*, प्रत्येकाने नियमाप्रमाणे वागावे (One should behave according to rules). These different modes or manners in which a verb may be used to express an action are called moods. There are three moods in Marathi :–

(1) The Imperative Mood (आज्ञार्थ), (2) The Potential Mood (विध्यर्थ) (3) The Conditional Mood (संकेतार्थ). In this chapter we propose to deal with the Imperative Mood.

The Imperative Mood can strictly be used in the second person, *e.g.*, (१) खाली बस (sing.) (sit down); खाली बसा (plural); (sit down); (२) पुस्तक दे (give book) (sing.); पुस्तक द्या (give book) (plural); (३) पाणी पी (drink water) (sing.); पाणी प्या (drink water) (plural). But in the first and in the third persons the sense of the verb is expressed by the use of the auxiliary verbs in English, *viz.*, may, let, *e,g.*, मी येऊ काय? (May I come?); लोक सुखी असोत (May the people be happy); तो जावो (Let him go).

We give below the forms of three different verbs : बसणे (to sit), घेणे (to take) and लिहिणे (to write), in the imperative mood :–

Imperative Mood (आज्ञार्थ)

बसणे (to sit)

	Singular	*Plural*
First person ...	मी बसू? (May I sit down?)	आम्ही / आपण बसू (May we sit down?)
Second person ...	तू बस / बैस (You sit down).	तुम्ही / आपण बसा (You sit down).

	Singular		Plural
Third person ...	तो बसो	(M)	ते बसोत
	ती बसो	(F)	त्या बसोत
	ते बसो	(N)	ती बसोत
	(Let him/her/it/sit down).		(Let them sit down).

घेणे (to take)

	Singular		Plural
First person ...	मी घेऊ ?		आम्ही / आपण घेऊ ?
	(May I take ?)		(May we take ?)
Second person ...	तू घे		तुम्ही / आपण घ्या
	(You take).		(You take).
Third person ...	तो घेवो	(M)	ते घेवोत
	ती घेवो	(F)	त्या घेवोत
	ते घेवो	(N)	ती घेवोत
	(Let him/her/it take).		(Let them take).

लिहिणे (to write)

	Singular		Plural
First person ...	मी लिहू ?		आम्ही / आपण लिहू ?
	(May I write ?)		(May we write ?)
Second person ...	तू लिही		तुम्ही / आपण लिहा
	(You write).		(You write).
Third person ...	तो लिहो	(M)	ते लिहोत
	ती लिहो	(F)	त्या लिहोत
	ते लिहो	(N)	ती लिहोत
	(Let him/her/it write).		(Let them write).

It will be seen from the examples above that the forms of verbs are the same in all the genders. The root of the verb is the imperative second person singular, *e.g.*, खा, जा, बस, घे, ऐक, दाखव. The imperative second person plural is arrived at by adding आ to the root, *e.g.*, बस + आ = बसा, दाखव + आ = दाखवा, ऐक + आ = ऐका.

The imperative second person plural of the following verbs should be noted : (१) घेणे-घ्या, (२) देणे–द्या, (३) पिणे–प्या, (४) होणे–व्हा, (५) धुणे–धुवा, (६) राहणे–राहा, (७) पाहणे–पाहा, (८) येणे–या, (९) लिहिणे–लिहा.

The subject of the verb in the second person is generally omitted, *e.g.*, जा, बैस, ये.

Uses of the forms of Imperative Mood. The personal forms of verbs in the imperative mood have different meanings :–

(1) First person (प्रथम पुरुष).—The first person is used for making an appeal or to ask for permission or to obtain consent, *e.g.*, मी येऊ काय? (May I come?). It also expresses its model sense, *e.g.*, चला, सिनेमाला जाऊ (Come on, let us go to a picture).

(2) Second person (द्वितीय पुरुष). –In the second person it expresses a command or an advice, *e.g.*, चालता हो (Get away); कार्यालयात वेळेवर या (Come to the office in time). It also expresses a prayer or a request, *e.g.*, गरिबाला मदत करा (Help the poor); पूरग्रस्तांना मदत द्या (Give help to the flood-affected people). It sometimes expresses a persistent request *e.g.*, लोकहो, आळस सोडा (O people, give up idleness).

(3) Third person (तृतीय पुरुष).—In the third person, the imperative is used to bless (आशीर्वाद देणे) or to curse (शाप देणे), *e.g.*, तो लवकर परत येवो (May he soon return); तो शंभर वर्षे जगो (May he live for hundred years); शत्रूचा पराभव होवो (May the enemy be defeated/vanquished).

The negative imperative form is made up by adding नको (singular) and नका (plural). These are joined to the infinitive of a verb. The infinitive of a verb is formed by adding ऊ to the verb, *e.g.*, जा+ऊ—जाऊ, कर+ऊ—करू, बस+ऊ—बसू, ये+ऊ—येऊ, *e.g.*, येऊ नको (Do not come–Sing.); येऊ नका (Do not come–Plural). Sometimes नकोस is also used for नको in the second person singular, *e.g.*, तू येऊ नकोस. In the first person (Plural) only 'नको' is used.

In the third person, the negative form is arrived at by adding, न, *e.g.*, तो येवो (Let him come), तो न येवो (Let him not come).

अभ्यास १

Rewrite the following sentences by using the verbs in the imperative mood ;—

(१) तू निबंधाची तयारी (करणे). (२) तुम्ही बाजारातून भाजी (आणणे). (३) रोज काहीतरी उद्योग (करणे). (४) सर्वांना सुख (मिळणे). (५) मी तुमच्या-बरोबर (ये) काय ? (६) तो आजारातून बरा (होणे). (७) आपले खेळाडू चांगले (खेळणे). (८) आम्ही आज सिनेमा (पाहणे) काय ? (९) तुम्ही हा आंबा (घेणे) आणि (कापणे). (१०) ते लवकर (उठणे) आणि फिरावयास (जाणे).

अभ्यास २

Translate the following sentences into Marathi ;—

(1) Do not shout and make a noise. (2) Tell the story, very slowly. (3) May God keep you happy. (4) Do not sit here and create an obstacle. (5) Do not drink contaminated water. (6) Do not apply for this post as you are overage. (7) Open your books at page 45. (8) Go to the market and bring tea, sugar and vegetables, (9) May he come in and have a cup of tea? (10) Come, let us go upstairs and play cards. (11) Please put up a self-contained note and submit the other papers. (12) Submit the file for perusal. (13) Strive your best to keep up efficiency in the office. (14) Please comply in time. (15) Discuss the matter personally. (16) Issue specific instructions and call for the explanation in case of delay.

[*New words* : A noise — आवाज, गोंधळ (M); To create an obstacle— अडथळा निर्माण करणे; contaminated — दूषित; upstairs — माडीवर; a self-contained note — स्वयंपूर्ण टिप्पणी (F); to put up — प्रस्तुत करणे; submit the file — फाईल सादर करणे; for perusal — अवलोकनार्थ; to strive one's best — आटोकाट प्रयत्न करणे, प्रयत्नांची पराकाष्ठा करणे; efficiency — कार्यक्षमता (F); to comply with — अनुपालन करणे; due date — ठराविक (or नियत) तारीख (F); specific — नक्की, विशिष्ट, ठराविक; in case of delay — विलंब झाल्यास].

• • •

२७

विध्यर्थ

(The Potential Mood)

The potential mood (विध्यर्थ) sometimes called the subjunctive mood, expresses duty, *e.g.*, त्याने जावे (He should go); कर्मचाऱ्यांनी वेळेवर यावे (The staff should come in time); नोकराने भाजी आणावी (The servant should bring vegetables). In all these examples the verbs जावे, यावे and आणावी are in the potential mood and express the sense of duty.

We give below forms of some of the verbs in the potential mood. There is a difference between the forms of intransitive (अकर्मक) and transitive (सकर्मक) verbs. First we take up the intransitive verb say जाणे:—

Potential Mood (विध्यर्थ)

जाणे (to go—intransitive)

	Singular	*Plural*
First person ...	मी जावे (I should go; I ought to go).	आम्ही / आपण जावे (We should go; we ought to go).
Second person ...	तू जावे/स (You should go; you ought to go).	तुम्ही/आपण जावे (You should go; you ought to go).
Third person ...	त्याने जावे (M) (He should go; he ought to go).	त्यांनी जावे (M) (They should or ought to go).
	तिने जावे (F) (She should go; she ought to go).	त्यांनी जावे (They should or ought to go)
	त्याने जावे (N) (It should go; it ought to go).	त्यांनी जावे (They should or ought to go).

The forms of verb असणे (intransitive) are given below :–

असणे (to be)

	Singular	*Plural*
First person ..	मी असावे (I should be there).	आम्ही/आपण असावे (We should be there)
Second person ..	तू असावे/असावेस (You should be there)	तुम्ही/आपण असावे (You should be there).
Third person ..	त्याने असावे, तिने असावे, त्याने असावे (He/She/It should be there).	त्यांनी असावे (M.F.N.). (They should be there).

The verb असणे (to be) is also used in the potential mood as follows :—

	Singular	*Plural*
First person ..	मी असावा (M) मी असावी (F) (I should be or I might be)	आम्ही/आपण असावे (M and F) (We should or might be)
Second person ..	तू असावास (M) तू असावीस (F) (You should be or you might be)	तुम्ही/आपण असावे/त (M and F). (You should or might be)
Third person ..	तो असावा (M) ती असावी (F) ते असावे (N) (They should be or they might be)	ते असावे–असावेत (M) त्या असाव्या–असाव्यात (F) ती असावी–असावीत (N) (They should or might be)

In these forms the verb expresses several meanings, *e. g.*, तो असावा (He may be; he can be; he might be; he could be; he should be; he would be). The auxiliary verbs in English *e.g.*, may be, might be, etc., can be expressed in Marathi by the use of the verb in the potential mood. The verbs जाणे and असणे referred to above are intransitive

verbs. The forms of the transitive verb खाणे (to eat) are given below. In the case of transitive verbs, the forms agree with the object in number and in gender, *e.g.*, मी चहा प्यावा (I'd better take tea) (I should drink tea); तू कॉफी प्यावीस (You'd better/You should drink coffee); त्याने दूध प्यावे (He should drink milk); मी मसुदा लिहावा (I'd better/I should write a draft); तू टिप्पणी लिहावीस (You'd better/You should write a note); त्याने पत्र लिहावे (He'd better write a letter).

Potential Mood (विध्यर्थ)

खाणे (To eat--Transitive)

		Singular		*Plural*
First person ..	(१)	मी आंबा खावा मी आंबे खावे/त	(१)	आम्ही/आपण आंबा खावा आम्ही/आपण आंबे खावे/त
	(२)	मी भाजी खावी मी भाज्या खाव्या/त	(२)	आम्ही/आपण भाजी खावी आम्ही / आपण भाज्या खाव्या/त.
	(३)	मी फळ खावे मी फळे खावी/त	(३)	आम्ही/आपण फळ खावे आम्ही/आपण फळे खावी/त
Second person .	(१)	तू आंबा खावास तू आंबे खावेस	(१)	तुम्ही/आपण आंबा खावा तुम्ही/आपण आंबे खावेत
	(२)	तू भाजी खावीस तू भाज्या खाव्यास	(२)	तुम्ही/आपण भाजी खावी तुम्ही/आपण भाज्या खाव्यात
	(३)	तू फळ खावेस तू फळे खावीस	(३)	तुम्ही/आपण फळ खावे तुम्ही/आपण फळे खावी/त
Third person ..	(१)	त्याने आंबा खावा त्याने आंबे खावे/त	(१)	त्यांनी आंबा खावा त्यांनी आंबे खावे/त
	(२)	त्याने भाजी खावी त्याने भाज्या खाव्या/त	(२)	त्यांनी भाजी खावी त्यांनी भाज्या खाव्या/त
	(३)	त्याने फळ खावे त्याने फळे खावी/त	(३)	त्यांनी फळ खावे त्यांनी फळे खावी /त

The subjects तिने (sing.), त्यांनी (plural) and त्याने (sing.), त्यांनी (plural) can be added in the third person feminine and neuter, respectively.

(1) The potential mood expresses the sense of obligation, *e.g.*, त्याने क्षमा मागावी (He should beg pardon). (2) It sometimes denotes fitness, ability or authority, *e.g.*, विद्वानांनीच चर्चा करावी (The learned alone should discuss). (3) It expresses, surprise *e.g.*, या प्रसंगी आम्ही काय बोलावे? (What should we speak on this occasion?). (4) Sometimes it expresses the sense of 'must', *e.g.*, मग त्याने काय उपाशी राहावे? (Must he then starve?). (5) It expresses a wish, *e.g.*, देश संकटातून पार पडावा (The country should tide over the calamity). (6) It denotes the sense of the phrase 'is to', *e.g.*, आता यावरून काय बोध घ्यावा? (What lesson, now are we to take from this? (7) It expresses a possibility, *e.g.*, लवकर पाऊस पडावा (It might, soon, rain). (8) As already stated it expresses a sense of duty and obligation. The potential mood expresses this sense, *e.g.*, आपण भिकाऱ्यास मदत करावी (We should help the poor). त्याने उद्या देवळात जावे (He should go to the temple to-morrow).

The verb होणे (to become) has exceptional forms in the potential mood. They are illustrated below:—

Potential Mood

Verb—होणे—to become

Singular	*Plural*
First person—	
मी मोठा अधिकारी व्हावा (I should become a big officer)	आम्ही / आपण मोठे अधिकारी व्हावे (We should become big officers)
मी हुषार मुलगी व्हावी (I should become a clever girl)	आम्ही/आपण हुषार मुली व्हाव्या/व्हाव्यात (We should become clever girls)

Singular	Plural
Second person -	
तू मोठा अधिकारी व्हावास (You should become a big officer)	तुम्ही/आपण मोठे अधिकारी व्हावे/व्हावेत (You should become big officers)
तू हुषार मुलगी व्हावीस (You should become a clever girl)	तुम्ही/आपण हुषार मुली व्हाव्या/व्हाव्यात (You should become clever girls)
Third person–	
तो मोठा अधिकारी व्हावा (He should become a big officer)	ते मोठे अधिकारी व्हावे/व्हावेत (They should become big officers)
ती हुशार मुलगी व्हावी (She should become a clever girl)	त्या हुषार मुली व्हाव्या/व्हाव्यात (They should become clever girls)
ते हुषार मूल व्हावे (It should become a clever child)	ती हुषार मुले व्हावी/व्हावीत (They should become clever children)

The sentence मी मोठा अधिकारी व्हावा can be translated as I may/might/cculd/would or should become a big officer.

The potential व्हावे of the verb होणे (to become) is sometimes used for पाहिजे. It then assumes the forms हवा, हवेत, हवास, हवी, हव्या, etc., *e.g.*. मला आंबा हवा or पाहिजे (I want a mango); मला आंबे हवेत or पाहिजेत (I want mangoes); मला तू हवास (I want you); मला ती हवी (I want her); मला तुम्ही हवेत (I want you); मला काम हवे (I want work); मला पोपई हवी (I want a popaya). The pronouns मला can be substituted by त्याला, तुला, तिला, त्यांना etc.

The negative forms of the verbs in the potential mood are formed in three ways: (1) By prefixing न to the verb in the potential mood,

e.g., तू काम करावेस अगर न करावेस (ambiguous–you may/should or you may/should not do the work); त्यांनी यावे अगर न यावे (They might or might not come); त्याने रजा घ्यावी अथवा न घ्यावी (He may take leave or he may not). (2) By taking the infinitive of the verb (Infinitives are formed by adding ऊ to the root), *e.g.*, ये–येऊ, बस–बसू, कर–करू and adding नये), *e.g.*, मी जाऊ नये (I should not go); त्याला क्षमा करू नये (He should not be pardoned); आपण आशा सोडू नये (We should not give up hope); तू चाकराला बोलू नयेस (You should not scold the servant). (3) By adding कामा नये. By adding this the root takes the termination ता, *e.g.*, तू येता कामा नयेस (You must not come); त्याने घरात शिरता कामा नये (He must not enter the house); मी आशा सोडता कामा नये (I must not give up hope). The last three are the examples of the last kind. These express the prohibitive sense. Of these three, the second one is often used to negative the subjunctive mood. We give below some illustrations of the positive and negative sentences in the potential mood.

	Positive	*Negative*
(अ)	१. मी आंबा खावा.	१. मी आंबा खाऊ नये.
	२. तुम्ही पुण्याला जावे.	२. तुम्ही पुण्याला जाऊ नये.
	३. त्याने व्यायाम करावा.	३. त्याने व्यायाम करू नये.
	४. तुला काय म्हणावे ?	४. तुला काय म्हणू नये.
	५. तुम्ही असे म्हणावे.	५. तुम्ही असे म्हणू नये.
	६. आपण उपाशी राहावे.	६. आपण उपाशी राहू नये.
	७. याचा असा अर्थ असावा.	७. याचा असा अर्थ नसावा.
	८. नोकराने यावे.	८. नोकराने येऊ नये.
(ब)	१. मुलाने पावसात खेळावे.	१. मुलाने पावसात खेळता कामा नये.
	२. अधीक्षकांनी लिपिकावर रागवावे.	२. अधीक्षकांनी लिपिकावर रागावता कामा नये.
	३. मुलांनी धूम्रपान करावे.	३. मुलांनी धुम्रपान करता कामा नये.

अभ्यास १

Use the forms, in the potential mood, of the roots given in brackets in the following sentences and re-write them :—

(१) तुम्ही सुखी (अस). (२) सर्वांनी रोज व्यायाम (कर) व फिरावयास (जा). (३) त्यांनी सामना (जिंक). (४) कुंभारांनीच मडकी (कर). (५) नेहमी डाव्या बाजूने (चाल). (६) तू चोरापासून सावध (राहा). (७) यावर तुम्ही काय उत्तर (दे) ? (८) तिने भाजी (आण). (९) मुलांनीच पतंग (उडव). (१०) कार्यालयीन परिपत्रक (काढा).

अभ्यास २

Translate into Marathi :—

(1) We should abide by the rules. (2) Young boys and girls should study hard. (3) You should give a suitable reply to his letter. (4) Beware of the dog; the visitor should first ring the bell. (5) Everyone should keep to the left of the road. (6) We should respect the elders. (7) People should tender the exact fare in the bus. (8) She should stay with her husband. (9) Leaders should visit vlilages and contact the people. (10) You should come to-morrow and enquire.

[*New words* : To abide by—पालन करणे; suitable—योग्य; To tender—देणे; To contact—संपर्क साधणे.]

• • •

२८

संकेतार्थ (१)

[The Conditional Mood (I)]

The conditional mood expresses a condition or a supposition contrary to fact, *e.g.* (१) जर मी त्याला **भेटलो असतो** तर मी त्याला मदत **केली असती** (Had I seen him, I would have helped him). (२) जर मुलाने **अभ्यास केला असता** तर तो परीक्षेत उत्तीर्ण **झाला असता** (Had the boy studied, he would have passed in the examination). (३) जर अधिक्षक सचिवांना **भेटले असते** तर गैरसमज दूर **झाला असता** (Had the Superintendent seen the Secretary, the misunderstanding would have been cleared).

The verbs in the bold type in the above examples are said to be in the conditional mood. All the conditional clauses in the above sentences are introduced by 'जर' (if); there are examples where जर is omitted, *e.g.* अभ्यास केला असता तर तो उत्तीर्ण झाला असता. The presence of जर (if) is however necessary for initiating the main clause.

From these cxamples it will be seen that a verb in the conditional mood is formed by adding the conditional forms of the auxiliary verb **असणे** (given below) to the forms of the past tense of the verb, *e.g.*, भेटलो असतो, अभ्यास केला असता, वाढवला असता.

We give below the conditional forms of the verb असणे (to be) :—

असणे (*Conditional Mood*)

	Singular	*Plural*
First person	मी असतो (M.) मी असते (F.)	आम्ही/आपण असतो (M.F.)
Second person	तू असतास (M.) तू असतीस (F.)	तुम्ही/आपण असता (M.F.)
Third person	तो असता (M.) ती असती (F.) ते असते (N.)	ते असते (M.) त्या असत्या (F.) ती असती (N.)

The meaning of मी असतो would be (1) If I were there, and (2) Had I been there. Combining these forms with the past tense of any verb say जा (गे) we get the following forms मी गेलो असतो, आम्ही गेलो असतो, etc., which would be traslated as 'Had we gone', 'Had we gone' or 'If I had gone', etc.

Some more illustrations of different verbs in the conditional mood are given below.

(१) तो घरी बसला असता तर चोरी झाली नसती.
Had he remained at home the theft would not have taken place.

(२) मुलाने पत्र लिहिले असते तर फार बरे झाले असते.
Had the son written a letter, it would have been all right.

(३) अधिकाऱ्यांनी काळजीपूर्वक चौकशी केली असती तर सत्य बाहेर आले असते.

Had the officer carefully enquired into matter, truth would have been out.

(४) जर सर्व लोक लिहावयास व वाचावयास शिकले असते तर भारताची साक्षरता वाढली असती.

Had all the people learnt to read and to write, literacy in India would have gone up.

There are in Marathi sentences such as (१) जर पाणी असते तर तो अंघोळ करता (Had there been water, he would have taken a bath). (२) तो आज येता तर तुमची भेट होती (If he had come to day, you could have seen him). The verbs in these sentences can be expanded as जर पाणी आले असते तर त्याने अंघोळ केली असती for असते and तो आज आला असता for तो येता.

Examples of the conditional mood in all the Tenses are given below:–

(१) तो रोज काही तरी लिहीत असता तर एव्हाना मोठा लेखक झाला असता (If he had been writing or had he been writing something every day,

he would have become a great writer by now. (२) तो नियमितपणे कार्यालयात जात असता तर फार बरे झाले असते (If he had been going to the office regularly, it would have been well). (३) तुम्ही जर रोज व्यायाम करीत असता तर आजारी पडला नसता (Had you been taking exercise every day, you would not have been ill).

In all these examples the verb in the conditional mood is formed by adding the conditional forms of the auxiliary verb असणे to the present participle of the verb, *e.g.* लिहीत असता; जात असता; करीत असता.

In the future tense, verbs in the condtional mood are formed by adding the conditional forms of असणे to the future participle in णार, *e.g.* तो जाणार असता, आम्ही लिहिणार असतो, ते जेवणार असते, तुम्ही झोपणार असता, मुली खेळणार असत्या; तो जाणार असता तर बरे झाले असते (It would have been well, if he were going or if he had been going), is an example of the verb in the conditional mood, in the future tense.

To convert these sentences into negative, substitute the conditional forms of नसणे in place of the conditional forms of असणे etc.

(१) त्यानी वेळेवर मदत केली नसती तर आम्ही वाचलो नसतो.
(२) पाऊस वेळेवर पडला नसता तर सर्वांचे हाल झाले असते.
(३) वक्ते वेळेवर न येते (आले नसते) तर लोक निघून गेले असते.

अभ्यास

Translate into Marathi :—

(1) Had you kept to the left, the accident would not have occurred. (2) Had the typist been punctual, he would not have received any memo. (3) Had the editor not published the news, people would have risen against him. (4) Had there been no offices, people would have remained at home. (5) Had you entered business, you would have become richer. (6) Had the tenant not opened the window, no fresh air would have come in. (7) If there was no rationing of foodgrains, it

would have been difficult for the people to procure foodgrains. (8) Had the Government not controlled the prices of footgrains, people would have had to pay exorbitant prices in the blackt markei. (9) Had there been no clerks in the office, who would have prepared the notes ? (10) Had the labourers in the mill gone on strike, there would have been no production.

[*New words* : To the left--डाव्या बाजूने; To occur--घडणे; a memo—ज्ञाप (M); to rise against—विरुद्ध उठणे, बंड करणे; a tenant—भाडेकरी (M); rationing—शिधावाटप (N); To procure--मिळवणे; in the black market--काळ्या बाजारात; production—उत्पादन (N).]

• • •

२९

संकेतार्थ (२)

[The Conditional Mood (II)]

Dubitative Forms

In this chapter it is proposed to discuss the dubitative forms in the conditional mood. The dubitative forms express a doubt of some kind *e.g.* (1) मी राजा असलो (झालो) तर सर्वांना सुखी करीन (If I become the king, I shall make all happy). (2) त्याला गरज असली तर तो मला भेटेल (If he is in need, he will see me). (3) हवा चांगली असली तर आम्ही फिरावयास जाऊ (If the weather is fine, we may go for a walk). (4) जर कर्मचाऱ्यांचे संबंध सलोख्याचे असले तर कामे लवकर होतील (If the relations among the staff member are cordial, the disposal would be quick).

In all these sentences the forms असलो, असली and असले are the simple dubitative forms of असणे. We can also conclude form the above examples, that the dubitative forms of the conditional mood are used only in the conditional clause and not in the main clause.

The simple dubitative forms of the verb असणे are given below—

असणे (to be)

	Singular		*Plural*	
First person	मी असलो	(M)	आम्ही/आपण असलो	(M.F.)
	मी असले	(F)		
Second person	तू असलास	(M)	तुम्ही/आपण असला	(M.F.)
	तू असलीस	(F)	तुम्ही/आपण असलात	
Third person	तो असला	(M)	ते असले	(M)
	ती असली	(N)	त्या असल्या	(F)
	ते असले	(N)	ती असली	(N)

The sentence मी असलो can be translated as 'should I be' or 'If I be', *e. g.* मी त्याच्या घरी असलो तर मला भेट (should I be at his house/If I happen to be at his house, then meet me).

The dubitative forms are possible in all the tenses.

The present dubitative is the participle in त with the forms असलो, असलास, असला, etc. *e. g.* जात असला, लिहीत असलो, खात असले, (टाळ्या) वाजवत असले.

(१) तो मुंबईस जात असला, तर त्याला औषध आणावयास सांग.
(If he is going should he be going to Bombay, ask him to bring the medicine.)

(२) जर जोराचा पाऊस पडत असला तर घरीच राहा.
(Should it be raining heavily, remain indoors) These are the illustrations of the present dubitative.

The past dubitative is the past tense with असलो, असलास, असला etc., *e.g.* गेला असला, लिहिले असले, खाल्ले असले, (टाळ्या) वाजवल्या असल्या.

(१) तो मुंबईला गेला असला तर मला सांग. (If he has/In case he has/Should he have gone to Bombay, then tell me).

(२) तिने निबंध लिहिला असला तर तपासून द्या. (If she has/If she has written an essay, then correct it).

(३) त्याला विषबाधा झाली असेल तर त्याला ताबडतोब रुग्णालयात न्या. (If he is affected by poison take him immediately to the hospital). These are the illustrations of the past dubitative.

The future dubitative is the future participle in णार with असलो, असला, etc. *e.g.* जाणार असला, लिहिणार असलो, खाणार असले.

(१) तो मुंबईला जाणार असला तर मला सांगा. (If he is going to Bombay, then tell me.)

(२) जर जोराचा पाऊस पडणार असला, तर छत्री न्या. (If it is going to rain heavily, take the umbrella).

(३) ते फळे खाणार असले तर बाजारात जा. (If they are going to eat fruits they should go to the market). These are the illustrations of the future dubitative.

To arrive at the negative forms, substitute the forms of the auxiliary verb नसणे in place of असणे, *e.g.* मी नसलो, तो नसला, तो जात नसला, तो गेला नसला, तो जाणार नसला.

The following sentences will clarify—

(१) मी घरी नसलो तर येऊ नका. (२) कर्मचारी वेळेवर येत नसले तर कार्यालयीन परिपत्रक काढा. (३) घरात साखर नसली तर चहा मिळणार नाही. (४) तो जाणार नसला तर मी जाईन.

अभ्यास

Translate into Marathi:—

(1)If you have no invitation, do not attend the function. (2) If the confidential reports for the last three years are satisfactory, he will be promoted; if not, his junior will get a promotion. (3) If it is very cold, put on woollen clothes. (4) If the younger generation is strong and healthy, the nation will prosper. (5) If the books happen to be illustrated, then buy a few for the children (6) If the medicines are expensive, do not waste them. (7) If the coolies get no work, they will starve. (8) If there are no clouds, there will be no rain; and if there is no rain, there will be a famine. (9) If you have no money, do not purchase expensive things. (10) If the officers do not treat the subordinate staff courteously, they might lodge a protest.

[*New words* : A function—समारंभ (M); a promotion—पदोन्नती (F); a junior—कनिष्ठ कर्मचारी; the younger generation—तरुण पिढी (F); to prosper—संपन्न होणे; illustrated—सचित्र; to starve—उपाशी राहाणे; a famine—दुष्काळ (M); to treat— वागविणे; the subordinate staff—हाताखालील लोक; lodge a protest—निषेध नोंदणे/तक्रार करणे].

• • •

३०

प्रयोग

(The Voice)

The use of voice in Marathi is quite distinct from that in English, whereas in English the voice is determined by whether the action is performed by or upon the subject. In Marathi the voice is determined by, whether the verb agrees in number and gender with the subject or the object, *e.g.* the sentence मी आंबा खाल्ला is in the Passive voice, (कर्मणि प्रयोग) though the sentence 'I ate a mango' in English is in the Active voice.

How a single sentence can be transformed into passive voice, in all the varieties of the three tenses, the present, the past and the future, is shown below :—

The Present Tense (वर्तमानकाळ)

	Active	*Passive*
Present Tense (वर्तमान काळ)	१. अधिकारी रजा मंजूर करतात. (The Officer sanctions the leave).	१. अधिकाऱ्यांकडून रजा मंजूर केली जाते/करण्यात येते. (Leave is sanctioned by the Officer).
Present continuous (अपूर्ण वर्तमानकाळ)	२. अधिकारी रजा मंजूर करीत आहेत. (The Officer is sanctioning the leave).	२. अधिकाऱ्यांकडून रजा मंजूर केली जात आहे/करण्यात येत आहे. (Leave is being sanctioned by the Officer).
Present perfect (पूर्ण वर्तमानकाळ)	३. अधिकाऱ्यांनी रजा मंजूर केली आहे. (The Officer has sanctioned the leave).	३. अधिकाऱ्यांकडून रजा मंजूर केली गेली आहे/करण्यात आली आहे. (Leave has been sanctioned by the Officer).

The Past Tense (भूतकाळ).

The Past Tense (भूतकाळ).	१. अधिकाऱ्यांनी रजा मंजूर केली. (The Officer sanctioned the leave).	१. अधिकाऱ्यांकडून रजा मंजूर केली गेली/करण्यात आली. (Leave was sanctioned by the officer).

Past continuous (अपूर्ण भूतकाळ)	२. अधिकारी रजा मंजूर करीत होते. (The officer was sanctioning the leave).	२. अधिकाऱ्यांकडून रजा मंजूर केली जात होती/करण्यात येत होती. (Leave was being sanctioned by the officer).
Past Perfect (पूर्ण भूतकाळ)	३. अधिकाऱ्यांनी रजा मंजूर केली होती. (The officer had sanctioned the leave).	३. अधिकाऱ्यांकडून रजा मंजूर केली गेली होती/करण्यात आली होती. (Leave had been sanctioned by the officer).
Habitual Past (रीति भूतकाळ)	४. अधिकारी रजा मंजूर करत असत. (The officer usually used to sanction the leave).	४. अधिकाऱ्यांकडून रजा मंजूर केली जात असे/करण्यात येत असे. (Leave was usually sanctioned by the officer)

The Future Tense (भविष्य काळ)

(१) घरभाडे (House rent)—घराचे भाडे; (२) गुणावगुण—गुण व अवगुण (merits and demerits); (३) प्रमाणपत्र (a certificate)—प्रमाण असे पत्र; (४) वाटचाल—वाटेतील चाल (transit); (५) सचिवालय—सचिवांचे आलय; (६) राज्यपाल (The Governor)—राज्याचे पालन करणारे; (७) मुद्रणाधिकार (copyright)—मुद्रणाचा

अधिकार; (८) मागणीपत्र (an indent)—मागणीचे पत्र; (९) प्रथमोपचार (first aid) —प्रथम असा उपचार; (१०) पूर्ववृत्त (previous history)—पूर्वीचे वृत्त; (११) पत्रव्यवहार (correspondence)—पत्रद्वारा-व्यवहार; (१२) निवृत्तिवेतन (pension)—निवृत्तीनंतरचे वेतन; (१३) सप्ताहान्त (week end)—सप्ताहाचा अन्त; (१४) शपथपत्र (an affidavit)— शपथपूर्वक दिलेले पत्र; (१५) वृत्तपत्र (a newspaper)—वृत्त देणारे पत्र (१६) लाचखाऊ (corrupt)=लाच खाणारा-रे; (१७) भाषांतर (translation)—दुसरी भाषा; (१८) भिन्नमत (different opinion, a minute of dissent)— भिन्न असे मत, भिन्न आहे मत जीत (अशी टिप्पणी); (१९) प्रवासभत्ता (travelling allowance)—प्रवासासाठी/करिता भत्ता; (२०) आधारसामग्री (data)—आधाराकरिता सामग्री; (२१) दोषारोप (a charge)—दोषांचा आरोप; (२२) विश्वासघात (breach of trust)—विश्वासाचा घात; (२३) गैरवर्तणूक (misconduct)—गैर अशी वर्तणूक; (२४) द्विपाद (a biped)— दोन पाय असलेला; (२५) लंबकर्ण (a donkey) लंब असा कर्ण (longeared)—लंब आहेत कर्ण ज्याचे (a donkey); (२६) विद्याभ्यास (learning)—विद्यांचा अभ्यास.

We give below some more compounds with their meanings :—

(१) दानशूर (liberal in giving, eminently liberal).
(२) रणशूर (brave on the battlefield).
(३) धनहर (a thief, a remover of wealth)
(४) सुखकर्ता (a bringer of happiness).
(५) सूक्ष्मदर्शी (one who sees minutely).
(६) ज्ञानपरायण (devoted to knowledge).
(७) कृतघ्न (ungrateful, one who forgets the good done to him).
(८) धनाढ्य (immensely rich)
(९) सुखावह (bringing pleasure).
(१०) विद्यार्थी (one who seeks learning).
(११) पराधीन (dependent).
(१२) घरोघरी (in every house).
(१३) पैसानपैसा (every pice/pie)
(१४) पांढरासफेत (extremely white).
(१५) वाकडातिकडा (crooked).
(१६) टीकाटिप्पणी (comments).

We now give below some of the compounds formed with one common member as a prefix in each of the groups :—

(१) चौ—चौरस (a square); चौकोन (a rectangle); चौपाई (an Indian cot); चौकार (a boundary); चौरंगी (quadrangular).

(२) जीवन—जीवनशिक्षण (basic education); जीवनमरण (life and death); जीवनमान (standard of living); जीवनावश्यक (essential for living); जीवनोपयोगी (useful for living); जीवनसाथी (a life-partner); जीवनदाता (a giver of life).

(३) धर्म—धर्मातीत (secular); धर्मादाय (charity); धर्मार्थ (in charity); धर्मवेडा (a religious fanatic); धर्मयुद्ध (a religous war); धर्मयुग (a religious age); धर्मबाह्य (outside the purview of religion).

(४) बाल—बालवाङ्मय (childrens' literature); बालवीर (a scout); बालोद्यान (children's park); बालवर्ग (the infant class) बालमित्र (a boyhood friend).

(५) महा (महान)—महाराष्ट्र, महारोग (leprosy); महाभारत, महाकाव्य (the great epic); महाशय (a noble person); महावस्त्र (an expensive piece of cloth); महावीर (a great warrior).

(६) मुख्य—मुख्यालय (Headquarters); मुख्याध्यापक (the Head teacher).

(७) यथा—यथाक्रम (According to the order) यथाविधि, यथाशास्त्र (According to scripture); यथामति (According to one's lights or understanding); यथाप्रस्तावित (As proposed).

(८) रक्त—रक्तदाब (blood-pressure); रक्तपेढी (a blood—bank); रक्तपात (a bloodshed); रक्तवाहिनी (blood vein).

(९) राजा (राजन्)—राजकुमार, राजपुत्र (a prince); राजवाडा (a palace); राजभवन (the Government House); राजकारण (politics); राजकन्या (a princess); राजमाता (The mother-queen); राजदरबार (a royal court).

(१०) वन—वनभोजन (lit. a meal in a garden or a forest, a picnic); वनविहार (sport in the forest); वनमहोत्सव (a festival of the trees/forest); वनवास (a forced stay in the forest, exile); वनराज (the king of the forest); वनसंरक्षक (a forest guard); वनाधिकारी (a forest officer).

(११) वस्तु—वस्तुभांडार (a store); वस्तुसंग्रहालय (a museum); वस्तुनिष्ठ (objective); वस्तुस्थिती (matter of fact).

(१२) विद्या—विद्यार्थी (a student); विद्यापीठ (a university); विद्यालय (a school); विद्याधन (wealth in the form of learning).

(१३) सम—समकालीन (contemporary); समवयस्क (of the same age); समतोल (balanced); समांतर (parallel); समभुज (equilateral); समकोन (equiangular).

(१४) सह—सहवास (staying together); सहकुटुंब (with family); सहकार (co-operation); सहशिक्षण (co-education); सहप्रवासी—(co-traveller).

(१५) हस्त—हस्तकौशल्य (dexterity); हस्तरेषा (lines on a palm); हस्तांतरण (transfer); हस्तसामुद्रिक (palmistry).

अभ्यास १

Fill in the gaps with appropriate words given at the end :—

(१) पंडित नेहरू व सरदार पटेल .... होते. (२) .... म्हणजे पदव्युत्तर शिक्षण मिळण्याचे ठिकाण. (३) प्रत्येकाने संरक्षण निधीस .... मदत करावी. (४) .... म्हणजे राज्यपालांचे राहण्याचे ठिकाण. (५) मला तीन दिवस .... सोडण्याची परवानगी द्यावी. (६) परीक्षेचे दोन प्रकार आहेत— १. व्यक्तिनिष्ठ २. .... (७) लढाईत खूप .... होतो. (८) हल्ली प्रत्येक रुग्णालयात .... असावी. (९) शासकीय पत्राच्या सुरुवातीस .... असे लिहितात. (१०) भारतापुढे पुष्कळ .... उभ्या आहेत.

(Ans—समस्या, रक्तपात, महोदय, मुख्यालय, वस्तुनिष्ठ, राजभवन, यथाशक्ति, रक्तपेढी, समवयस्क, विद्यापीठ.)

अभ्यास २

Give one word for the following :—

(1) Pertaining to the same period, (2) A figure with four equal sides, (3) Essential for life, (4) An expert in Mathematics, (5) Having the same distance throughout, (6) Literature for children, (7) Matter of fact, (8) The head of a nation, (9) Along with the family, (10) As proposed, (11) Immensely rich, (12) On duty.

अभ्यास २

Translate into Marathi:—

(1) On this point all the scientists differ, (2) This is a problem, pertaining to the future. (3) The Minister inaugurated the tree planting festival at 8 a.m. (4) The subjective type of examinations are ridiculous. (5) The rich people spend a lot over religious ceremonies. (6) In a secular state, every man has a right to worship, his own way. (7) Palaces are centres of politics. (8) Every office should have a co-operative store of its own. (9) Hospital authorities call you for donating blood. (10) Food problem is the most important problem before India.

[*New words* : A point मुद्दा (M.); a scientist– शास्त्रज्ञ; a problem— समस्या (F.); pertaining to the future—भविष्यकालीन; to inaugurate— उद्घाटन करणे; subjective—व्यक्तिनिष्ठ; ridiculous—हास्यास्पद; a religious ceremony—धार्मिक समारंभ; secular—धर्मातीत, निधर्मी; politics –राजकारण (N.); a co-operative store –सहकारी वस्तु भांडार.]

❀ ❀ ❀

३७

काही इंग्रजी क्रियापदे

(Some English verbs)

There are in English many verbs which when translated or rendered into Marathi affect the construction of Marathi sentences. English is by no means deficient in such verbs.

Read the following English sentences :—

(1) The sages subsist on roots and fruits.
(2) The Mogal Emperor was fond of architecture.
(3) Bhima was more than a match for the giant.
(4) We are afraid of serpents.
(5) People like mangoes.
(6) He has three brothers.

In most of these sentences. you will find that verbs, adjectives and nouns are followed by particular prepositions. Now note the renderings of these very sentences into Marathi.

(१) ऋषी कंदमुळांवर व फळांवर राहातात.
(२) मोगल बादशहाला शिल्पकाम आवडत होते.
(३) भीम राक्षसाला पुरून उरला.
(४) आम्ही सापाला भितो.
(५) लोकांना आंबे आवडतात.
(६) त्याला तीन भाऊ आहेत.

You will thus find that the use of corresponding verbs in Marathi sentences affect the construction of the sentences. Take *e.g.*, sentence No. 5, "People like mangoes" (लोकांना आंबे आवडतात). The original subject 'People' in the English sentence is changed to लोकांना (Dat. Plu. of लोक); and the verb 'like' in the English sentence which agrees with the subject 'people' in the English sentence agress with the object 'आंबे' in the Marathi sentence.

Consider the last sentence 'He has three brothers' (त्याला तीन भाऊ आहेत). The subject 'He' in the English sentence is changed to त्याला in Marathi and the verb 'has' which agrees with the subject in the English sentences agrees with भाऊ (brother) in the Marathi sentence.

We will, therfore, deal with such verbs in this chapter and illustrate their use in Marathi. The list of verbs given here is not exhaustive.

1. To want (पाहिजे).—(1) My brother wants money (माझ्या भावाला पैसे पाहिजेत). (2) She wanted a sari (तिला साडी पाहिजे होती). (3) The child may want milk (मुलाला दूध पाहिजे असेल). (4) Pupils may be wanting more marks (विद्यार्थ्यांना अधिक गुण पाहिजे असतील).

The verb 'पाहिजे' conveys the sense 'it is wanted' *e. g.* मला एक रुमाल पाहिजे can be translated as 'I want a handkerchief'. The forms हवे, हवा, हवेत, हवी, etc., of the verb होणे (to become) are optionally used for पाहिजे, *e. g.* मला रूमाल पाहिजे or हवा; मला रूमाल पाहिजेत or हवेत, मला वही हवी, मला वह्या हव्यात.

The verb पाहिजे is joined to the past tense of the principal verb. It then denotes the necessity of doing the action expressed by the principal verb, *e. g.* मला गेले पाहिजे (I must go), मला धावले पाहिजे (I must run), तिला आले पाहिजे (She must come).

If however the principal verb is transitive, the form of the past tense of the principal verb agrees with the object *e. g.* तुला आंबा (M.) खाल्ला पाहिजे; तुला भाजी (F.) खाल्ली पाहिजे; तुला केळे (N.) खाल्ले पाहिजे; तुम्हाला नकाशा उघडला पाहिजे; तुम्हाला वही उघडली पाहिजे; तुम्हाला वह्या उघडल्या पाहिजेत; तुम्हाला कपाट उघडले पाहिजे.

It may be observed that a person for whom or by whom something is wanted is put in the dative case.

2. To have (जवळ असणे, पाशी असणे).—This is an auxiliary verb. When it is used as a principal verb, it expresses a meaning of its own, *viz.*, that of possession, *e. g.* (1) I have two hands (मला दोन हात आहेत) (2) I have two books (माझ्याजवळ दोन पुस्तके आहेत).

The meaning of the verb 'have' is different in the two sentenses. Sentence No. 1 expresses a natural possession, whereas sentence No. 2 expresses an acquired possession.

It is also used as a principal verb in the sentence. I have to go (मला जावयाचे आहे); We have the study (आम्हाला अभ्यास करावयाचा आहे).

The verb have in these sentences expresses necessity or compulsion, *e.g.* त्यांना जावेच लागेल (They will have to go).

As an auxiliary verb it helps to form the perfect tense, *e. g.*, (१) I have taken meals (मी जेवण केले आहे), (२) He has written a book (त्याने पुस्तक लिहिले आहे), (३) They have done a lot of work (त्यांनी खूप काम केले आहे).

The past tense of 'have', *viz.*, 'had' is to be translated by the forms of असणे in the past tense, *viz.*, होता, होती, होते, etc. The future of 'have' 'shall have' or 'will have' is to be translated by the forms of असणे in the future tense, *e.g.*, (Past tense) : (1) I had some money (माझ्याजवळ काही पैसे होते), (2) I had gone to Bombay (मी मुंबईला गेलो होतो/गेले होते). (3) He had written a letter (त्याने पत्र लिहिले होते). (Future tense) : He may be having fifty rupees (त्याच्याजवळ पन्नास रुपये असतील).

3. Can (शकणे) (To be able).—This is joined to the infinitive of the principal verb (or is added to the participal ending in ऊ of the principal verb), *e. g.*, (1) He can go (तो जाऊ शकतो). (2) They can write (ते लिहू शकतात). The verb 'शकणे' yields forms in all the tenses, just as any other intransitive verb; but whatever be its forms in any tense, the verb शकणे is never used alone. It is used only with the infinitive of the principal verb. We give below the forms of the verb 'खाऊ शकणे' in all the tenses.

Present tense (खाऊ शकणे)

	Singular		*Plural*	
First Person	मी खाऊ शकतो,	(M.)	आम्ही/आपण खाऊ शकतो	(M.F.)
	शकते	(F.)		
Second Person	तू खाऊ शकतोस	(M.)	तुम्ही/आपण खाऊ शकता	(M F.)
	शकतेस	(F.)		
Third Person	तो खाऊ शकतो	(M.)	ते खाऊ शकतात	(M.)
	ती खाऊ शकते	(F.)	त्या खाऊ शकतात	(F.)
	ते खाऊ शकते	(N.)	ती खाऊ शकतात	(N.)

The verb शकणे will give the forms मी खाऊ शकलो (M.), मी खाऊ शकले (F.), आम्ही खाऊ शकलो, etc., in the past tense; it will give the forms मी खाऊ शकेन, आम्ही खाऊ शकू, तू खाऊ शकशील, etc., in the future tense.

The verb येणे is also substituted for शकणे. The verb येणे ordinarily means to come, but when it substitutes शकणे it has the same meaning as that of the latter (to be able, can). It is joined to the present participle in ता (जाता येते—can go). This compound verb is construed with the dative of the agent, *e.g.*, I can go (मला जाता येते); We can write (आम्हांला लिहिता येते); He is able to walk (त्याला चालता येते).

The verb येणे may also be joined to the infinitive mood, *e.g.*, ऐकू येते (is possible to hear). There is a difference between जाता येते and ऐकू येते. The construction जाता येते has an active force while ऐकू येते has a passive force. ऐकू येते means, 'it is capable of being heard' or 'is audible'.

The forms of येणे in the past and the future tenses when intransitively used are the same as those of येणे (to come), *e.g.*,

मला खाता येते	(I can eat).
मला खाता आले	(I could eat/I was able to eat).
मला खाता येईल	(It may be possible for me to eat).

When येणे is transitively used, it agrees with the object, *e.g.*, मला भाषा येते (Sing.); मला भाषा येतात (Plural); मला भाषा आली (Sing.); मला भाषा आल्या (Plural).

The verb येणे also means 'to get', *e.g.*, मला निरोप येतो (I get a message); मला चिठ्ठी येते (I get a note); मला पत्र येते (I get a letter). The past tense of the verbs in these three sentences will be आला, आली and आले, respectively. The plural forms of the verbs in the obove sentences will be मला निरोप आले, मला चिठ्ठ्या आल्या and मला पत्रे आली, respectively.

The sentences माणसाला धैर्य आले (The man got courage or the man became bold) and माणसाला दया आली (The man got sympathy or was affected with pity) illustrate another use of the verb येणे.

4. To know (माहीत असणे, येणे).—The verb 'to know' in the sentence—I know a language—is to be translated as माहीत आहे/येते, etc., *e.g.*

I know language ... मला भाषा माहीत आहे/मला भाषा येते.

I know languages ... मला भाषा माहीत आहेत/मला भाषा येतात.

In the case of a newspaper or a book we only say मला वर्तमानपत्र माहीत आहे or पुस्तक माहीत आहे (I know the newspaper or the book). The sentence 'I know a friend' or 'The friend is known to me' can be translated as (1) मला मित्र माहीत आहे. (2) मी मित्राला ओळखतो.

5. To have to (लागणे).—लागणे is an auxiliary verb. It is added to the potential forms of the principal verb. It indicates compulsion or obligation and the person so compelled or obliged is put in the dative case, *e.g.*—

(१) लिपिकाला जावे लागते ... (The clerk has to go).
(२) लिपिकाला जावे लागले ... (The clerk had to go).
(३) लिपिकाला जावे लागेल ... (The clerk will have to go).
(४) नोकराला काम करावे लागते ... (The servant has to work).
(५) नोकराला काम करावे लागले ... (The servant had to work).
(६) नोकराला काम करावे लागेल ... (The servant will have to work)

(७) मुलाला औषध घ्यावे लागते ... (The boy has to take medicine).
(८) मुलाला औषध घ्यावे लागले ... (The boy had to take medicine).
(९) मुलाला औषध घ्यावे लागेल ... (The boy will have to take medicine).
(१०) त्याला वही उघडावी लागेल ... (He will have to open a note-book).

It is also added to the participle ending in ऊ or to the infinitive of the principal verb, *e.g.*, मूल चालू लागले (The child began to walk); तो जाऊ लागतो (He starts to go); तो वाचायला or वाचावयास लागला (He began to read); ते अभ्यास करावयास लागले (They began to study).

अभ्यास

Translate into Marathi :—

(1) You will have to collect money for the Koyna Relief Fund; (2) Many officers were not able to attend the test match; (3) Workers can claim compensation from their employers; (4) We must be quite methodical in our work; (5) People can live without food for some days but not without water for long; (6) The staff shall not break the official rules; (7) If they do, we shall have to take drastic disciplinary action; (8) Every clerk can put up a self-contained proposal; (9) You must send the file to the Finance Department for their concurrence; (10) I know several languages but I can use one at a time.

[*New words;* a fund —निधी (M.); a test match—कसोटी सामना; (M.); compensation—नुकसानभरपाई; to claim—मागणे; an employer—मालक (M.); methodical—पद्धतशीर; without water—पाण्याशिवाय; a drastic disciplinary action—शिस्तीची अतिकडक कारवाई; a self-contained proposal—स्वयंपूर्ण प्रस्ताव; F. D.—वित्त विभाग; concurrence—सहमती (F).

● ● ●

३८

काही इंग्रजी क्रियापदे—चालू

[Some English Verbs (*contd.*)]

1. To be afraid of (भिणे, भीती वाटणे).—Study the use of the verbs भिणे and भीती वाटणे in the following sentences:—

(१) तो वाघाला भितो or त्याला वाघाची भीती वाटते. (He is afraid of tiger).

(२) तो वाघाला भ्याला or त्याला वाघाची भीती वाटली. (He was afraid of the tiger).

(३) तो वाघाला भिईल or त्याला वाघाची भीती वाटेल. (He will be afraid of the tiger.)

It will be seen that in the case of भिणे, the object, we are afraid of, is put in the dative case, *e.g.*, मुलगा झुरळाला भितो The boy is afraid of cocroaches). In the case of भीती वाटणे the person, referred to as being afraid of, is in the dative case and the object we are afraid of is in the genitive feminine because it qualifies the feminine noun भीती. The verb भिणे, and पिणे although transitive yield forms in the past tense like intransitive verbs.

2. To be angry with (वर रागावणे, चा राग येणे).— The English sentence 'The officer is angry with the clerk' is translated as अधिकारी लिपिकावर रागावतात or अधिकारी लिपिकाला रागावतात or अधिकाऱ्यांना लिपिकाचा राग येतो. In the case of रागावणे, the person with whom someone is angry is put in the locative or in the dative case (लिपिकावर, लिपिकाला). In the case of the verb राग येणे, the person with whom someone is angry, is put in the genetive case (लिपिकाचा).

3. To desire (इच्छिणे, इच्छा करणे).— This is an auxiliary verb. The verb इच्छिणे is added to the participle ending in ऊ of the principal verb, *e.g.*,

अधीक्षक घरी जाऊ इच्छितात ...(The Superintendent desires/wishes to go home).

आरोपी हे सांगू इच्छितो ... ... (The accused desires to say this). The verb इच्छा करणे (to desire) governs the genitive of the object desired, *e.g.*,--

मी यशाची इच्छा करतो ··· ··· (I desire success).
पुढारी सत्काराची इच्छा करतात ··· (The leader desires for a reception).

4. (1) To hate (द्वेष करणे); (2) To resolve (निश्चय करणे); (3) To insult (अपमान करणे); (4) To specify (उल्लेख करणे).

All the verbs given above govern the genitive of the person or of the object in question. As the nouns द्वेष, निश्चय, अपमान and उल्लेख are in the masculine gender, the genitive masculine (either singular or plural) only, of the person or of the object in question is to be used. We can thus say—

(1) The person to be hated—genetive singular—शत्रूचा द्वेष, मित्राचा द्वेष.

(2) The thing to be resolved—genetive singular (or plural) अभ्यासाचा निश्चय, सेवा करण्याचा निश्चय, चहा न पिण्याचा निश्चय.

(3) The person to be insulted—genetive singular (or plural)—महापौरांचा अपमान, राष्ट्रध्वजाचा अपमान.

(4) The thing to be specified—कामगिरीचा उल्लेख, भांडणाचा उल्लेख.

Example :—

(१) तो शेजाऱ्याचा द्वेष करतो ... ... (He hates his neighbour)
(२) शेजारी त्याचा द्वेष करतो ... ... (The neighbour hates him)
(३) मुलाने अभ्यास करण्याचा निश्चय केला .. (The boy resolved to study)
(४) कोणीही राष्ट्रध्वजाचा अपमान करू नये ... (None should insult the national flag)
(५) तुम्ही त्या स्त्रीचा का अपमान केलात ? ... (Why did you insult the lady)?
(६) चांगल्या घटनेचा नेहमी उल्लेख करा ... (Always mention the good event)

(७) मुलाच्या दोषाचा उल्लेख करू नका ... (Do not mention the fau of a child)

(८) पुढारी खादी वापरण्याचा निश्चय करतात [The leaders resolve to wear khadi (khaddar).]

5. The following verbs take the genitive feminine ची (Sing.) or च्या (Plural) as the case may be *e.g.*

(1) To take care— (काळजी घेणे) करणे—मुलांची काळजी, प्रकृतीची काळजी.
(2) To praise (स्तुती करणे)—शौर्याची स्तुती; भारताची स्तुती.
(3) To censure—(निंदा करणे)—दुसऱ्याची निंदा; सहकाऱ्याची निंदा.
(4) To register— To take cognisance— } (नोंद घेणे) (नोंद करणे).—पत्राची नोंद, उत्तराची नोंद.
(5) To forgive—(क्षमा करणे)—अपराधाची क्षमा.
(6) To hunt—(शिकार करणे) वाघाची शिकार, सिंहाची शिकार.

6. The following verbs take the genitive neuter (चे) *e.g.*—

(1) To receive To welcome } (स्वागत करणे) राष्ट्राध्यक्षांचे स्वागत, अधिकाऱ्यांचे स्वागत.
(2) To congratulate— (अभिनंदन करणे) मुलाचे अभिनंदन, सैनिकांचे अभिनंदन.
(3) To appreciate— (रसग्रहण करणे) (कौतुक करणे) } कवितेचे रसग्रहण, मुलीचे कौतुक.
(4) To protect— (रक्षण करणे) देशाचे रक्षण, इमारतीचे रक्षण.

7. The following verbs govern the instrumental (शी, बरोबर) *e.g.*—

(1) To compare—(तुलना करणे) भारताची युरोपशी—युरोपबरोबर तुलना.
(2) To discuss— (चर्चा करणे) अधिकाऱ्यांशी—अधिकाऱ्यांबरोबर चर्चा.
(3) To quarrel— (भांडणे) मी नोकराशी—नोकराबरोबर भांडतो.

8. The following verbs govern the locative (वर) *e.g.*—

(1) To criticise— (टीका करणे) मंत्र्यांवर टीका, चित्रपटावर टीका.
(2) To love— (प्रेम करणे) मुलावर प्रेम, देशावर प्रेम.
(3) To favour— (कृपा करणे) अपंगावर कृपा, गरिबावर कृपा.
(4) To oblige— (उपकार करणे) अनाथावर उपकार, सज्जनावर उपकार.
(5) To pity— (दया दाखवणे) गरिबावर दया, भिकाऱ्यांवर दया.

अभ्यास १

Translate into Marathi—

(1) Now-a-days we tend to criticise everybody. (2) It is always in our interest to discuss the problems either with our elders or with our superiors. (3) If you want to criticise anything, be a constructive critic. (4) Mother loves her son as the cow loves her calf. (5) If you oblige any person, he will definitely oblige you. (6) Why do you compare Bombay with Calcutta? (7) It is always good to praise a good man. (8) The Government appreciated the bravery of the soldiers. (9) The Minister congratulated the villagers. (10) He insulted the Superintendent because the latter hated him.

३९

'It' ने सुरू होणारी सुलभ इंग्रजी वाक्यरचना

[Some Simple English structures (patterns) beginning with 'it']

The third person pronoun 'it' is many times used at the beginning of English sentences. It is used as a provisional subject before the verb 'to be' when the real subject follows, *e.g.*,—

It is easy to critcise (टीका करणे सोपे आहे).

It is certain that you are wrong (तुझी चूक आहे, हे निश्चित आहे) (तू चुकला आहेस हे निश्चित).

It is used to emphasise the noun or the pronoun following, *e.g.*,—

(1) It was he who picked up the quarrel (त्यानेच भांडण उकरून काढले).

(2) It was at Delhi that the agreement was signed (दिल्लीतच करारावर सह्या झाल्या).

It is also used as an indefinite nominative of an impersonal verb, *e.g.*,—

It rains (पाऊस पडतो); It thunders (गडगडाट होतो).

It is used in speaking of the weather or of the time, *e.g.*,—

It is fine weather (सुंदर हवा पडली आहे).

It is summer (उन्हाळा चालू आहे, हा उन्हाळा आहे).

It is three o'colck (तीन वाजले आहेत).

From all the examples referred to above, it will be noticed that the pronoun 'it' is not translated into Marathi, if it begins a sentence. We give below some of the sentences beginning with 'it' and their renderings into Marathi—

English	*Marathi*
(1) It is very hot to-day	(१) आज फार उकडते.
(2) It was cold yesterday	(२) काल थंडी पडली होती.
(3) It is raining heavily	(३) जोराने पाऊस पडत आहे.
(4) It is pleasant now	(४) (हवा वातावरण) सुखद/प्रसन्न आहे.
(5) It is morning	(५) सकाळ झाली/आहे (सकाळ होते).
(6) It is mid-night	(६) मध्यरात्र झाली.
(7) It is a quarter past two ...	(७) सव्वा दोन वाजले आहेत.
(8) It is a half past four	(८) साडे चार वाजले आहेत.
(9) It is dark	(९) अंधार पडला आहे.
(10) It is very bad	(१०) (हे) फार वाईट आहे.
(11) It is very kind of you	(११) आपण फार दयाळू आहात.
(12) It is really surprising	(१२) (हे) खरोखर आश्चर्यकारक आहे.
(13) It means	(१३) याचा अर्थ असा.
(14) It is implied	(१४) हे अभिप्रेत आहे.
(15) It is evident that	(१५) हे स्पष्ट आहे.
(16) It is submitted that	(१६) सादर निवेदन आहे की.
(17) It has been proposed	(१७) असे प्रस्तावित केले आहे.
(18) It has been brought to the notice	(१८) असे नजरेस आणून दिले आहे.
(19) It is presumed that	(१९) असे गृहीत धरण्यात येत आहे की/असे धरून चालण्यात येत आहे की.
(20) It is not feasible	(२०) शक्य—व्यवहार्य नाही.
(21) It will be appreciated	(२१) फार बरे होईल.

अभ्यास

Translate the following sentences into Marathi—

(1) When it rains, I open my umbrella. (2) It is evident that you have committed a gross negligence. (3) It is presumed that you will attend the office tomorrow. (4) It will be appreciated if you go and receive the V.I.P. personally. (5) It has been decided to condone the deficiency in attendance. (6) As it is raining heavily and as the traffic is dislocated, I regret. I will not able to attend the office to-day. (7) It is three quarters past five and you are still not ready. (8) It is really surprising that people are so ignorant of the Five-Year Plan. (9) It has been brought to the notice of the Government that the Government staff does not abide by the rules. (10) It is not feasible to sanction the optional holiday to all the members of the staff on the same day.

[*New words* : To commit a gross negligence—अत्यंत हयगय करणे; V.I.P.—अति महत्त्वाची व्यक्ती (F); To condone—क्षमापित करणे; The traffic is dislocated—रहदारी विस्कळीत झाली आहे; To abide by—पालन करणे; An optional holiday—वैकल्पिक सुटी.]

● ● ●

४०

जाणे (क्रियापद) (सर्व काळी, सर्व अर्थी, इ.)

(Sentences containing the verb जाणे (Intr.) in all tenses, moods, etc.)

1. The servant goes home (Present tense) नोकर घरी जातो.
2. The servant is going home (Cont. present) नोकर घरी जात आहे.
3. The servant has gone home (Present perfect) नोकर घरी गेला आहे.
4. The servant usually goes home (Habitual present) नोकर घरी जात असतो.
5. The servant went home (Past tense) नोकर घरी गेला.
6. The servant was going home (Cont. past) नोकर घरी जात होता.
7. The servant had gone home (Past perfect) नोकर घरी गेला होता.
8. The servant used to go home (Habitual past) नोकर घरी जात असे.
9. The servant will go home (Future tense) नोकर घरी जाईल.
10. The servant will be going home (Future imperfect) नोकर घरी जात असेल.
11. The servant will have gone home (Future perfect) नोकर घरी गेला असेल/गेलेला असेल.
12. Let the servant go home } Imperative Mood { नोकराला घरी जाऊ दे.
13. May the servant go home } Imperative Mood { नोकर घरी जावो.
14. The servant should go home (Potential Mood) नोकराने घरी जावे — Different degrees of obligation.
15. The servant shall have to go home नोकरास घरी जावेच लागेल — Different degrees of obligation.
16. The servant must go home नोकराने घरी गेलेच पाहिजे. — Different degrees of obligation.
17. The servant can go home नोकर घरी जाऊ शकतो or नोकराला घरी जावतवे.
18. The servant (was able to) could go home नोकर घरी जाऊ शकला.
19. The servant will be able to go home नोकर घरी जाऊ शकेल.
20. The servant could have gone home नोकर घरी जाऊ शकला असता.
21. The servant would have gone home नोकर घरी गेला असता.
22. The servant has to go home नोकराला घरी जावयाचे आहे.
23. The servant had to go home नोकराला घरी जावयाचे होते (obligation).

24. The servant will have to go home नोकराला घरी जावे लागेल (obligation).
25. Had the servant gone home जर नोकर घरी गेला असता.
26. If the servant goes home जर नोकर घरी गेला/जाईल.
27. He will make the servant go home तो नोकरास घरी जावयास भाग पाडेल.
28. The servant is compelled to go home नोकरावर घरी जाण्याची सक्ती केली आहे.
29. The servant wants to go home नोकराला घरी जावयास हवे/घरी जाणे आहे/घरी जावयाचे आहे.
30. The servant wanted to go home. नोकराला घरी जावयाचे होते.
31. The servant must have gone home नोकर घरी गेला असलाच पाहिजे.
32. The servant had better go home नोकराने घरी जावे हे बरे.
33. Make the servant go home नोकराला घरी जावयास लावा.
34. Allow the servant to go home नोकराला घरी जावयास परवानगी द्या.

४१

काही वाक्यरचना

(Some Sentence-constructions)

In this Chapter it is proposed to illustrate certain Complex and Compound sentences. Traditionally, a Simple sentence is one that has only one finite verb *e.g.*, (१) रामा सकाळी अभ्यास करतो (Rama studies in the morning); (२) कार्यालयीन काम संपवल्यावर कर्मचारी घरी जातात (The staff goes home after finishing the office work); (३) सैनिक प्राणपणाने लढले (The soldiers fought to the bitter end). All these sentences contain only one finite verb in each, *viz.*, करतो, जातात, लढले. Therefore, these are called Simple sentences (केवल वाक्य).

A Compound sentence is one which is made up of two or more co-ordinate clauses, *e.g.*, (१) चांदणी रात्र होती आणि आम्ही गप्पा मारल्या (It was a moon-lit night and we chatted away); (२) रात्र झाली, खूप पाऊस पडला आणि आम्ही सर्व भिजलो (Night came on, it rained heavily and we were all wet). In these sentences there are co-ordinate clauses connected by the conjunction 'and' such sentences are called Compound sentences (संयुक्त वाक्य).

A Complex sentence (मिश्र वाक्य) is one that contains one main clause (मुख्य वाक्य) and one or more subordinate clauses (गौण वाक्य), *e.g.*, (१) जेव्हा संध्याकाळ झाली तेव्हा त्यानी विश्रांती घेतली (They rested when it was evening); (२) तो यशस्वी होणार हे निश्चित आहे. (That he will succeed is certain); (३) जो जरुरीच्या वेळेस तुम्हाला मदत करतो तो खरा मित्र होय (A friend in need is a friend in deed); (४) जे जे चकाकते ते सर्व सोने नव्हे (All that glitters is not gold). In all these sentences there is one main clause and one subordinate clause.

It is not possible to exhaust the list of such sentences. We, therefore, propose to give examples of some.—

1. जेव्हा—तेव्हा (when-then).—These two adverbs bring in a complex sentence containing an adverb clause of time, *e.g.*, (१) जेव्हा पाऊस पडतो

तेव्हा मी छत्री उघडतो (I open the umbrella when it rains): (२) जेव्हा लिपिक काम चुकवितात तेव्हा अधीक्षक रागावतात (When the clerk shirks work, the superintendent gets angry); (३) जेव्हा मांजर दूर असते तेव्हा उंदीर खेळतात (When the cat is away the mice play). The sequence of time and tense has to be observed in the principal and subordinate clauses. Generally there is the same tense in both the clauses; in some cases, however, the context may require one tense in the principal clause and another in the subordinate clause. We give below examples of each type:—

(१) जेव्हा सूर्य उगवतो तेव्हा (When the sun rises). (Present tense).	(१) शेतकरी शेतावर जातात. (२) पक्षी आकाशात उडतात. (३) सकाळच्या शाळेची मुले शाळेत जातात. (४) काही लोक फिरावयास जातात. (५) आम्ही घराची दारे व खिडक्या उघडतो.
(२) जेव्हा अंधार पडतो तेव्हा (When it gets dark). (Present tense).	(१) शेतकरी घरी परत येतात. (२) मुले प्रार्थना म्हणतात. (३) पक्षी घरट्याकडे परत येतात. (४) दुकानदार दुकान बंद करण्याचा विचार करतात. (५) रस्त्यातले दिवे लागतात.
(३) जेव्हा आम्ही प्रथम मुंबईला गेलो तेव्हा (When we first went to Bombay). (Past tense).	(१) आम्हाला फार आश्चर्य वाटले. (२) आम्ही घाबरून गेलो. (३) काय करावे कळेनासे झाले. (४) एका नातलगाकडे उतरलो. (५) ट्रामगाड्या फिरत होत्या.
(४) जेव्हा पुढील वर्षी सामना होईल तेव्हा (When there will be a tournament next year). (future tense).	(१) आम्ही नक्की विजय मिळवू. (२) आम्ही खेळातील दोष दूर करू. (३) उत्तम खेळ दाखवू. (४) सगळ्यांकडून वाहवा मिळवू. (५) आम्ही निश्चित ढाल जिंकू.

'When' is sometimes translated by केव्हा as in the following sentences गाडी केव्हा येणार आहे हे आम्हास माहीत नाही (We do not know when the train would arrive). Sometimes जेव्हा (When) is omitted and the sentence yields the same sense *e.g.*, सूर्य उगवतो तेव्हा शेतकरी शेतावर जातात. The word 'Whenever' is translated into Marathi by "जेव्हा जेव्हा' and is only followed by तेव्हा तेव्हा, *e.g.*, जेव्हा जेव्हा मी बाजारात जातो, तेव्हा तेव्हा तेथे खूप गर्दी असते (Whenever I go to the market, there is a big crowd); जेव्हा जेव्हा मी मंत्रालयात गेलो तेव्हा तेव्हा स्वागतकारांनी मला मार्गदर्शन केले (Whenever I went to the Mantralaya, the receptionist guided me).

2. जर– तर (if—then). —Adverb clauses of condition contain the conjunction जर—तर. They are illustrated below :—

(१) जर तू अभ्यास केला नाहीस तर ...
(If you do not study).

(१) गुरुजी रागावतील.
(२) तुझी प्रगती होणार नाही.
(३) तुला परीक्षेत यश मिळणार नाही.
(४) तुझे आईवडील नाराज होतील.
(५) तुझे मित्र पुढच्या वर्गात जातील व तू मागे राहाशील.

(२) जर कर्मचाऱ्यांनी मध्यंतर जास्त वेळ घेतले तर.
(If the staff take a longer interval).

(१) शिस्तभंग होईल.
(२) नियमांचे उल्लंघन होईल.
(३) वरिष्ठ अधिकारी रागावतील.
(४) काम वेळेवर होणार नाही.
(५) लोक टीका करतील.

(३) जर पुरेसा पाऊस पडेल तर ...
(If it rains enough).

(१) दुष्काळ पडणार नाही.
(२) पाण्याची टंचाई भासणार नाही.
(३) शेतकऱ्यांना आनंद होईल.
(४) भरपूर पीक येईल.
(५) धान्याचे भाव वाढणार नाहीत.

३. ज्याप्रमाणे—त्याप्रमाणे.—These indicate manner and can be rendered with the help of 'as' adverb clauses of manner contain these :—

(१) ज्याप्रमाणे बोलावे त्याप्रमाणे कृती करावी.
(One should act as one speaks).

(२) ज्याप्रमाणे बी असते त्याप्रमाणे फळ निपजते.
(३) ज्याप्रमाणे देश असतो त्याप्रमाणे वेष असावा.
(४) ज्याप्रमाणे तो बोलला त्याप्रमाणे घडले.
(५) तुला ज्याप्रमाणे वाटेल त्याप्रमाणे तू वाग.

These very adverbs lead us to जसा--तसा (M.), जशी—तशी (F.) and जसे--तसे (N.), *e.g.*,-

(१) जसा देश तसा वेष.
(२) जसा राजा तशी प्रजा.
(३) (जसे) करावे तसे भरावे.
(४) जशी इच्छा तसे फळ.
(५) जशी खाण तशी माती.

4. जरी--तरी (although/though/even --if/then).—Adverb clauses of supposition or concessions, contain these conjunctions, *e.g.*, (१) जरी मी गरीब आहे तरी मी प्रामाणिक आहे (Though I am poor I am honest); (२) आकाश कोसळले तरी न्याय मिळालाच पाहिजे (Justice must be done even if the heavens fall). Other examples are given below :—

जरी मी ताबडतोब निघालो तरी (Although I started immediately). ...
(१) आईची व माझी भेट झाली नाही.
(२) औषधे घ्यावयास विसरलो नाही.
(३) जाताना अधिकाऱ्यांची परवानगी काढली.
(४) मला स्टेशनवर पोचावयास उशीर झाला
(५) मी सर्व सूचना लक्षात घेतल्या.

5. जेथे—तेथे (where—there) introduce Adverb clause of place, *e.g.*,

(१) जेथे तू राहशील तेथे मी राहीन (I shall stay where you will stay);

(२) जेथे इच्छा आहे तेथे मार्ग आहे (Where there's a will there's a way)

Other examples are given below :—

(१) जेथे गाव असते तेथे विहीर असते.
(२) जेथे सभा असते तेथे अध्यक्ष असतो.

(३) जेथे धूर असतो तेथे अग्नी असतो.
(४) जेथे राजा असतो तेथे प्रधान (मंत्री) असतो.
(५) जेथे मंदीर असते तेथे प्रार्थना असते.

These words जेथे-तेथे can be used as a matching pair जेथे जेथे (wherever), तेथे तेथे (then and there); जेथे-तेथे (everywhere) and तेथल्या तेथे (then and t here).

6. तोच (the moment, on sooner than/as soon as).—The conjunction तोच introduces an Adverb clause of time, *e.g.*, (१) तो वर्गात शिरला नाही तोच घड्याळात दहाचे ठोके पडले (The moment he entered the class, he clock struck ten); (२) मंत्री व्यासपीठावर आले नाहीत तोच सर्वांनी टाळ्या वाजविल्या (The moment (or as soon as) the Minister appeared on the dais people clapped). These sentences can also be translated into English as : (1) No sooner did he enter the class, than the clock struck ten. (2) No sooner did the Minister appears on the dais than the people clapped.

Other examples containing the use of तोच are given below :—

(१) शिकाऱ्याने बंदुकीचा आवाज केला नाही तोच पक्षी उडून गेले.
(२) मी घरात शिरलो नाही तोच पत्नीने माझे स्वागत केले.
(३) सहा वाजले नाहीत तोच नळाचे पाणी बंद झाले.
(४) प्रार्थना संपली नाही तोच विद्यार्थी वर्गात गेले.
(५) त्याने तो भयंकर अपघात पाहिला नाही तोच त्याला मूर्च्छा आली.

7. असल्यामुळे, असल्याने (owing to, as).—मुळे and असल्याने are generally used for converting two simple sentences into one simple, sentence or for converting two simple sentences into one complex sentence *e.g.*, मला ताप आला आहे (I am suffering from fever); मी आज कार्यालयात येऊ शकत नाही (I cannot attend the office to-day). These two sentences can be combined as मला ताप असल्यामुळे/असल्याने मी आज कार्यालयात येऊ शकत नाही.

(As I am suffering from fever, I cannot attend the office to day). Other examples of this type are given below : –

(१) मी गरम चहा प्यायलो; मला बरे वाटले.
[(मी) गरम चहा प्याल्यामुळे मला बरे वाटले.]

(२) आज सकाळपासून पाऊस पडत आहे; मला उशीर होईल.
(आज सकाळपासून पाऊस पडत असल्यामुळे/असल्याने मला उशीर होईल).

(३) पत्नी कालपासून आजारी आहे; मी कार्यालयात येऊ शकत नाही.
(पत्नी कालपासून आजारी असल्यामुळे मी कार्यालयात येऊ शकत नाही)

(४) गाडी उशिरा येणार आहे; मी घरी परत आलो.
(गाडी उशिरा येणार असल्यामुळे मी घरी परत आलो).

(५) आज फार थंडी पडली आहे; मी लोकरीचे कपडे घातले आहेत.
[आज फार थंडी पडली असल्यामुळे (पडल्याने) मी लोकरीचे कपडे घातले आहेत].

8. कारण (because, since)—कारण (because, for since) indicates reason and denotes the closest causal connection. There are three rendering in English of the word कारण (1) Because—this denotes the closest causal connection; (2) For—this denotes the weakest and (3) since—this comes between the two examples, *e.g.*, यंदा मिठाई फार महाग आहे कारण साखर मिळत नाही (The confectionary is expensive at present because sugar is not available); तो परीक्षेत उत्तीर्ण होईल कारण तो हुषार आहे (He will pass in the examination for he is clever). Other examples are given below :–

(१) आपण दूध पितो कारण त्यामुळे शक्ती येते.
(२) यंदा महाराष्ट्रात दुष्काळ पडणार नाही, कारण खूप पाऊस पडला आहे.
(३) रात्री झाडाखाली झोपू नये कारण झाडे कर्बद्वि-प्राणिल वायू (Carbon-dioxide) सोडतात.
(४) सचिव रागावले कारण विधानसभा प्रश्नाचे उत्तर वेळेवर गेले नाही.
(५) आम्ही मराठी शिकतो कारण ती राजभाषा आहे.

The word 'since' is also translated into Marathi by ज्याअर्थी and expects the word त्याअर्थी (therefore) to complete the sense of the sentence, *e. g.*, ज्याअर्थी तू वेळेवर आला नाहीस त्याअर्थी तुला चहा मिळणार नाही. (Since you did not come in time, you shall not get tea).

9. इतका-की (so that).—Adverb clauses of result or consequence are introduced by इतका-की (M.) or इतकी-की (F.) or इतके-की (N.) *e.g.*, (१) तो इतका चांगला मनुष्य आहे की सर्व लोक त्याला मान देतात (He is so good that he is respected by all), (२) हे झाड इतके उंच आहे की मी त्यावर चढू शकत नाही (The tree is so high that I cannot climb it). Some times the adverb 'too' is substituted for 'so..that' However, the Marathi rendering of the sentences remains the same. Other examples of this type are given below :—

(१) काम इतके आहे की एकटा मनुष्य ते करू शकणार नाही.
(२) तो इतका अननुभवी आहे की त्याला अधीक्षकाच्या पदावर नेमणे शक्य नाही.
(३) शहर इतके लांब आहे की कोणीही पायी जाऊ शकणार नाही.
(४) साखर इतकी महाग झाली आहे की सामान्य मनुष्य घेणार नाही.
(५) नोकर इतका मंद आहे की वेळेवर कोणतेच काम होणार नाही.

10. म्हणजे (means, that is).—This is a copulative conjunction, *e.g.*, कार्यालय म्हणजे कामकाज करण्याचे ठिकाण (An office is (or means) a place for transacting business). Other examples illustrating the use of म्हणजे are as follows :—

(१) दुग्धालय म्हणजे दूध मिळण्याचे ठिकाण.
(२) मामा म्हणजे आईचा भाऊ.
(३) चारात आठ मिळविले म्हणजे बारा होतात.
(४) एक रुपया म्हणजे शंभर पैसे.
(५) गाडी थांबली म्हणजे आम्ही खाली उतरतो.

अभ्यास १

Pair the following suitably to make good sentences—

१. जर तू लवकर उठशील	:	ते कोणीही वाचू नये.
२. मी जेव्हा जेव्हा तुमच्या घरी जातो	:	म्हणून गुरुजी रागावले.
३. कोळी म्हणजे	:	तर सर्व लेखे बरोबर पाहिजेत.
४. जे जे मी तुला सांगितले	:	तेव्हा तेव्हा तुमच्या घराला कुलूप असते.
५. आज फार पाऊस पडला असल्याने	:	गुरुजी वर्गात आले.
६. मुलांनी गृहपाठ आणला नाही	:	त्याअर्थी तुम्हास ताकीद मिळालीच पाहिजे.

७. घंटा झाली नाही तोच	:	मासे पकडणारा पुरुष.
८. पुस्तक इतके अश्लील आहे की	:	ते ते तू लक्षात ठेव.
९. ज्याअर्थी तुम्ही नियमभंग केला आहे	:	तर तुला सूर्यदर्शन घडेल.
१०. जर अचानक तपासणी झाली	:	आम्ही कोठेही बाहेर जाणार नाही.

अभ्यास २

Complete the following sentences so that they read well:—

(१) मी अॅस्प्रोची गोळी घेतल्यामुळे ………

(२) जेव्हा घरी अडचण असते ………

(३) तुमचे अक्षर इतके वाईट आहे ………

(४) त्यांना पदोन्नती मिळाली नाही ………

(५) आळस म्हणजे ………

अभ्यास ३

Complete the following sentences by supplying their former halves :-

(१) …… तेव्हा मला आईची आठवण होते.

(२) …… म्हणून लोकांना आश्चर्य वाटले.

(३) …… त्याअर्थी तू उद्यापासून कामावर येऊ नकोस.

(४) …… तरी मला कमी गुण मिळाले.

(५) …… कारण महागाई भत्ता वाढला आहे.

अभ्यास ४

Translate the following sentences into Marathi :—

(1) If someone deceives you once, it is his fault.
It he deceives you the second time it is your fault.

(2) As soon as I reached home, it started raining.

(3) Since you have not passed in the annual examination, you will not get free-studentship this year.

(4) As the confidential reports of the officer are not favourable, he cannot get promotion.

(5) An idle brain is satan's workshop.

(6) The audience was pleased because the speaker arrived in time.

(7) No sooner did my friend enter the train than it started.

(8) As there is an unforeseen difficulty in the house, I shall not be able to attend the officc to-day.

(9) Had you apologized, I Would not have issued any warning.

(10) His hand-writing is too illegible for me to read.

[*New words* : To deceive—फसवणे; Free-studentship—पूर्ण फी-माफी, नादारी; Confidential report—गोपनीय अहवाल; A brain—मेंदू (N.), डोके (N.); Satan—सैतान; Unforeseen अनपेक्षित; Had you apologized—जर तुम्ही/आपण क्षमा मागितली असती; Illegible—वाचण्यास कठीण.]

• • •

४२

शब्दसमूहाऐवजी एक शब्द

(One word for a group of words)

Marathi is rich in single or compound words which occasionally require their simple paraphrase or which when used by themselves add to the beauty and brevity of the language, *e.g.*, ही गोष्ट **पूर्वी केव्हाही घडलेली नाही** (This incident has never happened before). The words in bold type in the above sentence can be substituted by the word 'अभूतपूर्व' (unprecedented). The sentence then will be ही गोष्ट अभूतपूर्व आहे. The former negative sentence is transformed into affirmative without any change in meaning.

Read the sentence 'महात्मा गांधी व सरदार पटेल **एकाच वेळी** हयात होते (Mahatma Gandhi and Sardar Patel were living at the same time). The words in bold type in the above sentence can be substituted by the word 'समकालीन' (Contemporaries) and the sentence after the substitution of the word समकालीन will read as महात्मा गांधी व सरदार पटेल समकालीन होते. (Mahatma Gandhi and Sardar Patel were contemporaries).

The substitution of a single or a compound word for a group of words does not always affect the grammatical construction of the sentence. In some cases, however, the substitution affects the grammatical construction of the original sentence. Read for example the sentence त्या **दोघा मित्रांचे वय सारखे** आहे (The two friends are of the same age). The word 'समवयस्क' (of the same age) can be substituted in this sentence. The substitution of the single word समवयस्क, however, affects the grammatical construction of the sentence. The sentence in the new form will be 'ते दोघे मित्र समवयस्क आहेत'.

We, therefore, set out below two lists 'A' and 'B', the former showing a substitution whcih does not affect the grammatical construction of the sentence and the latter showing the substitution which affects the construction of the sentence.

‘A’

१. हे पंधरा दिवसातून एकदा प्रसिद्ध होणारे वर्तमानपत्र आहे.	१. हे पाक्षिक आहे.
२. ते स्वतःची स्तुती करतात.	२. ते आत्मस्तुती करतात.
३. हा मुलगा रोगापासून मुक्त आहे.	३. हा मुलगा रोगमुक्त आहे.
४. हे रोज प्रसिद्ध होणारे वर्तमानपत्र आहे.	४. हे दैनिक आहे.
५. ही दिवस व तारखा दर्शविणारी पुस्तिका आहे.	५. ही दिनदर्शिका आहे.
६. ही रोग्याची शुश्रूषा करणारी स्त्री आहे.	६. ही परिचारिका आहे.
७. हा पुरुष अत्यंत कठोर हृदयाचा आहे.	७. हा पुरुष पाषाणहृदयी आहे.
८. ही गुप्त बातम्या काढणारी व्यक्ती आहे.	८. हा हेर आहे.
९. तो देशासाठी प्राणार्पण करणारा पुरुष आहे.	९. तो हुतात्मा आहे.
१०. सिंह हा चार पाय असलेला प्राणी आहे.	१०. सिंह हा चतुष्पाद प्राणी आहे.

‘B’

१. काही लोक आपल्यावर केलेले उपकार स्मरत नाहीत.	१. काही लोक कृतघ्न असतात.
२. या स्त्रीला लिहिता-वाचता येत नाही	२. ही स्त्री निरक्षर आहे.
३. तो स्वतःची कामे स्वतः करतो.	३. तो स्वावलंबी आहे.
४. त्याच्याजवळ कल्पना करण्याचे खूप सामर्थ्य आहे.	४. तो अत्यंत कल्पक आहे.
५. या गृहस्थाची पत्नी वारली आहे.	५. हा गृहस्थ विधुर आहे.
६. आमचे शिक्षक देव आहे असे मानतात.	६. आमचे शिक्षक आस्तिक आहेत.
७. ही निराश्रित मुलांना आश्रय देणारी संस्था आहे.	७. हा अनाथबालकाश्रम आहे.
८. या देयकात दोष नाहीत.	८. हे देयक निर्दोष आहे.
९. महात्मा गांधींची अहिंसेवर पूर्ण निष्ठा होती.	९. महात्मा गांधी अहिंसानिष्ठ होते.
१०. या वृद्धाला कशाचीही इच्छा नाही.	१०. हा वृद्ध निरिच्छ आहे.

[*New words* : पाक्षिक—a fortnightly; दिनदर्शिका—a calendar; परिचारिका—a nurse; पाषाणहृदयी—hard-hearted (Lit. stony hearted); हेर—a spy; चतुष्पाद—a quadruped; कृतघ्न—ungrateful; निरक्षर— illiterate; स्वावलंबी —self-reliant; self-dependent; विधुर—a widower; आस्तिक—a theist; अनाथबालकाश्रम—an orphanage; निर्दोष—free from fault; निस्पृह—selfless, free from selfish desire].

We give below some single words for groups of words. The group of words is mentioned against single words :—

१. विधवा	...	१. जिचा पती वारला आहे अशी स्त्री.
२. देशभक्त	...	२. देशावर भक्ती करणारा.
३. नामशेष	...	३. फक्त नावाला शिल्लक राहिलेला.
४. अद्वितीय	...	४. ज्याच्यासारखा दुसरा कोणीच नाही असा.
५. क्षणभंगुर	...	५. थोडा वेळ टिकणारे.
६. कृतज्ञ	...	६. केलेला उपकार जाणणारा.
७. सहोदर	...	७. एकाच आईच्या पोटी जन्मास आलेले.
८. परंपरागत	...	८. पूर्वापार चालत आलेली.
९. सिंहावलोकन	..	९. झालेल्या गोष्टींचे निरीक्षण.
१०. स्मारक	..	१०. आठवण करून देणारी वस्तू.
११. अवर्णनीय	.	११. वर्णन करण्यास अशक्य.
१२. चौक	..	१२. चार रस्ते मिळतात ती जागा.
१३. धर्मांतर	.	१३. दुसऱ्या धर्मात प्रवेश.
१४. वक्ता	..	१४. भाषण करण्याची कला अवगत असलेला.
१५. शेजारधर्म	..	१५. शेजाऱ्यांशी योग्य पद्धतीने वागण्याची तऱ्हा.
१६. निरुद्योगी	..	१६. काहीही उद्योगधंदा न करणारा.
१७. महाविद्यालय	..	१७. पदवीपर्यंत शिक्षण मिळण्याचे ठिकाण.
१८. आबालवृद्ध	..	१८. लहानांपासून वृद्धांपर्यंत.
१९. स्वयंसेवक	..	१९. स्वखुषीने सेवा करणारा.
२०. बहुश्रुत	..	२०. ज्याने पुष्कळ ऐकलेले आहे असा.
२१. निर्वासित	..	२१. घरादारास मुकलेला.
२२. स्वार्थी	..	२२. आपल्यापुरते पाहणारा.

२३. निराधार ..	. २३. कोणाचाही आधार नसलेला.
२४. कल्पवृक्ष ..	.. २४. इच्छिलेली वस्तू देणारा वृक्ष.
२५. चिरंतन ..	.. २५. दीर्घ काळ टिकणारी.
२६. सनातनी .	.. २६. जुन्या धर्मरूढीप्रमाणे/परंपरेप्रमाणे वागणारा.
२७. मनोवेधक ..	. २७. मन खेचून घेणारा.
२८. दानशूर ..	.. २८. दान देण्यास तयार असलेला.
२९. विचारमग्न ..	.. २९. विचार करण्यात गढलेला.
३०. शांतिदूत ..	.. ३०. शांतीचा संदेश पोचविणारा.

अभ्यास १

Give Marathi equivalents for the following :—

(1) A displaced person; (2) Unparalleled; (3) A messenger of peace; (4) Grateful; (5) Selfless; (6) A diary; (7) Transparent; (8) Illiterate; (9) Without any occupation; (10) Orthodox; (11) A square; (12) A review; (13) A theist; (14) Everlasting; (15) A volunteer.

अभ्यास २

Give in Marathi one word for the following groups of words :—

(1) A desire-yielding tree; (2) A hard-hearted person; (3) One who can read and write; (4) One who depends on others; (5) Born of the same mother; (6) One who sees for oneself; (7) Of the same age; (8) A place where two rivers meet; (9) The father of the nation; (10) A person who guides others; (11) A flood-affected person; (12) A hostel for students; (13) A person who receives everyone; (14) That which perishes in a moment; (15) Living by hard labour.

अभ्यास ३

Express in a simple sentence what the following do, so as to bring out the clear meaning of the word. [*e.g.*, कल्पवृक्ष (a desire yielding tree— इच्छित वस्तू देणारा वृक्ष.]

१. परिचारिका, २. स्वयंसेवक, ३. शांतिदूत, ४. वक्ता, ५. कृतज्ञ, ६. आस्तिक, ७. परावलंबी, ८. देशभक्त, ९. हेर, १०. कवयित्री.

भाग ५

सूक्ष्म अभ्यासाकरिता पाठ

अधिक वाचनासाठी पाठ

१. माझे घर
२. माझे कार्यालय
३. मुंबई शहर
४. मंत्रालय
५. कृषियोजनाविषयक अर्ज
६. विनोबाजींचे महात्मा गांधींना पत्र
७. अर्जित रजेचा अर्ज
८. साप
९. जन्मतारीख बदलण्यासाठी अर्ज
१०. महंमदाचा उपदेश
११. शास्त्रीजींच्या जीवनछटा
१२. भारताचे वाचस्पती
१३. राष्ट्रपित्याचे निर्वाण
१४. भारतीय परंपरा
१५. विनंती अर्ज
१६. विशाल भारत
१७. कार्यालयीन परिपत्रक
१८. अर्ज, टिप्पणी व उत्तर
१९. कार्यक्षम राज्यकारभार

माझे घर

हे माझे घर आहे. माझी जागा तीन खोल्यांची आहे. ती स्टेशनपासून फार दूर नाही. तीन वर्षांपूर्वी मी ही जागा भाड्याने घेतली. त्यापूर्वी मी माझ्या भावाकडे राहात होतो. पण भावाची जागा फारच लहान होती.

घरापासून कार्यालयात जाण्यास एक तास लागतो. माझे काही मित्र बसने कार्यालयात जातात व काही सायकलवरून जातात. मी संध्याकाळी सात वाजता घरी पोचतो. सुटीच्या दिवशी नातलग व मित्रमंडळी माझ्या घरी येतात.

माझ्या घराजवळ एक सार्वजनिक बाग आहे. आम्ही तेथे कधीकधी फिरावयास जातो. बागेत क्रीडांगणाचीही सोय आहे. तेथे खेळण्याची खूप साधने आहेत. घरापासून बाजार दूर नाही. तेथे सर्व वस्तू माफक दराने मिळतात. मुलांसाठी जवळच शाळा (विद्यालय) आहे. मोठ्या मुलांमुलींकरिता महाविद्यालयसुद्धा जवळच आहे. माझे घर खूप हवेशीर आहे.

माझे घर गृहनिर्माण मंडळाच्या वसाहतीत आहे. ही वसाहत फार स्वच्छ आहे. गृहनिर्माण मंडळाने ठिकठिकाणी घरे बांधली आहेत. माझे काही मित्रदेखील गृहनिर्माण मंडळाच्या जागेत राहतात. दिवसेंदिवस शहरातील वस्ती वाढत आहे. त्यामुळे घरांची टंचाई फार आहे. गृहनिर्माण मंडळ ही टंचाई दूर करण्याचा प्रयत्न करीत आहे.

अभ्यास

१. तुम्ही राहात असलेल्या घराचे ८–१० वाक्यांत वर्णन करा.

२. कार्यालय = कार्य + आलय.

याचप्रमाणे प्रतीक्षालय, मंत्रालय, विद्यालय, हिमालय या शब्दांची फोड करून लिहा.

३. 'टंचाई', 'हवेशीर', 'माफक', 'सार्वजनिक' या शब्दांचा आपल्या वाक्यांत उपयोग करा.

४. खालील शब्दांची लिंगे ओळखा व वचने बदला :–

घर, जागा, वसाहत, भाडे, स्टेशन, मंडळ, बाग, प्रयत्न, साधन, महाविद्यालय, शाळा, क्रीडांगण, बाजार, दर, वस्तू, कार्यालय, तास, मित्र, भाऊ, दिवस, खोली.

५. या पाठात आलेली पाच नामे व पाच विशेषणे सांगा.

● ● ●

माझे कार्यालय

हे माझे कार्यालय आहे. मी कार्यालयात सकाळी दहा वाजता येतो. मध्यंतरी भोजना-करिता अर्धा तास सुटी मिळते. सायंकाळी पाच किंवा साडेपाच वाजता मी घरी जातो. तातडीचे काम असले तर कधी कधी कार्यालयात अधिक वेळ थांबतो व ते काम पूर्ण करून घरी जातो. आवश्यक असेल तेव्हा मी नैमित्तिक रजा घेतो.

मी कृषि विभागात वरिष्ठ लिपिक आहे. मी आस्थापना शाखेत काम करतो. रोज सुमारे दहा प्रकरणे मी निकालात काढतो. माझ्याकडे आलेल्या प्रकरणांवर मी टिप्पणी लिहितो. नंतर मी ती प्रकरणे अधीक्षकांमार्फत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठवितो. वरिष्ठ अधिकारी त्यावर आदेश देतात. नंतर मी पत्राचा मसुदा तयार करून तो मान्यतेसाठी पाठवितो. मसुदा मान्य झाल्यावर त्याची स्वच्छ प्रत तयार करतो. अधिकाऱ्यांची त्यावर सही झाली की ते पत्र रवाना करण्याची व्यवस्था करतो.

बहुधा रजा, बदल्या, नेमणुका, बढत्या, यासंबंधीची प्रकरणे माझ्याकडे असतात. कामाची ताबडतोब विल्हेवाट लावणे आवश्यक असते. कधीकधी वेळेवर उत्तरे आली नाहीत तर स्मरणपत्रे पाठविण्याचेही काम मी करतो. इतके करूनही उत्तर आले नाही तर संबंधित अधिकाऱ्यांना अर्ध-शासकीय पत्रे पाठवितो. कार्यालयात अनेक शाखा आहेत व त्यांच्याकडे वेगवेगळी कामे आहेत. आम्ही सर्व खेळीमेळीने काम करतो.

लेखा शाखेकडे वेतन बिले, प्रवास भत्त्याची बिले व इतर देयके तयार करण्याची कामे असतात. नोंदणी शाखेत येणाऱ्या व जाणाऱ्या पत्रांची नोंद ठेवली जाते. माझ्या कार्यालयात हे काम दोन लिपिक सांभाळतात. टंकलेखन शाखेत दोन मराठी व दोन इंग्रजी टंकलेखन यंत्रे आहेत. कार्यालयात एक दूरध्वनी आहे. त्याचा उपयोग फक्त शासकीय कामाकरताच केला जातो.

अभ्यास

१. तुमच्या कार्यालयाचे ८–१० वाक्यांत वर्णन करा.

२. तातडी, तात्काळ, गोपनीय, अर्ध-शासकीय, नैमित्तिक या शब्दांचा वाक्यात उपयोग करा.

३. तुम्हांस माहीत असलेल्या कोणत्याही पाच विभागांची व पाच शाखांची नावे लिहा (पदनाम कोशाची मदत घ्या).

४. खालील शब्दांची लिंगे ओळखा व वचने बदला :-

भोजन, रजा, आस्थापना, प्रकरण, निकाल, टिप्पणी, मसुदा, प्रारूप, मान्यता, विल्हेवाट, रजा, बदली, नेमणूक, बढती, देयक.

५. खालील शब्दांचे मराठी पर्याय द्या :-

Casual Leave, Establishment Branch, Enquiry, Disposal, Demi--Official, Bills, Registry, Promotions, Transfer, Reminder, Draft, Approval, Increment, Deputy Secretary.

● ● ●

मुंबई शहर

मुंबई हे भारतातील एक सुंदर व मोठे शहर आहे. मुंबई ही महाराष्ट्र राज्याची राजधानी आहे. येथील वस्ती सुमारे पन्नास लाख आहे. अनेक जातींचे, पंथांचे व धर्मांचे लोक सुखाने राहतात.

मुंबईत आरे दूग्ध वसाहत, जुहू, मलबार टेकडी, भारताचे प्रवेशद्वार, राणीचा बाग, वास्तुसंग्रहालय इत्यादी अनेक प्रेक्षणीय स्थळे आहेत. मोठमोठ्या इमारती आहेत. लोकांची ने-आण करण्याकरिता स्थानिक आगगाड्या सतत धावत असतात. याशिवाय बसगाड्या, खाजगी व भाड्याच्या मोटारी यांची वाहतूक रात्रंदिवस चालू असते. येथील मंत्रालयाची इमारत फारच भव्य आहे. राज्यपाल, मंत्री, सचिव वगैरे अधिकारी या शहरातच राहातात.

मुंबईचे हवामान सम आहे. पावसाळ्यात खूप पाऊस पडतो. हिवाळ्यात विशेष थंडी नसते. उन्हाळा फार कडक नसतो. सर्व ऋतूंमध्ये निरनिराळ्या प्रकारची फळे येथे मिळतात. येथे दुधाचा व भाजीपाल्याचा पुरवठा बाहेरून होतो.

येथे निरनिराळ्या प्रकारची महाविद्यालये आहेत. काही महाविद्यालयांत संशोधनकार्य चालू असते. रुग्णालयेही मुंबई शहरात खूप आहेत. बऱ्याचशा रुग्णालयांत गरीब लोकांवर मोफत औषधोपचार केले जातात. येथील मत्स्यालय पाहण्यासारखे आहे. ते पाहण्याकरिता दर रविवारी गर्दी लोटते.

येथील काही इमारतींना दहा मजले आहेत. अशा इमारतींत वर जाण्याकरिता व खाली येण्याकरिता लिफ्ट असते. चौपाटीवर व मलबार टेकडीवर फिरावयास जाण्यास चांगली जागा आहे. निरनिराळ्या धर्मांच्या लोकांकरिता येथे देवालये व प्रार्थना-मंदिरे आहेत. परदेशातील लोक हे शहर पाहण्याकरिता येत असतात.

अभ्यास

१. तुम्ही राहात असलेल्या शहराचे वर्णन करा.

२. रुग्ण + आलय, मत्स्य + आलय, कार्य + आलय, संग्रह + आलय हे शब्द जुळवून लिहा.

३. प्रेक्षणीय, स्थानिक, खाजगी, भव्य, सम, कडक, मोफत या शब्दांचा आपल्या वाक्यांत उपयोग करा.

४. खालील शब्दांची लिंगे ओळखा व वचने बदला :—

शहर, राज्य, राजधानी, वस्ती, जात, जमात, धर्म, स्थळ, इमारत, आगगाडी, वाहतूक, राज्यपाल, मंत्री, सचिव, अधिकारी, हवामान, दूध, भाजीपाला, संशोधन, फळे, औषधोपचार, गर्दी, देवालय, मंदिर, परदेश, कार्यालय.

५. खालील शब्दांचे मराठी पर्याय द्या :—

Capital, Population, Creed, Museum, Transport, Magnificient, Supply, Research work, Aquarium, Governor, College, Colony.

● ● ●

४

मंत्रालय

हे मंत्रालय आहे. येथून शासकीय आदेश निघतात. म्हणून मंत्रालयाला शासकीय आदेश निघण्याचे ठिकाण असेही म्हणता येईल.

ही मंत्रालयाची इमारत पहा. ही भव्य व प्रेक्षणीय आहे. ती हवेशीर आहे. इमारत सहा मजली आहे. प्रत्येक मजल्यावर जाण्याकरता जिना आहे किंवा लिफ्टची सोय आहे. लिफ्ट विजेवर चालते. मंत्रालयात एकूण चौदा लिफ्ट आहेत.

हा मंत्रालयाचा तळमजला आहे. तळमजल्यावर चौकशी केंद्र आहे. येथे नवख्या माणसास आवश्यक ती माहिती मिळते. माहिती देणाऱ्या अधिकाऱ्यांना चौकशी अधिकारी म्हणतात. चौकशी केंद्राशेजारी ग्रंथालय आहे. ग्रंथपाल हे तेथील अधिकारी आहेत. ग्रंथालयात वर्तमानपत्रे, दैनिके, मासिके व पुस्तके मिळतात. जवळच प्रसिद्धि विभाग आहे.

मंत्रालयाचे दोन भाग आहेत. एक मुख्य इमारत व दुसरे विस्तारगृह. विस्तारगृहाच्या तळमजल्यावर डाकघर आहे. मुख्य इमारत व विस्तारगृह यांमध्ये मोकळी जागा आहे. तेथे फार चांगला वारा येतो. जवळच मोठी हिरवळ आहे. शेजारी छोटी पण सुंदर बाग आहे. माळी बागेकडे व हिरवळीकडे लक्ष देतात.

तळमजला व पहिला मजला यामध्ये एक पोटमजला आहे. येथे उपाहारगृह आहे. उपाहार-गृहात स्वस्त दराने भोजन मिळते. तळमजल्यावर, पाचव्या मजल्यावर व सहाव्या मजल्यावर सभागृहे आहेत. प्रत्येक मजल्यावर निरनिराळी कार्यालये आहेत. निरनिराळ्या मजल्यावर मंत्री, राज्यमंत्री व उपमंत्री बसतात. त्यांची कार्यालये तेथे आहेत. सहाव्या मजल्यावर मुख्य मंत्री व इतर मंत्री बसतात. त्यांची कार्यालये तेथे आहेत. प्रत्येक मंत्र्याच्या मदतीला स्वीय सहायक आहेत. सर्वांत वरच्या मजल्यावर राष्ट्रध्वज फडकत असतो.

मंत्रालयाच्या बाहेर आकाशवाणी केंद्राची इमारत आहे. जवळच आमदार निवास आहे. बरोबर विरुद्ध दिशेला मंत्रालयाचे क्रीडागृह आहे. मंत्रालय चर्चगेट स्टेशन-पासून दहा मिनिटांच्या अंतरावर आहे. मुंबईतील बहुतेक भागातून येथे बसगाड्या येतात.

मंत्रालयात सामान्य प्रशासन विभाग, गृह विभाग, वित्त विभाग, नियोजन विभाग, शिक्षण व सेवायोजन विभाग, समाजकल्याण व क्रीडा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, अन्न व नागरी पुरवठा विभाग, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, महसूल

व वन विभाग, कृषि व सहकार विभाग, पाटबंधारे विभाग, माहिती व जनसंपर्क, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, विधी व न्याय विभाग, महसूल व वन विभाग, नगरविकास व आरोग्य विभाग, विधानकार्य विभाग, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग आणि फलोत्पादन व सामाजिक वनीकरण विभाग आहेत.

मंत्रालय हे अत्यंत महत्त्वाचे कार्यालय आहे. ते राज्याचे मुख्यालय आहे.

अभ्यास

१. खालील शब्दांचे अर्थ संपूर्ण वाक्यात लिहा :–
कार्यालय, भोजनालय, विद्यालय, मुख्यालय व ग्रंथालय.

२. तुम्हांस मंत्रालयाची इमारत आवडते काय ?
कारणे सांगा.

३. खालील अधिकाऱ्यांची प्रत्येकी एका वाक्यात कामे सांगा :–
चौकशी अधिकारी, प्रसिद्धि अधिकारी, ग्रंथपाल, अधीक्षक, टंकलेखक.

४. खालील शब्दांची लिंगे ओळखा व वचने बदला :–
काम, आदेश, ठिकाण, इमारत, जिना, योजना, वीज, केंद्र, माहिती, ग्रंथपाल, भाग, वारा, बाग, हिरवळ, मजला, राष्ट्रध्वज, मिनिट, उद्योग.

५. खाली दिलेल्या जोड्या जमवा व वाक्ये पुन्हा लिहा :–

(१) मंत्रालय इमारत	स्वस्त दराने भोजन मिळते.
(२) चौकशी अधिकारी	हे राज्याचे मुख्य कार्यालय आहे.
(३) ग्रंथालयात	बागेकडे लक्ष देतात.
(४) विस्तारगृहाच्या	भव्य व हवेशीर आहे.
(५) माळी	नवख्या माणसाला माहिती देतात.
(६) उपाहारगृहात	राष्ट्रध्वज फडकत असतो.
(७) सहाव्या मजल्यावर	दैनिके, साप्ताहिके व मासिके मिळतात.
(८) मंत्रालय	तळमजल्यावर डाकघर आहे.
(९) शेवटच्या मजल्यावर	आकाशवाणी केंद्राची इमारत आहे.
(१०) मंत्रालयाच्या बाहेर	मंत्री बसतात.

कृषियोजनाविषयक अर्ज

दुसरी गल्ली,
पोस्टाजवळ,
जामनेर, जिल्हा जळगाव.
तारीख १५ ऑक्टोबर, १९८५

सचिव,
कृषि व सहकार विभाग,
मंत्रालय, मुंबई.

महोदय,

आम्ही असे ऐकतो की, महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांच्या हिताकरिता निरनिराळ्या योजना सुरू केल्या आहेत. बी-बियाणे व खते सवलतीच्या दराने पुरवणे, तगाईवाटप, पाण्याच्या पंपाकरिता कर्जे वगैरे योजनांची तपशीलवार माहिती आम्हास पुरवावी. येथील कृषि विभागाकडे चौकशी केली असता सविस्तर माहिती मिळू शकली नाही. तरी आपण स्वतः यात लक्ष घालून माहिती पुरवावी अशी विनंती आहे.

माझी एकूण सात एकर जमीन आहे व तीत एक विहीर आहे. मोटेने पाणी काढून पीक काढणे त्रासाचे व खर्चाचे आहे. पाण्याचा पंप बसविला तर सोय होऊन पीक चांगले निघेल. अन्नधान्याचे अधिक उत्पादन हे शासनाचे धोरण असल्याने या योजनेस आपला सक्रिय पाठिंबा मिळेल अशी आशा आहे.

आपला,
सर्जेराव रामराव कदम

कृषि व सहकार विभाग

"अ" शाखा

सादर

श्री. सर्जेराव कदम, जामनेर, यांचे दिनांक १५ ऑक्टोबर १९८५ चे आवेदपत्र कृपया पाहावे.

सदर आवेदनपत्रान्वये श्री. कदम यांनी शेतकऱ्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या योजनांची सविस्तर माहिती मागविली आहे. श्री. कदम यांना विशेषतः पाण्याच्या पंपासाठी तगाई कर्ज मिळविण्यासाठी काय करावे यासंबंधीची माहिती पाहिजे आहे.

संदर्भित पत्राच्या पहिल्या परिच्छेदात नमूद केलेल्या योजनांची सविस्तर माहिती "महाराष्ट्र कृषि योजना व सवलती" या पुस्तिकेत ग्रथित करण्यात आलेली आहे. त्याच-प्रमाणे विहिरीसाठी तगाई कशी मागावी याबाबतची माहिती या विभागाच्या परिपत्रक क्रमांक एजीआर १०६४-सी, दिनांक २० एप्रिल १९६४, मध्ये नमूद करण्यात आलेली आहे. सबब, उपरोक्त पुस्तिका व परिपत्रक यांची प्रत्येकी एक प्रत श्री. कदम यांना पाठविल्यास पुरेसे होईल असे वाटते. याव्यतिरिक्त काही अडचणी उद्‌भवल्यास त्यासंबंधीचा खुलासा श्री. कदम यांनी स्थानिक अधिकाऱ्यांकडून मिळवावा असे त्यांना कळविण्यास हरकत नसावी.

श्री. कदम यांनी संदर्भित आवेदनपत्रान्वये, स्थानिक अधिकाऱ्यांकडून योग्य वेळी माहिती मिळत नाही अशी तक्रार केली आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना श्री. कदम यांना आवश्यक ती माहिती पुरविण्याचे आदेश देण्यात यावेत व तसे आदेश दिल्याचे श्री. कदम यांच्या निदर्शनास आणावे असे वाटते.

वरील विचार मान्य झाल्यास खालील प्रारूपास कृपया अनुमोदन मिळावे.

लिपिक

अधीक्षक. अवर सचिव.

अर्जाचे उत्तर

क्र. त. ४३५-५३५,
कृषि व सहकार विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक २५ ऑक्टोबर, १९८५

श्री. स. रा. कदम,
दुसरी गल्ली, पोस्टाजवळ,
जामनेर.

विषय : शेती योजनांची माहिती.

संदर्भ : आपले दिनांक १५ ऑक्टोबर १९८५ चे पत्र.

महोदय,

आपले वरील तारखेचे पत्र मिळाले. महाराष्ट्र सरकारने शेती सुधारण्याकरिता अनेक योजना सुरू केलेल्या आहेत. त्यांची तपशीलवार माहिती सोबत जोडलेल्या परिपत्रकावरून

व पुस्तिकेवरून मिळेल. जिल्हा पातळीवर या योजना जिल्हा परिषदेकडून राबविल्या जातात. परिषदेच्या कृषि विभागाच्या अधिकाऱ्यांना आपणास जरूर लागेल ती माहिती पुरवावी असा आदेश विभागीय महसूल आयुक्त यांच्यामार्फत देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे संचालक, कृषि विभाग, पुणे, यांसही लिहिण्यात येत आहे. यासंबंधी पुन्हा काही अडचणी निर्माण झाल्यास आपण कृषि संचालक, पुणे १, यांस लिहावे. कळावे.

आपला,

सही
अवर सचिव, कृषि व सहकार विभाग.

अभ्यास

१. महाराष्ट्र शासनाने जनहिताकरिता तयार केलेल्या कोणत्याही पाच योजना सांगा. त्यांपैकी एका योजनेवर पाच ते सहा ओळी माहिती लिहा.

२. श्री. कदम यांच्या तक्रारीस अनुसरून आवश्यक ती माहिती पुरवण्याबाबत संबंधित कृषि अधिकाऱ्याला द्यावयाचा आदेश तयार करा.

३. पुणे, महाबळेश्वर, नाशिक, औरंगाबाद यांपैकी एका ठिकाणी तुमचे वरिष्ठ अधिकारी दौरा काढू इच्छितात. तेथील कार्यकारी अभियंत्यास विश्रामगृहात जागा राखून ठेवण्याबद्दल पत्र लिहा. वरील पत्रावर टिप्पणी लिहा व उत्तर तयार करा.

• • •

विनोबाजींचे महात्मा गांधींना पत्र

परमपूज्य बापूजीस,

वर्षापूर्वी प्रकृती सुधारण्यासाठी मी आश्रमातून बाहेर पडलो. वर्ष होत आले, पण माझा काही ठावठिकाणा नाही. आश्रम सोडून मी निघून गेलो की काय अशी कोणाला शंका येईल. दोष माझ्यावरच येईल. कारण पत्र न लिहिण्याची मला खोड आहे.

मी दहा वर्षांचा होतो तेव्हा प्रतिज्ञा केली, "ब्रह्मचर्यव्रताचे पालन करीन व देशसेवा करीन." माध्यमिक विद्यालयात असताना मला गीतेचे वेड लागले. वडिलांच्या आग्रहाखातर दुसरी भाषा म्हणून फ्रेंच घेतले. तरीपण माझे गीतेवरचे प्रेम कमी झाले नाही. घरच्या घरी मी संस्कृतचा अभ्यास सुरू केला. वेदान्त व तत्त्वज्ञान यांचा अभ्यास करण्याचा निश्चय होता.

माझा दुसरा उद्देश होता प्रकृती सुधारणे. प्रकृती सुधारण्यासाठी प्रथम मी रोज दहा-बारा मैल फिरणे सुरू केले. त्यानंतर सहा ते आठ शेर धान्य दळण्यास सुरुवात केली. आता तीनशे सूर्यनमस्कार व हा फिरणे माझा व्यायाम आहे. यामुळे माझी प्रकृती चांगली आहे.

आता आहारासंबंधी. पहिले सहा महिने मीठ खाल्ले. नंतर ते सोडून दिले. मसाले वगैरे बिलकूल खाल्ले नाहीत. आजन्म मीठमसाले न खाण्याचा निश्चय केला. दूध सुरू केले. एक महिना केळी, दूध व लिंबू यांवर काढला.

आता कार्य काय केले ? सहा विद्यार्थ्यांना कोठल्याही प्रकारचा मोबदला न घेता अर्थासह सर्व गीता शिकविली. मला जरी उत्तम हिंदी येत नसले तरी विद्यार्थ्यांसाठी हिंदी वर्तमानपत्रे वाचण्याचा उपक्रम चालू केला. रायगड, सिंहगड, तोरणा वगैरे ऐतिहासिक स्थळांची चारशे मैल पायी सफर केली. सर्व प्रसिद्ध किल्ले पाहिले. वाईत विद्यार्थीमंडळ स्थापन केले. एक वाचनालय सुरू केले व मदतीसाठी दळणारांचा वर्ग सुरू केला. त्यात मी आणि इतर विद्यार्थी दळत असू. दळणाचे पैसे वाचनालयाला देत असू.

आता आचरणाबद्दल थोडे लिहितो. अपरिग्रह (दानाचा स्वीकार न करणे), लाकडाची थाळी व वाटी, आश्रमातला लोटा, खादीचे धोतर, घोंगडी एवढे साहित्य जवळ आहे. बंडी, कोट, टोपी वगैरे न वापरण्याचे व्रत घेतले आहे. यामुळे शरीरावरही धोतरच पांघरतो. कपडा हातमागावरचाच वापरतो.

अधिक काय लिहू ? जेव्हा स्वप्ने पडतात तेव्हा एकच विचार मनात येतो. देव माझ्याकडून काही सेवा घेईल का ?

आपण स्वतः पत्र लिहावे असा विनोबाचा -- आपणास पितृतुल्य समजणाऱ्या या आपल्या पुत्राचा -- आग्रह आहे.

— विनोबाचे प्रणाम.

अभ्यास

१. विनोबांनी कोणते कार्य केले ?

२. विनोबाजींचे आचरण कसे दिसते ?

३. या धड्यातील सामासिक शब्द (Compound words) सांगा. उदा. हातमाग.

४. प्रतिज्ञा करणे, वेड लागणे, निश्चय करणे, मोबदला घेणे, सुरू करणे, व्रत घेणे यांचा वाक्यात उपयोग करा.

• • •

७

अर्जित रजेचा अर्ज, टिप्पणी व ज्ञापन

दि. २९ जुलै १९८४

भाषा संचालक,
महाराष्ट्र राज्य,
भाषा संचालनालय,
मुंबई,

महोदय,

शीतज्वरामुळे आजारी असल्यामुळे मी सोमवार, दिनांक २६ पासून कार्यालयात उपस्थित राहू शकलो नाही. वैद्यकीय सल्ल्यानुसार अजूनही विश्रांतीची आवश्यकता असल्यामुळे दिनांक २६ जुलै १९८४ पासून ३१ जुलै १९८४ पर्यंत सहा दिवसांची अर्जित रजा मला कृपया मंजूर करावी. कामावर रुजू होताना मी आवश्यक ते वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करीन.

आपला,
सही
वरिष्ठ लिपिक.

क्र. १९१७.

श्री. ...., वरिष्ठ लिपिक, यांचे दिनांक २९ जुलै १९८४ चे आवेदनपत्र कृपया पाहावे. श्री. .... हे शीतज्वरामुळे आजारी असून दिनांक २६ जुलै १९८४ पासून ३१ जुलै १९८४ पर्यंत सहा दिवसांची अर्जित रजा मंजूर करण्याबाबत त्यांनी विनंती केली आहे. कार्यालयात रुजू होताना वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करण्यात येईल असे त्यांनी कळविले आहे. श्री. .... यांच्या खाती दिनांक २५ जुलै १९८४ पर्यंत किती दिवसांची अर्जित रजा शिल्लक आहे. याची माहिती लेखा शाखेकडून मागविण्यात यावी.

सही

श्री. .... यांच्या सेवा पुस्तकाप्रमाणे दिनांक २५ जुलै १९८४ पर्यंत त्यांच्या खाती ६१ दिवसांची अर्जित रजा शिल्लक आहे.

सही
अधीक्षक (आ.)

लेखा शाखेच्या वरील टीपेस अनुसरून पुन्हा सादर

श्री. ... ., वरिष्ठ लिपिक, यांना दिनांक २६ जुलै १९८४ पासून ३१ जुलै १९८४ पर्यंत सहा दिवसांची अर्जित रजा मंजूर करण्यास हरकत नसावी. तसेच, दिनांक १ ऑगस्ट १९८४ ची रविवारची सुटीही रजेस जोडून घेण्याची त्यांना परवानगी देण्यास हरकत नसावी.

ज्ञापनाच्या स्वच्छ प्रती अनुमोदनार्थ प्रस्तुत.

सही

ज्ञापन

श्री. ... ..., वरिष्ठ लिपिक, यांना दिनांक २६ जुलै १९८४ पासून दिनांक ३१ जुलै १९८४ पर्यंत ६ दिवसांची अर्जित रजा मंजूर करण्यात येत आहे व दिनांक १ ऑगस्ट १९८४ ची रविवारची सुटी रजेस जोडून घेण्याची परवानगी देण्यात येत आहे.

सही

भाषा उपसंचालक,

भाषा संचालनालय.

प्रत माहितीकरता--

१. श्री. ...., वरिष्ठ लिपिक

२. अधीक्षक, लेखा शाखा.

३. प्रशिक्षण शाखा.

४. निवड फाईल.

२ ऑगस्ट १९८४

भाषा संचालक,
महाराष्ट्र राज्य,
भाषा संचालनालय,
मुंबई.

महोदय,

दिनांक २९ जुलै १९८४ च्या माझ्या अर्जास अनुसरून मी सोबत स्वास्थ्य प्रमाणपत्र सादर करीत असून मला कार्यालयात रुजू होण्याची कृपया अनुमती मिळावी.

आपला,
सही

क्र. २०२९

श्री. ...., वरिष्ठ लिपिक, यांचा २ ऑगस्ट १९८४ चा अर्ज अवलोकनार्थ प्रस्तुत. त्यांनी अर्जासोबत स्वास्थ्य प्रमाणपत्र पाठविले आहे. श्री. .... यांच्या ६ दिवसांच्या अर्जित रजेच्या मंजुरीचे आदेश पाठविण्यात आले आहेत. तरी प्रस्तुत अर्ज फाईल करण्यास हरकत नसावी.

सही

भाषा उपसंचालक.

अभ्यास

योग्य कारणासाठी दीर्घ मुदतीच्या रजेकरिता आवेदनपत्र सादर करा. तसेच, त्यावर कार्यालयीन टिप्पणी लिहून ज्ञापन मान्यतेकरिता प्रस्तुत करा.

● ● ●

साप

लोक सापाला फार भितात. परंतु तो किती स्वच्छ, किती सुंदर असतो! यत्किंचितही घाण त्याला खपत नाही. घाणेरडी माणसे किती तरी आढळतात. परंतु घाणेरडा सर्प कोणी पाहिला आहे काय? एकांतात राहणारा जणू ऋषीच. निर्मळ, सतेज, मनोहर हारासारखा हा साप, त्याला का भ्यायचे? आपल्या पूर्वजांनी तर त्याची पूजा करावयास सांगितले आहे. काय काय हिंदुधर्मात खुळे, असे तुम्ही म्हणाल. परंतु नागपूजा करावयास सांगितली आहे खरी. लहानपणी मी आईला गंधाचा नाग काढून द्यावयाचा. मी आईला म्हणे, "बाजारात चांगले चित्र मिळते." आई म्हणे "ते रद्दी, ते नको. मुलाच्या हातचे ते चांगले." मग ती त्या नागाची पूजा करावयाची. काय आहे हा पागलपणा? परंतु विचार तर करा. तो सर्प श्रावण महिन्यात अतिथी म्हणून आपल्या घरी येत असतो. त्याचे बिचाऱ्याचे घर पावसाळी पाण्याने सारे भरून गेलेले असते. मग काय करील तो? दूर एकांतात राहणारा तो ऋषी. तुम्हास उगीच फार त्रास होऊ नये म्हणून वळचणीत लाकडात पडून राहतो. कमीत कमी जागा तो व्यापतो. परंतु आपण दंडा घेऊन धावतो. संकटात सापडल्यामुळे अतिथी घरी आला तर त्याला काय करायचे? सेंट फ्रान्सिसची गोष्ट सांगतात की, जंगलात साप दिसला म्हणजे तो प्रेमाने म्हणायचा, "ये भाऊ, ये." ते साप त्याच्या मांडीवर खेळत, अंगावर रुळत. हे खोटे नका समजू. प्रेमामध्ये ही शक्ती आहे. साप म्हणजे विषारी आहे, आणि माणूस काय कमी विषारी आहे? साप चावला तरी क्वचित चावतो, तो मुद्दाम चावत नाही. शेकडा ९० तर निर्विषच असतात. तो तुमच्या शेतीचे रक्षण करतो. शेतीचा नाश करणारे असंख्य किडे, जंतू यांवर तो जगतो. असा हा उपकारी शुद्ध तेजस्वी एकांतप्रिय सर्प म्हणजे भगवंताचे रूप आहे.

गीता प्रवचने,
(आचार्य विनोबा भावे)

अभ्यास

१. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :-

(१) सापास मारू नये असे विनोबा का लिहितात?

(२) "असा हा सर्प भगवंताचे रूप आहे". असा म्हणजे कसा?

(३) "सेंट फ्रान्सिस कोण होता?" त्याची गोष्ट थोडक्यात लिहा.

२. प्रेम, विष, तेज, उपकार, एकांत, घाण, मळ, धर्म, खूळ यांपासून बनणारी विशेषणे सांगा.

३. खालील वाक्यांचे प्रयोग ओळखा :–

(१) साप सुंदर असतो.

(२) लोक सापाला भितात.

(३) असे तुम्ही म्हणा.

(४) मी आईला म्हणे.

(५) विचार तर करा.

(६) तो शेताचे रक्षण करतो.

४. सिंह, वाघ, घोडा यांपैकी एकावर ८–१० वाक्ये लिहा.

● ● ●

९

जन्मतारीख बदलण्यासाठी अर्ज

मुंबई,
११ जानेवारी १९८४

अवर सचिव,
महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई.

महोदय,

माझी महसूल व वन विभागात सहायक म्हणून दिनांक १५ ऑक्टोबर १९८३ पासून नियुक्ती झाली आहे. नुकतेच माझे सेवापुस्तक तयार झाले असून त्यात १० जुलै १९४३ ही माझी जन्मतारीख म्हणून नोंदविली आहे. ही नोंद शाळेच्या प्रमाणपत्रातील नोंदीस अनुसरून केली आहे हे खरे, पण तो माझा खरा जन्मदिनांक नव्हे. माझा खरा जन्मदिनांक ४ फेब्रुवारी १९४४ हा आहे. माझ्या पालकाच्या गैरसमजामुळे चुकीची नोंद झाली असावी. माझ्या वडिलांची दैनंदिनी व माझी जन्मपत्रिका यांनुसार ४ फेब्रुवारी १९४४ हाच माझा खरा जन्मदिनांक आहे, असे माझे वडील वा. वि. पोंक्षे, यांनी दंडाधिकारी, नागपूर, यांच्यासमोर मुद्रांकित कागदपत्रावर शपथपत्र लिहून दिले आहे व त्यानुसार इलाखाशहर दंडाधिकारी, मुंबई, यांनी मूळ अधिवास दखला दिला आहे. तरी कृपया हे पुरावे विचारात घेऊन माझ्या सेवापुस्तकातील जन्मतारखेची दुरुस्ती व्हावी ही विनंती.

आपला,

(**म. वा. पोंक्षे**),
सहायक; महसूल व वन विभाग.

म. व वन विभाग/क शाखा.

श्री. म. वा. पोंक्षे, सहायक, यांचे आवेदनपत्र कृपया पाहावे. सदर आवेदनपत्रात त्यांनी विनंती केल्याप्रमाणे इलाखा-शहर दंडाधिकारी, यांच्या दाखल्यानुसार त्यांच्या सेवापुस्तकातील जन्मतारखेची नोंद बदलण्यास हरकत नसावी. मुंबई नागरी सेवानियमातील नियम १७१ प्रमाणे, जन्मदिनांक बदलावयाचा असल्यास त्यासाठी सरकारी कर्मचाऱ्याने एक वर्षाच्या आत योग्य पुरावा दाखल करावयाचा असतो. श्री. पोंक्षे यांनी नियुक्तीपासून एका वर्षाच्या आत पुरावा दाखल केला आहे. हा पुरावा ग्राह्य मानून त्याप्रमाणे त्यांच्या सेवापुस्तकातील जन्म दिनांकाची नोंद दुरुस्त करून अधिवास दाखला

सेवापुस्तकात ठेवण्यात येईल. तत्पूर्वी हे प्रकरण अभिप्रायासाठी सामान्य प्रशासन विभागाने अनौपचारिकरीत्या पाहावे.

आद्याक्षरी.

अवर सचिव

सामान्य प्रशासन विभागाकडे अनौपचारिक संदर्भ; दिनांक ....

अनुक्रमांक सामान्य प्रशासन विभाग–ड शाखा

पाहून परत.

अवर सचिव

अनौपचारिक संदर्भ महसूल व वन विभाग, दिनांक ....

म. व वन विभाग

क शाखा

श्री. पोंक्षे यांची विनंती मान्य करण्यास हरकत नसावी.

ज्ञापन अनुमोदनार्थ प्रस्तुत.

आद्याक्षरी

अवर सचिव

ज्ञापन

क्रमांक स्थापना–११६५–२०४१६–क,

म. व. वन विभाग इ.

श्री. म. वा. पोंक्षे यांचा जन्मदिनांक १० जुलै १९४३ ऐवजी ४ फेब्रुवारी १९४४ असा मानण्यात येत असून त्याप्रमाणे त्यांच्या सेवापुस्तकात आवश्यक ती नोंद घेऊन त्यांनी सादर केलेला अधिवास दाखला त्यांच्या सेवापुस्तकावर ठेवण्यात येत आहे.

अवर सचिव, महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग.

श्री. म. वा. पोंक्षे,
सहायक, महसूल व वन विभाग,
सचिवालय, मुंबई.

प्रत रवाना :–

(१) लेखा शाखा, महसूल व वन विभाग, सचिवालय, मुंबई, यांना श्री. पोंक्षे यांच्या अधिवास दाखल्यासह माहितीकरिता व आवश्यक त्या कार्यवाहिकरिता.

(२) निवड फाईल.

अभ्यास

सरकारी सेवेत असताना कर्मचाऱ्यांच्या जन्मतारखेत बदल करण्यास केव्हा परवानगी नाकारली जाते ?

• • •

महंमदाचा उपदेश

"बंधूंनो, मी आज सांगतो ते ऐका. कारण आणखी एखादे वर्ष मला लाभेल असे वाटत नाही. या जागी पुन्हा तुमच्यात मी दिसेन, वावरेन, बोलेन असे वाटत नाही. हा आजचा दिवस व हा महिना जसा सर्वांना पवित्र वाटतो; त्याप्रमाणे सर्वांचे जीवन व मालमत्ता पवित्र माना. तुम्ही एकमेकांचे जीवन पवित्र माना. ऐकमेकांना सांभाळा. ईश्वरासमोर जाण्याची वेळ येईपर्यंत असे प्रेमाने व बंधुभावाने वागा. कोणाच्या प्राणांचा वा घरादारांचा नाश करू नका. एके दिवशी ईश्वराच्या न्यायासनासमोर उभे राहावयाचे आहे, हे कधीही विसरू नका. त्या दिवसाची नेहमी आठवण ठेवा. तेथे सर्व कृत्यांचा झाडा द्यावा लागेल.

मित्रांनो, पतीचे पत्नीवर काही हक्क आहेत, तसेच पत्नीचेही पतीवर आहेत. आपल्या बायकांना प्रेमाने व सहानुभूतीने वागवा. कठोर होऊ नका. दयाळू राहा. तुम्ही ईश्वराच्या जामीनकीवर आपल्या पत्नीचा स्वीकार केलेला असतो. खरे ना? परमेश्वराच्या शब्दाने त्या तुमच्या कायदेशीर भार्या झालेल्या असतात, ही गोष्ट विसरू नका.

तसेच, तुमच्यावर कोणी विश्वास टाकला तर त्याचा विश्वासघात करू नका. दिलेला शब्द पाळा. पाप टाळा. सावकारी निषिद्ध आहे. व्याजबट्टा वर्ज्य आहे, हे ध्यानात धरा. पैसे उसने घेणाऱ्याने घेतले तेवढे परत करावे. व्याज देऊ नये, मुद्दलाची फेड व्हावी.

आणि प्राचीन काळापासून तुम्ही रक्ताचा सूड घेत आलात. खुनाचा बदला घेत आलात. परंतु आजपासून ते बंद होत आहे. ही गोष्ट निषिद्ध आहे. आजपासून सारी सूडाची भांडणे रद्द झाली समजा.

आणि तुमचे गुलाम; त्यांना नीट वागवा. तुम्ही खाल तेच त्यांनाही खायला द्या. तुम्ही कपडे घालाल तसेच त्यांना द्या. लक्षात ठेवा की, कसेही झाले तरी तेही खुदाचे बंदे आहेत. त्यांना कठोरतेने वागवता कामा नये.

मित्रांनो, माझे शब्द ऐका, नीट समजून घ्या. सारे लोक एकमेकांचे भाऊ आहेत हे कधीही विसरू नका. जे दुसऱ्याचे आहे ते त्याने स्वेच्छेने, खुशीने दिल्याशिवाय त्याला हात लावू नका. अन्यायापासून व अन्याय करणाऱ्यापासून दूर राहा. सावध राहा.

जे येथे आज हजर आहेत त्यांनी हे सारे गैरहजर असणाऱ्यास सांगावे. येथे ऐकणाऱ्यापेक्षाही ज्याला हे सांगितले जाईल तो कदाचित ते अधिकच लक्षात ठेवण्याचा संभव आहे."

अभ्यास

(१) "त्या दिवसाची नेहमी आठवण ठेवा." कल्पनाविस्तार करा.

(२) पति-पत्नी, मालक-गुलाम, यांच्याविषयी महंमदाचे काय विचार आहेत?

(३) दयाळू, निषिद्ध, वर्ज्य, अक्षम्य, प्राचीन, पवित्र, कायदेशीर, नीट, कठोर या शब्दांचे विरुद्ध अर्थाचे शब्द सांगा.

११

शास्त्रीजींच्या जीवनछटा

शास्त्रीजी सापडले

१९०४ च्या डिसेंबरातील ही घटना आहे. लालबहादूरजी त्यावेळी अवघे चार महिन्यांचे होते. छोट्या लालबहादूरजींना घेऊन त्यांची आई गंगा नदी पार करून जात होती. नावेत बरीच गर्दी होती. एवढ्यात त्या गर्दीत आईच्या कडेवरून छोटे लालबहादूरजी घसरले आणि बेपत्ता झाले. नावेत एकच हाहाःकार उडाला. त्या बिचाऱ्या मातेने बरीच शोधाशोध केली, आरडाओरड केली. पण छे, मुलाचा काही शोध लागला नाही. आईच्या कडेवरून निसटलेले ते मूल पुढील होडीत बसलेल्या एका शेतकऱ्याच्या टोपलीत अलगदपणे जाऊन पडले होते. त्या शेतकऱ्याला वाटले, हा गंगा मातेने दिलेला प्रसादच आहे. म्हणून त्याने मुलाला चार दिवस आपल्या घरी नेऊन त्याची चांगली बडदास्त राखली. पण शेवटी त्याला राहवेना आणि मग त्याने त्या मुलाच्या आईचा शोध करून त्याला तिच्या हवाली केले.

आणि एकदा असेही झाले

एकदा शास्त्रीजींच्या निवासस्थानाच्या दारावरची विजेची घंटा वाजली. दार उघडले गेले आणि एक सडपातळ बांध्याची ठेंगू मूर्ती दारात उभी राहिली. "मी आपल्या सेवेसी काय बरे करावे ?" मोठ्या अदबीने त्या व्यक्तीने दाराबाहेरच्या व्यक्तीला विचारले.

पाहुण्या माणसाने सांगितले, "कृपा करून मंत्रिमहाशयांना सांगा की, आपण जो लघुटंकलेखक मुद्दाम बोलावला होता तो आलेला आहे."

"जरा थांबा हं" असे म्हणून ती दार उघणारी व्यक्ती आत गेली आणि त्यानंतर दुसरी व्यक्ती तेथे आली आणि बाहेर आलेल्या पाहुण्याला आत घेऊन गेली. "चला, मंत्रिमहाशयांनी आपल्याला बोलावले आहे."

तो पाहुणा आत गेला आणि स्तंभितच झाला. दरवाजा उघडणारी ती व्यक्ती म्हणजे दुसरी तिसरी कोणी नसून खुद्द मंत्रिमहाशयच होते. पाहुण्याने झालेल्या प्रकाराबद्दल क्षमा मागितली. परंतु लालबहादूरजी हसतच राहिले.

हुंडा पण हुंडा

शास्त्रीजींच्या विवाहाच्या वेळेची गोष्ट आहे. वधूपरीक्षेच्या वेळी लालबहादूरजींच्या सासऱ्याने त्यांना विचारले, "मग, आपल्या हुंड्याच्या अटी कोणत्या आहेत ?"

विवाहोत्सुक लालबहादूरजींनी सांगितले, "चरखा आणि हाताने कातलेल्या सुताच्या लडी." वराच्या या उत्तराने वधूपक्षाकडील सारीच मंडळी आश्चर्यचकित झाली. "हे काय, आणखी काही मागा ना." अनेकांनी त्यांना सल्ला दिला. पण शास्त्रीजी म्हणाले, "या सांगितलेल्या दोन वस्तू आणि तुमची लाडकी कन्या याशिवाय तिसरी वस्तू जर देणार असाल तर मी हा असा निघालो पाहा."

सासरच्या मंडळींना लालबहादूरजींचे हे विचित्र मागणे अर्थातच मान्य करावे लागले.

खरा कर्णधार

एकदा शास्त्रीजींच्या बंगल्याचे आणि त्यांच्या आवारातील इमारतींचे एका महिन्याचे विजेचे बिल ५०० रुपये झाले आहे असा लोकसभेत कोणीतरी आक्षेप घेतला. त्याबरोबर शास्त्रीजी आश्चर्याने थक्क झाले व ते सर्व बिल त्यांनी आपल्या स्वतःच्या खाजगी पैशातून भरले. सदसद्विवेकबुद्धीचा जागता पहारा शास्त्रीजींच्या प्रत्येक कृतीतून अशा प्रकारे दिसून येतो. भारताच्या कर्णधारपदी इतक्या स्वच्छ विचारांचा व कृतीचा ध्येयनिष्ठ सद्-गृहस्थ लाभला ही केवढ्या सुदैवाची गोष्ट!

अभ्यास

१. लालबहादूर शास्त्री यांच्या ताश्कंद भेटीबाबत १५ ते २० ओळी लिहा (२ परिच्छेद).

२. वर दिलेल्या त्यांच्या आठवणींपैकी, तुम्हाला कोणती आठवण विशेष आवडते व का?

• • •

भारताचे वाचस्पती

दाक्षिणात्य पद्धतीचा शुभ्र व उंच फेटा, त्यामुळे चमकणारी गंभीर व बुद्धिप्रधान मुद्रा, सोनेरी चौकटीच्या चष्म्यातून चमकणारे सात्विक नेत्र, बदामी रंगाचा लांब रेशमी कोट आणि सुलक्षणाप्रमाणे ऊंच व सडपातळ देहयष्टी असे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हाताची मिठी छातीवर ठेवून बोलू लागले की वातावरण विद्युन्मय होऊन जाते.

कुलगुरु कॉलिन्स यांनी डॉ. राधाकृष्णन यांचे भाषण ऐकले. भाषण संपल्यावर ते डॉ. राधाकृष्णनना उद्देशून म्हणाले, "महाराज, चाळीस वर्षांपूर्वी जेव्हा मी मानसशास्त्राचा विद्यार्थी होतो तेव्हा मला आपल्यासारखे प्राध्यापक मिळाले असते तर किती बरे झाले असते ? " एकदा इंग्लंडमध्ये डॉ. राधाकृष्णन यांचे भाषण व्हावयाचे होते त्याच वेळेस क्रीडानौकांची मनोहर स्पर्धा होती. परंतु ती पाहण्याचे टाकून माणसे डॉ. राधाकृष्णन यांच्या व्याख्यानाकडे वळली. यावरून त्यांचे भाषण किती मनोवेधक व विद्वत्ताप्रचुर असते याची कल्पना येईल.

डॉ. राधाकृष्णन हे खरेखुरे तत्त्वज्ञानी आहेत. "साधी राहणी आणि उच्च विचारसरणी" असे त्यांचे वर्तन असते. त्यांच्या शिष्टाचारात विलक्षण मार्दव असते. मोठमोठे राजकारणीही त्यामुळे दिपून गेले आहेत. त्यांचे वागणे म्हणजे नम्रता व डौल यांचे मोठे मनोहर मिश्रण आहे. ज्ञानामुळे ते विनयशील झाले आहेत, तसेच, त्यांचा आत्मविश्वासही वाढलेला आहे. तत्त्वज्ञानी किंवा लेखक माणसे व्यवहारात नेहमी अपेशी ठरतात. त्यांना राजदरबारात चमकणे किंवा राजकारण करणे जमत नाही. राधाकृष्णन त्याला अपवाद आहेत. डॉ. राधाकृष्णन यांच्याइतका गौरव फार थोड्यांच्या वाट्याला आला असेल. जगद्‌वंद्य गांधीजींपुढे ते एखाद्या विद्यार्थ्याप्रमाणे बसत. गुरुवर्य टागोर किंवा न्यायमूर्ती रानडे यांच्याविषयी त्यांनी प्रगट केलेला गाढ आदर पाहिला म्हणजे राधाकृष्णन यांच्या लीनतेची कल्पना येईल. राधाकृष्णन हे मुख्यतः तत्त्वज्ञ असले तरी, एकारलेले नाहीत. अनेक उपयुक्त व मनोरंजक विषयांची त्यांना गोडी आहे. अनेक क्षेत्रांतील माणसे त्यांच्याभोवती असतात. शरीर सुव्यवस्थित ठेवण्यास जसा व्यायाम पाहिजे तसा मन प्रसन्न ठेवण्यास आध्यात्मिक व्यायाम पाहिजे, असे त्यांचे मत आहे. त्यांनी पाश्चात्य व पौर्वात्य तत्त्वज्ञानांचे कठीण ग्रंथ पचविले आहेत. — गो. प. तळवलकर

अभ्यास

१. डॉ. राधाकृष्णन राष्ट्रपती होण्यापूर्वी कोणत्या हुद्यावर होते ?
२. राष्ट्रपतींची कोणतीही पाच कर्तव्ये लिहा.
३. डॉ. राधाकृष्णन कोणत्या गोष्टीला अपवाद आहेत ?
४. डॉ. राधाकृष्णन यांनी लिहिलेल्या कोणत्याही तीन ग्रंथांची नावे लिहा.

● ● ●

राष्ट्रपित्याचे निर्वाण

आमच्या जीवनातला प्रकाश आज गेला आहे. सर्वत्र काळोख पसरला आहे. काय सांगावे आणि कसे बोलावे ते कळत नाही. आमचा परमपूज्य नेता आम्हाला सोडून गेला आहे इतकी वर्षे आम्ही त्याला डोळे भरून पाहात होतो. पण यापुढे तो आम्हाला दिसणार नाही. कोणत्याही बाबतीत आम्हाला मार्गदर्शन किंवा सल्ला पाहिजे असला किंवा संकटाच्या प्रसंगी धीर हवा असला तर आम्ही त्याच्याकडे धाव घेत होतो. यापुढे आम्हाला मार्गदर्शन कोण करणार, धीर कोण देणार, आणि प्रकाश कोठून मिळणार ?

हा प्रकाश खरोखर गेला आहे काय ? नाही, तसे म्हणणे चूक आहे. या देशावर लकाकणारा हा प्रकाश काही सामान्य प्रकाश नव्हता. तो स्वर्गीय प्रकाश होता. तो यापुढेही या देशावर शेकडो वर्षे लकाकत राहील. साऱ्या जगाला तो चैतन्य देत राहील. असंख्य अंतःकरणांना आधार देईल. याच प्रकाशाने आपल्याला स्वातंत्र्याचा मार्ग दाखविला.

यापुढे आम्हाला बेजबाबदारपणे वागून चालणार नाही. कोणत्याही संकटाशी बेडरपणे आणि निर्धारपूर्वक सामना करण्यासाठी आम्ही सदैव तयार असले पाहिजे. त्या महान पुढाऱ्याने दिलेल्या आदेशांचे आणि शिकवणुकीचे आम्ही निष्ठापूर्वक पालन केले पाहिजे. त्यांच्या स्वर्गस्थ आत्म्याला दुःख होईल असे यत्किंचितही गैरवर्तणुकीचे किंवा हिंसेचे कृत्य आमच्या हातून घडता कामा नये.

याचा अर्थ आपण कमकुवत बनले पाहिजे असा नाही. उलट, एकोप्याने व सर्व शक्तीनिशी आपण आपल्या समोरील अडचणींना तोंड दिले पाहिजे. आपल्यावर कोसळलेल्या या घोर संकटाच्या प्रसंगी आपण आपल्या क्षुल्लक मतभेदांना मूठमाती दिली पाहिजे आणि आपण सर्व एक झालो पाहिजे. हे महान संकट एक प्रकारचे आपल्याला आव्हान आहे. जीवनात जे काही महान असेल ते स्मरणात ठेवून ज्यांचा आजवर आपण फार विचार करीत आलो त्या क्षुल्लक गोष्टी सोडून देणे हाच या घटनेचा अर्थ आहे. त्यांच्या निश्चयाने जीवनातील महन्मंगल गोष्टींचा विचार करण्याला चालना मिळालेली आहे. वरील गोष्टी स्मरणात ठेवल्या तर भारताचे यापुढे निश्चित कल्याण होईल.

(पं. जवाहरलाल नेहरू)

अभ्यास

१. आपण वरील प्रसंगी कोणत्या गोष्टी स्मरणात ठेवाव्या ?

२. बापूजींच्या जीवनचरित्रातील दोन छोट्या कथा लिहा.

● ● ●

१५

भारतीय परंपरा

पुत्र प्लेगाने आजारी असताही शांतपणे "केसरी" लिहिणारे लोकमान्य; दोन तपांहून अधिक काळ केवळ ध्यानात रमणारे अरविंद; "सरकारी धोरणाप्रमाणे पत्र चालवा, म्हणजे तुम्हाला मदत देऊ" असे बंगालचा गव्हर्नर सांगत असता "देशात एक तरी प्रामाणिक संपादक नको का?" असे म्हणून निघून जाणारे "अमृतबझार पत्रिके" चे आद्य संपादक बाबू शिशिरकुमार घोष; नागपूरच्या सन १९२० मधील राष्ट्रीय सभेत असहकारितेचा ठराव मांडीत असता "अहो, तुम्ही अजून बॅरिस्टरी चालवीतच आहात" असे श्रोत्यांतून कोणी म्हणताच "चित्तरंजन जे बोलतो ते करतो" असे गर्जणारे व दुसऱ्याच दिवशी सर्वस्वत्याग करणारे देशबंधु; एके दिवशी मनात विषयवासना आली म्हणून स्वतःवर संतापून तापलेल्या तव्यावर जाऊन बसणारे स्वामी विवेकानंद; आईने बोलावले, परंतु साहेब जाऊ देत नाही, असे पाहताच राजीनामा देणारे व वाटेत प्रचंड पूर आला असताही नदीत आईच्या नावाने उडी टाकणारे ईश्वरचंद्र विद्यासागर; "माझ्या पत्नीकडे गेली वीस वर्षे मी माता म्हणूनच पाहात आहे," असे सांगणारे महात्माजी; "चलाव तेरी गोली" असे म्हणून गुरखा शिपायांसमोर आपली विशाल छाती उघडी करणारे स्वामी श्रद्धानंद"; "गांधी टोपी काढ, नाही तर गोळी झाडतो" असे पिस्तुल रोखून सांगितले जात असताही अविचल उभे राहणारे सोलापूरचे वीर तुळशीदास जाधव; मोटारीखाली चिरडून घेणारा हुतात्मा बाबू गेनू; गीतेचे स्मरण होताच, रामनाम मनात येताच, तनू पुलकित होऊन ज्यांच्या डोळ्यांतून घळघळ अश्रुधारा वाहू लागतात, अशी ती वर्ध्याची ज्ञानकर्मभक्तीची मूर्ती पूज्य विनोबाजी; "जगातील कोणती शक्ती माझ्या मोटारीवरचा झेंडा काढते ते बघू दे," असे गर्जणारे निर्भयमूर्ती ध्येयरत जवाहरलाल.

लेखक साने गुरुजी

अभ्यास

१. भारतीय परंपरेत बसणाऱ्या आणखी कोणत्याही दोन व्यक्तींची वैशिष्ट्ये सांगा.

२. बाबू गेनू, ईश्वरचंद्र विद्यासागर, देशबंधु दास, श्री. छगला यांपैकी कोणाही दोघांवर प्रत्येकी ६–७ वाक्यांचा परिच्छेद लिहा.

३. ध्यान, तप, प्रमाण, परंपरा, पक्षपात, त्याग यांपासून होणारी विशेषणे सांगा.

४. पुढील वाक्ये भविष्यकाळाच्या सर्व प्रकारांत बदला :—

(१) मी तुम्हाला मदत देतो.

(२) त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहतात.

(३) त्यांना गीतेचे स्मरण झाले.

विनंती अर्ज

मुंबई,
१ सप्टेंबर १९८४

आयुक्त,
मुंबई विभाग,
मुंबई.

विषय : ज्येष्ठतासूची दुरुस्त करण्याबाबत.

महोदय,

लोकसेवा आयोगाने उपजिल्हाधिकाऱ्यांच्या जागा भरण्यासाठी केलेल्या निवडीत मी यशस्वी झालो आहे. त्याप्रमाणे माझी परिवीक्षाधीन उपजिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. निवड झालेल्या १० उमेदवारांना ७ दिवसांच्या आत आपल्या जागी रुजू होण्याचा आदेश, क्रमांक निमअ-१०८४, दिनांक १८ जून १९८४ च्या नियुक्ती ज्ञापनाद्वारे देण्यात आला आहे. त्याप्रमाणे मी दिनांक २४ जून १९८४ रोजी माझ्या जागी रुजू झालो.

निवडीनंतर गुणवत्तेनुसार केलेल्या निवडसूचीत माझा क्रमांक ५ वा आहे. परंतु आता चालू सूचीत माझा क्रमांक १० वा आहे.

परिपत्रक क्रमांक एसएनआर-१०६५ व शासन निर्णय क्रमांकएसएनआर-१०६५-२३४४२-फ, दिनांक २८ मार्च १९५२ मध्ये ज्येष्ठता पद्धती स्पष्ट केली आहे. या पद्धतीनुसार नियुक्त कालावधीत रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता निवडसूचीप्रमाणेच राहावयाची आहे. तरी विनंती अशी की ज्येष्ठतासूचीत माझे स्थान क्रमांक ५ वर कायम करावे.

आपला,
वि. वि. विश्वासराव,
परिवीक्षाधीन उपजिल्हाधिकारी,
ठाणे.

आयुक्त, मुंबई विभाग.
क शाखा.

सादर—

कृपया श्री. वि. वि. विश्वासराव, परिवीक्षाधीन उपजिल्हाधिकारी, ठाणे, यांचे दिनांक १ सप्टेंबर १९८४ चे आवेदनपत्र पाहावे.

सदर आवेदनपत्रान्वये श्री. विश्वासराव यांनी असे कळविले आहे की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने उपजिल्हाधिकाऱ्यांच्या जागा भरण्यासाठी निवड केलेल्या १० उमेदवारांच्या यादीत त्यांचा क्रमांक ५ वा आहे. तसेच नियुक्तीच्या ज्ञापनानुसार ते ७ दिवसांच्या आत आपल्या जागी रुजू झाले आहेत. असे असतानाही आता तयार करण्यात आलेल्या परिवीक्षाधीन उपजिल्हाधिकाऱ्यांच्या यादीत त्यांना १० व्या क्रमांकावर दर्शविण्यात आले आहे. सबब परिपत्रक क्रमांक एसएनआर-१०६५ व शा. नि. क्र. एसएनआर-१०६५- २३४४२-फ, दिनांक २८ मार्च १९५२ मधील ज्येष्ठता पद्धतीप्रमाणे त्यांचे स्थान क्रमांक ५ वर कायम करावे अशी विनंती केली आहे.

या कार्यालयाच्या ज्ञापन क्रमांक निमअ-१०६५, दिनांक १८ जून १९८४ अन्वये श्री. विश्वासराव यांची परिवीक्षाधीन उपजिल्हाधिकारी म्हणून ठाणे येथे नेमणूक करण्यात आली असून त्यातील आदेशानुसार ते ७ दिवसांच्या आत म्हणजेच दिनांक २४ जून १९८४ रोजी त्यांच्या जागी रुजू झाल्याचे जिल्हाधिकारी, ठाणे, यांच्या दिनांक १ जुलै १९८४ च्या पत्रावरून दिसून येते. तसेच, लोकसेवा आयोगाने पाठविलेली मूळ यादी पाहता असे दिसून येते की, त्या यादीत श्री. विश्वासराव यांचा पाचवा क्रमांक आहे. परिपत्रक क्रमांक एसएनआर-१०६५ व शासन निर्णय क्रमांक एसएनआर-१०६५–२३४४२-फ, दिनांक २८ मार्च १९५२ अनुसार विहित कालावधीत रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता लोकसेवा आयोगाच्या निवडसूचीप्रमाणेच ठेवावयाची असते. त्यामुळे श्री. विश्वासराव यांनी केलेली विनंती रास्त असून ती मान्य करण्यास हरकत नसावी.

वरील विचार मान्य झाल्यास प्रस्तुत प्रारूपास कृपया अनुमोदन मिळावे.

सही :

उपआयुक्त

आयुक्त

क्रमांक निमअ-१०८४-क
आयुक्त, मुंबई विभाग, यांचे कार्यालय

ज्ञापन

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने गुणवत्तेनुसार तयार केलेल्या परिवीक्षाधीन उपजिल्हाधिकाऱ्यांच्या निवडसूचीनुसार श्री. विश्वासराव यांचे स्थान क्रमांक ५ वर कायम करण्यात येत आहे.

आयुक्त,
मुंबई विभाग.

श्री. वि. वि. विश्वासराव,
परिवीक्षाधीन उपजिल्हाधिकारी, ठाणे.

प्रत माहितीकरिता रवाना :—

(१) अवर सचिव, महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

(२) जिल्हाधिकारी, ठाणे.

अभ्यास

१. तुमची ज्येष्ठतासूची दुरुस्त करण्याकरिता कार्यालयप्रमुखांना आवेदनपत्र लिहा. त्यावर टिप्पणी लिहून ज्ञापन तयार करा.

२. तुमच्याऐवजी तुमच्यापेक्षा कमी सेवा झालेल्या कर्मचाऱ्याला वरची जागा दिली आहे. तुमच्यावर अन्याय झाला आहे. याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांना आवेदनपत्र पाठवा.

• • •

१७
विशाल भारत

या विशाल भारतात अनेक प्रांत आहेत. मोठ्या कुटुंबात पुष्कळ भाऊ असावेत त्याप्रमाणे या विशाल भारतीय कुटुंबात पुष्कळ भाऊ आहेत. या भावांनी परस्परांशी संयमाने वागले पाहिजे. एका कुटुंबात राहावयाचे असेल, तर आपापलीच तुणतुणी वाजवून चालणार नाही, आपापलेच सूर उंच करून भागणार नाही. युरोपात लहान लहान अनेक देश विभक्त आहेत, आणि कापाकापी करीत आहेत. तसे जर भारताचे व्हावयास नको असेल, तर भारताने जपले पाहिजे. एकत्र कुटुंबात दुसऱ्याचे सुखदुःख आधी पाहावयाचे, आधी माझे नाही, आधी तुझे, हे जसे करावे लागते, तसेच आपणास भारतीय संसारात करावे लागेल.

महाराष्ट्राने गुजराथला म्हणावे, "धन्य गुजराथ! महात्माजींना व सरदार वल्लभभाईंना जन्म देणारा गुजराथ धन्य होय." गुजराथने महाराष्ट्राला म्हणावे, "धन्य महाराष्ट्र! लोकमान्यांना जन्म देणारा, छत्रपति श्रीशिवाजीस जन्म देणारा, शूरांचा महाराष्ट्र धन्य आहे." बंगालला म्हणावे, "बा वंग देशा, कृतार्थ आहेस तू, जगदीशचंद्र, प्रफुल्लचंद्र, रवींद्र, देशबंधू, सुभाषबाबू यांना जन्म देणाऱ्या, श्रीरामकृष्ण व विवेकानंद यांना प्रसवणाऱ्या, बलिदान देणाऱ्या शेकडो सत्पुत्रांनी शोभणाऱ्या प्रांता, धन्य आहे तुझी! "पंजाबला म्हणावे, "हे पंजाबा, दयानंदाची तू कर्मभूमी, स्वामी रामतीर्थांची जन्मभूमी, श्रद्धानंद, लालाजी, भगतसिंग यांची तू माता, थोर आहेस तू!" सरहद्द प्रांताला म्हणावे, 'पंचवीस लाख लोकांतून सोळा हजार सत्याग्रही देणाऱ्या तेजस्वी प्रांता, धन्य आहे तुझी. देवाचे सैनिक देणाऱ्या प्रांता, तू भारताची शोभा व आशा आहेस." मद्रासला म्हणावे, "डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्यासारख्या थोर तत्त्वज्ञाला आणि शिक्षणतज्ञाला जन्म देणाऱ्या प्रांता, धन्य आहेस तू."

अशा रीतीने सारे प्रांत परस्परांची मुक्तकंठाने स्तुती करीत आहेत. एकमेकांचा गौरव करीत आहेत, एकमेकांचा प्रकाश घेत आहेत, एकमेकांपासून स्फूर्ती घेत आहेत, एकमेकांचे हात हातात घेत आहेत, असा देखावा या भारतात दिसला पाहिजे; परंतु याला मोठे मन हवे, याला संयम हवा. (लेखक – साने गुरुजी)

अभ्यास

१. भारताला विशाल का म्हटले आहे ?

२. "असा देखावा या भारतात दिसला पाहिजे" ... स्पष्ट करा.

३. म्हैसूर, बिहार व मद्रास या प्रांतांना उद्देशून महाराष्ट्र काय म्हणेल ?

४. गौरव करणे, हातात हात घेणे, संयमाने वागणे, तुणतुणे वाजविणे, जन्म देणे, स्तुती करणे या वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करा.

कार्यालयीन परिपत्रक

विषय —कार्यालयीन वेळेसंबंधी.

परिपत्रक क्रमांक स्थापना १९८४, दिनांक २५ मार्च १९८४.

परिपत्रक

कार्यालयातील कर्मचारी कार्यालयात बरेच वेळा उशीरा येत असल्याचे आढळून आल्यावरून पुन्हा एकदा कार्यालयीन वेळेसंबंधीचे नियम सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणण्यात येत आहेत. कार्यालयीन वेळेसंबंधीचे नियम खाली देण्यात येत असून त्यांचे कर्मचाऱ्यांकडून योग्य प्रकारे पालन करण्यात येत आहे किंवा नाही याकडे अधिक लक्ष पुरविण्यात येईल. यापुढे नियमबाह्य वर्तन करणाऱ्याविरुद्ध कडक उपाययोजना करण्यात येईल :—

(१) कार्यालयात येण्याची वेळ सकाळी १० वाजताची असून त्यानंतर फक्त १० मिनिटांची सवलत देण्यात येईल.

(२) बरोबर १०–१० वाजता हजेरीपत्रक उचलून वरिष्ठ अधिकाऱ्याच्या खोलीत नेऊन ठेवण्यात येईल.

(३) १०-१० नंतर येणाऱ्या कर्मचाऱ्यांनी वरील अधिकाऱ्याकडे जाऊन तेथे ठेवण्यात आलेल्या समयोत्तर हजेरीपत्रकात सही करून इतर आवश्यक माहिती भरावी.

(४) कर्मचाऱ्याने दिलेले कारण समर्थनीय न वाटल्यास पहिल्या वेळी त्यास मौखिक ताकीद देण्यात येईल.

(५) त्याच महिन्यात दुसऱ्या वेळी उशीरा येणाऱ्या कर्मचाऱ्यास लेखी ताकीद देण्यात येईल.

(६) एकाच महिन्यात तीनदा उशीरा येणाऱ्या कर्मचाऱ्याची **एक नैमित्तिक रजा** कमी करण्यात येईल.

(७) त्यानंतर वारंवार उशीरा आल्यास एका दिवसापेक्षा जास्त नैमित्तिक रजा कमी करण्यात येतील व त्याबरोबरच शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

(८) चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांसाठी वेगळे हजेरीपत्रक ठेवण्यात येईल. हे हजेरी पत्रक बरोबर ९–४५ वाजता उचलण्यात येईल.

(९) दुपारच्या भोजनासाठी १२ ते २ चे दरम्यान फक्त ३० मिनिटे कार्यालय सोडण्याची सवलत देण्यात येईल.

(१०) अधीक्षक अगर संबंधित शाखेतील वरिष्ठतम अधिकाऱ्याकडे एक नोंदवही ठेवण्यात येईल. शाखेतील कर्मचाऱ्यांनी या वहीत भोजनास व चहास जाण्याची व परत येण्याची वेळ नमूद करावी व इतर वेळी शाखा सोडून जावयाची असल्यास शाखा-प्रमुखाची परवानगी घ्यावी.

कार्यालय प्रमुख

प्रत माहितीकरिता--

(१) सर्व लिपिक,

(२) मुख्य लिपिक,

(३) अधीक्षक,

(४) सूचनाफलक.

विषय : भोजनाच्या व चहाच्या वेळेसंबंधी.

परिपत्रक क्रमांक स्थापना–१९८४, दिनांक १२ जून १९८४.

परिपत्रक

दिनांक २५ मार्च १९८४ रोजी कार्यालयीन वेळेसंबंधी एक परिपत्रक काढून ते कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांच्या माहितीकरिता फिरविण्यात आले होते. तथापि, सदर परिपत्रकात नमूद केलेल्या भोजनाच्या व चहाच्या वेळेसंबंधीचे नियम बरेच कर्मचारी पाळत नाहीत व ते आपापल्या सोईप्रमाणे भोजनासाठी व चहासाठी जातात असे कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे. कार्यालयीन शिस्तीच्या दृष्टीने ही गोष्ट गैर असून प्रत्येक कर्मचाऱ्याने नियमांचे कसोशीने पालन करणे जरूर आहे. तरी कर्मचाऱ्यांनी आपापल्या सोयी-प्रमाणे भोजनास किंवा चहास न जाता परिपत्रक क्रमांक स्थापना–१९८४, दिनांक २५ मार्च १९८४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे ठराविक वेळांतच भोजनास किंवा चहास जाण्याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे सर्व शाखाप्रमुखांनी आपापल्या शाखेतील सर्व कर्मचारी शक्यतो एकाच वेळी भोजनास अगर चहास जाणार नाहीत अशा तऱ्हेने शाखेतील कर्मचाऱ्यांच्या जेवणाच्या व चहाच्या वेळा ठरवून घ्याव्यात. एखाद्या कर्मचाऱ्याला काही विशेष कारणा-करिता त्याने लिहून दिलेल्या वेळेव्यतिरिक्त अन्य वेळी चहास अगर भोजनास जावयाचे असेल तर त्याने त्याप्रमाणे शाखाप्रमुखांची आगाऊ परवानगी घेणे जरूर आहे. म्हणून सर्व कर्मचाऱ्यांस पुन्हा एकदा सूचना देण्यात येते की, त्यांच्याकडून संबंधित नियमांचे व वरील सूचनांचे पालन व्हावे.

कार्यालय प्रमुख

विषय : भोजन व चहासाठी किंवा इतर कामासाठी कार्यालय सोडण्याच्या वेळेची नोंद नोंदवहीत करण्यासंबंधी.

परिपत्रक क्रमांक स्थापना-११८४-आ, दिनांक ...... नोव्हेंबर १९८४

दिनांक १२ जून १९८४ च्या परिपत्रान्वये भोजनाच्या आणि चहाच्या वेळेची नोंद नोंदवहीत करण्याबाबत या कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांना कळविण्यात आले असूनसुद्धा काही कर्मचारी तशी नोंद न करता बाहेर जातात असे आढळून आले आहे. नोंद न करता कर्मचाऱ्यांनी बाहेर जाणे हे नियमबाह्य वर्तन असून अशी नोंद यापुढे कोणाही कर्मचाऱ्याने न केल्यास त्याच्याविरुद्ध योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. तसेच या वेळा-व्यतिरिक्त इतर वेळी कोठेही बाहेर जावयाचे असल्यास त्याबाबतची नोंदही नोंदवहीत करणे आवश्यक आहे व त्याचबरोबर त्याकरिता शाखाप्रमुखांची परवानगीही घेणे जरूर आहे. तरी सर्व कर्मचाऱ्यांनी सध्याची आणीबाणीची परिस्थिती लक्षात घेऊन, तसेच 'जास्तीत जास्त काम" हेच उद्दिष्ट समोर ठेवून वेळेसंबंधीचे नियम कटाक्षाने पाळावेत. शाखाप्रमुखांनी प्रत्येक आठवड्याच्या शेवटी सदर नोंदवही आपापल्या शाखाधिकाऱ्याकडे अवलोकनार्थ पाठवावी. वरील नोंदी तयार केलेल्या नवीन तक्त्याच्या प्रती आस्थापना शाखेकडून पुरविण्यात येतील.

कार्यालय प्रमुख.

अभ्यास

प्रत्येक कर्मचाऱ्याने आपले कार्यविवरण तयार करून ते सप्ताहाच्या शेवटी आपल्या शाखाप्रमुखाकडे सादर करण्यासंबंधी एक परिपत्रक तयार करा.

• • •

अर्ज, टिप्पणी व उत्तर

जयसिंगपूर
१ मे १९८४

जिल्हाधिकारी,
कोल्हापूर.

विषय : जमिनीचा ताबा मिळविण्याविषयी.

महोदय,

मी जयसिंगपूर, जिल्हा कोल्हापूर, येथील एक शेतकरी आहे. येथील जमीन भू-मापन क्रमांक २२५, हिस्सा ४, क्षेत्र ५ एकर २५ गुंठे, आकार रुपये १४·२५ या जमिनीचा मी मालक आहे. त्यातील ३ एकर २५ गुंठे इतकी जमीन मी स्वतः कसतो व २ एकर जमीन श्री. शंकर नारायण हे कूळ म्हणून कसतात. परंतु श्री. शंकर नारायण यांनी मला त्या जमिनीचा गेल्या ३ वर्षांचा खंड रुपये २७५ दिला नाही. त्यांना दिलेली नोटीस त्यांनी स्वीकारली नाही. ही जमीन मला वैयक्तिक लागवडीसाठी हवी आहे. म्हणून श्री. शंकर नारायण यांची कूळवहिवाट रद्द करून जमिनीचा ताबा मला द्यावा ही विनंती.

आपला,
वि. कृ. फडणीस.

जिल्हाधिकारी कार्यालय

सादर--

श्री. फडणीस यांचो दिनांक १ मे १९८४ च्या पत्रात केलेली विनंती पाहावी. कुळाने सतत ३ वर्षे खंड न दिल्यास जमिनीतील कुळाची कुळवहिवाट रद्द करता येते. तथापि, त्यापूर्वी शासनातर्फे कुळास आणखी एक संधी देण्यात यावी असे आदेश आहेत त्यानुसार श्री. शंकर नारायण, राहणार जयसिंगपूर, यांना हे पत्र मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत श्री. फडणीस यांच्याकडे अथवा मामलेदार, जयसिंगपूर, यांच्याकडे खंडाच्या बाकीचा भरणा करण्याबद्दल कळविण्यात यावे. तसेच इतके दिवस खंड का भरला नाही याचे कारण दाखविण्यास सांगून यापुढे तो नियमित भरणार असल्याबद्दलचे प्रतिज्ञापत्र त्यांच्याकडून घ्यावे असे वाटते.

प्रारूप अनुमोदनार्थ प्रस्तुत.

क्रमांक एन्सी. १२८४-म
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर
दिनांक १ सप्टेंबर १९८४

श्री. शंकर नारायण,
जयसिंगपूर.

विषय : जमिनीचा खंड भरण्याबाबत.

महोदय,

जयसिंगपूर येथील भू-मापन क्रमांक २२५ हिस्सा ४ या जमिनीचे मालक श्री. वि. कृ. फडणीस यांनी असे कळविले आहे की आपण कसत असलेल्या त्यांच्या दोन एकर जमिनीचा तीन वर्षांचा खंड रुपये २७५ आपण त्यांना अद्याप दिलेला नाही. शासकीय नियमांनुसार सतत तीन वर्षे खंड न दिल्यास कुळाची कुळवहिवाट रद्द करता येते. तथापि, खास बाब म्हणून हे पत्र मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत खंडाची रक्कम मामलेदार, जयसिंगपूर, यांच्या कार्यालयात भरण्याची आणखी एक संधी आपणास देण्यात येत आहे. त्याप्रमाणे खंडाच्या रकमेचा आपण भरणा करावा व आतापर्यंत खंड का भरला नाही याचे कारण दाखवून यापुढे खंड नियमितपणे भरणार असल्याबद्दलचे प्रतिज्ञापन १५ दिवसांच्या आत पाठवावे. वरील गोष्टी आपणाकडून वेळीच न झाल्यास योग्य ती पुढील कार्यवाही करण्यात येईल.

आपला,

जिल्हाधिकारी,
कोल्हापूर.

श्री. वि. कृ. फडणीस यांस वरील पत्राची प्रत माहितीकरिता रवाना.

अभ्यास

कूळकायद्याचे उद्दिष्ट काय? त्यातील कोणत्याही पाच महत्त्वाच्या कलमांचा आशय लिहा.

● ● ●

२०

कार्यक्षम राज्यकारभार

कार्यक्षम राज्यकारभाराच्या आपल्या काय कल्पना आहेत? या बाबतीत माझ्या कल्पना अगदी साध्या आहेत त्या मी तुम्हाला सांगतो.

कार्यक्षम कारभार याचा अर्थ जे ठरले असेल, जे करावयाचे असेल, ते तातडीने केले पाहिजे. तसेच, ते प्रामाणिकपणाने केले पाहिजे आणि ते करून आपण लोकांचे समाधान केले पाहिजे. माझ्या कल्पनेप्रमाणे कार्यक्षम राज्यकारभाराच्या या तीन कसोट्या आहेत. विलंब का लागतो? मला असे वाटते की, याबाबतीत वारंवार तपासणी केली पाहिजे. आपण कोणीही या बाबतीत एकच एक असा नियम घालून देऊ शकणार नाही. विलंब कसा टाळावा? सरकारने, विभागीय अधिकाऱ्यांनी किंवा जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या विभागामध्ये काही थोड्याफार गोष्टीत बदल करून, त्यात दुरुस्ती करून हा प्रश्न सुटणार नाही. विलंब टाळण्याचा एकच मार्ग आहे व तो म्हणजे आलेले काम एका ठराविक मर्यादेत पुरे केलेच पाहिजे अशी मनाला सवय लावून घेतली पाहिजे आणि ती सवय इतरांना लावली पाहिजे. एखाद्या प्रकरणासंबंधी अधिक माहिती मागवावयाची नसेल तर प्रश्नच नाही. पण अधिक माहिती मागवावयाची असेल तर त्यामुळे अधिक विलंब होतो असा आपला अनुभव आहे. तेव्हा माहिती मागविण्याच्या बाबतीत आपण मनाशी निर्णय घेतला पाहिजे की, सदरहू माहिती एका ठराविक काळात आलीच पाहिजे. यासंबंधी आपल्या मनाला सतत चिंता लागून राहिल्याशिवाय, आपल्या मनाला क्लेश झाल्याशिवाय हा विलंबाचा प्रश्न सुटणार नाही. हा सबंध राज्यकारभाराच्या पाठीमागे लागलेला राक्षस आहे. असे माझे मत आहे आणि वारंवार त्याचा पराभव करण्याची नित्य जागरूकता ठेवल्याशिवाय हा राक्षस पराभूत होणार नाही. तो एकदा पराभूत होऊन जात नाही तो रोज जन्माला येतो, प्रत्येक क्षणाला जन्माला येतो, प्रत्येक क्षणाला त्याच्याशी युद्ध करावे लागते. असा हा प्रश्न आहे आणि म्हणून या विलंबाच्या प्रश्नाच्या बाबतीत आपण नेहमी जागरूक असले पाहिजे. एखाद्याच दिवशी विलंबाचा प्रश्न दूर झाला तर त्याचा उपयोग नाही. दुसऱ्या दिवशी परत विलंब होण्याची शक्यता असते. ज्याला आपण सरकारी यंत्रणेचे काम म्हणतो त्याला मराठीत कागदी घोडे नाचविणे म्हणतात. राज्यकारभारामध्ये खरेखुरे घोडे नाचू शकत नाहीत, तर ते कागदावरचेच नाचतात. तेव्हा कागदावरचे घोडे म्हणून जर ते नाचावयाचे असतील तर या कागदी घोड्यांना आपण सारखे पळविले पाहिजे, हलविले पाहिजे, त्याच्यासंबंधी जागरूक असले पाहिजे आणि हा विलंबाचा प्रश्न तातडीने, जागरूकतेने, आपल्याला सोडविता यावा म्हणून त्यासंबंधाने काही निश्चित निर्णय घेतला पाहिजे. माझ्या कल्पनेप्रमाणे या बाबतीत एकच निर्णय असू शकतो. तो असा की, समोर

असलेले काम ज्या दिवशीचे त्या दिवशीच पुरे करणे आणि अधिक माहिती मागविण्या-करिता काम जावयाचे असेल त्याच्यासंबंधीही काही निश्चित असे निर्णय घेतले पाहिजेत. जी माहिती लौकर द्यावयाची असेल त्याकरिता दोन दिवसांची, काहींच्याकरिता आठ दिवसांची, काहींच्याकरिता दहा दिवसांची ह्याप्रमाणे जास्तीत जास्त कालमर्यादा घातली पाहिजे. माहिती मागविण्याकरिता गेलेला कागद हा अमूक दिवसांनी परत आलाच पाहिजे, अशी आपल्याला सवय लागली पाहिजे.

(श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या एका भाषणातील उतारा)

अभ्यास

१. कार्यक्षम राज्यकारभाराच्या मुख्य कसोट्या कोणत्या ?

२. तुमच्या कार्यालयात कारभार जास्त कार्यक्षम करावयाचा असेल तर तुम्ही कोणते उपाय अंमलात आणाल ?

३. नामे द्या :—

कार्यक्षम, काल्पनिक, साधा, प्रामाणिक, मर्यादित, निर्णायक, अनुभवी, ठराविक, क्लेशदायक, राक्षसी, जागरूक, क्षणिक, कागदी, निश्चित.

४. तुमच्या विभागातील सर्व पत्रव्यवहार राजभाषेतून चालावा म्हणून कोणकोणत्या गोष्टी कराल ?

५. वरील नामे व विशेषणे प्रत्येकी वेगवेगळ्या वाक्यांत वापरा.

भाग ६

शासन-व्यवहारविषयक शब्दावली

शासन-व्यवहारविषयक शब्दावली

शासकीय व व्यावहारिक शब्द (Words pertaining to administration and usage)

१

सचिवालयीन विभाग

(Secretariat Departments)

(१) सामान्य प्रशासन विभाग	General Administration Department
(२) गृह विभाग	Home Department
(३) वित्त विभाग	Finance Department
(४) महसूल व वन विभाग	Revenue and Forests Department
(५) सार्वजनिक बांधकाम विभाग	Public works Department
(६) पाटबंधारे विभाग	Irrigation Department
(७) विधी व न्याय विभाग	Law and Judiciary Department
(८) कृषि व सहकार विभाग	Agricu ture and Co-operation Department
(९) शिक्षण व सेवायोजन विभाग	Education and employment Department
(१०) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग	Industries, Energy and Labour Department
(११) अन्न व नागरी पुरवठा विभाग	Food and Civil Supplies Department
(१२) नगर विकास व आरोग्य विभाग	Urban Development and Public Health Department
(१३) ग्रामविकास विभाग	Rural Development Department
(१४) नियोजन विभाग	Planning Department
(१५) समाज कल्याण व क्रीडा विभाग	Social welfare and sports Department
(१६) विधानकार्य विभाग	Legislative Affairs Department
(१७) गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग	Housing and special Assistance Department

(१८) फलोत्पादन व सामाजिक वनीकरण विभाग	Horticulture and Social Forestry Department
(१९) माहिती व जनसंपर्क, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग	Information and Public Relations Tourism and cultural Affairs Department

● ● ●

२ शाखा

(Branches)

(१) आस्थापना शाखा	Establishment Branch
(२) लेखा शाखा	Accounts Branch
(३) नोंदणी शाखा	Registry
(४) अनुवाद शाखा	Translation Branch
(५) प्रशिक्षण शाखा	Training Branch
(६) ग्रंथालय शाखा	Library Branch
(७) परीक्षा शाखा	Examination Branch
(८) सहायक अनुदान शाखा	Grant-in-Aid Branch
(९) टंकलेखन शाखा	Typing Branch
(१०) लेखनसामग्री शाखा	Stationery Branch
(११) निविदा शाखा	Tender Branch
(१२) आवक-जावक शाखा	Inward and Outward Branch
(१३) रचना व कार्यपद्धति शाखा	Organisation & Methods Branch
(१४) अर्थसंकल्प शाखा	Budget Branch

शासकीय कामकाजातील लेखन प्रकार
(Types of writings in Government Business)

(१) टिप्पणी	Note
(२) मसुदा/प्रारूप	Draft
(३) स्मरणपत्र	Reminder
(४) शासकीय पत्र	Government Letter
(५) अर्धशासकीय पत्र	D. O. Letter
(६) पृष्ठांकन	Endorsement
(७) कार्यालयीन आदेश	Office Order
(८) कार्यालयीन परिपत्रक	Office Circular
(९) शासन निर्णय	Government Resolution
(१०) गोपनीय पत्र	Confidential Letter
(११) कार्यवृत्त	Minutes of the Meeting
(१२) सांविधिक आदेश	Statutory Order
(१३) अधिसूचना	Notification
(१४) अनौपचारिक संदर्भ	Unofficial Reference
(१५) सर्वप्राथम्य पत्र	Top priority Letter
(१६) प्रसिद्धी पत्रक	Press Release/Press Note
(१७) तार	Telegram
(१८) शुद्धिपत्र	Corrigendum
(१९) आवेदनपत्र, अर्ज	Application
(२०) ज्ञापन	Memorandum
(२१) तातडी पत्र	Urgent Letter
(२२) तात्काळ पत्र	Immediate Letter
(२३) प्रतिवेदन/अहवाल	Report

(२४) प्रमाणपत्र	Certificate
(२५) पुरवणीपत्र	Addendum
(२६) गोपनीय अभिलेख	Confidential Record
(२७) शीघ्रपत्र	Express Letter
(२८) ज्ञाप	Memo
(२९) परिशिष्ट	Appendix
(३०) अनुसूची	Schedule
(३१) कार्यसूची	Agenda
(३२) अग्रेषण पत्र	Forwarding Letter
(३३) उपरिपत्र	Covering Letter

• • •

काही पदनामे

(Some designations)

(१) मुख्य सचिव	Chief Secretary
(२) अपर सचिव	Additional Secretary
(३) उपसचिव	Deputy Secretary
(४) अवर सचिव	Under Secretary
(५) स्वीय सहाय्यक	Personal Assistant
(६) पर्यवेक्षक	Supervisor
(७) अधीक्षक	Superintendent
(८) वरिष्ठ लिपिक	Senior Clerk
(९) कनिष्ठ लिपिक	Junior Clerk
(१०) वरिष्ठ सहायक	Senior Assistant
(११) कनिष्ठ सहायक	Junior Assistant
(१२) टंकलेखक	Typist
(१३) लघुलेखक	Stenographer
(१४) लेखनसामग्री लिपिक	Stationery Clerk
(१५) नोंदणी लिपिक	Registry Clerk
(१६) दैनंदिनी लिपिक	Diary Clerk
(१७) रोखपाल	Cashier
(१८) लघु-टंकलेखक	Steno-typist
(१९) लेखा परीक्षक	Auditor
(२०) लेखापाल	Accountant
(२१) भांडारपाल	Store-keeper
(२२) अभिलेखापाल	Record-keeper
(२३) समयलेखक	Time-keeper
(२४) अनुवादक	Translator
(२५) स्वागतकार	Receptionist

आणखी काही पदनामे

(Some more designations)

(१) धर्मादाय आयुक्त	Charity Commissioner
(२) संचालक	Director
(३) उपसंचालक	Deputy Director
(४) निर्मिति अधिकारी	Production Officer
(५) मनोरंजन अधिकारी	Recreation Officer
(६) कार्यकारी अभियंता	Executive Engineer
(७) निवडणूक अधिकारी	Election Officer
(८) मतदान अधिकारी	Polling Officer
(९) पोलीस महानिरीक्षक	Inspector-General of Police
(१०) कारागृह महानिरीक्षक	Inspector-General of Prisons

(११) महासमादेशक	Commandant-General
(१२) विधी सल्लागार	Legal Adviser
(१३) रचना व कार्यपद्धति अधिकारी	Organisation and Methods Officer
(१४) लेखा अधिकारी	Accounts Officer
(१५) संशोधन अधिकारी	Research Officer
(१६) अधिदान व लेखा अधिकारी	Pay and Accounts Officer
(१७) कोषागार अधिकारी	Treasury Officer
(१८) प्रबंधक	Registrar
(१९) जनसंपर्क अधिकारी	Public Relations Officer
(२०) विक्रीकर अधिकारी	Sales Tax Officer
(२१) दंडाधिकारी	Magistrate
(२२) जिल्हाधिकारी	Collector
(२३) भूमि संपादन अधिकारी	Land Acquisition Officer
(२४) पुनर्वसन अधिकारी	Rehabilitation Officer
(२५) जनगणना अधिकारी	Census Officer
(२६) वास्तुशास्त्रज्ञ	Architect
(२७) मृद सर्वेक्षण अधिकारी	Soil Survey Officer
(२८) जिल्हा व सत्र न्यायाधीश	District and Sessions Judge
(२९) सांख्यिक	Statistician
(३०) प्रकल्प अधिकारी	Project Officer
(३१) प्राध्यापक	Professor
(३२) अधिव्याख्याता	Lecturer
(३३) अधिष्ठाता	Dean

५

अभ्यासाचे विषय

(Subjects of Study)

(१) विमागणितशास्त्र	Science of Actuary
(२) जीवशास्त्र	Biology
(३) रसायनशास्त्र	Chemistry
(४) वाणिज्य	Commerce
(५) अर्थशास्त्र	Economics
(६) तर्कशास्त्र	Logic
(७) तत्त्वज्ञान	Philosophy
(८) भौतिक	Physics
(९) प्राणिशास्त्र	Zoology
(१०) जीवरसायनशास्त्र	Biochemistry
(११) गृहविज्ञान	Home Science
(१२) विधि	Law
(१३) राज्यशास्त्र	Political Science
लेखी प्रमाण मागवावे / कागदोपत्री पुरावा मागवावा.

(4) Draft notification is in order.
अधिसूचनेचा मसुदा नियमास धरून / नियमानुसार आहे.

(5) Drawing and disbursing officers should be authorised to sign the pay bills of the subordinate staff.
आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना अधीनस्थ कर्मचाऱ्यांच्या वेतन बिलांवर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करावे.

(6) During the current year the rate of interest on the balances in the General Provident Fund of the incumbent has been increased.
चालू वर्षात पदधारकाच्या सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधीतील शिल्लकीवरील व्याजाचा दर वाढवला आहे.

'E'

(1) Education grants should be rationalised and procedure for giving these grants should be simplified.
शिक्षण अनुदानाकरिता काही वाजवी सिद्धांत निश्चित करावेत आणि ही अनुदान देण्याची कार्यपद्धती सुलभ करावी.

(2) Enquiry should be completed and report submitted without delay.
चौकशी पूर्ण करावी आणि अहवाल/प्रतिवेदन अविलंब सादर करावा/करावे.

(3) Ensure that the rules are properly observed in future.
यापुढे नियमांचे योग्य रीतीने पालन केले जाईल याची काळजी घ्यावी.

(4) Every officer has to carry out multifarious duties.
प्रत्येक अधिकाऱ्याला बहुविध कर्तव्ये पार पाडावी लागतात.

(5) Examine the proposal in the light of observation at "A".
"अ" स्थानी व्यक्त केलेल्या विचारांस अनुलक्षून प्रस्तावाचे परीक्षण करावे.

(6) Expenditure on the above account should be met out of the savings under the head "XIX G.A.D." in the current year's budget.
वरील कारणासाठी केलेला खर्च चालू वर्षाच्या अर्थसंकल्पातील "एकोणीस सा. प्र. वि." या शीर्षाखालील बचतीतून भागवावा.

(7) Explanatory note placed below may please be seen.
खाली ठेवलेली स्पष्टीकरणात्मक टिप्पणी कृपया पाहावी.

'F'

(1) F. D. may kindly see for concurrence.
वित्त विभागाने हे कृपया सहमतीसाठी पाहावे.

(2) F. D. should be approached for *ex-post-facto* sanction to the expenditure.
खर्चास कार्योत्तर मंजुरी देण्याबाबत वित्त विभागास लिहावे.

(3) Fair copy of the draft is put up for approval.
मसुद्याची स्वच्छ प्रत मान्यतेकरिता प्रस्तुत केली आहे.

(4) For the reasons explained above, I do not concur with the proposal.
वर स्पष्ट केलेल्या कारणासाठी मी प्रस्तावाशी सहमत नाही.

(5) Forwarded for immediate compliance.
तात्काळ पालनाकरिता पुढे पाठवण्यात आले आहे.

(6) Forwarded with compliments for information/necessary action/ remarks and disposal.

माहितीसाठी/आवश्यक कार्यवाहीसाठी / अभिप्रायासाठी व निकालात काढण्यासाठी पुढे पाठविण्यात येत आहे.

(7) Further orders in the matter will follow; till then this case may be kept in await.

या बाबतीत पुढील आदेश मागाहून पाठविण्यात येतील; तोंपर्यंत हे प्रकरण प्रतीक्षाधीन ठेवावे.

'G'

(1) Government consider that there is no case for suspending the officer from service.

अधिकाऱ्याला सेवेतून निलंबित करण्यासाठी पुरेसे कारण आहे असे शासनाला वाटत नाही.

(2) Government decided to hold a departmental enquiry against him as in the opinion of Government he was acquitted by the court on some technical grounds.

शासनाच्या मते न्यायालयाने काही तांत्रिक कारणास्तव त्यांची निर्दोषी म्हणून सुटका केली असल्याने त्यांच्या विरुद्ध विभागीय चौकशी करण्याचा निर्णय शासनाने घेतला.

(3) Government desire that severe action should be taken against officers who are guilty of gross misconduct and negligence while on duty.

कर्तव्यस्थ असताना अत्यंत गैर अशी वर्तणूक व निष्काळजीपणा याबद्दल दोषी ठरणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई केली जावी अशी शासनाची इच्छा आहे.

(4) Government may be moved to waive the recovery of arrears.

थकबाकीची वसुली माफ करण्याबद्दल शासनास विनंती करावी.

(5) Government Resolution No. 1129 of 23-6-1964 makes it clear that officers on deputation to other departments will be entitled to receive a deputation allowance at 20 per cent of their substantive pay or Rs. 50 whichever is less.

शासननिर्णय क्रमांक ११२९, दिनांक २३ जून १९६४, यावरून असे स्पष्ट दिसते की जे अधिकारी अन्य विभागात प्रतिनियुक्तीवर जातील त्यांना त्यांच्या मूळ वेतनाच्या २० टक्के किंवा रुपये ५० यापैकी जे कमी असेल ते मिळण्याचा हक्क आहे.

(6) Some Government servants in their dealings with visitors often act in an arrogant and high-handed manner.

काही शासकीय कर्मचारी अभ्यागतांशी व्यवहार करताना पुष्कळ वेळा उद्धट आणि उद्दाम रीतीने वागतात.

(7) Group application by Government servants should never be entertained.

शासकीय कर्मचाऱ्यांकडून आलेले सामूहिक अर्ज केव्हाही स्वीकारू नयेत/विचारात घेऊ नयेत.

'H'

(1) He has asked for Rs. 3,000 which is much more than what he can get under the normal rules.

त्यांनी मागितलेली रुपये ३,००० ची रक्कम सर्वसाधारण नियमांनुसार त्यांना मिळू शकणाऱ्या रकमेपेक्षा पुष्कळच अधिक आहे.

(2) He has about Rs. 10,000 to his credit in the General Provident Fund account.

सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधीत त्यांच्या खाती सुमारे १०,००० रुपये जमा आहेत.

(3) He has been taking a keen interest in the all-round development of the district, with particular emphasis on its industrialisation.

जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाकडे व विशेषतः त्याच्या औद्योगीकरणाकडे ते आस्थापूर्वक लक्ष देत असतात.

(4) He has been placed under suspension as there is a *prima facie* evidence against him.

त्यांच्याविरुद्ध प्रथमदर्शनी पुरावा असल्यामुळे त्यांना निलंबनाधीन ठेवले आहे.

(5) He is allowed to cross the efficiency bar.

त्यांना दक्षतारोध पार करण्यास परवानगी/अनुमती दिली आहे.

(6) He is mentally and physically fit to carry out the office work.

कार्यालयीन काम करण्यास ते मानसिक व शारीरिकदृष्ट्या कार्यक्षम आहेत.

(7) He may be continued in service for a further period of one year.

त्यांची सेवा पुढील एक वर्षपर्यंत चालू ठेवावी.

(8) He will have to bear his travelling expenses.

त्यांना आपला प्रवासखर्च स्वतःच करावा लागेल.

(9) His absence from office may be treated as extraordinary casual leave as a special case.

विशेष बाब म्हणून त्यांची कार्यालयातील अनुपस्थिती असाधारण नैमित्तिक रजा समजावी.

(10) His explanation may be obtained and forwarded to this department with your remarks for further action.

त्यांचे स्पष्टीकरण मागवावे व ते आपल्या अभिप्रायांसह पुढील कार्यवाहीकरिता या विभागाकडे पाठवावे.

(11) His increment has been withheld.

त्यांची वेतनवाढ रोखून ठेवली आहे.

(12) His work for the current year will have to be closely watched.

चालू वर्षातील त्यांच्या कामावर बारकाईने देखरेख ठेवावी लागेल.

'I'

(1) I am to state that this office has accepted the lowest tender for the supply of furniture.

मला असे सांगावयाचे आहे की फर्निचरच्या पुरवठा करण्याबद्दलची कमीत कमी दराची निविदा या कार्यालयाने स्वीकारली आहे.

(2) I find no reason to change my previous order.

माझे पूर्वीचे आदेश बदलण्याचे मला कारण दिसत नाही.

(3) I have made some verbal changes; the amended draft may be approved.

मी काही शाब्दिक फेरफार केले आहेत; सुधारलेल्या मसुद्यास अनुमोदन मिळावे.

(4) I have the honour to inform you that you have deliberately violated the orders of your superior.

तुम्हांस कळविण्यात येते की, तुम्ही जाणूनबुजून आपल्या वरिष्ठांच्या आदेशांचा भंग केला आहे.

(5) I heve the honour to state that a gross injustice has been done in my case.

मला सादर निवेदन करावयाचे आहे की माझ्या बाबतीत घोर अन्याय करण्यात आला आहे.

(6) I shall be highly obliged if you personally look into the matter and arrange to reply by return of post.

आपण या प्रकरणी जातीने लक्ष घालून उलट टपाली उत्तर पाठविल्यास मी आपला अत्यंत आभारी होईन.

(7) I reiterate my former comments.

मी माझ्या पूर्वीच्याच अभिप्रायांचा पुनरुच्चार करू इच्छितो.

(8) In the absence of definite information from the subordinate offices, the replies to starred questions cannot be submitted within the prescribed time-limit.

दुय्यम कार्यालयांकडून निश्चित माहिती न आल्यामुळे तारांकित प्रश्नांची उत्तरे विहित कालमर्यादेत सादर करता येत नाहीत.

'J'

(1) Join duties at once; your request for cancellation of transfer cannot be granted.

कामावर ताबडतोब रुजू व्हा; बदली रद्द करण्यासंबंधीची तुमची विनंती मान्य करता येत नाही.

(2) Joining report should invariably be despatched on the day the officer takes over charge.

अधिकारी ज्या दिवशी कार्यभार स्वीकारतील त्याच दिवशी रुजू झाल्याचे/पदग्रहणाचे प्रतिवेदन न चुकता पाठवावे.

(3) Joining time on transfer cannot be asked for as a matter of right.

बदली झाल्यावर हक्क म्हणून पदग्रहण अवधी मागता येत नाही.

(4) Judgment in this case has been reserved.

या बाबीवरील/प्रकरणावरील न्यायनिर्णय राखून ठेवला आहे.

(5) Justify in detail the necessity of the additional posts asked for.

मागितलेली अतिरिक्त पदे का आवश्यक आहेत याचे सविस्तर समर्थन करा.

'K'

(1) Kindly acknowledge the receipt of this letter by return of post.

या पत्राची पोच कृपया उलट टपाली पाठवावी.

(2) Kindly confirm the presumption made by this office.

या कार्यालयाची धारणा बरोबर असल्याचे कृपया कळवावे.

(3) Kindly permit me to leave the headquarters during the period of leave.

रजेच्या मुदतीत मला मुख्यालय सोडण्याची कृपया अनुमती द्यावी.

'L'

(1) Leave if due and admissible may be granted.

रजा देय व अनुज्ञेय असल्यास मंजूर करावी.

(2) Leave on average pay for ten days followed by leave on half average pay for seven days has been granted to Shri ....; the said leave may please be notified in the gazette.

श्री. .... यांना दहा दिवसांची सरासरी वेतनावरील रजा व त्या रजेस जोडून सात दिवसांची अर्धसरासरी वेतनावरील रजा मंजूर करण्यात येत आहे; उक्त रजा राजपत्रात कृपया अधिसूचित केली जावी.

(3) (The) Letter under reference needs no action as it is pseudonymous.

संदर्भाधीन पत्र टोपणनावी असल्यामुळे त्यावर कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.

(4) (The) Liability for this additional expenditure will rest with the party concerned.

या अतिरिक्त खर्चाची जबाबदारी संबंधित पक्षावर राहील.

(5) Lien means the title of a Government servant to hold substantively a permanent post, including a tenure post.

धारणाधिकार म्हणजे एखाद्या सावधि-पदासह कोणतेही स्थायी पद मूळ पद म्हणून धारण करण्याचा शासकीय कर्मचाऱ्याचा हक्क.

(6) Local purchases of stationery and other articles should be made after obtaining the prior sanction of the Government.

शासनाची पूर्वानुमती मिळाल्यानंतरच लेखनसामग्रीची आणि इतर वस्तूंची स्थानिक-रीत्या खरेदी करावी.

(7) (The) Loss of revenue thus sustained cannot be made good by any other means.

या प्रकारे झालेल्या महसुलाची हानी इतर कोणत्याही मार्गाने भरून काढता येणे शक्य नाही.

(8) Looking to the purpose for which he has requested for the advance, it may be sanctioned as a special case.

त्यांनी ज्या प्रयोजनाकरिता हे अग्रिम मागितले आहे ते लक्षात घेता, विशेष बाब म्हणून ते मंजूर करावे.

'M'

(1) Major items of equipment costing above Rs. 5,000 per article can be purchased through the normal agency of the Central Stores Purchase Organisation.

प्रत्येकी रु. ५,००० किंमतीहून अधिक किंमतीची मोठी उपकरणे नेहमीप्रमाणे मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेमार्फत खरेदी करता येतील.

(2) May I know when a reply in the matter can be expected ?

याबाबत उत्तर केव्हा मिळू शकेल ते मला कळेल काय ?

(3) Medical examination is compulsory in respect of every Govt. servant on his first appointment.

प्रथम नेमणुकीनंतर प्रत्येक शासकीय कर्मचाऱ्यास वैद्यकीय तपासणी अनिवार्य आहे.

(4) Merged States servants have a right of appeal in respect of the fixation of their seniority.

विलीन संस्थानांतील कर्मचाऱ्यांना आपली ज्येष्ठता निश्चित करण्याच्या बाबतीत अपील करण्याचा अधिकार आहे.

(5) Most of the additional expenditure was incurred on account of the additions and alterations in the original scheme at the eleventh hour.

अतिरिक्त खर्चापैकी बहुतेक खर्च, मूळ योजनेत आयत्यावेळी केलेल्या फेरबदलामुळे झाला.

(6) Most of the candidates appointed recently need a thorough training in respect of the B. C. S. R.

नुकत्याच नियुक्त केलेल्या बऱ्याचशा उमेदवारांना मुंबई नागरी सेवा नियमांबाबत परिपूर्ण प्रशिक्षण देण्याची गरज आहे.

'N'

(1) Necessary entries may be made in his service book.

त्यांच्या सेवापुस्तकात आवश्यक त्या नोंदी कराव्यात.

(2) Nine-monthly expenditure statements should give the clear idea of the balance to be surrendered.

नऊमाही खर्चाच्या विवरणपत्रांवरून शासनास परत करावयाच्या शिल्लक रकमेची स्पष्ट कल्पना आली पाहिजे.

(3) No further action is necessary, file.

यापुढे आणखी कार्यवाही आवश्यक नाही, दप्तरी दाखल करावे.

(4) No-objection certificate from the previous employer should be produced at the time of the interview.

मुलाखतीच्या वेळी मागील सेवायोजकाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्रस्तुत करावे.

(5) No previous advances from the G. P. F. are outstanding against him.

त्यांच्याकडे सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधीतील पूर्वीची कोणतीही बाकी राहिलेली नाही.

(6) "No profit, no loss" should be the first principle of every departmental stores.

"ना नफा, ना तोटा" हे प्रत्येक विविध वस्तुभांडाराचे पहिले तत्त्व असावे.

(7) Not more than two holidays can be enjoyed in conjunction with any spell of casual leave.

नैमित्तिक रजेच्या कोणत्याही कालावधीला जोडून दोनपेक्षा अधिक सुट्या घेता येणार नाहीत.

'O'

(1) Occasional surprise checks will improve the efficiency of the staff and speed up the office work.

अधूनमधून केलेल्या अचानक तपासणीमुळे कर्मचारीवर्गाची कार्यक्षमता वाढेल आणि कार्यालयीन कामकाजास गती मिळेल.

(2) Officers appointed on probation shall have to pass the departmental examination before they complete the probationary period.

परिवीक्षाधीन अधिकाऱ्यांना त्यांचा परिवीक्षाकाल पूर्ण होण्यापूर्वी विभागीय परीक्षा उत्तीर्ण व्हावे लागेल.

(3) On receipt of these orders the surplus staff should be relieved.

हे आदेश मिळाल्यावर अतिरिक्त कर्मचारीवर्ग सेवामुक्त करावा.

(4) Orders in this connection will be issued very shortly.

या संबंधात लवकरच आदेश देण्यात येतील.

(5) Other things being equal, a candidate belonging to a scheduled caste should be given preference.

अन्य परिस्थिती/बाबी समान असल्यास, अनुसूचित जातीतील उमेदवारास प्राधान्य द्यावे.

(6) Over-time allowance is not admissible in the case of gazetted officers.

राजपत्रित अधिकाऱ्यांना अतिकालिक भत्ता अनुज्ञेय नाही.

'P'

(1) Please contact Shri 'X' on phone.

श्री. 'क्ष' यांच्याशी कृपया दूरध्वनीवर संपर्क साधावा.

(2) Please ensure that the rules are properly observed in future.

यापुढे नियमांचे योग्य पालन केले जाईल याची कृपया काळजी घ्या.

(3) Please issue an urgent reminder.

कृपया तातडीचे स्मरणपत्र पाठवा.

(4) Please put up a self-contained proposal.

कृपया स्वयंपूर्ण प्रस्ताव प्रस्तुत करा.

(5) Please quote the authority.

कृपया प्राधिकार उद्धृत करा/प्रमाण द्या.

(6) Please see the letter, dated 29th July 1965, from the Registrar, High Court.

कृपया प्रबंधक, उच्च न्यायालय, यांचे दिनांक २९ जुलै १९६५ चे पत्र पाहावे.

(7) Please see the letter from the Commissioner, Bombay Division.

कृपया आयुक्त, मुंबई विभाग, यांचे पत्र पाहावे.

(8) Please see the undersigned.

कृपया खाली सही करणाऱ्यास भेटावे.

(9) Please submit the information in the prescribed form.

कृपया विहित प्रपत्रात/ठराविक नमुन्यात माहिती सादर करा.

(10) Please treat this as most urgent.

कृपया हे अत्यंत तातडीचे समजावे.

(11) Please treat this as strictly confidential.
कृपया हे अगदी गोपनीय समजावे.

(12) Please write the abbreviated address of the office.
कृपया कार्यालयाचा संक्षिप्त पत्ता लिहा.

'Q'

(1) Qualified candidates will have to appear at the interview at their own cost.
अर्हताप्राप्त उमेदवारांना स्वतःच्या खर्चाने मुलाखतीसाठी यावे लागेल.

(2) Qualifying standards should be strictly adhered to while selecting candidates for the posts of the Deputy Collector.
उप-जिल्हाधिकाऱ्याच्या पदांसाठी उमेदवारांची निवड करताना अर्हताविषयक प्रमाणे काटेकोरपणे पाळावीत.

(3) Quinquennial administrative reports should be preserved by every office.
प्रत्येक कार्यालयाने पंचवार्षिक प्रशासनिक अहवाल जतन करून ठेवावे.

'R'

(1) Recall from leave all the military personnel gone on leave, casual or earned.
नैमित्तिक अथवा अर्जित रजेवर गेलेल्या सर्व लष्करी अधिकाऱ्यांना ताबडतोब रजेवरून परत बोलवा.

(2) Refresher courses, for those who are already trained in the departmental procedure should be started in every district.
'विभागीय कार्यपद्धती' या विषयाचे अगोदरच प्रशिक्षण घेतलेल्या सर्व अधिकाऱ्यांकरिता प्रत्येक जिल्ह्यात उजळणी पाठ्यक्रम सुरू करावेत.

(3) Report regarding analysis and valuation of crops should be put up immediately.
पिकांच्या वर्गीकरणासंबंधीचा आणि मूल्यांकनासंबंधीचा अहवाल तात्काळ प्रस्तुत करावा.

(4) Report regarding character and antecedents of the candidates should be called for from the local police before issuing appointment orders.

नियुक्ती आदेश रवाना करण्यापूर्वी उमेदवारांचे चारित्र्य आणि पूर्वचरित्र यांबाबत स्थानिक पोलिसांकडून अहवाल मागवावा.

(5) Right to reject any or all the applications is reserved with the Department.

कोणताही किंवा सर्व अर्ज नाकारण्याचा हक्क विभागाने राखून ठेवला आहे.

(6) Returned the papers with a reply that a retrospective effect be given to the proposal.

प्रस्तावास पूर्वलक्षी प्रभाव द्यावा या उत्तरासहित कागद परत पाठविले आहेत.

(7) Rules and regulations should be carefully studied by every Government servant desiring for promotion.

बढती इच्छिणाऱ्या प्रत्येक शासकीय कर्मचाऱ्याने नियमांचा व विनियमांचा अभ्यास काळजीपूर्वक केला पाहिजे.

'S'

(1) Sanction cannot be accorded to this expenditure according to normal rules.

सामान्य नियमांनुसार या खर्चास मंजुरी देता येत नाही.

(2) Separate applications are invited for the following posts :—
(1) Investigating Officer; (2) Survey Officer; (3) Inspecting Officer.

खालील जागांसाठी स्वतंत्र आवेदनपत्रे मागविण्यात येत आहेत :—
(१) अन्वेषण अधिकारी; (२) सर्वेक्षण अधिकारी; (३) निरीक्षण अधिकारी.

(3) Shri ... . may please see these papers for immediate remarks in the first instance.

त्वरित अभिप्रायासाठी हे कागदपत्र प्रथमतः श्री. ... . यांनी पाहावे.

(4) Shri .... should comply with the above orders within a week failing which serious action will be taken against him.

श्री. .... यांनी वरील आदेशांचे एक आठवड्याच्या आत पालन करावे; पालन न केल्यास त्यांच्याविरुद्ध कडक कार-वाई करण्यात येईल.

(5) Special pay for handling cash is ordinarily admissible only to one person in an office.

रोख रक्कम हाताळण्याकरिता दिले जाणारे विशेष वेतन हे सामान्यतः कार्यालयातील फक्त एकाच व्यक्तीस अनुज्ञेय असते.

(6) Shri .... is entitled to a special pay not exceeding 1/10 th of the presumptive pay of the post, in question.

श्री. .... हे संबंधित पदाच्या आनुमानिक वेतनाच्या १/१० पेक्षा अधिक नाही इतके वेतन मिळण्यास पात्र आहेत.

(7) Since the L. A. is in session, these papers may be shown to C. M. before the advance from C. F. is drawn.

विधानसभेचे अधिवेशन चालू असल्याने आकस्मिकता निधीतून आगाऊ रक्कम काढण्यापूर्वी हे कागदपत्र मुख्य मंत्र्यांना दाखवावेत.

(8) Suitable action should be taken against the person concerned after giving him an opportunity to be heard.

संबंधित व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर तिच्याविरुद्ध योग्य ती कारवाई करावी.

'T'

(1) The above proposal may kindly be treated as very urgent and necessary orders in the matter may kindly be issued as early as possible.

वरील प्रस्ताव अत्यंत तातडीचा समजावा आणि यासंबंधात आवश्यक आदेश शक्य तो लवकर काढावेत.

2) The above vacancies should not be kept substantively filled.

वरील रिकामी पदे कायमची भरू नयेत.

(3) The abstract of the receipts and expenditure should be put up forthwith.

जमा आणि खर्च यांचा गोषवारा तात्काळ प्रस्तुत करावा.

(4) The advance increment proposed is not admissible under the rules.

प्रस्तावित आगाऊ वेतनवाढ नियमांनुसार अनुज्ञेय नाही.

(5) The application may be rejected.

अर्ज नाकारावा / आवेदनपत्र फेटाळावे.

(6) The argument put forth in the above note is fallacious beyond doubt.

वरील टिप्पणीत केलेला युक्तिवाद निःसंशय तर्कदुष्ट आहे.

(7) The Legislative Assembly is adjourned *sine die*.

विधानसभा बेमुदत तहकूब करण्यात आली आहे.

(8) The present arrangements will continue until further orders.

पुढील आदेश मिळेपर्यंत सध्याची व्यवस्था चालू राहील.

(9) These orders shall not be called in question on any ground.

या आदेशांवर कोणत्याही कारणास्तव आक्षेप घेतला जाणार नाही.

(10) These papers should be scrutinised by the U. S. before referring them to the A. G.

हे कागदपत्र महालेखापालांकडे पाठविण्यापूर्वी अवर सचिवांनी त्यांची बारकाईने तपासणी करावी.

(11) This being an anonymous application, may be filed.

हा अर्ज निनावी असल्यामुळे फाईल करावा.

(12) This case should be dealt with promptly.

या प्रकरणावर तत्परतेने कार्यवाही करावी.

(13) This has been informally ascertained from the G. A. D.

सामान्य प्रशासन विभागाकडून याबाबत अनौपचारिकपणे खात्री करून घेतली आहे.

(14) This is an advance copy of the application. No action need be taken till the application in original along with the remarks of the head of the office is received.

ही अर्जाची आगाऊ प्रत आहे. कार्यालयप्रमुखांच्या अभिप्रायासह/शेऱ्यासह मूळ अर्ज येईपर्यंत काहीही कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.

(15) This is clearly a criminal breach of trust.

हा उघडउघड दंडनीय विश्वासघात आहे.

'U'

(1) Under instructions from the Secretary, Finance Department, I have to inform you that your request to allow you to continue in the post of the Under Secretary cannot be granted, in view of the fact that the Government have ordered that ten per cent of the posts of all the cadres are to be retrenched.

सर्व संवर्गातील दहा टक्के जागा कमी कराव्यात असे आदेश शासनाने दिलेले आहेत हे लक्षात घेता, वित्त सचिवांच्या अनुदेशांनुसार तुम्हांस कळविण्यात येते की, अवर सचिवाच्या पदावरील तुमची नेमणूक चालू ठेवण्यासंबंधीची तुमची विनंती मंजूर करता येत नाही.

(2) Unforeseen circumstances prevent me from availing myself of the concession granted by you.

अकल्पित परिस्थितीमुळे मी आपण दिलेल्या सवलतीचा फायदा घेऊ शकत नाही.

(3) Unofficial letters addressed to any of the officers should never be entered in the inward register.

कोणत्याही अधिकाऱ्याच्या नावे आलेल्या अशासकीय पत्रांची नोंद आवक नोंदवहीत कधीच करू नये.

(4) Until further orders, the office hours in the Sachivalaya will be from 10-00 a.m. to 5-00 p.m. with 30 minutes' interval from 1-00 p.m. to 1-30 p.m. for lunch and 15 minutes' interval from 4-00 p. m. to 4-15 p. m. for tea.

पुढील आदेश होईपर्यंत सचिवालयातील कार्यालयीन वेळ सकाळी १० ते सायंकाळी ५ पर्यंत राहील. या वेळेत जेवणासाठी १ ते १-३० पर्यंत अर्धा तास आणि चहापानासाठी ४ ते ४-१५ पर्यंत पंधरा मिनिटे मध्यंतर राहील.

(5) Upper age-limit will be relaxed in the case of the candidates from Backward Classes and Scheduled Castes.

मागास वर्गाच्या व अनुसूचित जातीच्या उमेदवारांच्या बाबतीत वरची वयोमर्यादा शिथिल करण्यात येईल.

'V'

(1) Vacant posts should not be filled in until further orders from the Chief Minister.

मुख्य मंत्र्यांकडून पुढील आदेश मिळेपर्यंत रिकामी पदे भरू नयेत.

(2) "Verified and found correct" should be the only remark that every officer should enter in the account book at the time of the inspection provided the accounts are correct.

प्रत्येक अधिकाऱ्याने तपासणीच्या वेळेस लेखे बरोबर असल्यास "पडताळले व बरोबर आढळले" एवढाच शेरा लेखापुस्तकात लिहावा.

(3) Very important persons are likely to attend the seminar conducted by the Agricultural Department.

कृषि विभागाने आयोजित केलेल्या/चालविलेल्या परिसंवादास अति महत्त्वाच्या व्यक्ती उपस्थित राहण्याचा संभव आहे.

(4) Very urgent cases should be personally attended to by the Superintendent concerned.

अत्यंत तातडीची प्रकरणे संबंधित अधीक्षकांनी स्वतः हाताळावीत / अत्यंत तातडीच्या प्रकरणांवर संबंधित अधीक्षकांनी स्वतः कार्यवाही करावी.

'W'

(1) We do not know the whereabouts of the individual.

त्या व्यक्तीचा ठावठिकाणा आम्हांस माहीत नाही.

(2) We may issue the draft notification which has been examined by the establishment branch.

आस्थापना शाखेने तपासलेल्या मसुद्याप्रमाणे अधिसूचना काढावी.

(3) What is the established procedure in such cases ?

अशा बाबतींत रूढ कार्यपद्धती काय आहे ?

(4) While calculating the total cost of the maintenance of this building, the following items of expenditure should be taken into account.

या इमारतीच्या देखभालीच्या एकूण खर्चाची गणना करताना खालील बाबी विचारात घेतल्या पाहिजेत.

(5) With reference to your memo cited above, I beg to state that my absence from the office on the 24th of the last month may not be treated as wilful absence; the circumstances that led to the said absence were entirely beyond my control.

वर उल्लेखिलेल्या आपल्या ज्ञापनाच्या संदर्भात निवेदन आहे की माझी गेल्या महिन्यातील २४ तारखेची कार्यालयीन अनुपस्थिती ही हेतुपुरस्सर अनुपस्थिती होती असे समजले जाऊ नये; कारण ज्या परिस्थितीत मला अनुपस्थित राहावे लागले ती माझ्या आटोक्याबाहेरची होती.

'Y'

(1) You are called upon to show cause or causes as to why severe disciplinary action should not be taken against you.

तुमच्याविरुद्ध शिस्तभंगाची कडक कारवाई का करू नये याबद्दल कारण अगर कारणे दाखविण्यास तुम्हांस फर्माविण्यात येत आहे.

(2) Your presumption is correct.

आपली धारणा बरोबर आहे.

(3) Your request to post you as Parishad Education Officer at Poona cannot be considered.

पुणे येथे परिषद शिक्षणाधिकारी म्हणून नियुक्ती व्हावी या आपल्या विनंतीचा विचार करता येत नाही.

(4) You should appreciate my difficulties regarding the shortage of staff.

कार्यालयात पुरेसे कर्मचारी नसल्याबद्दलची माझी अडचण आपण समजून घ्यावी.

● ● ●

भाग ८

परिशिष्ट

परिशिष्ट

१. काही वाक्प्रचार.

२. निवडक म्हणी.

३. लेखनविषयक नियम.

१

काही वाक्प्रचार व त्यांचे उपयोग

(Some idioms and their uses)

अनु-क्रमांक	वाक्प्रचार	मराठी अर्थ	इंग्रजी अर्थ	मराठी वाक्यात उपयोग
१	वाटाण्याच्या अक्षता लावणे .	विनंती अमान्य करणे, किंवा नकारात्मक उत्तर देणे.	To refuse flatly ...	पुष्कळ वेळा आवेदनपत्रातील विनंतीला **वाटाण्याच्या अक्षता लावल्या** जातात.
२	डोळ्यात तेल घालून कोणतीही गोष्ट करणे.	काळजीपूर्वक काम करणे .	To work with precision and care.	रात्रीच्या वेळेस पहारेकरी **डोळ्यात तेल घालून** पहारा करतात.
३	पिकले पान ...	अतिशय म्हातारा माणूस	An extremely old person.	**पिकले पान** केव्हा गळून पडेल याचा नेम नसतो.
४	पाणी ओळखणे ...	लायकी पाहाणे, किंवा कर्तृत्वशक्ती अजमावणे, पारखणे.	To discover the virtue or capability.	सामना चालू असताना प्रतिस्पर्धी संघाचे **पाणी ओळखले** पाहिजे.
५	ब्रह्मघोटाळा होणे ...	गोंधळ होणे ...	To be in a state of confusion.	अधीनस्थ कार्यालयाकडून चुकीची माहिती आल्यामुळे **ब्रह्मघोटाळा झाला** आहे.

६	द्राविडी प्राणायाम ...	१. एखाद्या साध्या गोष्टीसाठी विनाकारण करावा लागणारा खटाटोप. २. मुद्दाम वाकडे जाण्याचा खटाटोप.	A round about procedure.	कोणतीही कामे करताना द्राविडी प्राणायामाचा अवलंब करू नये.
७	ताटाखालचे मांजर ...	पूर्णपणे आज्ञांकित माणूस...	(1) A Tool ... (2) A complete slave or cycophant	लक्ष्मणराव हा गोविंदरावांच्या ताटाखालचे मांजर आहे.
८	भांडण उकरून काढणे ...	मागल्या गोष्टीचा उल्लेख करून शमलेले भांडण पुन्हा उपस्थित करणे.	To pick up a quarrel.	काहीतरी कारण काढून राम गोविंदाबरोबर भांडण उकरून काढत आहे.
९	राईचा पर्वत करणे ...	१. अतिशयोक्ती करणे ... २. अगदी क्षुल्लक वस्तूला अतोनात महत्त्व देणे.	To make a mountain out of a mole-hill.	१. काही लोकांना राईचा पर्वत करण्याची सवय असते. २. माझ्या हातून घडलेल्या क्षुल्लक चुकीबद्दल अधीक्षकांनी राईचा पर्वत केला.
१०	इमानास जागणे ...	पूर्वीचे उपकार स्मरून वागणे.	To prove true to the salt.	सैनिक इमानास जागले तर राष्ट्राचे कधीही अकल्याण होणार नाही.

अनु-क्रमांक	वाक्प्रचार	मराठी अर्थ	इंग्रजी अर्थ	मराठी वाक्यात उपयोग
११	पोबारा करणे ...	१. पळून जाणे. २. एखाद्याची नजर चुकवून निसटून जाणे. ...	To take to one's heels.	आपल्या सैनिकांनी जोराचा हल्ला चढविताच शत्रुसैन्याने **पोबारा केला.**
१२	एखाद्याची अंडीपिल्ली बाहेर काढणे.	एखाद्याची रहस्ये किंवा गुप्त गोष्टी उघडकीस आणणे.	(1) To expose one through. (2) To divulge one's secrets so as to dis-credit him utterly.	तू मला विरोध केलास तर मी तुझी सर्व **अंडीपिल्ली बाहेर काढून** तुझी फजिती करीन.
१३	खडा टाकून पाहाणे ...	थोड्याशा गोष्टीने परिक्षा पाहाणे. अंदाज घेणे, अजमावून पाहणे.	To sound a man ...	मित्र अडचणीत मदत करील काय यासाठी मी त्याच्याकडे जाऊन **खडा टाकून पाहिला.**
१४	अडणीवरचा शंख ...	१. बिनअकली मनुष्य. २. उच्च स्थानावरील मूर्ख व अशिक्षित माणूस.	A dunce ...	**अडणीवरचा शंख** कोठल्याही जबाबदारीच्या कामावर नेमला तर कामाचे वाटोळे होते.
१५	पाठ दाखविणे ...	समोरून पळून जाणे ...	To run away from ...	लढाईत आम्ही मारू किंवा मरू; पण शत्रूला **पाठ दाखविणार नाही.**

१६	चालत्या गाड्यास खीळ घालणे	सुरळीत कामात अडथळा आणणे.	To put a spoke in the wheel.	**चालत्या गाड्यास खीळ घालणे** शहाणपणाचे नाही.
१७	तुणतुणे वाजविणे ...	तीच ती गोष्ट पुनःपुन्हा सांगत सुटणे.	To reiterate To keep on the same story.	... एकाच कुटुंबात राहावयाचे असेल तर आपापले **तुणतुणे वाजवून** चालणार नाही.
१८	थंडा फराळ करणे	१. उपाशी राहणे. २. घोटभर पाणी पिऊन राहाणे.	To dine upon a draught of cold water.	पुष्कळ गरीब लोकांना **थंडा फराळ करून** दिवस काढावे लागतात.
१९	ऊहापोह करणे ...	सविस्तर चर्चा करणे. ...	To discuss the pros and cons of a thing.	राजकारणातील महत्त्वाच्या विषयाचा **ऊहापोह केल्यावरच** निष्कर्ष काढणे चांगले.
२०	हरभऱ्याच्या झाडावर चढविणे	एखाद्याची लबाडीने खोटी स्तुती करणे.	To etevale a person by flattering.	स्वार्थ साधावयाचा असल्यास एखाद्यास **हरभऱ्याच्या झाडावर चढवावे लागते.**
२१	पगडी फिरविणे ...	१. करार मोडणे. २. पूर्वीचा पक्ष सोडून दुसरा पक्ष स्वीकारणे. ...	To change the mind.	पूर्वी कॉंग्रेस पक्षात काम केलेले काही लोक आता **पगडी फिरवीत आहेत.**

अनु-क्रमांक	वाक्प्रचार	मराठी अर्थ	इंग्रजी अर्थ	मराठी वाक्यात उपयोग
२२	माशा मारीत बसणे ...	निरुद्योगी बसणे. ...	To remain without occupation.	**माशा मारीत बसण्याने** माणूस आळशी बनतो.
२३	वाटेवर पडणे ...	सहज प्राप्त असणे. ...	To be easily accessible/ obtainable.	पैसे काय **वाटेवर पडले** आहेत ? त्यासाठी खूप श्रम करावे लागतात.
२४	सोन्याचा धूर निघणे ...	अतिशय संपत्तिमान असणे. अतिशय श्रीमंत असणे.	To have abundance of riches.	अमेरिकेत आता **सोन्याचा धूर निघत आहे.**
२५	किल्ली फिरविणे ...	१. गुप्तपणे बंदोबस्त करणे. २. काही गुप्तप्रकारे मन वळवणे.	(1) To manage secretly. (2) Work upon by some artful suggestion.	अधीक्षकांनी आधीच **किल्ली फिरवून ठेवल्यामुळे** मला रजा मिळू शकली नाही.
२६	गुण उधळणे ...	दुर्गुण प्रकट करणे.	To manifest one's evil qualities.	नोकरी लागल्याबरोबर एक महिन्याच्या आत त्याने **गुण उधळले.**
२७	नावाने खडे फोडणे ...	दूषण देणे.	To blame ... To slander	वरिष्ठ अधिकाऱ्यांना परस्पर भेटाल तर अधीक्षक तुमच्या **नावाने खडे फोडतील.**

२८	हातातोंडाशी गाठ ...	जेमतेम खाण्यास मिळणे ...	To make both ends meet with g·eat difficulty.	दोन दिवसांच्या उपवासानंतर एकदाची **हातातोंडाशी गाठ** पडली.
२९	काथ्याकूट करणे ...	निरर्थक चर्चा करणे ...	To discuss in vain To examine the pros and cons. ..	क्षुल्लक विषयावर **काथ्याकूट करीत बसू** नये.
३०	स्वर्ग दोन बोटे उरणे ...	गर्वाने अतिशय फुगून जाणे. ...	To be puffed up with pride	पूर्वी मुलगा मराठी सातवी पास झाला तर पालकाला **स्वर्ग दोन बोटे उरत असे.**
३१	राम म्हणणे ...	मरणे ..	To expire	रोगाच्या तिसऱ्या अवस्थेत रोगी **राम म्हणावयाच्या** बेतात असतो.
३२	पारावार नसणे ...	१. मर्यादा नसणे २. साधारण मर्यादेच्या पलीकडे असणे. ...	To be beyond limits	विनूच्या खोडकरपणाला **पारावार नाही.**
३३	नाव मिळविणे ...	कीर्ती संपादन करणे ...	To make a name. To earn a fame.	तुमच्या मुलाने वकिलीत **नाव मिळविले** आहे.
३४	जीव भांड्यात पडणे ...	काळजी दूर होणे ...	To get ease To find rest ...	महागाईच्या दिवसात मुलाला नोकरी मिळाली हे ऐकून आईचा **जीव भांड्यात पडला.**

अनु-क्रमांक	वाक्प्रचार		मराठी अर्थ	इंग्रजी अर्थ	मराठी वाक्यात उपयोग
३५	कागदी घोडे नाचविणे	...	कागदावर नुकत्याच वाटाघाटी करणे	To indulge in a mere red tape	कार्यालयीन कारभारात **कागदी घोडे नाचवून** कार्यक्षमता निर्माण होत नाही.
३६	गाशा गुंडाळणे	...	(सामानाची आवराआवर करून) निघून जाणे.	To leave bag and baggage.	आमच्या घरी आश्रय मिळणार नाही असे पाहून पाहुण्यांनी **गाशा गुंडाळला.**
३७	अत्तराचे दिवे जाळणे	...	पैशाची उधळपट्टी करणे	... To be extravagant...	पुष्कळ श्रीमंत लोक अजूनही **अत्तराचे दिवे जाळतात.**
३८	तोंड काळे करणे	...	निघून जाणे पळून जाणे.	... To abscond.	तुला जर माझ्या म्हणण्याप्रमाणे चालावयाचे असेल तर माझ्या घरी रहा, नाहीतर **तोंड काळे कर.**
३९	जिभेला हाड नसणे	...	जिभेवर नियंत्रण नसणे	... To have no hold over one's tongue	तो हवे ते बोलेल, त्याच्या **जिभेला हाड नाही.**
४०	अन्नास लावणे	...	उपजीविकेचे साधन मिळवून देणे.	To give employment	हल्ली सेवायोजन कार्यालय पुष्कळ तरुणांना **अन्नास लावते.**

२

निवडक म्हणी

(१) एक ना धड, भाराभर चिंध्या.	(1) Jack of all trades, but master of none.
(२) चार दिवस सासूचे, चार दिवस सुनेचे.	(2) Every dog has his day.
(३) नाचता येईना अंगण वाकडें.	(3) A bad workman quarrels with his tools.
(४) बळी तो कान पिळी (सत्तेपुढे शहाणपण नाही).	(4) Might is right.
(५) वरातीमागून घोडे.	(5) After death, the doctor.
(६) खाण तशी माती.	(6) Like father, like son; like begets like.
(७) बडा घर पोकळ वासा.	(7) Great cry and little wool.
(८) हाताच्या काकणाला आरसा कशाला?	(8) We do not want a candle to see the sun.
(९) असंगाशी संग, प्राणाशी गाठ.	(9) Bad company leads to ruin.
(१०) मनात एक, जनात एक.	(10) One in secret, another in public.
(११) करावे तसे भरावे.	(11) Reap as you sow.
(१२) यथा राजा तथा प्रजा.	(12) Like master, like man.
(१३) व्यक्ती तितक्या प्रकृती.	(13) Many men, many minds.
(१४) उथळ पाण्याला खळखळाट फार.	(14) An empty vessel makes much noise.
(१५) पुढच्यास ठेच, मागचा शहाणा.	(15) One man's fault is another man's lesson.
(१६) शहाण्याला शब्दाचा मार, मूर्खाला छडीचा.	(16) A nod for the wise, a rod for the fool.
(१७) एक हाताने टाळी वाजत नाही.	(17) There can be no quarrel without two parties (It takes two to make a quarrel).
(१८) डोंगर पोखरून उंदीर काढणे.	(18) Much a do a bout nothing.

(१९) डोळ्यात केर, कानात फुंकर.	(19) Application of a wrong remedy to a wrong disease.
(२०) जेवीन तर तुपाशी नाहीतर उपाशी.	(20) My own terms or none.
(२१) खोट्याच्या कपाळी गोटा.	(21) Evil to him who evil thinks.
(२२) खाई त्याला खवखवे.	(22) Conscience pricks wrongdoer.
(२३) अती तेथे माती.	(23) Extremes are always bad.
(२४) हलवायाच्या घरावर तुळशीपत्र.	(24) To be generous at another's expense.
(२५) हातचे सोडून पळत्याच्या पाठीस लागणे.	(25) A bird in the hand is worth two in the bush.
(२६) हात ओला तर मित्र भला.	(26) Our friend is friendly while our hand is full.
(२७) ज्याचे पोट दुखेल तो ओवा मागेल.	(27) He who is sick will seek the physician.
(२८) घर फिरले म्हणजे घराचे वासे फिरतात.	(28) In adversity even friends become foes.
(२९) इच्छा तेथे मार्ग.	(29) Where there's a will there is a way.
(३०) कामापुरता मामा (गरज सरो वैद्य मरो).	(30) Dangers past, God is forgotten.
(३१) आई जेऊ घालीना, बाप भीक मागू देईना; किंवा इकडे आड तिकडे विहीर.	(31) A dilemma (Between Scylla and charybdis).
(३२) हजीर तो वजीर.	(32) First come, first served.
(३३) येरे माझ्या मागल्या.	(33) The state is as clear as before.
(३४) नवी विटी, नवे राज्य.	(34) New Lords, new laws.
(३५) शितावरून भाताची परीक्षा.	(35) A straw shows which way the wind blows.
(३६) पाचही बोटे सारखी नसतात.	(36) Dissimilarity is the law of nature.
(३७) जशास तसे.	(37) Tit for tat.
(३८) नव्याचे नऊ दिवस.	(38) A new broom sweeps clean.

(३९) भरल्या गाड्यास सुपाचे ओझे.	(39) The last straw breaks the camel's back.
(४०) शेरास सव्वा शेर.	(40) A rougue meeting his match.
(४१) पळसाला पाने तीन.	(41) Human nature is the same everywhere.
(४२) गाढवापुढे वाचली गीता, कालचा गोंधळ बरा होता.	(42) Casting pearls before swine.
(४३) थेंबे थेंबे तळे साचे.	(43) Small drops make a pool.
(४४) दाम करी काम.	(44) Money makes the mare go.
(४५) जया अंगी मोठेपणा तया यातना कठीण.	(45) Uneasy lies the head that wears the crown.
(४६) देश तसा वेष.	(46) Be a Roman when you go to Rome.
(४७) प्रयत्नान्ती परमेश्वर.	(47) God helps those who help themselves.
(४८) नव्याचे नऊ दिवस.	(48) A wonder lasts but nine days.
(४९) गरज पडली म्हणजे अक्कल सुचते. (गरज ही शोधाची जननी आहे)	(49) Necessity is the mother of invention.
(५०) हयातीची घागर अन् ज्ञानाचा सागर.	(50) Life is short and art is long.

लेखनविषयक नियम

मराठी साहित्य महामंडळ

(मुंबई येथे दिनांक २ ऑक्टोबर १९६१ रोजी सर्वसंमत झालेले)

(१) अनुस्वार

नियम १ ला. — स्पष्टोच्चारित अनुनासिकाबद्दल शीर्षबिंदू द्यावा. उदा., तंटा, चिंच, आंबा, संस्कृत. अनुनासिकाबद्दल विकल्पाने परसवर्ण लिहिण्यास हरकत नाही.

(अ) मराठी शब्दांत अनुनासिकाचा उच्चार जेव्हा खणखणीत, स्पष्ट असतो, त्या वेळी शीर्षबिंदू लिहावा, म्हणजे अनुनासिकपूर्व अक्षरावर टिंब लिहून तो उच्चार दर्शवावा. परंतु काही शब्दांत हा उच्चार अगदी अस्पष्ट असतो, किंबहुना उच्चारला जातच नाही, तेथे ती अक्षरे अनुस्वारविरहितच लिहावी. उदा., हसणे, धावणे, सावळा, आतडे, घराणे, मेंढरू, लेकरू, मी, आम्ही, तुम्ही (तृतीयेची रूपे), जातो-गेलो (प्रथमपुरुषी रूपे), हे, ते, जे, ही, ती, जी (नपुंसकलिंगी रूपे), जेव्हा-जेव्हा, जो-तो (कालवाचक अव्यये), इत्यादी.

(आ) जेथे अनुनासिकाचा उच्चार स्पष्ट होतो, तेथे तो सामान्यतः शीर्षबिंदूनेच व्यक्त करावा. तथापि तत्सम, म्हणजे संस्कृतमधून जसेच्या तसे मराठीमध्ये आलेले जे शब्द, त्यांमध्ये परसवर्ण लिहून तो व्यक्त करण्यास हरकत नाही. या सवलतीप्रमाणे कंकण, शंख, कुंज, पंडित, चंद्र, पंचमी यांसारखे शब्द कङ्कण, शङ्ख, कुञ्ज, पण्डित, चन्द्र, पञ्चमी असे लिहिण्यास हरकत नाही. वेदान्त, देहान्त हेही असेच शब्द आहेत. परंतु तत्सम नसणारे मराठी शब्द शीर्षबिंदू देऊनच लिहावे. उदा., दंग, चिंच, खंत, उंट, संप असे शब्द दङ्ग, चिन्च अथवा चिञ्च, खन्त, उण्ट, सम्प असे लिहू नयेत. (परसवर्ण लिहिण्याची सवलत फक्त तत्सम शब्दांपुरती मर्यादित आहे.)

नियम २ रा:— य्, र, ल्, व्, श्, ष्, स्, ह यांच्यापूर्वी येणाऱ्या अनुस्वाराबद्दल संस्कृताप्रमाणे केवळ शीर्षबिंदू द्यावा. उदा., सिंह, संयम, मांस.

सिंह, संयम, मांस इत्यादी शब्दांत अनुस्वाराचा स्पष्ट उच्चार करीत असता त्यानंतर व पुढील अक्षराआधी मध्ये 'य' कार किंवा 'व' कार उच्चारात येतो. उच्चारानुसारी लेखन व्हावे म्हणून कित्येक लोक सिंव्ह, संय्यम, मांव्स असे त्यांचे लेखन करताना दिसतात. अनुस्वाराचा उच्चार स्पष्ट व पूर्ण केला की, आपोआपच 'य' वा 'व' उच्चारला जातो, म्हणून तो लिहून दाखविण्याची गरज नसते. लेखनात अनेक वेळा येणारे असे

आणखी काही शब्द पुढे दिले आहेत :- संशय, संरक्षण, संसार, संसृति, संहार, किंवा, संस्था, संवाद, संयोग, अंश, संस्कार, इत्यादी. 'ल' पूर्वी असे स्पष्टोच्चारित अनुनासिक आल्यास आणखी एक 'ल' कार मध्ये लिहिण्याची क्वचित पद्धत होती; तसेही करण्याचे कारण नाही. सं-लाप-संलाप (संल्लाप नको).

नियम ३ रा.— नामांच्या व सर्वनामांच्या अनेकवचनी सामान्यरूपांवर विभक्तिप्रत्यय व शब्दयोगी अव्यय लावताना अनुस्वार द्यावा. उदा. लोकांना, मुलांनी, तुम्हांस, लोकांसमोर, घरांपुढे.

वरील नियमातच 'नामांच्या' आणि 'सर्वनामांच्या' या शब्दांत अनुस्वाराचा उच्चार स्पष्ट होतच आहे. तो दर्शविण्यासाठी तेथे म्हणजे त्या शब्दांच्या सामान्यरूपाच्या अंत्य अक्षरावर अनुस्वार येतोच. उदाहरणादाखल घेतलेल्या शब्दांत तो तितकासा स्पष्ट नसला तरी अस्पष्टपणे उच्चारला जातो व त्यान्ला, लोकान्ला असेही उच्चार कित्येकांच्या तोंडी असलेले आढळतात. तेव्हा तो उच्चार सरसकट लिहून व्यक्त करावा हे युक्त होय.

या नियमाप्रमाणे चतुर्थीचे एकवचनी व अनेकवचनी 'स, ला' हे प्रत्यय, आणि सप्तमीचे एकवचनी व अनेकवचनी प्रत्यय 'त' किंवा 'मध्ये' हे शब्दयोगी अव्यय, नाम-सर्वनामास लावताना होत असणारा फरक विशेष लक्षात घ्यावा.

उदा.,	मुलास (ए. वचन),	मुलांस (अ. वचन)
	मुलाला (ए. वचन),	मुलांला-ना (अ. वचन)
	घरात (ए. वचन),	घरांत-मध्ये (अ. वचन)

इतर विभक्ति-प्रत्यय आणि शब्दयोगी अव्यये यांच्याबाबतही हाच नियम समजावा. उदा. मुलाशी-मुलांशी, मुलाते-मुलांते, मुलाने-मुलांनी, गावाहून-गावांहून, घरावर-घरांवर इत्यादी.

नियम ४ था.— वरील नियमाव्यतिरिक्त कोणत्याही कारणासाठी व्युत्पत्तीने सिद्ध होणारे वा न होणारे अनुस्वार देऊ नयेत.

ज्यांचा उच्चार स्पष्टपणे किंवा अस्पष्टपणे होत नाही, ते अनुस्वार देण्याचे कारण नाही ही भूमिका येथे घेण्यात आली आहे. यामुळे आतापर्यंत दिले जाणारे पुढील वेगवेगळ्या प्रकारचे अनुस्वार लेखनातून गळतील :—

१. नपुंसकलिंगी ई-कारान्त, ऊ-कारान्त व ए-कारान्त नामांच्या शेवटी उभयवचनी येणारे अनुस्वार; उदा., घरें, घरटीं, घोडें, घोडीं, लेकरूं, लेकरें, मोतीं, मोत्यें, नामें, रूपें, करणें,

बोलणें, इत्यादी. हे अनुस्वार लिहिता येणार नाहीत. (२) लिंगानुसार बदलणाऱ्या विशेषणांच्या नपुंसकलिंगी रूपांवर येणारे अनुस्वार; उदा., काळीं-गोरीं (मुलें), चांगलीं (फळें), पांढरीं (फुलें), वेडीं, शहाणीं, इत्यादीं. यातील अंत्याक्षरावरील अनुस्वार देता येणार नाहीत. (३) अर्थभेद स्पष्ट व्हावा म्हणून दिले जाणारे अनुस्वार; उदा., नाव (नौका)-नांव (नाम), पांच (पंच)-पाच (रत्नप्रकार), कां (कारण)-का (काय), जो-तो (सर्वनामे), जों-तों (कालवाचक क्रियाविशेषणे), कीं (किंवा)- की (इतर अर्थाने). तसेच घांट-घाट, कांच-काच, वाचणें-वांचणें, इत्यादी हे अनुस्वार देण्याची गरज नाही. (४) क्रियापद रूपांवरील पुरुषवाचक अनुस्वार; उदा., मी-आम्ही, जातों-गेलों, करितों, करीं, असें, करीत असूं; तुम्ही करितां, करां, गेलां, करीत असां; हे प्रथम पुरुषवाचक व द्वितीय पुरुषवाचक अनुस्वार देण्याचे कारण नाही, देऊ नयेत. (५) नपुंसकलिंगी ए-कारान्त सर्वनामांवरील अनुस्वार; उदा., जें, तें, हें (जीं-तीं-हीं ही अनेकवचनी रूपेसुद्धा) हे अनुस्वार आता द्यावयाचे नाहीत. (६) विभक्तिमूलक अनुस्वार सर्वच्या सर्व वरील नियमाप्रमाणे गळतात. तृतीयेचे नें, नीं, एं, हीं, शीं, चतुर्थीचा तें, सप्तमीचे तं, ईं, या प्रत्ययांवरील अनुस्वार देण्याची गरज नाही. रामें, रामानें, लोकांनीं, त्यांहीं लोडाशीं, रामातें, घरांत, घरीं, दारीं, हे शब्द अनुक्रमे रामे, रामाने, लोकांनी, त्यांही, लोडाशी, रामाते, घरात, घरी, दारी असे लिहावे. (७) तां, तांना, ऊं या प्रत्ययांनी साधलेल्या धातुसाधितांवरील अनुस्वारही गळतात. जातां-येतां, जातांना-येतांना, जाऊं--करूं, इत्यादी प्रयोगातील अनुस्वार आता उरले नाहीत.

(२) ऱ्हस्व-दीर्घ

नियम ५ वा. –तत्सम (ऱ्हस्व) इ-कारान्त आणि उ-कारान्त शब्द प्रथमेत दीर्घान्त लिहावे; उदा. कवी, मती, गती, गुरु. इतर शब्दांच्या अंती येणारा इ-कार व उ-कार दीर्घ लिहावा. उदा., पाटी, जादू, पैलू, विनंती, ही (शब्दयोगी अव्यय).

अपवाद : आणि, नि. स्पष्टीकरण :–– परंतु, यथामति, तथापि, इत्यादी तत्सम अव्यय ऱ्हस्वान्त लिहावी. तसेच सामासिक शब्दांतही तत्सम (ऱ्हस्व) इ-कारान्त व उ-कारान्त शब्द पूर्वपद असताना ऱ्हस्वान्तच लिहावे. उदा. बुद्धिवैभव, कविराज, गतिमान, गुरुवर्य.

प्रथमेत म्हणजे प्रथमेच्या दोनही वचनांत, त्याप्रमाणे प्रथमेबरोबर अप्रत्ययी द्वितीयाही अभिप्रेत आहे. तत्सम ऱ्हस्वान्त शब्द मुळामध्ये ऱ्हस्वान्तच आहेत ही भूमिका येथे मान्य आहे. त्यामुळे समासांमधून ते तसेच उच्चारले जातात म्हणून समासांत उत्तरपद नसताना

ते तसेच म्हणजे ऱ्हस्वान्तच लिहावे. सामासिक शब्दांबरोबर गतिमान, गुरुवर्य, इत्यादी साधित शब्दांनाही हाच न्याय लागू आहे. विभक्तिप्रत्यय आणि शब्दयोगी अव्यये लावताना ते दीर्घान्त उच्चारले जातात, म्हणून पूर्वीही दीर्घान्त लिहिले जात; परंतु प्रत्यय किंवा शब्दयोगी अव्यये लागलेली नसतानाही मराठीच्या स्वभावानुसार ते बहुधा दीर्घान्तच उच्चारले जातात. म्हणून प्रथमेत आणि अप्रत्ययी द्वितीयेत असता ते दीर्घान्त लिहावे असा या नियमाचा अभिप्राय आहे. या अभिप्रायाप्रमाणे कवि, गति, मति, स्थिती, दृष्टि, वृष्टि, अग्नि, अतिथि, अद्रि, पति, इत्यादी शब्द याप्रमाणे दीर्घान्त लिहावे. अप्रत्ययी द्वितीयेची उदाहरणे :–(१) मी तुझे हेतू जाणतो; (२) कौरवांनी विराटाच्या धेनू पळविल्या.

नियम ६ वा.— (दीर्घ) ई-कारान्त व उ-कारान्त शब्दांतील उपान्त्य इ-कार व उ-कार ऱ्हस्व लिहावे. उदा. गरिबी, माहिती, हुतुतू, सुरू. अपवाद :— नीति, भीति, रीति, कीर्ति, इत्यादी तत्सम शब्द.

तत्सम शब्दांची ही यादी आणखी पुष्कळच वाढविता येईल. प्रीति, भूमि, स्फूर्ति, दीप्ति, ऊर्मि, वीचि, विभूति, इ. शब्द असे आहेत. हे तत्सम शब्द मुळात दीर्घान्त नसल्याने वस्तुतः प्रस्तुत नियमाच्या कक्षेत येऊ नयेत. परंतु नवीन लेखनाप्रमाणे ते प्रथमेत आणि अप्रत्ययी द्वितीयेत दीर्घान्त लिहावयाचे असल्याने ते दीर्घान्त शब्दच मानले जाण्याचा संभव आहे. म्हणून अपवादरूपाने त्यांचा वेगळा उल्लेख केला आहे. इतर दीर्घस्वरान्त शब्दरूपातसुद्धा उपान्त्य इ-कार व उ-कार उच्चाराप्रमाणे ऱ्हस्व लिहावे. उदा., बोलवित मिळवितो, ठेविले, इ.

नियम ७ वा.— अ-कारान्त शब्दांचे उपान्त्य इ-कार व उ-कार दीर्घ लिहावे. उदा., गरीब, वकील, वीट, सून, वसूल. अपवाद :— ऱ्हस्वोपान्त्य अ-कारान्त तत्सम शब्द, उदा., गुण, शिष्य, मधुर, प्रचुर.

असे आणखीही काही शब्द पुढे दिले आहेत :—

(अ) विहीर, उंदीर, आमीर, फकीर, भरीव, कणीक, ठरीव, हुरूप, नाजूक, पूर.

(आ) अपवादभूत तत्सम शब्द :— शुक, विधुर, मंदिर, जटिल, भिन्न, अखिल, अधिप, छिन्न, छिद्र, अंकुश, अंकुर, अद्‌भुत, अरुण इ. सर्वसाधारणपणे तत्सम शब्दांच्या मूळ रूपांत बदल होऊ नये, मुळात त्यांचे जसे उच्चार होतात, तसेच ते कायम राहावे व केवळ विभक्तिरूपात किंवा शब्दयोगी अव्यये लागताना अपरिहार्य असे उच्चारानुसारी

फरक त्यात करावे. इतर करू नयेत, अशी या नियमामागील भूमिका आहे. हे लक्षात घेऊन सामाजिक, कायिक, वाचिक, स्थानिक, इत्यादी इक-प्रत्ययान्त तत्सम शब्द ऱ्हस्वोपान्त्यच लिहावे. इतरत्रही हीच भूमिका लक्षात ठेवावी. तत्सम नसणारे भिंत, धुंद यासारखे शब्द उच्चारा प्रमाणे ऱ्हस्वोपान्त्यच लिहावे.

नियम ८ वा.—उपान्त्य दीर्घ ई-ऊ असलेल्या शब्दांचा उपान्त्य इ-कार-उ-कार उभय-वचनी सामान्यरूपाच्या वेळी ऱ्हस्व लिहावा; उदा., गरिबास, वकिलांना, सुनेला, वसुलाची, नागपुरास, जिवाला (प्राण, मन या अर्थी). अपवाद.— दीर्घोपान्त्य तत्सम शब्द, उदा., शरीरास, गीतेत, सूत्रास, जीवास (प्राणी या अर्थी).

तांदूळ, बेडूक, कापूस, ढेकूण इत्यादी शब्दांचे सामान्यरूप करताना उपान्त्य 'ऊ' राहात नाही. त्या ठिकाणी वरील नियमाचा उपयोग नाही हे उघड आहे. त्यांची रूपे बेडकांनी, कापसाची, ढेकणांना अशी होतात. तेथे 'उ' ऱ्हस्व वा दीर्घ होण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही. दीर्घोपान्त्य तत्सम शब्दात उपान्त्य ई-कार वा ऊ-कार ऱ्हस्व होत नाही याची आणखी उदाहरणे पुढे दिली आहेत.— क्रीडा, लीला, वीणा, वीर, शीत, गीत, संगीत, दूत, पूजा, मयूर, भूत, पूर्व, चूर्ण, धूलि, दीप, नीच, दीन, परीक्षा, पीठ, पीडा, नवीन, प्रवीण, इत्यादी.

(३) किरकोळ

नियम ९ वा.—पूर हा ग्रामवाचक शब्द कोणत्याही ग्रामनामास लावताना दीर्घोपान्त्य लिहावा. उदा., नागपूर, संबळपूर, तारापूर.

नियम १० वा.—कोणता, एखादा ही रूपे लिहावी; कोणचा, एकादा ही रूपे लिहू नयेत.

नियम ११ वा.— हळूहळू, मुळूमुळू, खुटूखुटू या शब्दांतील दुसरा स्वर व चौथा स्वर दीर्घ लिहावा.

नियम १२ वा.—ए-कारान्त नामाचे सामान्यरूप या-कारान्त करावे. उदाहरणार्थ, करण्यासाठी, फडक्यांना (म्हणजे फडके यांना), पाहण्याला; करणेसाठी, फडकेंना, पाहणेला यासारखी ए-कारान्त सामान्यरूपे लिहू नयेत.

नियम १३ वा.—लेखनात पात्राच्या किंवा वक्त्याच्या तोंडी बोलण्याची भाषा घालावी लागते. त्यावेळी तिचे स्वरूप बोलण्यातील उच्चाराप्रमाणे असावे. अन्य प्रसंगी तसे लिहू नये.

नियम १४ वा.-- मराठीत रूढ झालेले पुढील तत्सम शब्द अकारान्त लिहावे :—
क्वचित, कदाचित, अर्थात, अकस्मात, विद्वान इत्यादी

असे आणखी काही शब्द पुढे दिले आहेत :-- किंचित्, तद्वत्, तस्मात्, दैववशात्, श्रीमान्, धनवान्, भगवान, विद्युत्, परिषद्, संसद्, सम्राट् हे शब्द किंचित, तद्वत, तस्मात, दैववशात, श्रीमान, धनवान, भगवान, विद्युत, परिषद, संसद, सम्राट असे लिहावेत.

• • •

शासकीय मुद्रणालय, वाई